म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ५८८

# साहित्य--संग्रह

भाग २ रा.

लेखक: शिवराम महादेव परांजपे.

REFBK-0002703

# साहित्य--संग्रह

## भाग २ रा.

लेखक :

शिवराम महादेव परांजपे.

२७०३

REFBK-0002703

किंमत १॥ रु.

सन १९२५.

मुद्रक व प्रकाशक:—
शिवराम महादेव परांजपे

× × ×

× × ×

गोवर्धन प्रेस,
६ शुक्रवार,
पुणें.

# अनुक्रमणिका.


१ एक जुनी पुराणांतरींल नवीन सांपडलेली गोष्ट ... १

२ धर्मप्रसाराच्या पद्धतीचा बौद्धधर्मातील एक नमुना भाग १ ... ... ... १४

३ धर्मप्रसाराच्या पद्धतीचा बौद्धधर्मातील एक नमुना भाग २ ... ... ... २३

४ इफिजीनिआ आणि ऑरेस्टेस ... ... ३२

५ श्रद्धा ... ... ... ... ६०

६ प्रस्थानत्रयीची एकवाक्यता ... ... ७५

७ मालकम साहेबांचीं कारस्थानें ... ... ९१

८ शब्दांच्या वाढीचा इतिहास ... ... ११०

९ महाराष्ट्र भाषेंतील वेदान्तपर ग्रंथ लिहिण्याच्या पद्धतींचें पर्यालोचन ... ... ... १२८

१० पूर्वजन्म आणि पुनर्जन्म ... ... १४०

११ मदनदहन ... ... ... ... १५५

१२ नवी सृष्टि ... ... ... ... १७१

२५.३१७. २१५
२७०३

# साहित्य-संग्रह.

## भाग दुसरा.

## एक जुनी पुराणांतरींची नवीन सांपडलेली गोष्ट.

समुद्राच्या पाण्यांत काय काय रत्नें सांपडतील याचा कांहीं नियम नाहीं. पृथ्वीचीही गोष्ट तशीच आहे. आणि त्यावरूनच 'बहुरत्ना वसुंधरा' असें म्हणण्याचा परिपाठ पडलेला आहे. समुद्र आणि पृथ्वी यांच्याप्रमाणेंच गतकालाचेंही जठरकुहर फार अनंत आणि अगम्य असें असलें पाहिजे, असें त्यांत गडप झालेल्या ज्या कित्येक जुन्या वस्तु नवीन काळांत उपलब्ध होऊन प्रसिद्धीस येतात, त्यांवरून म्हणावें लागतें! असल्या जुन्या गोष्टी आणि जीर्ण ग्रंथ भूतकाळाच्या काळोखांतून वर्तमानकाळाच्या प्रकाशांत आले असतां त्यांचे जड देह जरी जागोजागीं छिन्नविच्छिन्न झालेले असले, तरी त्यांच्यांतील अंतर्गत सत्य पूर्णपणें कायम राहिलेलें असतें, हें पाहून कोणाला आश्चर्य वाटणार नाहीं?

× × × × ×

° हें जग निर्माण करून त्याची साधारणपणें चालचलाऊ व्यवस्था लावून दिल्यानंतर कार्तिक शुद्ध एकादशीपासून आषाढ शुद्ध एकादशीपर्यंत आठ

महिने ह्या त्रैलोक्याच्या सुप्रतिष्ठितत्वासंबंधानें जें कांहीं कामकाज असेल तें पहावयाचें, आणि आषाढी एकादशीपासून तों फिरून कार्तिकी एकादशी-पर्यंत चार महिने क्षीरसमुद्रामध्यें जाऊन स्वस्थ झोंप घ्यावयाची, असा विष्णूनें आपल्या राज्यकारभाराचा क्रम ठरवून ठेवलेला होता. विष्णूची दृष्टि दूर आणि कारकीर्द करडी, अशी स्थिति असल्यामुळें कोणाला आपल्या कांहीं मूर्खपणाच्या महत्त्वाकांक्षा परिपूर्ण करून घ्यावयाच्या असल्या, तर तसें करण्याला त्यांना सहसा संधि मिळत नसे. पशूंची पूर्वीं एकदां अशी फार महत्त्वाकांक्षा होती कीं, आपणही मनुष्यांच्यासारखें वागावें. मनुष्यांच्यांत आणि आपल्यांत ठेविलेला जन्मसिद्ध फरक पाहून त्यांच्या पायाची आग अगदीं शिंगापर्यंत जाऊन पोहोंचत असे, व हें सगळें विष्णूच्या कपटाचें कारस्थान असावें, अशी त्यांची समजूत झालेली होती; आणि त्यामुळें विष्णूबद्दल त्यांचें मत अगदीं प्रतिकूळ होऊन गेलेलें होतें.

ही आपली स्थिति बदलून घेण्याला काय उपाय योजावेत, आणि विष्णूला न कळत आपले इच्छित हेतु परिपूर्ण करून देण्याला कोण भोळसट तयार होईल, या विचारांमध्यें ते पुष्कळ दिवस निमग्न झालेले होते. अखेरीस स्वबुद्धीच्या गजगतीनें विचार करितां करितां एकदां त्यांच्या असें लक्षांत आलें कीं, आपल्याला पाहिजे तशी शंकर ही भोळसर देवता आहे. पण तेथें आपला वशिला कसा लागतो, अशी दुसरी काळजी त्यांना नंतर लगेच येऊन पडली. परन्तु ही काळजी फार वेळ टिकली नाहीं. त्या पशूसंघापैकीं जे नंदीबैल होते, ते अत्यंत हर्षित होऊन म्हणाले कीं, ' ही काळजी आपल्याला मुळींच नको. हिचें आम्ही एका क्षणांत निवारण करतों. आमचा एक आत खुद्द शंकराच्या जवळ नेहमीं असतो. त्याच्यावांचून शंकराचें एक पाऊलसुद्धां हलत नाहीं ! शंकराच्या सर्व हालचाली त्याच्या तंत्रानें चालत असतात. आणि तो जशी मान हलवील, तशी शंकराच्या हातांतील सूत्रें हालत असतात. त्याच्याकडून आम्ही हें काम करवून घेऊं.' ह्या वशिल्याचा मागचा दरवाजा अचानक उघडा झालेला पाहून सर्व पशूंना फार आनंद झाला. व नंदीबैलांच्या गोत्रांतील मूळ पुरुष जो शंकराच्या घरीं मोठ्या हुद्द्याच्या आणि दर्जाच्या अधिकारावर होता, त्याची गुप्तपणें गांठ घेऊन आपल्या जातीच्या लोकांना उच्चावस्था प्राप्त करून देण्याविषयीं

त्याचें मन वळविण्याच्या कामगिरीवर जाण्याकरितां ज्या महाबुद्धिमान् आणि मुत्सद्दी नंदीबैलांनीं ही युक्ति सुचविली होती, त्यांचीच नेमणूक करण्यांत आली. पुढें सर्व गोष्टी यथास्थित जुळून आणि शंकराच्या नंदीलाही आपल्या सजातीयांची महत्त्वाकांक्षा अगदीं प्रशंसनीय आहे असें वाटून, ' योग्य संधि पाहून मी हें तुमचें म्हणणें शंकराच्या पुढें रुकाराकरितां ठेवून त्याची मंजुरी तुम्हाला हळूच युक्तीनें काढून देववितों, ' असें त्यानें त्यांना आश्वासन दिलें. आणि अशा रीतीनें आपली कामगिरी फत्ते करून हें नंदीबैलांचें प्रतिनिधि मंडळ आनंदानें आणि अभिमानानें प्रोत्साहित होऊन परत आलें.

आषाढाच्या वद्य पक्षांतील गोष्ट. शिवरात्रीचा दिवस होता. ऋतुमानाप्रमाणें जरी पावसाळा सुरू झाला असें म्हणण्यांत येत होतें, तरी त्या वेळीं पाऊस पडण्याला सुरवात झाली नव्हती. जरी आकाशांत ढग आले होते, अंतरिक्षांत सोसाट्याचे वारे मोकळे सुटले होते, क्षीरसमुद्रांत तुफानांच्या लाटा उसळत होत्या, आणि नभोमंडळांत सूर्याचे किरण एकुणएक झांकून गेले होते, तरी पण उष्मा होण्याचा थांबला नव्हता. उकाडा फार होत होता. कैलासपर्वतावरही शंकराच्यानें तो प्रखर ताप सहन होईना. तेव्हां पूर्वीं हालाहल विषाच्या वेळीं ज्या रामनामानें गुण आला होता, तेंही घोकून म्हणून पाहिलें. परंतु कांहीं उपयोग होईना. तेव्हां भृंगी, रिटी वगैरे माहीतगार पार्श्वगणांनीं भांगेचा घोटा तयार करून आणिला. त्या आदिमाया शांभवीच्या प्रभावानें थोडथोडी थंडाई येत आहे, असें वाटल्यावरून आणखीही कांहीं कमंडलूंचें सेवन करण्यांत आलें. त्याच्या योगानें मस्तकाच्या आंतील ज्ञानतंतूंच्या जटाजूटावर हळू हळू परिणाम होत चालला आहे, असें पाहून शंकराच्या खालोखालच्या हुद्यावरील अधिकारी जो नंदी त्यानें आपल्या जातभाईंचा अर्ज पुढें काढला. भगवान् विष्णु क्षीरसागरामध्यें झोंपीं गेलेले आहेत आणि शंकर शांभवीसेवन समाप्त करून सारीपाट खेळण्याला जाण्यासाठीं उत्सुक झालेले आहेत, अशी संधि साधून त्या गडबडींत नंदीनें पृथ्वीतलावरील पशुजनांचे हाल हल्लीं कसे चालले आहेत, आणि त्यांतून मुक्त होण्याविषयीं आणि माणसांच्या बरोबरीनें वागण्याची परवानगी मिळण्याविषयीं त्यांनीं किती उत्कट महत्त्वाकांक्षा धारण केली आहे, याबद्दलची सविस्तर हकीकत शंकराच्या कानावर घातली. शंकर हे

दैवत सर्व देवतांमध्यें अतिशय भोळें आणि दयाळू. ही हकीकत त्यांनीं अर्धीमुर्धी ऐकिली असेल नसेल, तोंच त्यांना गहिंवर आला, आणि 'शक्य असेल तर मनुष्यांप्रमाणें वागण्याची आपली महत्त्वाकांक्षा पशुजनांनीं तृप्त करून घ्यावी,' असा अर्धवट वर देऊन भगवान् शंकर हिमालयाच्या एका गुहेमध्यें पार्वतीसह प्रवेश करते झाले.

नंदीला पडत्या फळाची आज्ञा. शंकराकडून मिळालेल्या वरप्रदानाची बातमी त्यानें तावडतोब मृत्युलोकीं कळविली, तेव्हां सर्व पशूंना जो आनंद झाला, त्याचें वर्णन जितकें करावें तितकें थोडेंच! पहिला वशिला नंदीबैलांचा लागला, नंदी हा त्यांच्या गोत्रांतील पुरुष, आणि नंदीबैलांच्या तर्फेनें अखेरीस हें काम फत्ते झालें, अशा अनेक कारणांमुळें आतां नवीन तऱ्हेवर व्हावयाच्या घटनेमध्यें स्वाभाविकपणेंच नंदीबैलांचें महत्त्व आणि वजन फार वाढलें. ते मोठे मुत्सद्दी म्हणून गणले जाऊं लागले, आणि कोणाला कांहीं शहाणपणाची सल्लामसलत विचारावयाची झाली तर ते या पशुप्रमुख नंदीबैलांकडे येऊन विचारीत असत. बैलांचा हा उत्कर्ष सहन न होऊन टोणग्यांच्याही मनामध्यें मत्सर उत्पन्न झाला, आणि यमाच्या वशिल्यानें त्यांनींही आपलें प्रस्थ बैलांच्या बरोबरीनें वाढवून घेतलें. परंतु गाढवांनीं असें पाहिलें कीं, आपल्याला कोणीच वाली नाहीं, तेव्हां आपल्याला जी कांहीं योग्यता संपादन करावयाची असेल, ती आपण आपल्या अश्रांत श्रमाच्या जोरावरच संपादन केली पाहिजे, आणि त्याप्रमाणें त्यांनीं केलेंही. अशा रीतीनें त्यांचा या पशुसमाजामध्यें दर्जा वाढल्यानंतर ते कधीं कधीं बैल, टोणगे इत्यादिकांना उपरोधिक भाषेमध्यें अशा दुगाण्या झाडीत कीं, 'आमच्या गोत्रांतील कोणीही पूर्वपुरुषानें अजूनपर्यंत जर कधीं कोणत्याही देवाचे चाबूक खाल्लेले नाहींत, तर आमचा तिकडे वशिला लागतो कोठून'! अशा रीतीनें कोणीं हरामीनें तर कोणी हलालीनें आपली योग्यता वाढवून घेतली. आणि त्याचा परिणाम असा विलक्षण झाला कीं, अगदीं निर्भेळ मूर्खपणा देखील शुद्ध अकलेसारखा चमकूं लागला! जनावरांची ही चळवळ पाहून त्यांच्याबद्दल कित्येक माणसांच्याही मनांमध्यें आपल्या बंधूंविषयीं सहानुभूति उत्पन्न झाली; आणि मनुष्यांच्या सारखी त्यांची रहाणी वगैरे करून देण्याचें कामीं ते त्यांना मनःपूर्वक

मदत करूं लागले. व अखेरीस पशूंच्या संबंधानें सदोदित सहानुभूतिपूर्वक पहातां पहातां कांहीं बाबतींत माणसांच्यापेक्षां जनावरांच्या मध्येंच जास्त चांगले गुण आहेत, असें त्यांना दिसून येऊं लागलें; आणि त्यामुळें जे गुण जनावरें सहज दाखवूं शकतात, त्या बाबतींत माणसांनीं कांहीं अवगुण दाखविले, तर जनावरांना बक्षीस म्हणून माणसांच्या समाजामध्यें घ्यावें, आणि माणसांना शिक्षा म्हणून पशूंच्यासारखें रहावयाला लावावें, असाही क्रमाक्रमानें त्यांच्या मताचा कल होऊं लागला.

कित्येक मनूच्या वंशजांकडून अशा प्रकारें प्रोत्साहन मिळूं लागल्यापासून तर पशुसमाजाची सुस्थिति फार जलदीनें वाढूं लागली, व त्यांनीं कित्येक महत्त्वाच्या गोष्टी तावडतोब अमलामध्येंही आणल्या. पहिली गोष्ट त्यांनीं जी केली ती कृतज्ञतापूर्वक आपल्या आश्रयदात्यांचे उतराई होण्याची होय. ज्यांच्या वरप्रदानामुळें आपल्याला मानवी जीवितपद्धत शक्य होत आहे, त्या शंकराला त्यांनीं आपल्या सर्वांचा मुख्य पति असें मानण्याचें ठरविलें आणि तेव्हांपासून शंकर हे ‘पशुपति’ या बहुमानास्पद अभिधानानें सर्व पशुसमाजामध्यें प्रसिद्ध झाले. तसेंच ‘नंदिकेश्वर’ हीही दुसरी एक पदवी त्यांनीं शंकराला पूर्वस्मरणपूर्वक समर्पण केली. अशा रीतीनें कृतज्ञतेचा दोष टाळून झाल्यानंतर मग ते पशु माणसारखा रीतरिवाज आपल्यामध्यें आणण्याच्या उद्योगाला लागले. पशूंना चार पाय असतात, हा जो अत्यंत अपमानकारक जनप्रवाद, त्याच्याविरुद्ध त्यांनीं प्रथम् मोहीम सुरू केली. पशूंतील पंडितांनीं असा युक्तिवाद काढला कीं, “पशूंना चार पाय असतात, ही खोटीच कल्पना माणसांनीं आमचा अपमान करण्याकरितां मुद्दाम काढली आहे. वास्तविक पाहिलें असतां आम्हांलाही हे चार पाय नसून माणसांप्रमाणेंच आमचे हे दोन हात आणि दोनच पाय आहेत. आणि याला जर चार पाय असें म्हणावयाचें असेल, तर मग माणसांनाही चार पाय असतात, असें ह्मणण्याला काय हरकत आहे! आतां एवढें मात्र खरें कीं, आमच्या हातांचा आम्ही माणसांप्रमाणें उपयोग न करितां चालण्याच्या कामाकडेच त्यांचा उपयोग करितों. तेवढ्या बाबतींत आपण सुधारणा करणें अवश्य आहे.” अशा युक्तिवादानें प्रेरित होऊन पशु माणसांसारखे बसूं आणि चालूं लागले. इतकेंच नव्हे, तर अशाच रीतीनें त्यांनीं इतर बाबतींतही मनुष्यांचें अनुकरण जारीनें सुरू केलें. ते माणसां-

सारखे पाटावर जेवूं लागले, खुर्चीवर बसूं लागले, गाड्यांत फिरूं लागले, मेण्यांतून आणि पालख्यांतून मिरवूं लागले, आणि मऊ गाद्यांच्या पलं-गावरून निजूं लागले. फार काय माणसांच्या लग्नकार्यांतून आणि मेज-वान्यांतून, उपहारगृहांतून आणि मदिरामंदिरांतून, सभांतून आणि इतर समारंभांतून पशु माणसांसारखें मिरवूं लागले !

माणसांशीं जसजसा जास्त सहवास होत चालला, तसतशी पशूंच्या लक्षांत आणखी एक गोष्ट येऊं लागली. मनुष्यांनीं आपणा स्वतःकरितां एक प्रतिष्ठित भाषा राखून ठेविली असून जनावरांच्या करितां हलकटपणाचे द्योतक असे दुसरे शब्द ते वापरतात, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत आली, व त्यामुळें त्यांना फार राग आला. अशाच पंक्तिप्रपंचाच्या आणखीही पुष्कळ गोष्टी त्यांच्या कानावर जाऊन त्यांचीं मनें मत्सरानें कलुषित झालीं, व 'जशास तसें' या न्यायानें मनुष्यांच्यापाशीं वागण्याची कल्पिकल्पनाही त्यांच्या डोक्यामध्यें डोकावूं लागली. या बाबतींत पहिल्यानें त्यांनीं कित्येक पशुपंडितांकडून पशूंपाशीं सभ्य रीतीनें आणि बरोबरीच्या नात्यानें कसें बोललें पाहिजे, हें शिकविण्याकरितां एक पुस्तक तयार करविलें. त्यांतील सगळे नियम येथें देणें अशक्य आहे. परंतु माणसांच्या माहिती-करितां त्यांतील कांहीं महत्त्वाच्या गोष्टी येथें नमूद करणें अप्रासंगिक होणार नाहीं. जनावरांच्या खाण्याला 'वैरण' 'आंबोण' असें मनुष्यानें आपल्या भाषेमध्यें कांहीं शब्द करून ठेविलेले आहेत; परंतु इतःपर हे अपमानकारक शब्द जनावरांच्या जेवणाला कोणीही लावूं नयेत. अन्नसामग्री, भोजन इत्यादि जे शब्द मनुष्यांच्या जेवणाला लावतात, तेच शब्द जनावरांच्याही जेवणाला लावावेत, आणि असें जो कोणी करणार नाहीं, त्या मनुष्याच्या जेवणाला वैरण, आंबोण हे शब्द लावण्यांत येतील. जनावरें पाणी पीत असतांना त्यांना 'लो, लो,' असे अपमानकारक शब्द वापरण्याची मनुष्यांनीं वहिवाट ठेविली आहे; ही त्यांनीं तावडतोब बंद करावी. आणि मनुष्याप्रमाणेंच जनावरांपुढेंही स्वच्छ तांब्यापंचपात्री (बादली किंवा घमेलें नव्हे,) पाण्यानें भरून व जवळ शक्य असेल तर गुळाचे खडे ठेवून 'अहो, पशुमहाराज, आपण जलपान करावें,' अशी सभ्यपणाची विनंति करावी. कोणी जनावर एखादे वेळीं चुकून वाटेंत उभें असेल, तर त्याला 'हैक, हैक,' अशा

निंदास्पद शब्दांनीं हाकलून लावितात, त्या ऐवजीं 'अहो जनावरमहाराज, जरा बाजूला सरण्याची आपण तसदी घ्याल काय?' असें नम्रतापूर्वक विनविल्यास जनावरें बाजूला सरणार नाहींत काय? उगीच त्यांचें मन दुखविण्यांत काय अर्थ आहे? एखाद्या जनावराच्या वाटेंत एखादा मनुष्य उभा असला, आणि त्या जनावरानें त्याला "हैक, हैक,' असें म्हटलें, तर मनुष्याला कसें बरें वाटेल? हें लक्षांत आणून सभ्य शब्दांनीं सभ्यांनीं सभ्यांना संबोधावें हेंच उचित होय. अशा प्रकारचीं पाशवीय धर्मशास्त्रांतील सदाचाराचीं अनेक तत्त्वें पुष्कळ पशुप्रिय माणसांनाही पसंत पडून ते त्याप्रमाणें आपल्या वर्तनामध्यें त्यांचा उपयोग करूं लागले होते. त्यांच्या तोंडून कोणत्याही सभ्य पशूला उद्देशून अपशब्द निघत नसत. ते एखाद्या टोणग्याला 'टोणगा' 'हल्या' असल्या निरुपपद नांवांनीं कधींही हाक मारीत नसत. तर त्यांच्या संबंधानें बोलावयाचें झाल्यास 'टोणगेश्वर' 'महिषाधिपति,' 'महिषोत्तम,' असे शब्द वापरीत. एके वेळीं कोणी एक टोणगेश्वर नापिकाकडून आपल्या अंगावरील केशविलुंचन करवीत असतां त्या क्रियेला उद्देशून कोणी एक असंस्कृत बुद्धीचा मनुष्य भलताच एक अपशब्द वापरूं लागला असतां आसपासच्या लोकांनीं त्याचें तोंड दाबून टाकलें आणि 'टोणगेश्वर महाराजांची श्मश्रु चालली आहे.' असें सभावित शब्द वापरण्याविषयीं त्याला उपदेश केला. असल्या लोकमताच्या दहशतीमुळें कित्येक शब्दप्रयोग त्या वेळीं भाषेंतून अजीबात नाहींसे झाले! 'म्हैस गोठ्यांत बांधली आहे' हें वाक्य लुप्त झालें. आणि त्याच्या ऐवजीं 'महिषी आपल्या महालामध्यें विराजमान झालेली आहे,' अशी भारदस्तपणाची भाषा रूढ झाली. तसेंच 'गव्हाणी' हा शब्द नष्टप्राय होऊन त्याच्या जागीं 'भोजनालय' हा शब्द आला होता आणि कोठिंब्यामध्यें अबोण ठेवण्याची पद्धत मोडली जाऊन ताटामध्यें वाढलेलें पंचपक्वान्नाचें जेवण पशूंच्या पुढें ठेविलें जात होतें. एक गांवढळ मनुष्य 'म्हैस गाभण होती ती विऊन तिला पारडी झाली,' असा कोणाला निरोप सांगत असतां तो एका शिष्ट मनुष्यानें ऐकल्याबरोबर त्यानें आपल्या कानांत बोटें घातलीं, व पहिला दुःखाचा आवेग कमी झाल्यावर मग त्यानें त्या रानटी मनुष्याला 'महिषी गरोदर होती ती प्रसूत होऊन तिला

कन्यारत्न झालें ' असे शिष्टसंमत, शब्दप्रयोग करण्याविषयीं समजून सांगितलें. एकदां कांहीं बैल, टोणगे आणि त्यांचे मित्र मनुष्य, इत्यादिकांचा समाज कांहीं विचाराकरितां एकत्र जमला असतां त्यांत एक बैल कोठें दिसेना, तेव्हां तो कोठें गेला असावा याबद्दल चौकशी चालू झाली. इतक्यांत एका अडदांड मनुष्यानें त्या भर सभेमध्यें येऊन असें सांगितले कीं ' त्या बैलाला कोंडवाड्यांत कोंडून ठेविलें आहे ! हे अपमानास्पद शब्द उच्चारले गेल्या-बरोबर त्या सभेमध्यें फार चळवळ सुरू झाली. पशूंना फार वाईट वाटलें. एका बैलानें तर असे उद्गार काढले कीं, ' मनुष्यांना अक्कल नसतेच कां हो ? ' कित्येक इसम आपल्या नागपुड्या फुरफुरावून दुःखाचे दीर्घ श्वासोच्छ्वास टाकूं लागले. आणि कित्येकांच्या डोळ्यांतून अश्रुबिंदु पतन पावूं लागले. परंतु अशा रीतीनें मनांतल्या मनांत आपलें दुःख दाबून ठेवण्याचें न आवडून त्यांपैकीं एका पशुगृहस्थानें आपल्या मनुष्यमित्रांना उद्देशून असें उघड बोलून दाखविलें कीं, "हे मद्बांधवांनो, हे पशूंनो—अथवा छे, छे ! तुम्हांला पशु म्हणून हाक मारण्याची मला लाज वाटते. पशूंच्या योग्यतेपर्यंत चढण्याला अद्या-पि तुम्हांला पुष्कळ अवकाश दिसतो, म्हणून मी म्हणून आतां निरुपायास्तव मनुष्यच म्हणतों—हे मनुष्यांनो, आमच्यांपैकीं कोणी गृहस्थ अटकेंत पडला तर त्याला तुम्ही 'कोंडवाड्यांत पडला,' असे कां म्हणतां ? अशी' भिन्न भाषा कां ? तुम्ही अटकेंत पडलां, तर मात्र तुम्ही तुरुंगांत पडला असें म्हणतां. आणि आम्हांलाच तेवढें कोंडवाड्यांत कां घालतां ? " त्या सभेमध्यें जे कित्येक मनुष्य होते, त्यांना या तर्कशास्त्राच्या समानतेची साक्ष इतक्या सहृदयतेनें पटली कीं, ज्या आडदांड मनुष्यानें सभेमध्ये 'कोंडवाडा' हा शब्द उच्चारला होता त्याला धरून ते तुरुंगाकडे गेले, आणि तेथें तुरुंगांत अस-लेल्या बैलाला सोडवून त्या ठिकाणीं या माणसाला त्या कोंडवाड्यांत चार पायांवर उभें राहावयाला लावून कोंडून टाकलें, व फिरून सभेंत येऊन ते सांगूं लागले कीं, असे कडक उपाय योजिल्यावांचून मनुष्यांची ही अपशब्द बोलण्याची संवय कधींही जावयाची नाहीं, व ते पशूंच्या उच्च कोटीला येऊन पोहोंचण्याला कधींच लायक व्हावयाचे नाहींत. पशूंनीं दुसरी एक तक्रार अशी उपस्थित केली कीं, कोणा पशूची तब्यत बिघडली, तर त्याला शालिहोत्राच्या ग्रंथांतील औषधोपचार कां ? तेव्हां त्यांच्या समाधानासाठीं

चरक, सुश्रुत, वाग्भट, इत्यादिकांच्या पाठीप्रमाणें औषधें देणें, त्यांची नाडी पहाणें वगैरे गोष्टींचा प्रघात सुरू झाला. अशा विपरीत गोष्टी वरचे-वर फार होऊं लागल्या. एकदां एका मनुष्याच्या हातून कांहीं चुक झाली. तेव्हां त्याचा धनी त्याजवर अतिशय रागें भरून त्याला म्हणाला कीं, 'तुला अक्कल नाहीं, तूं गाढवासारखा वागतोस!' हे शब्द त्याच्या तोंडून निघत असतां त्याच्या दुर्दैवानें तेथून जवळच एक गाढव मागच्या दोन पायांवर उभा राहून पुढले दोन पाय माणसाच्या हातासारखे वापरीत चालला होता. त्यानें हे चीड आणणारे शब्द ऐकिले, तेव्हां त्याला अतिशय राग आला, व असें बोलणाराचे कानच उपटून त्याच्या हातावर द्यावे, अशा हेतूनें त्याच्या कानशिलापासून सुमारें वीतभर उंचीवर त्याच्या कानांची टोकें पकडण्यासाठीं तो चाचपडूं लागला! परंतु त्याच्या हाताला कांहीं लागेना. तेव्हां याचे कान आधींच कोणी तरी उपटले असले पाहिजेत, असें समाधान मानून तो पुढें निघून गेला, व अशा रीतीनें एक भांडणाचा प्रसंग टळला. परंतु एक प्रसंग टळला, तर दुसऱ्या दहा प्रसंगीं भांडा-भांडी होऊन रक्तपातापर्यंत पाळी येत असे.

इतक्या अनवस्थेच्या थरापर्यंत गोष्टी जाऊन पोहोंचत चालल्या होत्या, तरी कित्येक पशुपक्षीय मनुष्यांनीं या पंथाला उत्तेजन देण्याचा क्रम चालू ठेविलाच होता. त्यांनीं पशूंच्या खुशामतीखातर एक पाशवीय आध्यात्म-शास्त्रही बनविलें. या शास्त्रांतील सिद्धांत त्यांनीं असा ठरविला होता कीं, जनावरांनाही आत्मा असतो, आणि तो आत्मा उत्क्रांतीच्या क्रमामध्यें मनुष्याच्या आत्म्यापेक्षां वरच्या दर्जाचा असतो. मनुष्यदेहांत जे पुण्य करितात त्यांना पुढल्या जन्मीं पशूचा देह प्राप्त होतो. जे प्राणी मनुष्य-देहांत असतांना आपल्या इंद्रियांचें आणि मनोविकारांचें संयमन करण्याचा अभ्यास करितात, त्यांना पुढचा जन्म पशूचा येतो. कारण, या अवतारांत तो अभ्यास त्यांना फारच चांगल्या रीतीनें पुढें चालवितां येतो. व यांच्या तोंडून कधीं असत्य भाषण येत नसल्यामुळें व यांच्या हातून कधीं पापाचरण घडत नसल्यामुळें मोक्षाला जी पूर्व तयारी लागते, ती या पशु-जन्मामध्यें सर्व सिद्ध असल्यामुळें येथूनच आत्मा मोक्षाला जातो. असे सिद्धांत ठरविण्यांत आल्लेले असल्या कारणानें आपल्याला पुढला जन्म

पशूचा मिळावा, अशी महत्त्वाकांक्षा कित्येक मनुष्यांच्या डोक्यांमध्यें जागृत होऊं लागली होती. आणि 'दुर्लभं भारते जन्म पशुत्वं तत्र दुर्लभम्' हें पशुमाहात्मांतील वाक्य तर सर्वतोमुखीं आणि सर्वतोहृदयीं होऊन गेलें होतें.

अशा रीतीनें जिकडे तिकडे पशूंचा आणि मूर्खांचा सुळसुळाट होऊन गेलेला होता ! असें एकही स्थळ उरलें नव्हतें कीं, जेथें एक तरी निदान नंदीबैल किंवा टोणगा प्रतिष्ठितपणाच्या पदवीला पोहोंचला नव्हता ! त्यामुळें हें जग रहाण्याला मोठें कठिण झालें, सर्व सुज्ञ लोक हताश होऊन बसले, मूर्खपणाच्या भडिमारापुढें शहाणपणाला वर डोकें काढतां येईनासें झालें, आणि अखेरीस सरस्वती देवीसुद्धां आपलें चंबूगवाळें आटपून ब्रह्मलोकीं परत जाण्यास निघाली. ही सरस्वतीच्या प्रयाणाची बातमी जेव्हां सर्व नंदीबैल, माकड, टोणगे, गाढव, वगैरे प्रमुख पशुमंडळींत पसरली, तेव्हां त्यांनीं तिला रहाण्याविषयीं फार आग्रह केला. ते म्हणाले, " हे विद्यादेवि, तूं का जातेस ? आम्ही काय कमी विद्वान आहों ? आमच्यामध्यें नंदीबैलांसारखीं आणि गाढवांसारखीं विद्वद्रत्नें आणि पशुरत्नें असतांना तूं कां उदासीन होतेस ? तुझ्या भक्तिप्रसारासाठीं तूं सांगशील तेवढें मोठें देऊळ आम्ही तुला बांधून देऊं कां ? " यावर " गाढवांनो, मला तुमचें कांहीं एक नको ! " असें म्हणून तिनें मोठ्यानें टाहो फोडला ! तो ब्रह्मदेवानें ऐकून व आपल्या कन्येची संकटावस्था पाहून तिला ब्रह्मलोकीं एकदम घेऊन येण्याकरितां तिच्या मोराला पाठविलें व त्यावर बसून ती पहातां पहातां अदृश्य झाली ! असा पृथ्वीवर जेव्हां जिकडे तिकडे कहर उडून गेला, तेव्हां स्वर्गांतील ब्रह्मादिक देवतांचे डोळे ह्या पृथ्वीवरील स्थितीकडे लागले. हें झालें आहे तरी काय, व या संकटाचें निवारण होणार कसें, इकडे त्यांचें लक्ष्य वेधलें. तेव्हां या कामांत कोणीं कोणीं कसकशीं कारस्थानें केलेलीं आहेत, हें त्यांच्या लक्षांत येऊन भगवान् विष्णूशिवाय ही आपत्ति दूर करण्याला दुसरा कोणीही समर्थ नाहीं, असें जाणून ते क्षीरसमुद्राकडे जाण्याला निघाले.

या सुमारास आकाशांतील सर्व मेघ नाहींसे होऊन तें अगदीं निर्मळ दिसूं लागलें होतें. रात्रीचें चंद्राचें चांदणें पांढरें शुभ्र पडत होतें. नद्यांचें पाणी स्वच्छ झालें होतें. सरोवरांमधून विकासमान होऊं लागलेल्या कमलपुष्पांवर

राजहंसपक्षी येऊन बसूं लागले होते. आणि शरदृतूंतील सर्व लता व वृक्ष पुष्पफळांनीं मंडित झाले होते. तसेंच क्षीरसमुद्राच्या पृष्ठभागावर सोसाट्यानें वहाणारा वारा आतां अगदीं मंद गती पावला होता. त्याच्या प्रचंड गर्जना आतां शांत झाल्या होत्या. फक्त लहान लहान लहरी किनाऱ्यावर नाचत बागडत होत्या व पांढरे शुभ्र पक्षी त्या लाटांवर बसून हळू हळू पोहत होते. आणि द्वीपांतरांतून वहात आलेला मंद वारा आपल्या सुखस्पर्शानें मनाला आनंदवीत होता. अशा वेळीं सर्व देवता भगवान् विष्णूच्या कानावर ही जगाची स्थिति घालण्याकरितां येऊन त्याच्या प्रबोधाची वाट पहात राहिल्या होत्या. इतक्यांत कार्तिकी एकादशीचा दिवस प्राप्त होऊन त्या दिवशीं भगवान् आपल्या शेषशयनावरून उठले. सर्व देवतांनीं बंदिजनांप्रमाणें त्याची स्तुति केली, व जगाची हालहवाल त्याच्या कानावर घातली. तेव्हां "तुम्ही स्वस्थ मानसें करून आपापल्या स्थानाप्रत गमन करावें; मी या सर्वांचा बंदोबस्त करतों." असें आश्वासन देऊन विष्णूनें देवांना परत पाठविलें व हें काय झालें आहे, आणि कोणी केलें आहे, याबद्दल त्यानें चौकशी चालविली. चौकशीअंतीं नंदीबैलांचें कारस्थान, नंदीचा वशिला, शंकराचा भोळसरपणा आणि पशूंचा व मूर्ख माणसांचा मूर्खपणा या सगळ्यांबद्दलची सविस्तर हकीकत त्याला समजली, व आतां याला उपाय काय योजावा ह्यांच्या चिंतनाला तो लागला. ह्या पशूंच्या मूर्खपणाचा त्याला अतिशय क्रोध आला, व या कृत्यांचा नायनाट करून टाकण्याविषयीं त्यानें निश्चय केला. मग ह्या बंडाळीवर फार कडक इलाज योजण्याची विष्णूनें तयारी चालविली. तोंपर्यंत हे सर्व पशु मोकळे होते; त्यांना बंधनें नव्हतीं; तेव्हां त्यांना बांधून टाकण्याची विष्णूनें कल्पना काढली, आणि तेव्हांपासून दावीं वगैरे अस्तित्वांत आलीं! दाव्यांचे ढीगच्या ढीग एकदम निर्माण झाले. तसेंच लाकडांच्या सोट्यांच्या राशी उत्पन्न करण्यांत आल्या. पायबंद वगैरेंकरितां लागणाऱ्या दोऱ्यांचीं वाटोळीं नागलोकांतील सापांच्या वेटोळ्यांप्रमाणें प्रचंड तयार झालीं. कित्येक पिंजरे तयार करण्यांत आले. इतकी कडेकोट सामग्री एकत्र जमविल्यानंतर विष्णूनें बेलदार, वढारी, कुंभार, परीट, गवळी, शेतकरी वगैरे लोकांचीं पलटणें उत्पन्न केलीं, आणि त्यांना आज्ञा केली कीं, " हे साध्या आणि समंजस माणसांनो! हल्लीं पृथ्वीतलावर शहाणे पशु आणि मूर्ख मनुष्य यांनीं जे वेडेचार आरंभिले आहेत,

त्यांचा उच्छेद करण्याकरितां मी तुम्हांला उत्पन्न केलें आहे. तेव्हां तुम्ही आतां असें करा कीं, हीं दावीं, दोऱ्या, सोटे, पिंजरे, पायबंद, जेरबंद वगैरे वगैरे जी येथें अनेक प्रकारची सामग्री तयार करून ठेविली आहे, ती तुम्ही आपल्या स्वाधीन करून घ्या, आणि जेथें जेथें तुम्हांला हे टोणगे, नंदीबैल वगैरे पशु आढळतील, तेथें तेथें यांपैकीं ज्या साधनाचा उपयोग करितां येईल त्याचा उपयोग करून त्यांना तुम्ही बांधून टाका; आणि अशा रीतीनें ते तुमच्या हस्तगत झाले, म्हणजे मग त्यांच्याकडून तुम्ही आपल्या शेतकीची वगैरे काबाडकष्टाचीं कामें नित्यशः करवून घेत जा. या कामांत तुम्हांला पूर्ण यश येईल, असा माझा आशीर्वाद आहे."

इतकें बोलून विष्णु अंतर्धान पावला व त्याचे दूत विष्णूची आज्ञा अमलांत आणण्याला प्रवृत्त झाले. इकडे हें वादळ आपल्या डोक्यावर गोळा होत आहे, याची त्या बिचाऱ्या पशूंना कल्पनाही नव्हती! विष्णू केव्हां तरी झोपेंतून जागा होईल, इतकी त्यांची कल्पना होती. परंतु तो जागा झाला, तरी एकदां आपली वहिवाट सुरू झाल्यानंतर मग तो तरी काय करणार? त्याला जसें डोकें आहे, तसें आपल्यालाही आहे! त्याची अक्कल झाली, तरी ती आपल्या अकलेपेक्षां थोडीच जास्त असणार आहे? अक्कल म्हटली म्हणजे ती इथून तिथून सारखीच! अशा घमेंडींत ते होते. परंतु अशा स्थितींत एके दिवशीं पहांटेस अचानक त्यांच्यावर छापा आला. प्रत्येक विष्णुदूताच्या हातांमध्यें एकेक सोटा आणि एकेक काढणी पाहून त्यांचा कांहीं उमज पडेना. तीं दोऱ्यांचीं वेटोळीं पाहून त्यांना असें वाटलें कीं, मनुष्यांना जशा माळा घालतात, तशा आपल्या गळ्यांमध्यें घालण्याकरितां यांनीं या माळा आणल्या असल्या पाहिजेत! या कल्पनेनें भ्रांत होऊन पुष्कळ सन्मानलोलुप पशु आपल्या माना माळांनीं सुशोभित करून घेण्याकरितां मुकाट्यानें पुढें करूं लागले; व त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांच्या गळ्यांत त्या दाव्यांच्या माळा पडल्याही! परंतु जे कोणी मस्ती करूं लागले, त्यांना प्रथमतः सोट्याचा मार खावा लागला, आणि नंतर मग ते या कंठमुक्ताहारांचा बहुमान स्वीकारण्याला कबूल झाले! अशा रीतीनें हा क्रम सुरू झाल्यानंतर मग या डावपेंचांचा काय अर्थ आहे, हें हळुहळू सगळ्या पशूंच्या लक्ष्यांत येऊं लागलें. या गोष्टीचें खरें स्वरूप कळल्यावर पशूंच्या

समाजामध्यें हाहाकार सुरू झाला. जिकडे तिकडे दाणादाण उडून गेली. पळतां भुई थोडी झाली. आणि आतां आपलें प्राण वांचविण्याला आणि बंदिवास टाळण्याला काय उपाय योजावा, हें कोणाला कांहीं समजेना! ज्याला जिकडे वाट फुटली तिकडे तो पळून गेला. सिंह, हत्ती, वाघ, आस्वल, गेंडे वगैरे पशूंनीं घोर अरण्यांतील 'गुहांचा आश्रय केला. परन्तु बारीक सारीक पशूंची फार त्रेधा उडाली. त्यांतही जे निरुपद्रवी आणि निरपराधी पशु होते, त्यांच्या वाटेला कोणी फारसे गेलेच नाहीं. परंतु बाकीच्यांना मात्र फार त्रास झाला. गाढव, नंदीबैल, टोणगे यांच्यावर विशेष लक्ष ठेवण्याविषयीं कुंभार, बेलदार, गवळी, शेतकरी वगैरे लोकांना विष्णूनें मुद्दाम सांगितलें होतें. त्यामुळें त्यांची धरपकड झाली; तेव्हां त्यांच्यांत फार पळापळ सुरू झाली. ज्याला जेथें जागा सांपडली तेथें तो दडला; कोणी राजवाड्यांतून, कोणी दरबारांतून, कोणी सरदारांच्या घरांतून, कोणी कचेऱ्यांतून, कोणी मोठमोठ्या कारखान्यांतून, कोणी वखारींतून कोणी विद्यामंदिरांतून असे मनुष्यांच्यांत मिसळून दडून राहिले. बाकी सर्वांना धरून नेण्यांत आलें. फक्त जे माणसांशीं सरूपता धरून राहिले, त्यांच्यावरचें संकट टळलें पण त्यांना त्या प्रसंगाची इतकी जबर दहशत बसली कीं, जर आपण माणसांमध्यें दडून बसलों आहों तेथून बाहेर पडलों, तर कदाचित् फिरून कोणी आपल्याला "हा पशु आहे रे पशु!" असें म्हणून ओळखून धरील आणि दाव्याशीं बांधून ठेवील, या भीतीनें यांनीं माणसाचा केलेला आश्रय अद्यापपर्यंतही सोडलेला नाहीं, ही गोष्ट पुष्कळांच्या प्रत्यही निदर्शनाला येत असली पाहिजे! परंतु ह्या माणसांत मिसळलेल्या पशूंखेरीजकरून बाकी सर्व पशु पकडले जाऊन हें पशूंचें बंड विष्णूच्या कृपेनें मोडलें; आणि पृथ्वीवरील व्यवस्था पुनः सुरळीतपणें सुरू झाली.

परंतु आपण इतक्या प्रयासानें सुरू केलेली ही घटना अशा रीतीनें उद्ध्वस्त होऊन नामशेषतेला पोंचणार हें पाहून बैलांना फार वाईट वाटलें व आम्हांला कांहीं तरी उःशाप मिळावा म्हणून विष्णूपाशीं त्यांनीं लचकोडगेपणानें फिरून रडगाणें सुरू केलें. तेव्हां विष्णूला दया येऊन त्यानें सांगितलें कीं, "ठीक आहे, हे बैलानो, 'वर्षांतून एक दिवस तुम्ही याप्रमाणें वागत जा. त्या दिवसाला 'बैलाचा पोळा' असें म्हणण्यांत येईल.

आणि त्या दिवशीं तुमच्या सन्मानार्थ तुम्हांला चांगले पोषाख, दागदागिने वगैरे घालून वाद्यांच्या कडकडाटामध्यें लोक तुमची मिरवणुक काढतील." इतकें सांगितल्यावर विष्णु अंतर्धान पावला, बैल समाधान पावले, आणि बैलांच्या पोळ्याचा सण तेव्हांपासून प्रचारांत जो आला, तो अद्यापिही आपल्यामध्यें चालत आहे !

---

# धर्मप्रसाराच्या पद्धतीचा बौद्ध-धर्मांतील एक नमुना.

## भाग पहिला.

### पूर्वपक्ष.

एके वेळीं गौतमबुद्ध आपल्याबरोबर मोठा भिक्षुसंघ घेऊन कोसलदेशामधून संचार करीत असतां अचिरावतीनामक नदीच्या कांठीं असलेल्या मनसाकट नांवाच्या एका गांवीं येऊन तेथील अंबराईमध्यें राहिला होता. तो गांव मोठ्या ब्राह्मणवस्तीचा होता. आणि चंकी, तारुख्ख, पोक्करसाति, जानुश्रोणि, तोदेय्य इत्यादि मोठमोठे प्रख्यात आणि श्रीमंत ब्राह्मण त्या गांवांत रहात होते. त्या गांवांतील वासेट्ठ आणि भारद्वाज या नांवाच्या दोघां ब्राह्मणांमध्यें एकदां ब्रह्मप्राप्तीचा खरा मार्ग कोणता याच्या संबंधाचा वाद उपस्थित झाला. वासेट्ठाचें असें म्हणणें पडलें. कीं, पोक्करसाति यानें ब्रम्हप्राप्तीचा जो मार्ग प्रतिपादिलेला आहे, तो मार्ग खरा आहे. आणि भारद्वाजाचें असें म्हणणें

पडलें कीं, तारुख्ख यानें ब्रम्हप्राप्तीचा जो मार्ग प्रतिपादिलेला आहे, तो मार्ग खरा आहे. परन्तु यांपैकीं कोणाचेंही म्हणणें दुसऱ्याला पटेना. तेव्हां वासेठ भारद्वाजाला म्हणाला, 'भारद्वाजा, शाक्यमुनी भगवान् गौतमबुद्ध हा हल्लीं आपल्या गांवांतील अचिरावती नदीच्या कांठच्या आंबराईमध्यें येऊन उतरला आहे.त्याच्याकडे जाऊन त्याला आपण हा प्रश्न विचारूं या.' ही गोष्ट भारद्वाजाला पसंत पडून ते दोघेही गौतमबुद्धाकडे गेले. तेथें पोहोंचल्यानंतर गौतमबुद्धाला प्रणिपात करून त्यांनीं आपल्या शंका त्याच्यापुढें मांडल्या, आणि पोक्करसातीनें प्रतिपादिलेला मार्ग खरा किंवा तारुख्खानें प्रतिपादिलेला मार्ग खरा याच्याबद्दल त्यांचें मत त्यांनीं विचारलें. व अशा या ब्रम्हप्राप्तीच्या निरनिराळ्या मार्गासंबंधानें वासेठ आणखी असेंही म्हणाला कीं, "हे भगवन्, निरनिराळ्या ब्राह्मणांनीं निरनिराळे मार्ग प्रतिपादिलेले आहेत; अध्वर्यु ब्राह्मण, तैत्तिरिय ब्राह्मण, छंदोग ब्राह्मण, ब्रम्हचारीय ब्राम्हण, इत्यादि प्रत्येक ब्राम्हणांचे निरनिराळे मार्ग आहेत. हे सगळे मार्ग खरे आहेत काय ? आणि ह्या मार्गांनीं जे जातील, ते खरोखरच ब्रह्मसायुज्याप्रत पावतील काय ? एखाद्या खेडेगांवाच्या अगर शहराच्या आसपास पुष्कळ वाटा पसरलेल्या असतात, त्या सगळ्या वाटा त्या एका गांवांतच येऊन पोहोंचतात. त्याप्रमाणें अध्वर्यु ब्राम्हण, तैत्तिरिय ब्राह्मण, छंदोग ब्राह्मण, ब्रह्मचारीय ब्राह्मण, इत्यादि सगळ्या ब्राह्मणांचे मार्ग, हे भगवन् खरेच आहेत काय ? आणि ह्या मार्गांनीं जे जातील ते खरोखरच ब्रम्हसायुज्याप्रत पावतील काय ?"

"वासेठा, हे सगळे खरे मार्ग आहेत असें तुला वाटतें काय ?"

"होय, मला वाटतें."

"खरोखरच तुला असें वाटतें ?"

"होय, मला खरोखरच असें वाटतें."

"पण वासेठा, तिन्ही वेदांमध्यें निष्णात असलेल्या त्या ब्राह्मणांपैकीं एकानें तरी ब्रह्म कधीं समक्ष पाहिलें आहे काय ?"

"नाहीं."

"नसेल. पण, वासेठा, ज्यानें ब्रह्म समक्ष पाहिलें आहे असा--

तिन्ही वेदांमध्यें निष्णात असलेल्या त्या ब्राम्हणांच्या गुरूंमध्यें कोणी तरी एखादा असेल ?"

"कोणी नाहीं !"

"कांहीं हरकत नाहीं. पण कदाचित्, वासेट्ठा, ज्यानें ब्रह्म समक्ष पाहिलें आहे असा--तिन्हीं वेदांमध्यें निष्णात असलेल्या त्या ब्राह्मणांच्या गुरूंच्या शिष्यांमध्यें तरी कोणी एखादा असेल ?"

"नाहीं, त्यांच्यांतही कोणी नाहीं ?"

"बरें, वासेट्ठा, ज्यानें ब्रम्ह समक्ष पाहिलें आहे असा--ब्राम्हणांच्या सात पिढ्यांपर्यंत तरी कदाचित् कोणी होऊन गेला असेल ?"

"छे ! भगवन्, तसाही कोणी नाहीं !"

"बरें ! वासेट्ठा, तिन्ही वेदांमध्यें निष्णात असे ते पूर्वीचे ऋषि--मंत्रद्रष्टे आणि मंत्र पठण करणारे--अट्ठक, वामक, वामदेव, वेस्सामित्त जमदग्नि, अंगिरस, भारद्वाज, वासेट्ठ, कश्यप, भृगु--यांपैकीं कोणी कधीं असें म्हटलेलें आहे काय कीं, 'ब्रह्म कोठें आहे, तें आलें कोठून, आणि जाणार कोठें, हें आम्हांला माहीत आहे, आणि तें ब्रह्म आम्ही पाहिलें आहे ?"

"नाहीं !"

"तर मग, वासेट्ठा, तुझ्या म्हणण्यांतील सारांश असा निष्पन्न झाला कीं, ब्राह्मण, त्यांचे गुरू अगर त्यांचे शिष्य यांनीं–अगर यांच्या सात पिढ्यांपर्यंत सुद्धां कोणी ब्रह्म समक्ष पाहिलेलें नाहीं. इतकेंच नव्हे, तर जुने ऋषि–मंत्रद्रष्टे आणि मंत्र पठण करणारे–यांनीं सुद्धां कधीं असा अभिमान बाळगिला नाहीं कीं, ब्रह्म कोठें असतें, तें कोठून येतें आणि कोठें जातें, हें आपल्याला माहीत आहे, किंवा तें ब्रह्म आपण पाहिलें आहे. तेव्हां हे त्रैविद्येमध्यें पारंगत झालेले ब्राह्मण अर्थात् असें म्हणतात म्हणावयाचें कीं, 'जें आम्हांला माहीत नाहीं, किंवा जें आम्ही कधीं पाहिलेलें नाहीं, त्याची प्राप्ति करून देण्याचा मार्ग आम्ही दाखवूं शकतों !'—तेव्हां, वासेट्ठा, अशा स्थितीमध्यें हे त्रैविद्य ब्राम्हण जे कांहीं बोलतात, तें वेडगळपणाचें आहे, असें यावरून उघड होत नाहीं काय ?"

"होय."

"खरेखर पाहिलें असतां, वासेठ्ठा, जें या त्रैविद्य ब्राम्हणांनीं जाणलें नाहीं किंवा पाहिलें नाहीं, त्याच्या प्राप्तीचा मार्ग यांना दाखवितां येतो, अशी वस्तुस्थिति असणें अगदीं अशक्य आहे. आंधळ्या माणसांची एखादी रांग बनविली असतां जसें त्यांतील पुढल्याला दिसत नाहीं, मधल्याला दिसत नाहीं आणि पाठीमागच्यालाही दिसत नाहीं; त्याप्रमाणेंच ब्राम्हणांची स्थिति आहे. यांच्यापैकीं पूर्वींच्या काळांतील कोणा ब्राम्हणांना ब्रह्म दिसलें नाहीं, मधल्या काळांतील कोणाला दिसलें नाहीं आणि अर्वाचीन काळांतीलही कोणाला तें दिसत नाहीं. अशा स्थितींत त्या कधींही न दिसलेल्या ब्रह्माच्या प्राप्तीचा मार्ग आम्ही दाखवूं शकतों, हें ब्राह्मणांचें म्हणणें निव्वळ हास्यास्पद नाहीं काय ?"

"बरें, वासेठ्ठा, मी तुला आणखी एक गोष्ट विचारतों. हे ब्राह्मण सूर्य आणि चंद्र यांची प्रार्थना करतात; ते उगवतात आणि मावळतात तेव्हां त्या त्या दिशांकडे वळून हात जोडून हे त्यांची पूजा करतात. ते सूर्य आणि चंद्र इतर लोकांप्रमाणें ह्या त्रैविद्य ब्राह्मणांना दिसतात किंवा नाहीं ?"

"हो, हो ! दिसतात तर !"

"बरें, वासेठ्ठा, हे जे सूर्य आणि चंद्र या त्रैविद्य ब्राह्मणांना प्रत्यक्ष दिसतात, त्यांच्याशीं जाऊन मिळण्याचा एखादा मार्ग हे ब्राह्मण दाखवूं शकतात काय ?"

"मुळींच नाहीं."

"तर मग, वासेठ्ठा, जे सूर्य, चंद्र प्रत्यक्ष दिसत आहेत, त्यांच्याशीं जाऊन मिळण्याचा मार्ग देखील जर या ब्राह्मणांना दाखवून देतां येत नाहीं, तर मग जें ब्रह्म यांनीं किंवा यांच्या गुरूंनीं किंवा यांच्या सात पिढ्यांपर्यंत कोणीही कधीं पाहिलेलें नाहीं, त्या ब्रह्माच्या प्राप्तीचा मार्ग आम्ही दाखवन देतों असें जें यांचें म्हणणें आहे, तें व्यर्थ आहे, हें उघड होत नाहीं काय ?"

---

"वासेठ्ठा, आतां आपण दुसरा एक दृष्टांत घेऊं. कोणी एक मनुष्य म्हणतो कीं, जी एक अतिशय सुंदर स्त्री आहे तिच्यावर माझें फार प्रेम आहे. असें तो म्हणाला असतां लोक त्याला विचारतात, 'अरे, तूं म्हण-

तोस हें ठीक आहे. पण ज्या या सुंदर स्त्रीवर तूं इतकें प्रेम करीत आहेस, ती सुंदर स्त्री ब्राह्मणाची आहे किंवा वैश्याची आहे किंवा शूद्राची आहे, याच्याबद्दल तुला काय माहिती आहे ? ' असें विचारलें असता ' मला तिची कांहीं माहिती नाहीं, ' असें तो उत्तर देतो ! फिरून लोक त्याला असें विचारतात, ' बरें, तिचें नांव काय, तिचें आडनांव काय, ती उंच आहे कीं ठेंगणी आहे, काळी आहे कीं गोरी आहे, आणि ती कोणत्या ठिकाणीं रहाते, याबद्दल तरी तुला कांहीं माहिती आहे काय ? "

" असें विचारलें असतां, ' हेंही मला कांहीं ठाऊक नाहीं ' असें तो उत्तर देतो ! "

" तेव्हां लोक त्याला म्हणतात, ' ज्या स्त्रीची तुला कांहीं माहिती नाहीं किंवा जिला तूं कधीं पाहिली नाहींस, अशा स्त्रीवर तुझें प्रेम बसलें आहे, आणि तिच्यासाठीं तूं उत्कंठित झाला आहेस, असें तुझें म्हणणें आहे तर मग ? ' "

" यावर ' होय, अशी स्थिति आहे खरी ! ' असें जर त्या प्रेम करणाऱ्या मनुष्यानें उत्तर दिलें, तर त्यावरून असें निष्पन्न होत नाहीं काय कीं, त्याचें प्रेमाबद्दलचें हें सगळें बोलणें अगदीं वेडगळपणाचें आहे ? "

" भगवन् गौतमा, अशा मनुष्याचें हें बोलणें अगदीं वेडगळपणाचें आहे, यांत शंका नाहीं. "

" आणि, वासेट्ठा, त्याच्या इतकेंच या त्रैविद्य ब्राह्मणांचें म्हणणें वेडगळपणाचें आहे. ज्या ब्रह्माबद्दल यांना कांहीं माहिती नाहीं, त्याच्या प्राप्तीचा मार्ग हे दाखविणार, ही गोष्ट सर्वथैव असंभवनीय आहे.

---

" वासेट्ठा, आणखी एक दृष्टांत आपण घेऊं. आपण अशी कल्पना करूं कीं, कोणी एक मनुष्य एका माडीवर चढून जाण्यासाठीं एक जिना बांधीत आहे. पण ती माडी कोठें आहे हें कोणालाही न आढळून आल्यामुळें कांहीं लोकांनीं त्याला विचारलें, ' अरे बाबा, ज्या माडीवर चढून जाण्याकरितां तूं हा जिना बांधीत आहेस, ती माडी कोठें आहे ? पूर्वेकडे, कीं दक्षिणेकडे, कीं पश्चिमेकडे, कीं उत्तरेकडे, हें तुला कांहीं माहीत आहे

काय ? तसेंच ती माडी फार उंच आहे, कीं ठेंगणी आहे, कीं मध्यम आहे, याच्यासंबद्दल तरी तुला कांहीं माहीती आहे काय ? ' "

" असें विचारलें असतां तो उत्तर देतो कीं, ' याबद्दल मला कांहीं माहीत नाहीं ! "

" तेव्हां ते लोक त्याला फिरून असें प्रपादितात कीं, ' अरे असें कसें म्हणतोस ! ज्या माडीबद्दल तुला कांहीं माहिती नाहीं, किंवा जी माडी तूं कधीं पाहिलेली नाहींस अशा माडीवर चढून जाण्याकरितां तूं हा जिना बांधीत आहेस याचा अर्थ काय ? ' "

" असें विचारिलें असतांही तो उत्तर देतो कीं, ' माडी कोठें आहे हें माहीत नसूनही तिच्यावर चढण्याचा जिना मात्र मी बांधीत आहे, अशी वस्तुस्थिति आहे खरी ! ' "

" वासेठ्ठा, असें जर तो म्हणाला, तर त्याचें हें म्हणणें अगदीं वेड-गळपणाचें नव्हे काय ? आणि या त्रैविद्य ब्राम्हणांचेंही म्हणणें अशाच कोटींतील आहे. कारण त्यांनीं किंवा त्यांच्या गुरूंनीं किंवा त्यांच्या ऋषींनीं किंवा त्यांच्यापैकीं मागच्या सात पिढ्यांपर्यंत कोणीं देखील ब्रह्म कधीं पाहिलें नसून त्याच्या प्राप्तीचा मार्ग दाखवून देण्याच्या गोष्टी हे बोलत आहेत. तेव्हां हें त्यांचें म्हणणें माडी पाहिलेली नसतांना त्या माडीवर जाण्या-करितां जिना बांधणाराच्या बोलण्याइतकेंच वेडगळपणाचें नाहीं काय ? "

---

" शिवाय वासेठ्ठा, आणखी एक गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. तूं अशी कल्पना कर कीं, ही अचिरावती नदी पाण्यानें तुडुंब भरून चाल-लेली आहे. आणि त्या नदीच्या पलीकडच्या बाजूला ज्याचें कांहीं काम आहे, असा कोणी मनुष्य त्या नदीच्या कांठीं येऊन या कांठावर उभा राहून पलीकडच्या कांठाची प्रार्थना करूं लागला आणि त्याला म्हणूं लागला कीं, ' हे पलीकडल्या कांठा, तूं ह्या कांठाला ये ! ' तर, वासेठ्ठा, तुला कसें वाटतें ? अचिरावती नदीचा पलीकडचा कांठ—त्या मनुष्यानें केले-ल्या स्तुतीमुळें, स्तोत्रामुळें किंवा प्रार्थनेमुळें—अलीकडच्या कांठाला कधीं तरी येईल काय ? "

" कधींही येणार नाही. "

" तरी पण नदीच्या पलीकडच्या कांठाला अलीकडे बोलावणाऱ्या या आतां वर्णिलेल्या मनुष्याप्रमाणें, वासेट्ठा, हे त्रैविद्य ब्राह्मण ' इंद्रमावाहयामि ' ' सोममावाहयामि ' ' वरुणमावाहयामि ' ' ईशानमावाहयामि ' ' प्रजापतिमावाहयामि ' ब्रह्माणमावाहयामि ' अशा रीतीनें इंद्र, सोम इत्यादि देवतांना हांका मारीत असतात ! पण त्याचा काय उपयोग होणार? असल्या हांका मारण्यानें, स्तुतीनें किंवा प्रार्थनेनें हे लोक मरणानंतर शरीराचा लय झाला असतां ब्रह्मप्राप्तीप्रत जाऊं शकतील अशी वस्तुस्थिति असणें अगदीं अशक्य आहे. "

---

" वासेट्ठा, आणखी एक गोष्ट विचार करण्यासारखी आहे. तूं अशी कल्पना कर कीं, अचिरावती नदी पाण्यानें तुडुंब भरून चालली आहे, आणि त्या नदीच्या पलीकडच्या बाजूला ज्याचें कांहीं काम आहे, असा कोणी मनुष्य पलीकडे जाण्याच्या इच्छेनें या कांठावर येऊन एका मजबूत शृंखलेनें आपले हात आपल्या पाठीमागें घट्ट बांधून घेऊन पलीकडे जाण्याची तयारी करूं लागला, तर, वासेट्ठा, तुला कसें वाटतें ! तो मनुष्य अचिरावतीच्या या कांठावरून त्या कांठावर कधीं तरी जाऊं शकेल काय ?"

" गोतमा, तो कधींही जाऊं शकणार नाहीं. "

" वासेट्ठा, त्याचप्रमाणें या संसारामध्यें मनुष्याला बांधणाऱ्या पांच शृंखला आहेत. चक्षुरिंद्रिय, श्रोत्रेंद्रिय, घ्राणेंद्रिय रसनेंद्रिय, आणि त्वगिंद्रिय, या पांच इंद्रियांचे जे विषय त्यांना बंधन किंवा शृंखला असें म्हणतात. या शृंखलेनें हे त्रैविद्य ब्राह्मण बद्ध झालेले असतात. असले ब्राह्मण मरणोत्तरकालीं ब्रह्मसायुज्याप्रत पावूं शकतील, ही गोष्ट घडून येणें कधींही संभवनीय नाहीं. "

---

" तसेंच वासेट्ठा, एखाद्या मनुष्याला ह्या तुडुंब भरलेल्या अचिरावती नदीच्या अलीकडच्या कांठावरून पलीकडच्या कांठाला जावयाचें

आहे. परंतु तो अलीकडच्या काठांवर येऊन तेथें डोक्यावरून पांघरूण घेऊन जर खुशाल झोंपीं गेला, तर तो मनुष्य पलीकडच्या कांठाला जाईल, असें तुला वाटतें काय ?"

"गौतमा, तो जाऊं शकणार नाहीं."

"त्याचप्रमाणें, वासेठ्ठा, मनुष्याला या संसारांत पांच आवरणें आहेत. काम, मत्सर, आलस्य, गर्व आणि शंका, हीं तीं पांच आवरणें होत. या पांच आवरणांनीं, वासेठ्ठा, हे त्रैविद्य ब्राह्मण अवगुंठित झालेले आहेत. आणि व्यापून गेलेले आहेत. असले हे त्या पांच आवरणांनीं आवृत झालेले ब्राह्मण मरणानंतर ब्रह्मसायुज्याप्रत जाऊन पोहोंचतील अशी स्थिति असणें अगदीं असंभवनीय आहे."

---

"आतां वासेठ्ठा, मी तुला आणखी एक गोष्ट विचारतों. वयोवृद्ध अशा ब्राह्मण गुरुंचीं आणि त्यांच्या शिष्यांचीं शंकासमाधानें चाललीं असतां तीं तूं ऐकिलीं असशील. त्यावरून माझ्या प्रश्नांचीं उत्तरें तुला देतां येतील. ब्रह्माला बायका आणि संपत्ति आहे किंवा नाहीं ?"

"नाहीं."

"त्याला क्रोध आहे किंवा नाहीं ?"

"नाहीं."

"त्याला मत्सर आहे किंवा नाहीं ?"

"नाहीं."

"त्याचें मन निर्मळ आहे किंवा नाहीं ?"

"निर्मळ आहे."

"तो स्ववशवर्ती आहे किंवा परवश आहे ?"

"तो स्ववशवर्ती आहे."

"आतां, वासेठ्ठा, तूं मला हें सांग कीं, हे त्रैविद्य ब्राह्मण कसे आहेत ? यांना बायका आणि संपत्ति आहे किंवा नाहीं ?"

"आहे"

"यांना क्रोध आहे किंवा नाहीं ?"

" आहे. "

" यांना मत्सर आहे किंवा नाहीं ? "

" आहे. "

" यांचें मन निर्मळ आहे किंवा नाहीं ? "

" नाहीं. "

" ते स्ववशवर्ती आहेत किंवा परवश आहेत ? "

" ते परवश आहेत. "

" तर मग, वासेठ्ठा, तुझें असें म्हणणें कीं, या ब्राह्मणांना बायका, संपत्ति, क्रोध, मत्सर, वगैरे आहेत, आणि ब्रह्माला तें कांहीं नाहीं. तर मग अशा भिन्न स्वरूपाच्या या दोघांमध्यें सरूपता, सायुज्यता, वगैरे प्रकारचें ऐक्य उत्पन्न होऊं तरी शकेल कसें ? यावरून या त्रैविद्य ब्राह्मणांचें ब्रह्मप्राप्तीसंबंधाचें हें सगळें बोलणें अगदीं व्यर्थ आहे हें उघड होतें. "

गौतमबुद्धाचें हें बोलणें संपल्यावर वासेठ्ठा त्याला म्हणाला, " हे भगवन्, मला कोणी असें सांगितलें आहे कीं, ब्रह्माच्या प्राप्तीचा मार्ग आपल्याला माहीत आहे. "

" वासेठ्ठा, मनसाकट हें गांव तेथून अगदीं जवळ आहे. त्या गांवांत जन्मलेल्या, आणि तेथें लहानाचा मोठा झालेल्या, कोणा मनुष्याला दुसऱ्या कोणी विचारलें कीं, मनसाकट गांवाला जाण्याचा मार्ग कोणता, तर त्या प्रश्नाचें उत्तर देण्याला त्याला कांहीं शंका येईल काय, किंवा कांहीं अडचण पडेल काय ? "

" भगवन् गौतमा, त्याला कसली अडचण पडणार आहे ? कारण मनसाकटमध्येंच जर तो जन्मलेला आहे, आणि जर तो तेथेंच लहानाचा मोठा झालेला आहे, तर मनसाकटला येऊन पोहोंचणारे सर्व मार्ग त्याला माहीत असलेच पाहिजेत. "

" वासेठ्ठा, मनसाकटमध्यें उत्पन्न झालेल्या मनुष्यालाही मनसाकटचा मार्ग कोणी विचारिला असतां तो सांगण्याच्या वेळीं तो मनुष्य कदाचित् एक वेळ संशयांत आणि अडचणींत पडेल; परंतु ब्रह्मप्राप्तीचा मार्ग कोणता असा तथागताला प्रश्न विचारिला असतां त्याला मुळींच संशय आणि अडचण पडणार नाहीं. कारण, वासेठ्ठा, ब्रह्म मला माहीत आहे,

ब्रह्मलोक मला माहीत आहे, आणि तेथें नेऊन पोंचविणारा मार्ग कोणता हेंही मला माहीत आहे."

---

इतकें भाषण झाल्यावर वासेठ्ठा म्हणालाः—" मीं असें ऐकलेलेंच आहे कीं, श्रमण गौतमाला ब्रह्मप्राप्तीचा मार्ग माहीत आहे. तेव्हां कृपा करून आपण आम्हांला तो मार्ग दाखवावा आणि आमच्या ह्या ब्राह्मण-जातीला आपण कृपा करून उद्धरावें."

अशा प्रकारची वासेठ्ठानें विनंति केल्यावरून पुढें भगवान् गौतम बुद्धानें आपला ब्रह्मप्राप्तीचा जो मार्ग होता, त्याचें वासेठ्ठाला निरूपण केलें व अखेरीस तो मार्ग ऐकून वासेठ्ठानें बौद्धधर्माची दीक्षा घेतली.

---

## भाग दुसरा.

### उत्तरपक्ष.

भगवान् गौतमबुद्धाचीं जीं अनेक सुत्तें आहेत, त्यांपैकीं तेविग्ग सुत्त हें एक प्रसिद्ध सुत्त आहे. या तेविग्ग सुत्तांतील गोष्टीचा सारांश आतांपर्यंत वर दिलेला आहे. त्यावरून या सुत्ताचें काय धोरण आहे आणि त्या द्वारानें काय सिद्ध करण्याचा गौतमबुद्धाचा हेतु आहे, हें कोणाच्याही लक्षांत येईल. तेविग्ग म्हणजे त्रैविद्य होय. वेदमूलक धर्म हिंदुस्थानामध्यें प्रस्थापित झालेला होता. सर्व लोकांचे आचारविचार त्या वैदिक धर्माच्या अनुरोधानें चाललेले होते. इहलोकीं कल्याणकारक आणि परलोकीं मोक्ष-दायक अशीं जीं जीं वेदविहित कर्में तीं तीं सर्व वैदिक धर्मानुयायी लोक आपल्या इच्छेनुसार आणि शक्त्यनुरूप करीत होते. अशा स्थितीमध्यें आप-ल्या ह्या आर्यभूमींत कपिलवस्तुनामक नगरींत भगवान् गौतमबुद्धाचा अव-तार झाला. तो एका राजाचा पुत्र असतांही व त्याला स्त्रीपुत्रादि बंधनें असतांही त्या सर्वांचा त्याग करून ज्ञानसंपादन करण्याकरितां तो अरण्यांत

गेला व त्यानें पुष्कळ खडतर तपश्चर्या केल्यानंतर अखेरीस त्याला ज्ञान प्राप्त झालें, आणि तेव्हांपासून तो हिंदुधर्माच्या विरुद्ध आपल्या बौद्धधर्माचा प्रसार करण्याच्या प्रयत्नाला लागला. त्या प्रयत्नांत त्याला किती यश आलें, हें बौद्धधर्माचा आज जो चोहोंकडे प्रचंड विस्तार झालेला आहे, यावरून लक्षांत घेण्यासारखें आहे. भगवान् गौतमबुद्धानें उपदेशिलेलीं नीतितत्त्वें फार चांगलीं आहेत, व तीं आपल्या चांगुलपणानें सर्व समंजस मनुष्यांच्या आदराला पात्र झालेलीं आहेत, याच्याबद्दल वाद नाहीं. वाद आहे काय तो परमार्थ तत्त्वज्ञानाविषयीं. हें परमार्थतत्त्वज्ञान कोणत्या एखाद्या धर्माला दुसऱ्या एखाद्या धर्मापेक्षां कांहीं जास्त समजलें आहे किंवा काय, हा काय तो मुख्य वादाचा प्रश्न आहे. बाकीच्या सामान्य गोष्टींबद्दल बहुतेक समंजस आणि प्रतिष्ठित धर्मांची एकवाक्यताच असते. सामान्य नीतीचे आणि व्यवहाराचे नियम सर्व धर्मांना बहुतेक सारखेच संमत असतात. त्यांत कांहीं म्हणण्यासारखा फरक नसतो. त्यामुळें त्या बाबतींत एका धर्माला दुसऱ्या धर्माच्या विरुद्ध जय मिळवून घेण्याला फारशी जागा सांपडणें शक्य नसतें. दुसऱ्या धर्माच्या प्रदेशांमध्यें अतिक्रमण करूं इच्छिणाऱ्या प्रधर्षणशाली धर्मांना जी कांहीं फट सांपडते, ती परमार्थ तत्त्वज्ञानासारख्या किंवा मोक्षप्राप्तीसारख्या अदृष्ट आणि असामान्य गोष्टींचा बाबतींत होय. तेथें कांहीं परिक्षेला आणि प्रत्यक्ष प्रमाणाला अवकाश नसतो. केवळ श्रद्धेच्या योगानें तेथें सर्व घडामोडी होत असतात. आणि या श्रद्धेच्या ढिल्या साम्राज्यामध्यें अज्ञानी लोकांना वाटेल तशा थापा देऊन वाटेल त्या मताकडे वळविण्याला मुळींच अडचण पडत नसल्याकारणानें हीं धर्मप्रसाराचीं बंडें ह्या जगामध्यें सुलभ होऊं शकतात. पूर्वींचे जे धर्म असतील, त्यांमध्यें कांहीं तरी फूट पाडून त्यांतून फितूर झालेलें लोक आपल्या धर्माचे अनुयायी बनवून आपल्या धर्माचा प्रसार करावयाचा, ही रीत आर्यधर्माच्या पाठीमागून काल परवा उत्पन्न झालेल्या बौद्ध, ख्रिस्ती, मुसलमानी, वगैरे धर्मांतून बहुतेक सारखीच आहे. मुसलमानी धर्मानें ह्या युक्तीपेक्षां आपल्या तरवारीच्या शक्तीचा ज्यास्त उपयोग केलेला आहे, हें खरें आहे. परंतु ख्रिस्ती धर्माच्या संबंधानें पहातां त्यानें आपली तरवार मुळींच म्यानांत घालून ठेविली होती असें जरी नाहीं, तरी पण तरवारीच्या शक्तीपेक्षां वरील

युक्तीनेंच त्या धर्मानें आपला फैलाव ज्यास्त करून घेतला आहे. परंतु तरवारीची ( प्रत्यक्ष तरी निदान ) मदत न घेतां वाढलेला असा एखादा धर्म असेल, तर तो बौद्ध धर्मच होय. सारांश; या पर्यालोचनावरून असें दिसतें कीं या धर्मप्रसाराच्या कामांत पुढें पुढें शक्तीचा उपयोग जास्त करण्यांत येऊं लागला; तरी पण पूर्वी पूर्वी या कामीं युक्तीचाच जास्त उपयोग करण्यांत येत असला पाहिजे. या युक्तीचे उपाय अनेक आहेत. व त्यांचें आणि त्यांच्या देशकालपरत्वें उपयोगांत आणावयाच्या सर्व पोटभेदांचें वर्णन, विवेचन आणि आविष्करण ख्रिस्तीधर्मप्रसाराच्या इतिहासामध्यें चांगलें दृग्गोचर होतें. धर्मप्रसाराच्या कामांतील युक्त्यांच्या वर्चस्वाचा विजयध्वज ख्रिस्ती धर्माच्याच हातांत दिला पाहिजे, याबद्दल कोणी कितीही स्वाभिमानी असला तरी त्याचा मतभेद होईल असें कधींही होणार नाहीं. तरी पण बौद्धधर्मही असले उपाय कधीं उपयोगांत आणीत नसे, असें नाहीं. हल्लींची वर दिलेली वासेष्ठाची गोष्ट हें एक त्या उपायाचें फार उत्कृष्ट उदाहरण आहे. धर्मप्रसाराच्या उपयोगीं पडणारें या गोष्टींतील कौशल्य इतकें मोहक आहे कीं, तें पाहून कित्येक खुद्द ख्रिस्तीधर्मानुयायांच्या देखील तोंडाला पाणी सुटल्यावांचून राहिलेलें नाहीं. 'सेक्रेड बुक्स ऑफ धि ईस्ट' या पुस्तकमालेंतील तेविग्गसुत्ताला जी प्रस्तावना लिहिण्यांत आलेली आहे, त्या प्रस्तावनेच्या लेखकानें त्या प्रस्तावनेंत एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, 'One would think perhaps that such a Sutta might be adapted, without very great difficulty, for use as a missionary tract.'

गौतमबुद्धानें काशीभारद्वाज, अग्गिकभारद्वाज, कोसल देशांतील ब्राह्मण, सुंदरिकभारद्वाज, सभिय, सेल, इत्यादि, ब्राह्मणांकडून स्वधर्माचा त्याग करवून बौद्धधर्माची दीक्षा घेण्याला लाविल्याचीं वर्णनें निरनिराळ्या सुत्तांमधून दिलेलीं आहेत; परंतु त्या सर्व सुत्तांपेक्षां या तेविग्ग सुत्तांतील रचनाशैली फारच वर्णन करण्यासारखी आहे. या सुत्तांत ज्या भाषणपद्धतीचा अंगीकार करण्यांत आलेला आहे, ती भाषणपद्धति साक्रेटिसाच्या संभाषणांमधून नेहमीं दृग्गोचर होते. 'Dialogues of Plato.' या प्रसिद्ध पुस्तकामध्यें याच धर्तीचीं साक्रेटिसाचीं प्रश्नोत्तररूप अनेक संभाषणें अद्यापिही आपल्याला वाचावयाला मिळतात. त्यांची आठवण हें तेविग्ग सुत्त वाचीत

असतांना कोणालाही आल्यावांचून राहणार नाहीं. क्षणभर आपण गौतमबुद्ध आणि वासेष्ठ हीं पात्रें विसरून जातों आणि साक्रेटिसच आपल्या एखाद्या प्रतिपक्षाची उलटतपासणी घेत आहे कीं काय, असा आपल्याला भास होतो. आपल्याला जसें उत्तर पाहिजे असेल, तशा प्रकारचे प्रश्न विचारीत विचारीत आपलीं अपेक्षित उत्तरें साक्षीदाराच्या तोंडून कशीं काढून घ्यावीं, ही विद्या ज्यांना शिकावयाची असेल, त्यांना हें सुत्त फारच चांगल्या रीतीनें आदर्शभूत होईल, यांत शंका नाहीं.

वादविवादाच्या आणि स्वमतस्थापनाच्या दृष्टीनें या सुत्ताचें महत्त्व फार मोठें आहे. हें येथपर्यंत सांगितलें. परंतु वादविवादांतील जय पराजय हे कांहीं तत्त्वनिर्णयाचें खरें साधन नाहीं. धर्माच्या बाबतींत तर परमार्थ-तत्त्वनिर्णय हीच काय ती मुख्य गोष्ट असते. तेव्हां त्या दृष्टीनें ह्या त्रैविद्य सुत्ताचें महत्त्व कितपत आहे, याच्या विचाराकडे आपण वळूं. एक धर्म सोडून दुसऱ्या धर्मांत कशाकरितां जावयाचें? नवीन धर्मांत आपल्या जुन्या धर्मा-पेक्षां कांहीं नवीन असेल, म्हणून त्यांत जावयाचें. परंतु तसें कांहीं नसेल, तर एक धर्म सोडून दुसरा धर्म स्वीकारण्याची यातायात करण्यांत काय अर्थ आहे? वासेष्ठानें आर्यधर्माचा त्याग केला आणि बौद्धधर्माचा स्वीकार केला, त्या वेळीं आर्यधर्मापेक्षां बौद्धधर्मामध्यें त्याला काय जास्त आढळून आलें? ब्रह्मप्राप्तीचा जो मार्ग ब्राह्मणांनीं प्रतिपादिलेला आहे तो खरा आहे किंवा नाहीं, ही त्याची जिज्ञासा होती, आणि त्या जिज्ञासेनें प्रेरित होऊन तो गौतमबुद्धाकडे गेला. अशा प्रकारचा निष्कपट जिज्ञासु आपल्या जवळ सम्यग्ज्ञानाच्या इच्छेनें मोठ्या विश्वासानें प्राप्त झाला असता, गौ-तमबुद्धानें त्याला काय सांगितलें? निरनिराळ्या तऱ्हेच्या प्रश्नांनीं गुरफटून घेऊन आणि दृष्टांतांनीं बांधून घेऊन गौतमबुद्धानें हाच मुद्दा वासेष्ठाचे तोंडून सिद्ध करून घेतला कीं नाहीं कीं, ब्रह्म हें ज्याअर्थीं कोणा-लाही दिसलेलें नाहीं, त्याअर्थीं त्या ब्रह्माप्रत जाऊन पोंचण्याचा मार्ग कोणीही ब्राह्मण दाखवूं शकणार नाहीं! येथपर्यंत गौतमबुद्धाचा युक्तिवाद ठीक आहे. व येथेंच जर हें तर्कशास्त्र थांबलें असतें, तर प्रतिपक्षाला त्या-च्या उलट बोलण्याला फारशी जागा सांपडली नसती. परंतु येथें थांबून गौतमबुद्धाचें कसें भागतें? त्याला ब्राह्मणधर्मापेक्षां बौद्धधर्म ज्यास्त चांग-

का आहे, हें दाखवावयाचें होतें ! तें येथेंच थांबून कसें दाखविलें जाणार? त्याच्यासाठीं पुढें जाणें जरूरच होतें. परंतु येथपर्यंतचा तर्कशास्त्राचा प्रदेश जरी कणखर जमिनीचा होता, तरी याच्या पुढील तर्कशास्त्राचा प्रांत दलदलीनें व्यापिलेला असल्या कारणानें त्यांत पाऊल टाकण्यांत आल्याबरोबर तें पाऊल हेत्वाभासांच्या चिखलांत रुतून गेलें; तर त्यांत कांहीं मोठेंसें आश्चर्य आहे, असें नाहीं. गौतमबुद्धानें वासेठ्ठाच्या विनंतीवरून त्याला पुढें असें सांगितलें कीं, जें ब्रह्म दुसऱ्या कोणाला माहीत नाहीं, तें मला माहीत आहे, आणि म्हणून त्या ब्रह्माप्रत जाऊन पोंहोचण्याचा मार्ग मी दाखवूं शकतों. परंतु हें म्हणणें विश्वसनीयत्वाच्या कोटीमध्यें कसें यावें ? एकच तर्कशास्त्राचे नियम दोहोंकडे सारखेच लावावयाचे असतील, तर जें ब्रह्म कोणत्याही ब्राह्मणांना, किंवा त्यांच्या गुरूंना, किंवा त्यांच्या ऋषींना, किंवा त्यांच्या सात पिढ्यांपर्यंत कोणालाही कधीं दिसलें नाहीं, ते ब्रह्म गौतमबुद्धाला तरी कसें दिसलें ? दिसणें म्हणजे काय ? जी वस्तु आपणांस दिसावयाची, तिचा आणि आपल्या चक्षुरिंद्रियाचा जेव्हां संयोग होतो, तेव्हां ती वस्तु आपल्याला दिसते. परंतु आपल्या चक्षुरिंद्रियाचा कोणत्या प्रकारच्या वस्तूंशीं संयोग होऊं शकतो? ज्या वस्तूला रूप, आकार वगैरे आहेत, त्या वस्तूंशीं आपली दृष्टि संलग्न होऊं शकते, आणि जिला आकार नाहीं ती वस्तू आपल्याला कधींही दिसूं शकत नाहीं. तर मग आतां येथें असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, * ब्रह्माला

---

* येथें ब्रह्मशब्दाच्या अर्थासंबंधानें थोडासा खुलासा करणें जरूर आहे. मूळांत या शब्दाच्या कल्पनेसंबंधानें कांहींसा घोटाळा असावा असें दिसतें. ब्रह्म शब्दाचे परब्रह्म आणि ब्रह्मदेव अगर बौद्धांचा ब्रह्मासहंपति असे दोन अर्थ येथें प्राप्त होतात. पैकीं पूर्वीचा ब्राह्मणज्ञातींतील वासेठ्ठ ज्या ब्रह्माच्या प्राप्तीबद्दल प्रश्न उपस्थित करतो, तें परब्रह्मच असलें पाहिजे. बौद्धधर्मांत जाण्यापूर्वीं बौद्धधर्मांतील ब्रह्मासहंपतीच्या प्राप्तीबद्दल वासेठ्ठानें चिंता करीत बसणें अनुपपन्न आहे. तसेंच आपल्या ब्रह्मदेवाच्या प्राप्तीसंबंधानेंही कोणा मुमुक्षुला कधीं तळमळ लागून राहिलेली असणें शक्य नाहीं. कारण आपल्या आर्यधर्माच्या दृष्टीनें तोही नश्वरच आहे. तेव्हां वासेठ्ठाची उत्कंठा परब्रह्माच्या प्राप्तीसंबंधानेंच असली पाहिजे हें उघड होतें,

आकार आहे किंवा नाहीं? नाहीं. ब्रह्म निराकार आहे. नाहीं तर तें अनित्य होईल. मग तें जर निराकार आहे, तर तें चक्षुरिंद्रियाला गोचर कसें होईल? आणि तें ब्रह्म पक्षपाती नसल्यामुळें त्यानें ब्राह्मणांच्या दृष्टीस पडूं नये आणि गौतमाच्या पडावें, असा पक्षपातही त्याचे हातून होणें शक्य नाहीं. ब्राह्मणांना सूर्य, चंद्र तरी कां दिसतात? कारण त्यास आकार आहे म्हणून. तसा आकार ब्रह्माला असतां तर तेंही त्यांना दिसलें असतें. आणि तें जर निराकारत्वामुळें त्यांना दिसत नाहीं, तर त्यांच्या प्रमाणेंच तें दुसऱ्याही कोणाला दिसणें शक्य नाहीं. अशी वस्तुस्थिति असतांही जर कोणी म्हणेल कीं, तें ब्रह्म मला दिसलें, तर अशा म्हणण्याला काय म्हणावें, हें वासेष्ठानेंच सांगावें!

आतां यावर कोणी असें म्हणेल कीं, गौतमबुद्धानें दुर्धर तपश्चर्या केली होती, व त्या योगानें त्याला ब्रह्मसाक्षात्कार होणें अगदीं संभवनीय आहे. पण जर अशीच कल्पना करावयाची असेल, तर मग ह्या कल्पनेचा फायदा आर्यधर्मांतील जुन्या ऋषींना आणि ब्राह्मणांनाही कां देऊं नये? त्यांच्यामध्ये महान् तपस्वी आणि महान् ज्ञानी थोडेथोडके होते असें नाहीं. वामदेव, विश्वामित्र, जमदग्नि, अंगीरस, भारद्वाज, वसिष्ठ, कश्यप, भृगु, यांच्यापैकी कोणींच तपश्चर्या केलेली नव्हती? आणि त्या तपश्चर्येनें त्यांना कोणालाच दिव्य दृष्टि प्राप्त झालेली नव्हती? आणि गौतमबुद्धाला मात्र तेवढी त्याच्या तपश्चर्येनें दिव्य दृष्टि प्राप्त झालेली होती? कल्पनाच जर करावयाची आणि श्रद्धाच जर ठेवावयाची, तर मग ती गौतमबुद्धावरच ठेवावी आणि आपल्या मंत्रदृष्ट्या ऋषींवर किंवा श्रीकृष्णासारख्या परमात्म्यांवर कां ठेवूं नये, याला कांहीं विनिगमक नाहीं. अशा चिकित्सक दृष्टीनें विचार केला असतां ब्रह्म कोणीच प्रत्यक्ष पाहिलेलें नसल्या कारणानें त्याच्या प्राप्तीचा मार्ग दाखवून देण्याला जर ब्राह्मण समर्थ

---

व त्या परब्रह्माला लागूं पडतील अशींच वर्णनें मूळ सूत्रांतील प्रश्नोत्तरांमधून आलेलीं आहेत. आणि हें जें परब्रह्म तें निराकार असल्यामुळें तें जसें ब्राह्मणांच्या डोळ्यांना कधीं प्रत्यक्ष दिसलें नाहीं. तसें तें गौतमबुद्धाच्या डोळ्यांनाही प्रत्यक्ष दिसणें कधीं शक्य नाहीं.

नसतील, तर त्यांच्याप्रमाणेंच गौतमबुद्धही समर्थ नाहीं, असेंच म्हणणें प्राप्त होतें. परंतु इतका दूरवर पोंच नसल्या कारणानें वासेठ्ठासारखे जे बेडगळ आणि अर्धवट असतात ते असल्या हेत्वाभासांच्या जाळ्यांत सहज सांपडतात. आणि असल्या वेडगळांच्याच खोगीरभरतीनें नवीन धर्म प्रतिष्ठितपणाला पावण्याचा प्रयत्न करितात, व ते प्रयत्न अंशतः सफलही होतात. परंतु हेत्वाभासांनीं कोणत्याही गोष्टीला प्रमाणत्व येणें कधींही शक्य नाहीं. गौतमबुद्धानें याच त्रैविद्य सूत्राच्या शेवटच्या भागांत कूलशील, मध्यमशील आणि महाशील; अशा तीन प्रकारच्या शीलांच्या स्वरूपानें वासेठ्ठाला सद्वर्तनाचे जे नियम सांगितलेले आहेत, ते फार चांगले आहेत. तसेंच एखादा मोठा कर्णा वाजविणारा मनुष्य आपला कर्णा वाजवून त्याच्या आवाजानें आपल्या सभोंवतालच्या चारी दिशा व्यापून टाकितो, त्याप्रमाणें आपल्या मनांतील प्रेम आणि दयार्द्रता यांच्या विचारांच्या प्रणिधानानें आपण हें सर्व जग व्यापून टाकावें, व असें करणें हाच ब्रह्माशीं एक होण्याचा खरा मार्ग होय; इत्यादि जीं तत्त्वें गौतमबुद्धानें वासेठ्ठाला सांगितलीं आहेत, तींही खरोखरच फार उत्कृष्ट आणि उदात्त अशीं आहेत. परंतु तीं काय आमच्या आर्यधर्मांत नाहींत? गौतमबुद्धच काय तो तेवढा नीतीचीं तत्त्वें शिकवीत होता, आणि आर्यधर्म काय लोकांच्या घरावर दरवडे घालावयाला सांगत होता? प्रेम आणि दयार्द्रता यांच्या प्रणिधानानें सर्व जग व्यापून टाकावयाचें, ही चांगली कल्पना आपल्या आर्यधर्मामध्यें काय थोड्या ठिकाणीं प्रतिपादिलेली आहे? अशा स्थितींत वास्तविक पाहतां एक धर्म टाकून दुसऱ्या धर्माची दीक्षा घेण्याची कांहीं जरूरी नाहीं. अध्यात्मशास्त्रांतील अज्ञेय कोटींतील ज्या कांहीं अगदीं अखेरच्या अशा थोड्याशा गोष्टी आहेत, त्या जर एखाद्या धर्माच्या स्वीकारानें ज्ञात होत असतील, तर त्या धर्माचें ग्रहण अगदीं जरूर करावें. परंतु तीं दैवी रहस्यें मानवी बुद्धीला आजपर्यंत कधीं ज्ञात झालीं नाहींत, किंवा याच्यापुढें तीं ज्ञात होतील असाही संभव नाहीं. या जगाचा प्रारंभ केव्हां व कसा झाला हा त्या रहस्यांपैकीं एक प्रश्न आहे. या प्रश्नासंबंधानें गौतमबुद्धानें एके ठिकाणीं असें सांगितलें आहे कीं, असल्या प्रश्नासंबंधींच्या फारशा खोल विचारामध्यें कोणीही पडूं नये. या एका अज्ञेय रहस्यासंबंधानें गौतमबुद्धानें जें ज्ञान

सांगितलें आहे, तेंच दुसऱ्याही अज्ञेय रहस्यांबद्दल असावयाचें! कारण मानवी बुद्धीनें उभारलेल्या आणि मानवी कल्पनेनें कल्पिलेल्या सगळ्या धर्मविचारांची धांव एकाच कुंपणापर्यंत गेलेली असावयाची! त्याच्या पलीकडे कोणी गेल्याचीं क्वचित् उदाहरणें अंधळ्या श्रद्धेच्या डोळस माणसांना कदाचित् आढळलीं असलीं, तरी प्रमाणगम्य तर्कशास्त्राच्या ऐकण्यांत असें एकही उदाहरण आलेलें नाहीं. नुसत्या गप्पाच मारावयाच्या असतील, तर त्या वाटेल तशा मारतां येतील. ख्रिस्ती धर्माचे जे पगारी मिशनरी चवाठ्यावर उभे राहून आपल्या धर्माचा प्रसार करीत असतात, ते देखील 'आम्ही आकाशांतील बापाला पाहिलें आहे' असें लोकांना सांगत असतात! परंतु असल्या गप्पांवर किती विश्वास ठेवावयाचा, हें रस्त्यांतील बायका-पोरांनासुद्धां आतां माहीत झालेलें आहे. तात्पर्य, निसर्गनियमांप्रमाणें ज्या गोष्टी नेहमीं अज्ञेयच रहावयाच्या, त्या अमुक धर्माला समजल्या नाहींत, पण माझ्या धर्माला मात्र समजल्या आहेत, अशा गोष्टी बोलणें म्हणजे निसर्गनियमाच्या विरुद्ध कांहीं तरी वेडगळपणानें बोलणें, असा अर्थ होतो. म्हणून कोणीही समंजस मनुष्यानें असें बोलूं नये. वासेट्ठ हा एक अर्धवट मनुष्य बुद्धाला भेटला होता, म्हणून ठीक होतें. परंतु तो जर पक्का वस्ताद असता, आणि 'मीं ब्रह्म पाहिलें आहे' असें बुद्धानें म्हटल्याबरोबर 'तें कसें दिसलें?' यासंबंधींच्या वर दिलेल्या प्रश्नपरंपरेच्या भडीमारानें तो त्याच्यावर उलटून पडला असता, व गौतमबुद्धाच्याच पद्धतीनें तो त्याची उलट तपासणी घेऊं लागला असता, तर कसें झालें असतें? 'तुम्हांला ब्रह्म कसें माहीत? तुम्ही त्याला कसें पाहिलें? तें निराकार असल्या कारणानें कोणालाही प्रत्यक्ष दिसणें शक्य नाहीं, हें खरें ना? मग तुम्हीं जर तें ब्रह्म प्रत्यक्ष पाहिलें नाहीं, तर त्याच्या प्राप्तीचा मार्ग तुम्ही तरी कसा दाखवूं शकाल? हे भगवन् गौतम, जी स्त्री कधीं पाहिली नाहीं किंवा जिच्याबद्दल कांहीं माहिती नाहीं, अशा स्त्रीवर कोणी प्रीति करूं शकेल काय? किंवा जी माडी कोठें आहे हें माहीत नाहीं, त्या माडीच्या वर चढून जाण्याकरितां कोणी जिना बांधणें शक्य आहे काय?' अशा रीतीनें हे सगळे प्रश्न उलटून गळ्यांत येण्यासारखे आहेत. धर्मासारख्या महत्त्वाच्या बाबतींत असले लपंडावाचे खेळ फारसे टिकाऊ कधींही

नसतात. ह्या अगम्य प्रदेशामध्यें जितकें जातां येतें तितकें जाऊन याच्या-पुढें मानवी बुद्धीला जातां येत नाहीं, असें प्रांजलपणानें सांगितल्यानें कोणत्याही धर्माची हानि होणार नाहीं. व याच्या पलीकडील आम्ही देव पाहिला आहे आणि अमुक केलें आहे!' असल्या असंभाव्य आणि अश्रद्धेय गोष्टी सांगण्यापासून कांहीं फायदाही होणार नाहीं. धर्मप्रसाराच्या कामाला कदाचित् असल्या युक्त्या सकृद्दर्शनी कोणाला हितावह वाटत असतील. परंतु आधीं सत्य धर्म मूळांत जाग्यावर पाहिजे. तेव्हां मग पुढें त्याचा प्रसार करावयाचा. नाहीं तर प्रसार करणार कशाचा? असत्याचा! त्याच्यापेक्षां लोक ज्या धर्मांत आहेत त्या धर्मांतच त्यांना जेथल्या तेथें योग्य नीतिधर्मामध्यें राहूं देणें काय वाईट? पाठीमागून उशिरां आलेल्या बहुतेक धर्मसंस्थापकांचा इतिहास पहावा तों, जो उठतो तो आपल्या धर्माचा प्रसार करावयाला लागतो! परंतु हीं धर्मांतरें करीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं, हें तत्त्व फक्त आमच्या एका आर्यधर्मानें जाणलें आहे, व अमलांतही आणलें आहे. 'माझ्या धर्मांत या, माझ्या धर्मांत या, माझा माल दुसऱ्यापेक्षां चांगला आहे.' असल्या दुकानदारी चढाओढी बहुतेक धर्मप्रचारकांनीं केलेल्या आहेत. फक्त 'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः' हें उदार आणि उदात्त तत्त्व प्रतिपादन करणारा भगवान् श्रीकृष्ण आमच्या एका आर्य धर्मामध्येंच निघालेला आहे! तो आपल्या या आर्यधर्माचें अखंड रक्षण करो!

# इफिजीनिआ आणि ऑरेस्टेस.

हल्लीं एशियामायनर या नांवानें जो देश प्रसिद्ध आहे, त्या देशाच्या पश्चिम किनाऱ्यावर पूर्वीं ट्रॉय या नांवाचें एक मोठें शहर होतें. तेथें प्रायम या नांवाचा एक राजा राज्य करीत होता. त्याच्या मुलांपैकीं पॅरिस या नांवाचा जो मुलगा होता, तो अतिशय रूपवान् असल्याबद्दल चोहोंकडे प्रख्याति होती.

ट्रॉय शहरापासून कांहीं अंतरावर समुद्राच्या पलीकडे ग्रीस नांवाचा जो देश आहे, त्यांत पूर्वीं निरगिराळीं लहान लहान अशीं अनेक संस्थानें होतीं. त्यांपैकीं एका ठिकाणीं मिनिलॉस या नांवाचा राजा राज्य करीत होता; व त्याचा भाउ अगॅमेमनन हा दुसऱ्या ठिकाणीं राज्य करीत होता. अशी स्थिति असतां एके वेळीं ट्रॉय येथील राजपुत्र, पॅरिस, हा ग्रीसमधील राजा, मिनिलॉस, यांजकडे पाहुणा आला होता. तेथें त्यानें मिनिलॉसची बायको, हेलन, हिजला पाहिलें. पॅरिस हा जसा अतिशय सुंदर होता, तशीच हेलन हीही अतिशय सुंदर होती. त्या दोघांची एकमेकांवर प्रीति बसली. आणि अखेरीस मिनिलॉसच्या घरीं पाहुणचार घेण्याकरितां आलेला पॅरिस मिनिलॉसची बायको घेऊन ट्रॉय येथें पळून गेला.

ही गोष्ट ऐकून ग्रीसमधील सर्व राजांना अतिशय संताप आला, आणि मिनिलॉसचा हा जो उपमर्द करण्यांत आला, त्याचा सूड उगविण्याकरितां आणि ट्रॉयचें राज्य पादाक्रांत करून हेलनला परत आणण्याकरितां ट्रॉयवर स्वारी करून जाण्याच्या इराद्यानें ग्रीसमधील सर्व लहान मोठे संस्थानिक व राजे आपआपलीं सैन्यें आणि गलबतें घेऊन समुद्रकांठीं सज्ज झाले, व मिनिलॉसचा भाऊ, अगॅमेमनन, हा सर्वांमध्यें शूर आणि पराक्रमी असल्या कारणानें त्यांनीं त्याला आपल्या सर्व सैन्याचा सेनाधिपति नेमिलें. परंतु अगॅमेमनन सेनापति नेमण्यांत आल्यानंतर, एकदां त्याला असा दृष्टांत

झाला कीं, 'तूं आपली मुलगी देवतांच्या प्रीत्यर्थ बळी देशील, तरच तुझ्या हाताखालील सर्व सैन्य सुरक्षितपणें ट्रॉयला जाऊन पोंचेल; नाहीं तर तुझीं गलबतें समुद्रांत मधेंच कोठें तरी अडकून पडतील.' असा दृष्टांत झाल्यापासून अॅगेमेमननचें चित्त अगदीं अस्वस्थ होऊन गेलें होतें. व अशा स्थितींत काय करावें याबद्दलचा निश्चय त्याच्या मनामध्यें कांहींच होईना. ग्रीशन समुद्राच्या वाळवंटावर सर्व सैन्याचे तंबू ठोकलेले होते; समुद्राच्या पाण्यावर गलबतांच्या डोलकाठ्या वाऱ्याच्या मंदगतीनें डुलत राहिलेल्या होत्या; आणि अॅगेमेमनन आपल्या तंबूमध्यें चिंताग्रस्त होऊन तळमळत पडलेला होता.

अशा स्थितींत एके रात्रीं त्याला मुळींच चैन पडेना. मध्यरात्र उलटून गेली, तरी त्याला झोंप येईना. त्याचें चित्त अतिशय व्यग्र होऊन गेलें होतें. तो आपल्या बायकोला एक पत्र लिहित होता; पण मनाच्या व्यग्रतेमुळें तो एकदां जें लिही, तें दुसऱ्या क्षणीं खोडून टाकीत असे. असें होतां होतां अखेरीस त्यानें आपलें पत्र एकदांचें कसें तरी पुरें केलें. पत्र लिहीत असतां त्याच्या डोळ्यांतून एकसारख्या अश्रुधारा चालल्या होत्या. पत्र पुरें झाल्यावर तो एकदां तें बंद करी, पण मनाचा विचार फिरून डळमळीत होऊन तो तें बंद केलेलें पत्र फिरून उघडी. अखेरीस एकदां तें पत्र बंद करून त्यानें आपल्या एका नोकराजवळ दिलें. तें पत्र त्यानें आपली बायको, क्लायटेमनेस्ट्रा, हिला उद्देशून लिहिलें होतें. याच्यापूर्वीं त्यानें आपल्या बायकोला दुसरें एक पत्र लिहिलें होतें. त्यांत त्यानें असा बहाणा केला होता कीं, ' आपली मुलगी, इफिजीनिआ, हिचें लग्न ॲकिलिस या नांवाच्या ग्रीसमधील एका अतिशय शूर राजाबरोबर करून द्यावयाचें आहे; याकरितां तूं आपल्या मुलीला घेऊन लवकर येथें यावें.' या लग्नाच्या मिषानें आपल्या मुलीला आपल्या बायकोबरोबर बोलावून आणून तिचा बळी देवतेला समर्पण करावा, असा त्याचा पहिला विचार होता; परंतु मनाच्या अस्थिरतेमुळें तो विचार बदलून आतां, 'तूं आपल्या मुलीला घेऊन येथें येऊं नको; कारण लग्नाचा बेत सध्यां रहित करण्यांत आला आहे;' अशा मजकुराचें हें दुसरें पत्र त्यानें लिहून तयार केलें

होतें. तें दुसऱ्या कोणाच्या हातीं न देतां आपली बायको, क्लायटेमनेस्ट्रा, हिजला लष्कर नेऊन द्यावें, असें सांगून त्यानें आपला जासूद रवाना केला.

परंतु, तो जासूद अॅगमेमननच्या तंबूंतून बाहेर पडला असेल नसेल, तोंच अॅगमेमननचा भाऊ मिनिलॉस, हा तंबूच्या बाहेरच होता, त्यानें तें पत्र त्या जासुदाच्या हातांतून हिसकावून घेऊन फोडलें. अॅकिलिस पाशीं लग्न करून देण्याच्या मिषानें आपली मुलगी, इफिजीनिआ, हिजला आणण्याबद्दल अॅगमेममननें आपल्या बायकोला लिहिलेलें पहिलें पत्र मिनिलॉसला माहीत होतें. व इफिजीनिआचा बळी पुढील कार्याच्या सुकरतेकरितां दिला जावा, ही गोष्ट मिनिलॉसला इष्ट असल्या कारणानें, पहिल्या पत्राप्रमाणें तो इफिजीनिआच्या येण्याची वाटच पहात होता आणि आपला भाऊ अॅगमेमनन, हा कदाचित् आपला विचार, प्रेमवश होऊन, बदलील अशी त्याला भीतिही वाटत होती. आणि हा संशय मनामध्यें येऊन मिनिलॉसनें जासुदाच्या हातून अॅगमेमननचें पत्र हिसकावून घेऊन वाचलें. पत्र दुसऱ्या कोणाच्या हातीं पडूं नये, असें जासुदाला सांगितलें असल्यामुळें, मिनिलॉसनें पत्र हिसकावून घेतलें, तेव्हां जासूद मोठ्यानें ओरडला. ती गडबड ऐकून अॅगमेमनन हा आपल्या तंबूंतून बाहेर आला, व काय दंगा आहे म्हणून पाहूं लागला; तों इतक्यांत मिनिलॉस पुढें आला आणि अॅगमेमननला उद्देशून म्हणाला, " माझ्या हातांत हें पत्र आहे, तें तूं पाहिलेंस काय ? "

अॅगमेमनन म्हणाला, " होय. तें माझेंच आहे; तें माझें मला परत दे. "

यावर मिनिलॉसनें उत्तर दिलें. " या पत्रांत तूं जें लिहिलें आहेस, तें एकत्र जमलेल्या सर्व ग्रीक सैन्याला वाचून दाखविल्याशिवाय, मी हें पत्र तुला कधींही परत देणार नाहीं. "

" पण आधीं हें पत्र तुझे हातीं आलें कसें ? " अॅगमेमननें विचारिलें.

मिनिलॉसनें सांगितलें, " तुझी मुलगी, इफिजीनिआ, ही केव्हां येऊन पोंचते याची वाट पहात मी येथें उभा होतों. इतक्यांत तुझा जासूद तंबूंतून बाहेर पडला. तूं आपला निश्चय बदलशील असा मला संशय होताच. म्हणून मी त्याच्या हातांतून हें पत्र हिसकावून घेतलें. "

यावर अगॅमेमनन संतापानें बोलला, "तें माझें खाजगी पत्र आहे. त्याच्याशीं तुला काय करावयाचें होतें ? माझ्यां घरगुती कामांतसुद्धां मी लोकांच्याच मर्जीप्रमाणें वागलें पाहिजे कीं काय ?"

"लोकांनीं तुला आपला सेनापति निवडीपर्यंत" मिनिलॉस आपल्या भावाला टोंचून म्हणाला, "तूं सर्व लोकांच्या मर्जीप्रमाणेंच वागत होतास, तूं त्यांची खुषामत करीत होतास, तूं त्यांचें आगतस्वागत करीत होतास, तूं त्यांना मेजवान्या देत होतास, पण सेनाधिपतीचा अधिकार मिळाल्याबरोबर तुझी वर्तणूक बदलली. तूं गर्वानें फुगून गेलास आणि तूं कोणाशीं बोलेनासा झालास. पुढें सेनापतीनें आपली मुलगी बळी दिली तरच हें ग्रीक सैन्य ट्रायला सुरक्षित जाऊन पोचेंल, असा जेव्हां दृष्टांत झाला, तेव्हां आतां आपली सेनापतीची जागा जाणार आणि आपला नांवलौकिक कमी होणार अशी भीति पडून तुझा भविष्यवादी ज्योतिषी जो कॅल्कस, त्याच्या सांगण्यावरून तूं आपली मुलगी बळी देण्याला तयार झालास, आणि ॲकिलिसजवळ तिचें लग्न लावून द्यावयाचे आहे, अशा निमित्तानें तूं तिला बोलवावयाला पाठविलेंस, या सगळ्या गोष्टी खऱ्या नाहींत काय ? आणि तोच तूं आतां बदललास ! तुझ्यासारखा डळमळीत सेनापति ग्रीसला मिळाला हें ग्रीसचें दुर्दैवच समजलें पाहिजे."

"पण," अगॅमेमननने विचारलें, "मला अशीं नावें ठेवण्याला तुला कसा अधिकार पोंचतो ? तुझी बायको तुझ्या ताब्यांत रहात नाहीं, म्हणून तूं मला काय म्हणून दूषणें देणार ? तुझी बायको परत मिळविण्याकरितां तूं कां पुढें सरसावत नाहींस ? माझा पहिला विचार चुकीचा असला आणि मागून मला एखादा जास्त शहाणपणाचा विचार सुचला, तर त्यांत काय बिघडलें ? तुझी बायको परत आणण्यासाठीं तूंच कां जात नाहींस ? तुझ्या बायकोसाठीं मी आपली मुलगी काय म्हणून बळी देऊं आणि जन्माचा दुःखी होऊन बसूं ?"

"अशा रीतीनें विश्वासघात करून मला तोंडघशीं पाडावयाचें असलें, तर तूं खुशाल पाड, असें असेल तर मला दुसरी कांहीं तरी तजवीज केलीच पाहिजे." असें म्हणत मिनिलॉस संतापानें हातपाय आपटीत तेथून निघून गेला.

तो हें बोलत आहे, इतक्यांत एक जासूद येऊन सांगूं लागला कीं, "महाराज, आपली मुलगी, इफिजीनिआ, हिला आपले आज्ञेप्रमाणें मी घेऊन आलों आहें. तसेंच राणीसाहेब, क्लायटेमनेस्ट्रेस, ह्याही आल्या आहेत. आणि त्यानीं आपलें धाकटे चिरंजीव ऑरेस्टेस, यांनाही बरोबर आणिलें आहे. प्रवास फार दूरचा, त्यामुळें घोडे अगदीं थकून गेले असल्याकारणानें शेजारच्या नदीच्या कांठीं थोडी विश्रांति घेण्याकरितां ते सर्व थांबले आहेत. त्यांना पाहण्याकरितां लष्करांतील पुष्कळ लोक त्यांच्याभोंवती जमा झाले आहेत. आणि त्यांच्या येण्याचें कारण काय असावें, याबद्दल लोकांमध्यें आपापसांत पुष्कळ चर्चा चाललेली आहे. आपल्या मुलीचें लग्न करून देण्यासाठीं महाराजांनीं तिला बोलाविली असली पाहिजे, असा कित्येकांचा तर्क आहे; तर कित्येकांना असें वाटत आहें कीं, महाराजांनीं तिला नुसती भेटण्याकरितांच बोलविलेली असली पाहिजे."

आपली बायको आली आहे हें ऐकून अगॅमेमननला फारच मोठें संकट वाटूं लागलें, आणि तो आपल्याशीं म्हणाला, "आतां हिला मी काय सांगूं? आपल्या मुलीचें लग्न व्हावयाचें आहे, अशा समजुतीनें ती येथें आलेली आहे. पण तिला माझा खरा हेतु समजला म्हणजे ती मला काय म्हणेल? आणि मी आपल्या मुलीला तरी काय सांगूं? बाळे! तुझ्यासारखी हतभाग्य दुसरी कोणी नाहीं! मृत्यूशीं तुझें लग्न लावून देण्याकरितां मी—तुझ्या बापानें—तुला येथें आणिलें आहे! तिला जेव्हां सगळी खरी हकीकत कळेल, तेव्हां ती माझ्याजवळ येऊन मला विचारील कीं, 'बाबा, तुम्ही खरोखरच का माझा वध करणार आहां? तेव्हां तिला मी काय उत्तर देऊं? तसेंच त्या भयंकर प्रसंगीं तिचा धाकटा भाऊ, ऑरेस्टेस, हाही रडूं लागेल. त्याला काय सांगावयाचें! हाय हाय! हा सगळा भयंकर प्रसंग त्या नीच पॅरिसमुळें आमच्यावर आलेला आहे! या दुष्टाचा एकदांचा नायनाट होवो!"

या वेळीं अगॅमेमननचा भाऊ 'मिनिलॉस' हा परत आला आणि आपल्याला झालेला पश्चाताप प्रदर्शित करून तो म्हणाला, "मी पूर्वी तुला बोललों ती माझी चूक आहे. कारण माझ्यासाठीं तूं आपल्या मुलीला मृत्यूच्या तोंडीं काय म्हणून द्यावेंस? माझी बायको, हेलन, ही परत आली किंवा न आली तरी त्याच्याशीं तुझ्या मुलीला काय कर्तव्य आहे? तेव्हां

हें जें सैन्य जमा झालें आहे तें सगळें परत आपापल्या जागीं जाऊं द्या. कारण तुझ्या मुलीचा विनाकारण घात करणें हा अन्याय आहे, आणि तो आपल्या हातानें होतां कामा नये ! "

यावर अॅगॅमेमननें शंका काढिली कीं, " हें होणार कसें ! सगळ्या सैन्यांतील लोक मला आपली मुलगी बळी देण्याला भाग पाडल्यावांचून कधींही राहणार नाहींत ! "

यावर मिनिलॉसने अशी तोड सुचविली कीं, ' तूं आपली मुलगी मुकाट्यानें आरगॉसला परत पाठवून दे, म्हणजे पुढे कांहीं एक होणार नाहीं. " परंतु अॅगॅमेमननला हा सल्ला पसंत पडेना. त्याचें असें म्हणणें पडलें कीं, " मी आपल्या मुलीचा बळी देण्याचें दिलेलें अभिवचन कॅल्कस आणि युलिसिस यांना माहीत आहे, मी वचनभंग करीत आहें, म्हणून ते जिकडे तिकडे डंका पिटवितील. आणि यदाकदाचित् मीही आरगॉसला निघून गेलों, तर हे सगळे लोक माझ्या मागोमाग तेथें येतील आणि माझ्या राज्याचा विध्वंस करून टाकतील. सारांश मी आतां कांहीं केलें, तरी माझी या पेचांतून सुटका होण्याचा मार्ग दिसत नाहीं. असें भयंकर संकट माझ्यावर येऊन पडलें आहे.—पण तुलें तरी तूं एवढी खबरदारी घे कीं, यांतील एक अक्षरही क्लायटेमनेस्ट्रा, राणीच्या कानावर जाऊं नये."

पण हें त्याचें बोलणें संपलें नाहीं तोंच राणी, क्लायटेमनेस्ट्रा, ही आपल्या रथांतून तेथें येऊन पोहोंचली. ती व तिचीं दोन मुलें रथांतून खालीं उतरल्यानंतर इफिजीनिआ हिनें प्रथम पुढें जाऊन आपल्या बापाला मिठी मारिली, आणि म्हटलें, " बाबा, तुम्ही मला येथें आणिली हें किती तरी चांगलें झालें आहे ! "

अॅग०——कोणाला ठाऊक, चांगलें झालें आहे कीं वाईट झालें आहे!

इफि०——कां, बाबा, तुम्ही असें कां बोलतां ! मी आलेली पाहून तुम्हाला आनंद झाल्यासारखा दिसत नाहीं.

अॅग०——बाळे, जो राजा असतो आणि जो एखाद्या मोठ्या सैन्याचा सेनापति होतो, त्याच्या मनाला पुष्कळ काळज्या असतात.

इफि०——पण त्या सगळ्या क्षणभर दूर सारून तुम्ही माझ्याशीं मोकळ्या मनानें बोला.

अॅग०-- तुला पाहून मला खरोखरच फार आनंद होत आहे.

इफि०--तुम्हांला आनंद होत आहे ! मग तुमच्या डोळ्यांतून हे अश्रु कां गळत आहेत ?

अॅग०--बाई, तुझा आणि माझा आतां दीर्घ काळपर्यंत वियोग होणार आहे म्हणून मला हें रडूं येत आहे.

इफि०--जळोत या लढाया एकदांच्या !

अॅग०--छे, छे ! त्या कशा जळणार ! त्या माझ्या अंतःकरणाला जाळण्यासाठीं निर्माण झाल्या आहेत.

इफि०--बाबा, या लढाईसाठीं तुम्हांला माझ्यापासून फार दूरवर कां प्रवासाला जावयाचें आहे ?

अॅग०--होय. आणि तुला पण जावयाचें आहे !

इफि०--पण माझ्याबरोबर आई असेलना ? कीं मला एकटीलाच गेलें पाहिजे ?

अॅग०--एकटी ! एकटी ! आई, बाप, कोणीही तुझ्याबरोबर येऊं शकणार नाहींत !

इफि०--तर मग काय, बाबा, तुम्ही मला दुसरीकडे कोठें तरी रहावयास धाडणार आहां ?

अॅग०--ऐक, किती बोलतेस. लहान मुलांनीं असल्या बाबतींत इतक्या चौकश्या करूं नयेत.

इफि०--बरें तर बाबा. तुम्ही तिकडचें मोहिमेवरचें काम आटपून लौकर परत याल ना ?

अॅग०--पण मला जाण्याच्या आधीं देवतांना बलिदान करून संतुष्ट केलें पाहिजे.

इफि०--तसें तर जरूर केलें पाहिजे. देव संतुष्ट झाले म्हणजे ते तुम्हांला जय देतील.

अॅग०--पण, बाळे, त्या बलिदानाच्या वेळीं तूं माझ्याजवळ उभें राहिलें पाहिजे !

इफि०--हो हो ! मी मोठ्या आनंदानें तुमच्याजवळ उभी राहीन !

अॅग०--( आपल्याशीं ) हिला यांतला कांहीं एक अर्थ समजत

नाहीं, म्हणून ही किती सुखी आहे ! हें सुख मला आहे कां ?—बरें, बाळे ! तूं आतां आपल्या तंबूंत जा. पण थांब, आधीं मला एकदां तुझें चुंबन घेऊं दे. कारण, तुझा एकदां वियोग झाल्यावर फिरून तुझें दर्शन केव्हां घडणार आहे !

इतकें बोलणें झाल्यानंतर ती तेथून निघून गेली. तेव्हां तिच्याकडे पहात पहात अॅगॅमेमनन आपल्याशींच म्हणाला, " अहाहा ! हिचें हें शरीर किती तरी कोमल आहे. आणि त्याचा आतां बळी दिला जाणार ! ट्रॉय शहराला आम्ही सुरक्षित जाऊन पोहोंचलें पाहिजे, एवढ्यासाठीं माझ्यावर हें संकट ओढवत आहे; परंतु आतां याविषयीं जास्त विचार करून उपयोगीं नाहीं ! "

नंतर तो आपल्या राणीकडे वळला. राणीनें " आपला जावई कोण " म्हणून विचारलें, तेव्हां त्यानें अॅकिलिसचें नांव सांगितलें. तसेंच याच महिन्यांत आणि लष्कराच्या छावणीमध्येंच आपल्या मुलीचें लग्न व्हावयाचें असल्याचें त्यानें तिला सांगितलें. अखेरीस तो आपल्या राणीला म्हणाला कीं, " आपल्या मुलीचें मी कन्यादान करीन; तूं आता आरगॉसला परत जा. "

यावर राणी आश्चर्यानें म्हणाली, " काय ? मी परत जाऊं ? माझ्या मुलीचें लग्न आणि मी कशी परत जाऊं ! माझ्या मुलीच्या कन्यादानाच्या वेळीं तुमच्या हातावर कन्यादानाचें पाणी कोण घालील ? "

अॅग॰—मी तें सगळें करीन. तूं येथून जा म्हणजे झालें, जेथें सगळें लष्कर जमा झालें आहे, तेथें बायकांनीं राहणें योग्य नाहीं.

क्लाय॰—पण आपल्या मुलीच्या लग्नाच्या वेळीं तिच्या आईनें तिच्याजवळ असणें यांत कांहीं गैर नाहीं.

अग॰—पण आरगॉसला तुझीं दुसरीं कामें तुझ्यावांचून खोळंबून राहिलीं असतील ?

क्लाय॰—त्या कामावांचून आतांच कांहीं खोळंबलेलें नाहीं, आणि शिवाय लग्नापेक्षां तीं कांहीं जास्त महत्त्वाचीं नाहींत.

हा त्या उभयतांचा संवाद चालला आहे, इतक्यांत खुद्द अॅकिलिसच तेथें आला. सैन्य निघण्याला फार वेळ लागत असल्यामुळें सैन्यांतील

लोक अगदीं कंटाळून गेले आहेत, आणि जो तो लष्कर सोडून आपा-पल्या घरीं निघून जाण्याला तयार झाला आहे, असें अगॅमेमननला सांग-ण्याकरितां तो येत होता. हा ॲकिलिसच आहे, असें त्याच्याच एका चाकराच्या तोंडून ऐकल्यावरोबर क्लायटेमनेस्ट्रा ही तंबूच्या बाहेर आली आणि याच ॲकिलिसला आपली मुलगी द्यावयाची ठरलेली आहे, हें लक्षांत आणून त्यासंबंधानें ती त्याच्याशीं कांहीं बोलू लागली. परंतु ॲकि-लिसला त्या लग्नाबद्दल खरोखरच कांहीं माहीत नव्हतें; कारण इफिजीनि-आला बळी देण्याकरितांच अगॅमेमननें आणविलेली असून ॲकिलिस-पाशीं तिचें लग्न लावून द्यावयाचें आहे, ही खोटी सबब त्यानें आपल्या मुलीला व बायकोला सांगितलेली होती. त्यामुळें ॲकिलिसला लग्नाची कांहींच वार्ता नव्हती, यांत कांहीं मोठेंसें आश्चर्य होतें, असें नाहीं. परंतु राणीला हें कपट माहीत नसल्यामुळें तिला असें वाटूं लागलें कीं, ॲकिलिस हा लाजेमुळें लग्नाच्या बाबतींत कांहीं एक बोलत नाहीं. त्यामुळें त्यांच्या संभाष-णामध्यें अधिकच संशय आणि घोटाळा उत्पन्न होऊं लागला. तेव्हां ही लग्नाची बातमी कशी व कोठून निघाली, हें खुद्द अगॅमेमननलाच जाऊन विचारावें अशा हेतूनें ॲकिलिस त्याच्याकडे जाण्याकरितां निघत होता; इतक्यात ज्या जासुदानें अगॅमेमननचें पहिलें पत्र त्याच्या राणीकडे नेलें होतें, आणि ज्याला या गोंधळांतील सगळी हकीकत माहीत होती, तोच जासूद तेथें आला. त्याला राणीनें विचारलें. परंतु कांहीं केल्या तो सांगेना. अखेरीस राणीनें त्याला अभय दिल्यानंतर त्यानें सर्व हकीकत सांगितली. आपल्या मुलीचा देवतांना बळी देण्याचा अगॅमेमननचा विचार आहे असें जेव्हां क्लायटेमनेस्ट्राला समजलें आणि या संकटामध्यें आपल्याला मदत करण्याला आतां ॲकिलि-सशिवाय दुसरा कोणी नाहीं असें जेव्हां तिनें पाहिलें, तेव्हां ती ॲकिलि-सच्या विनवण्या करून त्याला म्हणाली, "आतां या संकटांतून तूंच आम्हांला सोडविलें पाहिजे. तुझ्या नांवावर हा गुन्हा घडून येत आहे. तुझ्या नांवाच्या भरंवशावर आम्ही फसत आहोंत, तेव्हां आतां तूंच आम-चें रक्षण केलें पाहिजे. आम्हांला दुसरा कोणी तारणारा नाहीं."

यावर ॲकिलिसनें उत्तर केलें कीं, "खरेपणानें असो किंवा खोटे-पणानें असो, अगॅमेमननें ही आपली मुलगी मला देऊं केली होती; तेव्हां

तिचें संरक्षण करणें हें माझें कर्तव्यकर्मच आहे. तिच्या बापाच्या हातून मी कधींही मरण येऊं देणार नाहीं. ती जर अशा रीतीनें मरेल, तर तो माझ्या नांवाला मोठाच कलंक आहे. कारण माझ्याशीं लग्न लावून देण्याच्या मिषानें अॅगमेमननें तुम्हांला फसवून येथें आणिलें आहे, तेव्हां मला आपल्या तरवारीनें या अबलेचें रक्षण केलेंच पाहिजे ! "

इतक्यांत अॅगमेमनन आपल्या तंबूंतून बाहेर आला. त्याला आपल्या पोटांतील गुप्त हेतु राणीला कळला असल्याबद्दलची कांहींच कल्पना नव्हती. अशा स्थितींत तो पुढें आल्याबरोबर राणी क्रोधानें चवताळून जाऊन त्याला ह्मणाली, " आपला काय विचार आहे ? आपली आणि माझी मुलगी हिला ठार मारण्याचा आपला बेत आहे काय ? " यावर अॅगमेमनन काय उत्तर देणार ? तो स्वस्थ उभा राहिला. पुढें काय बोलावें हें त्याला सुचेना. त्या वेळीं राणीनें त्याची फार निर्भर्त्सना केली.

इतक्यांत इफिजीनिआला ही सर्व बातमी कळून तीही जवळच्या एका तंबूतून ऑरेस्टेसला आपल्या उराशीं धरून बाहेर आली, आणि आपल्या बापाच्या पुढें गुडघे टेकून केविलवाण्या स्वरानें त्याची विनवणी करूं लागली. " बाबा, मी तुमच्या पोटची मुलगी आहेना ? मग तुह्मी मला अशी कां मारतां ? मला मरण येईल तेव्हां मी मरेन; पण तोंपर्यंत तुह्मी मला मारूं नका. हा पहा चोहोंकडे पसरलेला सूर्याचा प्रकाश पाहण्याला किती तरी आल्हादकारक आहे. त्यांतून उचलून तुम्ही मला काळ्याकुट्ट अंधकारामध्यें ढकलून देऊं नका. मी तुमची पहिली मुलगी. पहिल्यानें जर कोणी तुम्हांला ' बाबा ' म्हणून हाक मारिली असेल तर ती मी होय; आणि मी लहान होते तेव्हां तुह्मी मला आपल्या मांडीवर घेऊन माझ्या पाठीवरून हात फिरवीत मला असें सांगत असां कीं, एखादा चांगला श्रीमंत नवरा पाहून त्याच्याशीं तुझें लग्न लावून देऊं. मला हीं तुमचीं सगळीं बोलणीं आठवतात. पण तुम्हीं मात्र तीं अगदीं विसरलां. कारण लहानपणीं असें गोडगोड बोलणारे तेच तुम्हीं माझा बळी देण्याला तयार झालां ! पण बाबा असें पातक करूं नका. आपल्या पुर्वजांकडे पहा. आपल्या वडिलांचें स्मरण करा. निदान जिनें नऊ महिने माझें ओझें पोटांत वाहिलें आणि जी आतां अत्यंत कष्टी झाली आहे, त्या या माझ्या

आईकडे तरी पहा. तसेंच हें पहा आपलें धाकटें बाळ. याच्याकडे तरी पहा.—बाळा, तूं तरी मला कांहीं मदत कर. तूं माझ्याबरोबर रड आणि रडत रडत आपल्या बाबांना सांग कीं, तुम्ही माझ्या बहिणीला मारूं नका !—बाबा, पहा, याच्याकडे पहा. याला जरी बोलतां येत नाहीं, तरी खात्रीनें तो माझ्यासाठीं तुमची विनवणी करीत आहे. त्याच्या विनवणीची तरी तुम्हांला दया येऊं द्या. बाबा, माझ्यावर दया करा ! मला मारूं नका !

हें आपल्या मुलीचें करुणात्मक भाषण ऐकून राजा अगदीं गहिंवरून गेला. आणि पुढें काय बोलावें किंवा काय करावें, हें त्याला कांही सुचेना. कारण या वेळीं तो मोठ्या पेचांत सांपडलेला होता. आपल्या मुलीचा बळी देवतांना समर्पण करून त्यांना संतुष्ट केल्याखेरीज ग्रीशन सैन्य ट्रायच्या किनाऱ्याला सुरक्षितपणें जाऊन पोहोंचणें शक्य नव्हते; आणि दुसरीकडे प्रत्यक्ष आपल्या मुलीचा वध करणें हेंही अशक्य होत चाललें होतें. अशा अडचणींत तो पडला असतां ॲकिलिस तेथें आला व सांगूं लागला कीं, " सगळ्या लष्करामध्यें फार भयंकर दंगा उसळला आहे ! राजाच्या मुलीचा बळी दिलाच पाहिजे, असें सगळेजण ओरडत आहेत ! मी त्यांना थांबविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परन्तु तें ताळ्यावर येत नाहींत. तरी पण या कुमारिकेसाठीं मी आतां त्यांच्याशीं जाऊन लढावयालाच सुरवात करितों आणि त्यांचा पराजय करून टाकितों. "

परन्तु ही हकीकत जेव्हां इफिजीनिआनें ऐकिली तेव्हां तिचें मन एकदम पालटलें. आणि ती म्हणाली, " आई, उगी रहा. तूं आपलें दुःख आवरून धर आणि बाबांवर विनाकारण रागावूं नको. त्यांच्याही हातीं काहीं इलाज आहे. असें दिसत नाहीं. तेव्हां आतां आपल्या नशिबी जें लिहिलें आहे तें भोगण्याला आपण तयार झालें पाहिजे. हा राजपुत्र, ॲकिलिस, आपल्यासाठीं आपले स्वतःचे प्राण खर्ची घालण्याला तयार झाला आहे. परन्तु आपल्यासाठीं त्यालाही विनाकारण श्रम देणें उचित नाहीं. शिवाय एवढ्या सैन्यापुढें त्याची एकट्याची काय दाद लागणार आहे ? तेव्हां या सगळ्या गोष्टी लक्षात आणून मी आपल्या मनाचा निश्चय केला आहे. सगळा ग्रीसदेश या क्षणीं माझ्याकडे पहात आहे. मी जर आपला देह अर्पण करण्याला तयार झालें नाहीं तर आपल्या

देशाच्या सैन्याचीं गलबतें प्रवासाला निघूं शकत नाहीत, आणि तीं निघालीं नाहींत तर शत्रूचें शहर जमीन दोस्त होत नाहीं आणि आपल्या देशाच्या शत्रूचा सूड उगविला जात नाहीं! आई, मी जी जन्मास आलें आहे ती कांहीं फक्त तुझ्याचकारितां नाहीं, तर हा सगळ्या माझ्या देशबांधवांकरिता माझा जन्म आहे! म्हणून त्यांच्या कल्याणाकरितां मी आपला प्राण खर्ची घाल-ण्याचा निश्चय केला आहे!—बाबा, चला, उठा, द्या मला त्या देवतांना बळी आणि माझ्या देशबांधवांच्या सैन्याला जाऊं द्या ट्रॉयच्या यशस्वी मोहिमेवर! ह्याच्याच योगानें माझें नांव अजरामर होईल!"

हें तिचें भाषण ॲकिलिस मोठ्या उत्कंठेनें ऐकत होता. तें ऐकून तो सद्गदित झाला. आणि त्या राजकन्येला उद्देशून म्हणाला, "हे कुमा-रिके, हे तुझे उदात्त विचार ऐकून माझें मन तुजविषयीं फारच तल्लीन होऊन गेलें आहे. आणि इतक्या उदात्त विचारांची स्त्री परमेश्वर माझी सहधर्मचारिणी करून देईल, तर मी आपल्याला मोठाच भाग्यवान् सम-जेन!—हे सुंदरी, तुला माझ्या पराक्रमाबद्दल मुळींच शंका वाटूं देऊं नको. ग्रीसमधील सगळे लोक माझ्यावर तुटून पडले तरी त्या सगळ्यांचा पराभव करून त्यांच्यामधून वाट काढून मी तुला सुरक्षितपणें आपल्या घरीं नेईन. मात्र तुझी इच्छा तशी असली पाहिजे!" यावर त्या कुमारिकेनें असें उत्तर दिलें कीं, "ॲकिलिस, मी पूर्ण विचार करून आपला निश्चय केला आहे. माझ्यासाठीं कोणाचाही जीव धोक्यांत पडावा अशी माझी बिलकुल इच्छा नाहीं; उलट माझ्या हातून माझ्या देशबांधवांचे जीव धोक्यांतून बाहेर काढले जावेत, अशी माझी महत्त्वाकांक्षा आहे.!"

हें ऐकून ॲकिलिसनेंही मोठ्या संतोषानें मान डोलविली आणि तिच्या मनाच्या उदात्तपणाचीही तारीफ करून त्यानें आपलें म्हणणे माघारें घेतलें. इफिजीनिआचें मन तिच्या निश्चयापासून परावृत्त करण्याकरितां तिच्या आईनेंही डोळ्यांत अश्रु आणून पुष्कळ विनवण्या केल्या. परंतु कांहीं केल्यानें तिचा अढळ निश्चय ढळला नाहीं आणि अखेरीस बलि-दानाचा निश्चय ठरला.

ज्या देवीला तिचा बळी द्यावयाचा होता, त्या देवीच्या मंदिरासभों-वतीं एक मोठी वृक्षराजि होती. त्यामध्यें एक भव्य मंडप उभारलेला होता

आणि त्या मंडपाच्या मध्यभागीं एक मोठी वेदी तयार केली असून, तेथें एक अग्निकुंड प्रदीप्त करण्यांत आलें होतें. आणि त्याच्या सभोंवतीं सर्व ग्रीक सैन्य गोळा झालेलें होतें. त्या मंडपाकडे इफिजीनिआला नेऊं लागले, त्या वेळेला तिच्याकडे पाहून अगॅमेमननें आपलें तोंड झांकून घेतलें आणि तो ढळढळा रडूं लागला. तेव्हां त्याची मुलगी आपल्या बापाजवळ क्षणभर थांबली आणि तिनें त्याची पुढें लिहिल्याप्रमाणें समजूत केली. " बाबा, तुम्ही कां रडतां ? आपल्या देशांतील लोकांच्या विजयाकरितां मी आपल्या खुषीनें आपल्या देहाचा बळी समर्पण करण्याला सिद्ध झालें आहे ! आणि त्याबद्दल माझी परमेश्वरापाशीं एवढीच प्रार्थना आहे कीं, त्यानें आतां तुम्हांला या लढाईमध्यें पूर्ण यश द्यावें आणि तुम्ही सर्वांनीं विजयी होऊन सुखरूपपणें आपल्या घरीं परत यावें ! तेव्हां आतां कोणी माझ्या आड येऊं नका; आणि देवीला बळी देण्याकरितां मला आपली मान संतोषानें पुढें करूं द्या ! "

हें तिचें भाषण ऐकून तिच्या अंतःकरणांतील धैर्याबद्दल आणि औदार्याबद्दल सर्वांना आश्चर्य वाटलें. इतक्यांत बलिदानाची तयारी झाली. त्या मंडपांतील व्यवस्था ठेवणारा मुख्य अधिकारी मंडपाच्या मध्यभागीं येऊन उभा राहिला. आणि त्यानें सर्वांना स्तब्ध राहण्याविषयीं आज्ञा केली. त्या बलिदानाच्या कृत्यांतील मुख्य उपाध्याय जो कॅलकस त्यानें तिच्या गळ्यामध्यें पुष्पांची माळ घातली. आपल्या म्यानांतून त्यानें आपली तरवार बाहेर काढिली. आणि सर्व लोकांचे डोळे, ती कुमारिका आणि ती तरवार, यांच्याकडे लागून राहिले.

इतक्यांत त्या ठिकाणीं एक मोठा विलक्षण चमत्कार घडून आला. कॅलकसच्या तरवारीचा घाव सर्वांनीं ऐकला. परंतु त्याचक्षणीं ती राजकन्यका जी एकदम अदृश्य झाली, ती फिरून कोणाच्याही नजरेस पडली नाहीं. ती कोठें गेली किंवा तिचें काय झालें, हें कोणालाही कळलें नाहीं. मात्र तिच्या जागीं एक हरिणी त्या तरवारीचा घाव लागून विव्हळ होऊन पडलेली दिसली. आणि तिच्या रक्तानें ती सर्व वेदिका लाल भडक झालेली दिसूं लागली. ह्या चमत्काराला उद्देशून कॅलकसनें सर्व लोकांपुढें असें भाषण केलें कीं, " लोक हो, तुम्ही हा चमत्कार पहातच आहां. राजक-

न्येच्या ऐवजीं दुसरा बळी घेऊन देवीनें राजकन्येचा जीव कसा वांचविला आहे, आणि तिच्यावर तिनें कशी दया केली आहे, हें तुम्ही प्रत्यक्ष पाहिलेंच आहे. राजकन्या इफिजीनिआ हिच्या केसालाही धक्का लागला नसून देवीनें तिला आपल्या दुसऱ्या एका ठिकाणच्या मंदिरामध्यें सुरक्षितपणें नेऊन ठेविलें आहे. अशा रीतीनें तुम्ही दिलेला बळी तिनें स्वीकारलेला आहे. तेव्हां आतां तुम्हांला धैर्य येऊं द्या आणि तुम्ही शत्रूच्या मुलुखावर हल्ला करण्याकरितां आतांच्या आतां निघण्याची तयारी करा !"

मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें इफिजीनिआच्या बलिदानाचा विधि झाल्यानंतर ग्रीक सैन्यानें भरलेलीं गलबतें निघालीं, आणि ट्रॉय शहराला सुरक्षितपणें जाऊन पोहोंचलीं. तेथें ग्रीक लोकांचें आणि ट्रोजन लोकांचें कित्येक दिवसपर्यंत भयंकर युद्ध होऊन अखेरीस त्यामध्यें ट्रॉयचा पूर्ण उच्छेद होऊन ग्रीसचा पूर्णपणें विजय झाला. त्या विजयानंतर सर्व ग्रीक लोक ग्रीसला माघारे आले. त्यांच्याबरोबर अॅगॅमेमनन हाही आपल्या घरीं परत आला. परंतु तो लढाईवर असतांना त्याच्या पाठीमागें त्याची गृहस्थिति अगदीं बदलून गेलेली होती. आपली मुलगी इफिजीनिआ हिला आपल्या नवऱ्यानें ठार मारलें, अशा समजुतीनें अॅगॅमेमननची बायको क्लायटेमनेस्ट्रा हिचें मन आपल्या नवऱ्याविषयीं क्रोधाविष्ट झालें होतें, व त्याच्यावरचें तिचें सर्व प्रेम त्या क्रोधामुळें हळुहळू लोपत चाललें होतें. अॅगॅमेमननवरून उडत चाललेलें हें तिचें प्रेम त्याच वेळीं हळुहळू एजिस्थस याच्यावर बसत चाललें होतें. आणि या सर्व कारणांमुळें अॅगॅमेमनच्या पश्चात् त्याच्या घरची स्थिति अगदीं पालटून गेली होती. तो यशस्वी होऊन घरीं आला तेव्हां त्याबद्दल आपल्याला अतिशय आनंद झाला आहे, असें तिनें बाह्यात्कारी पुष्कळ दाखविलें; परंतु त्याचें आगतस्वागत करण्याच्या पहिल्या प्रसंगींच तिनें एजिस्थसच्या मदतीनें त्याचा फार भयंकर रीतीनें खून केला. त्या गर्दींत अॅगॅमेमननचा मुलगा, ऑरेस्टेस, याचाही खून व्हावयाचा; परंतु त्याची बहीण, इलेक्ट्रा, हिनें त्या वेळीं त्याचे प्राण वाचविले. आणि अॅगॅमेमननच्या एका मित्राच्या घरीं त्याला नेऊन ठेवण्याची तिनें गुप्तपणें तजवीज केली. त्या ठिकाणीं अज्ञातवासामध्यें ऑरेस्टेस हा लहानाचा मोठा झाला. तो सज्ञान आणि सशक्त झाल्यानंतर

त्याला आपली स्थिति समजूं लागली, आणि आपल्या बापाचा ज्यांनीं खून केला आहे त्यांचा सूड उगविणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे, असें त्याला वाटूं लागलें. तेव्हां असें कृत्य करावें किंवा न करावें याविषयीं त्याच्या मनामध्यें विकल्प उत्पन्न झाल्यामुळें त्याचा निर्णय करून घेण्याकरितां त्यानें देवाला कौल लाविला. त्यांत देवानें असा कौल दिला कीं, तूं या दुष्ट खुनाबद्दल सूड घेतलाच पाहिजेस, फार काय, पण जिनें तुला जन्म दिला त्या प्रत्यक्ष आईलाही या कामीं मारावें लागलें, तरी हरकत नाहीं ! परंतु तुझ्या बापाच्या खुनाचा तूं सूड उगविलाच पाहिजेस ! असा देवाचा कौल मिळाल्यामुळें आपला वेष पालटून तो आरगॉस या शहरीं आला. तो ज्या घरीं अज्ञातवासांत रहात होता, त्या घरचा मुलगा, पिलॅडिस, याचा व ऑरेस्टेसचा फार स्नेह जमलेला होता. त्यामुळें ऑरेस्टेसला या कामीं मदत करण्याकरितां तोही त्याच्या बरोबर आला होता. आणि ऑरेस्टेसचा एक जुना नोकरही बरोबर होता. त्या तिघांनीं मिळून आपला हेतु सफल होण्याकरितां एका युक्तीची योजना केलेली होती. राणी क्लायटेमनेस्ट्रा आणि राजा एजिस्थस यांना आपल्याबद्दल कांहीं एक संशय येऊं नये म्हणून ऑरेस्टेस हा मरण पावला आहे, ही बातमी सांगण्याकरितां आपण आलों आहोंत, असें ते बाह्यात्कारीं दाखवूं लागले. व अशा कपटनाटकाच्या तयारीनें त्या तिघांनीं एके दिवशीं सकाळीं शहरांत प्रवेश केला.

तें शहर दुरून दिसूं लागलें होतें, अशा वेळीं ऑरेस्टेसचा तो जुना नोकर त्या शहरांतील निरनिराळीं ठिकाणें त्याला दाखवीत चालत असतां म्हणाला, " ऑरेस्टेस, जी तुझी जन्मभूमि पाहण्याकरितां तूं इतका उत्सुक झाला होतास, ती ही तुझी जन्मभूमि तुझ्यापुढें दिसत आहे. येथील देवळें, राजवाडे आणि वृक्षराजि किती तरी सुंदर दिसत आहेत. तो पहा, पलीकडे तुझ्या बापाचा राजवाडा ! तेथें तुझी आई तुझाही खून करण्याला प्रवृत्त झाली होती ! परतु तुझी बहीण, इलेक्ट्रा, हिच्या मदतीनें मी तुला तेथून काढून दूर सुरक्षित ठेविलें ! "

या पूर्वस्मृतीच्या भाषणानें सूड घेण्याची इच्छा प्रज्वलित होऊन ऑरेस्टेस आपल्या नोकराला म्हणाला, " तूं आतां वेळ फुकट दवडूं नको. तूं एकदम संधि साधून राजवाड्यामध्यें प्रवेश कर आणि तेथील स्थितीची

बारकाईनें टेहळणी कर. तुझ्यां चेहऱ्यांमध्यें अलीकडे इतका फरक पडलेला आहे, कीं, तुला तेथें कोणीही ओळखणार नाहीं." आणि मी मरण पावलों आहे, म्हणून माझ्यासंबंधानें आपण ठरविलेली हकीकत त्यांना गाफील ठेवण्याकरितां तूं खुशाल सांग. तोंपर्यंत माझ्या बाबांच्या समाधीच्या दर्शनाला आणि पूजनाला मी जाऊन येतों. आतां यापुढें माझ्या प्रयत्नांना यश येणें न येणें, हें सर्वस्त्री परमेश्वराच्या कृपेवर अवलंबून आहे !" इतकें झाल्यानंतर ठरल्याप्रमाणें ते सर्व आपापल्या कामाला निघून गेले.

इकडे त्याच नगरांत त्या वेळीं ऑरेस्टेसची बहीण, इलेक्ट्रा, ही आपल्या दुःखाबद्दल अतिशय शोक करीत आणि रडत बसलीं होती. आणि तिच्याजवळ तिच्या पुष्कळ मैत्रीणीही होत्या. इलेक्ट्रा ही तेथें अतिशय दुःखामध्यें दिवस काढीत होती. कारण तिची आई तिला अतिशय वाईट रीतीनें वागवीत असे. ती ब्राह्यात्कारी जरी प्रेम दाखवित असे तरी इलेक्ट्रा ही मनापासून तिला नकोशीच झालेली होती; त्यामुळें इलेक्ट्रा अगदीं कंटाळून गेली होती. तिला आतां फक्त एकच आशा उरलेली होती. आणि ती तिच्या भावाची. आपण ज्याचे जीव वांचविले आहेत आणि ज्याला दूर नेऊन सुरक्षित ठेविलें आहे, आणि आपल्या बापाचा सूड घेण्याकरितां ज्याला आपण लहानाचा मोठा करविला आहे, तो आपला भाऊ, ऑरेस्टेस, हा केव्हां येईल आणि आपल्याला या दुःखांतून केव्हां सोडवील, याविषयीं ती रात्रंदिवस वाट पहात बसे. व त्याला लवकर पाठवून देण्याविषयीं ती देवाची नित्य प्रार्थना करी. तिच्या मैत्रिणी तिच्या मनाचें शांतवन करून तिला पुष्कळ समजुतीच्या गोष्टी सांगत. परन्तु त्याचा कांहीं उपयोग होत नसे.

अशा स्थितींत त्या दिवशीं रडत बसली असतां इलेक्ट्रा आपल्या मैत्रिणीना म्हणाली, " मैत्रिणींनो, तुम्ही मला रडूं नको म्हणून म्हणतां; परन्तु मी रडूं नको, तर काय बरें करूं ? मी कसे संकटांत दिवस काढीत आहें, ह्याची तुम्हांला कांहीं तरी कल्पना आहे काय ? ज्यांनीं माझ्या बापाचा खून केला, त्यांच्या संगतींत मला सदोदित काळ कंठावा लागत आहे ! माझ्या बाबांचें जें सिंहासन होतें, त्याच्यावर हा एजिस्थस रोज बसतो ! आणि त्याचीं छत्रचामरें आपल्या डोक्यावर धरतो ! आणि हें सगळें प्रत्यही मला आपल्या डोळ्यांनीं पहावें लागतें ! पण इतकेंच नव्हे, तर माझी ही आई

ही त्याची बायको झाली आहे! आणि ज्या दिवशीं तिनें त्याचा खून केला त्या प्रत्येक महिन्याच्या दिवशीं त्याच्या समाधीपुढें देवतांच्या प्रीत्यर्थ ही त्याच्या मासिक श्राद्धाचा समारंभ करीत असते! हें सगळें मला डोळ्यांनीं पहावें लागत आहे! आणि त्याबद्दल मला रडूं आलें, तर तें देखील चोरून रडलें पाहिजे! कारण, त्याबद्दल उघडपणें रडण्याची देखील सक्त मनाई आहे. एखादे वेळीं माझी मुद्रा खिन्न असली तर माझी आई मला विचारते, 'तूं अशी खिन्न कां असतेस? दुसऱ्या पुष्कळांचे नाहींत का तुझ्यासारखे बाप मेलेले? मग तुलाच एवढें खिन्न होण्याला काय झालें आहे?' असें तिनें विचारलें तर तिला काय सांगावें? ऑरेस्टेस आला तर याचा जबाब तिला मिळेल. ऑरेस्टेस जीवत आहे आणि तो लवकरच येणार आहे. अशी एखाद्याच्या तोंडून आईनें कधीं बातमी ऐकली तर एखाद्या वाघिणीसारखी चवताळून जाते, आणि मला ज्यास्तच छळूं लागते. अशा अडचणींत मी दिवस काढीत असते. यांतून सोडविण्याकरितां ऑरेस्टेस कधीं येईल तो येवो. पण तोंपर्यंत तूर्त तरी निदान माझें पुरें मरण आहे."

हें त्यांचें बोलणें चाललें आहे; तोंच इलेक्ट्राची धाकटी बहीण, क्रिसोथेमिस, ही आपल्या बापाच्या समाधीच्या वृंदावनाची पूजा करण्याचें साहित्य बरोबर घेऊन आपल्या मैत्रिणींसह तेथें आली. ह्या दोन बहिणीं-च्या स्वभावांमध्यें फारच अंतर होतें. इलेक्ट्रा ही धारिष्टवान होती. तिच्या मनांत ज्यांच्याबद्दल द्वेष असे त्यांच्याशीं तिला गोड बोलतां येत नसे. आणि आपल्या मनांतील खरे विचार झांकून ठेवण्याची कलाही तिला फारशी अवगत झालेली नव्हती. परंतु क्रिसोथेमिस ही स्वभावानें भित्री होती, आणि त्यामुळें तिच्या आईचीं वगैरे कृत्यें जरी तिला आवडत नव्हती. तरी ती तिच्याशीं मिळून मिसळूनच वागत असे, आणि तोंडावर तिची स्तुतीच करीत असे. असा दोघींच्या स्वभावांमध्यें फरक असल्या कारणानें आपली बहीण क्रिसोथेमिस ही आलेली पाहिल्याबरोबर इलेक्ट्राच्या अंगाचा संताप होऊन गेला व ती तिला कठोर शब्द बोलूं लागली. आपल्या बापाच्या स्मृतीचा विसर पडूं देणें आणि जिनें आपल्या नवऱ्याचा खून करण्याचें अघोर कृत्य केलें आहे, अशा आपल्या आईशीं गोडीगुलाबीनें वागणें हें अतिशय नीचपणाचें वर्तन आहे, असें ती बोलून दाखवूं लागली.

त्या वेळीं क्रिसोथेमिस हिनें न रागावतां असें उत्तर दिलें कीं, " तूं म्हणतेस तें सर्व मला माहीत आहे. पण काय करावयाचें ? आपली हल्लींची स्थितिच अशी चमत्कारिक झालेली आहे. म्हणून तूं देखील जरा जास्त जपून बोलशील आणि चालशील, तर फार बरें होईल; कारण मी असें ऐकिलें आहे कीं, तुझें तोंड कायमचें बंद करून टाकण्यासाठीं आंतून गुप्त रीतीनें कांहीं खटपटी चालू आहेत. म्हणून त्या भावी संकटाबद्दल तूं सावध आस. "

इलेक्ट्रा तिरस्कारानें म्हणाली, " भावी संकट ? हल्लीं जीं संकटें मी भोगीत आहें, त्यांच्यापेक्षां आतां जास्त संकटें माझ्यावर यावयाचीं कोणतीं राहिलेलीं आहेत ? "

क्रिसोथेमिस म्हणाली, " असें कां म्हणतेस ? ते तुला दूर कोठें तरी नेतील; आणि जेथें तुला सूर्यदर्शन सुद्धां होणार नाहीं, अशा एखाद्या अंधारकोठडींत कदाचित् कोंडून ठेवतील. मग काय करशील ? म्हणून म्हणतें कीं, संतापाच्या भरांत तूं अशी बडबड करीत न बसलीस तर बरें."

हा उपदेश इलेक्ट्राला मुळींच पटला नाहीं. आणि उलट ती त्वेपानें अधिकच बडबड करूं लागली. तेव्हां क्रिसोथेमिस ही मुकाट्यानें तेथून जाण्याकरितां निघाली. तेव्हां तूं आतां कोणीकडे जाणार असें इलेक्ट्रानें विचारल्यावरून क्रिसोथेमिसनें सांगितलें कीं, " गेल्या रात्रीं आईला आपल्या बाबांवरून एक वाईट स्वप्न पडलें, त्यामुळें ती फार घाबरून गेलेली आहे. आणि त्यासाठीं बाबांच्या समाधीचें आज कांहीं तरी भजनपूजन करणें जरूर आहे, असें तिला वाटून हें पूजेचें साहित्य घेऊन तिनें मला समाधीकडे जावयाला सांगितलें आहे. तिकडे मी जातें."

त्यावर इलेक्ट्रा आपल्या बहिणीला म्हणाली, " ताई, हें जें तूं पूजेचें साहित्य घेऊन जात आहेस, त्यापैकीं आपल्या बाबांच्या समाधीवर तूं कांहीं एक वाहूं नको. हें सगळें साहित्य तूं कोठें तरी नेऊन फेकून दे. किंवा जमिनीमध्यें गाडून टाक. हें समाधीवर वहावयाचें, म्हणजे ही त्या समाधीची थट्टा आहे. नाहीं तर ही आई जेव्हां मरेल,तेव्हां तिच्या समाधीवर वहाण्याकरितां हें ठेवून दे. ज्यांचा तिनें अशा नीच रीतीनें खून केला, त्यांच्या समाधीची ही पूजा कसली करते ? अशा योगानें तिचें पातक

धुवून निघेल असें कां तिला वाटतें? तसें कांहीं एक व्हावयाचें नाहीं. तेव्हां हा खटाटोप पाहिजे कशाला? ती कसली पूजा करते? तूं आणि मी मात्र आपल्या बाबांच्या समाधीची अनन्य भावानें पूजा करूं या आणि आपण आपल्या बाबांची अशी प्रार्थना करूं या कीं, तुम्ही जेथें कोठें असाल, तेथून तुम्ही अदृश्य रूपानें आम्हांला मदत करा, आणि या दुष्टांच्या नरडीचा घोट घेण्याकरितां आमच्या ऑरेस्टेसला लवकर येथें पाठवून द्या!"

असें दोघींचें बोलणें होऊन क्रिसोथेमिस निघून गेल्यानंतर खुद्द राणी, क्लायटेमनेस्ट्रा, हीच तेथें आली. इलेक्ट्रा आणि राणी ह्यांच्यामध्यें प्रेमभाव मुळींच उरलेला नव्हता. इलेक्ट्रा ही आपल्या आईचें मुळींच ऐकत नसे व तिचा नवीन नवरा जो एजिस्थस त्यालाही ती फारशी जुमानीत नसे. त्यामुळें तिच्या मनामध्यें आपल्या मुलीविषयीं नेहमीं फार क्रोध असे. त्या क्रोधाच्या आवेशांत ती त्या वेळीं आपल्या मुलीला म्हणाली, "तूं मला नेहमीं नांवें ठेवीत असतेस, याचें कारण काय? मी तुझ्या बापाला मारिलें, हेंच तुझें कारण कीं नाहीं? होय, मी त्याला मारिलें! मी कांहीं नाहीं म्हणत नाहीं. पण यांत माझा काय अन्याय? खरें पाहिलें तर मी त्याला मारिलें नसून तो आपल्या कर्मानेंच मेला आहे. त्यानें तुझ्या बहिणीला बळी देण्यासाठीं मारलें नाहीं का? आपल्या पोटच्या गोळयाचा असा कोणी तरी घात करतात काय? त्यानें काय म्हणून तिला मारावें? तूं म्हणशील कीं, ग्रीक लोकांच्या करितां त्यानें तिला मारलें. पण त्यांच्यासाठीं माझी मुलगी काय म्हणून मारली जावी? नाहीं तर तूं म्हणशील कीं, त्यानें आपल्या भावाच्या कार्याकरितां आपली मुलगी बळी दिली. पण असें तरी कां? त्याच्या भावाला स्वतःचीं दोन मुलें होतीं. त्यांपैकीं त्यानें आपलें एक मूल खुशाल बळी द्यावयाचें होतें. आणि हेलनसारख्या आईच्या पोटीं जन्माला आलेलें एकादें मूल मारलें गेलें असतें, म्हणून कांहीं मोठेंसें बिघडत होतें, असें नाहीं. मृत्यूला कांहीं माझेंच मूल आवडत होतें आणि दुसऱ्या कोणाचें आवडत नव्हतें, असें नाहीं. किंवा तुझ्या बापाला दुसऱ्याच्या मुलांची तेवढी करुणा आली आणि आपल्या मुलीबद्दल त्याला कांहीं दया आली नाहीं? हें तुझ्या बापाचें कृत्य कांहीं चांगलें नव्हतें. तुला

 २७०३..... ५१

कांहींही वाटो, मी तुला स्पष्ट सांगतें कीं, हें तुझ्या बापाचें कर्म फार अघोर होतें. आणि म्हणून मी जें केलें तें न्यायाचेंच होतें !"

यावर इलेक्ट्रा म्हणाली, "माझ्या बापाला तूं मारलेंस, तें न्यायाचें असो अगर अन्यायाचें असो; पण ही गोष्ट तूं अतिशय वाईट केली आहेस. आतां ही गोष्ट तूं न्यायानें केलीस, असें तुझें म्हणणें आहे. पण तेंही सर्वथैव खोटें आहे. तूं हें कर्म केलेंस, तेव्हां तुझ्या मनामध्यें न्यायाच्या कल्पनेचा लेशही नव्हता. ज्याच्याशीं तूं हल्लीं लग्न लाविलें आहेस, त्याच्या चिथावणीवरून तूं हें कर्म करण्याला प्रवृत्त झालीस ! आतां माझ्या बापानें आपल्या पोटच्या मुलीला मारावयाचें नव्हतें, असें तूं म्हणतेस. पण ही गोष्ट करण्यांत त्यालाही मोठासा आनंद वाटत होता असें नाहीं. तो अतिशय नाखूष होता ! पण लोकांच्या कल्याणासाठीं त्याला ती गोष्ट करावी लागली. पण आपल्या मुलीचा सूड घेण्यासाठीं तूं आपल्या नवऱ्याला ठार मारलेंस हें जें तुझें म्हणणें आहे, तें निव्वळ ढोंग आहे. कारण तुला आपल्या पोटच्या मुलांबद्दल किती कळकळ आहे, हें मला दिसतच आहे ! तुमच्या जाचाखालीं मीहि कशा स्थितींत दिवस काढीत आहें, हेंही सांगायला नको ! माझा भाऊ—तुझा मुलगा—ऑरेस्टेस याला तुझ्या हातून मीच वांचविला ! आणि तो हल्लीं दूर विदेशांत कोठें तरी दिवस काढीत आहे !"

अशा रीतीनें त्या दोघींच्या दरम्यान बरेंच भांडण झालें; परंतु असें भांडत बसून कांहीं अर्थ नाहीं, ही गोष्ट लक्षांत आणून इलेक्ट्रा स्तब्ध बसली; आणि त्यानंतर राणीही आपल्या नवऱ्याच्या समाधीची पूजा करण्याकरितां निघून गेली. पूजा झाल्यानंतर वृंदावनासमोर उभी राहून आणि सूर्याकडे दृष्टि लावून तिनें सूर्याची अशी प्रार्थना केली कीं, "हे भगवान् सूर्य नारायणा, गेल्या रात्रीं मला जें दुष्ट स्वप्न पडलें आहे, त्याचें निरसन करण्याला तुझ्या वांचून कोण समर्थ आहे ! माझ्या हातांत हल्लीं जें वैभव आलेलें आहे, तें माझ्या हातांत असेंच कायम राहो ! आणि माझ्या शत्रूंचे बेत विस्कळित होऊन माझें सुख असेंच अव्याहत चालूं दे !"

ती अशी प्रार्थना करीत होती, इतक्यांत ऑरेस्टेसचा म्हातारा नोकर तेथें आला. आणि हीच राणी क्लायटेमनेस्ट्रा आहे, अशी खात्री करून घेऊन तो तिला नम्रपणानें मुजरा करून म्हणाला, " बाईसाहेब, मला आपल्याला आणि आपल्या राजेसाहेबांना एक चांगली बातमी सांगावयाची आहे. "

राणीनें विचारलें, " तूं कोण ? आणि तूं कोठून आला आहेस ? "

तो म्हातारा नोकर म्हणाला, " बाईसाहेब, आपला मुलगा, ऑरेस्टेस, हा ज्या गांवीं रहात होता, त्या गांवचा मी आहें. आणि तेथील एक चांगली बातमी सांगण्याकरितां मी आपल्याकडे आलों आहें. "

राणी म्हणाली, " ती चांगली बातमी काय आहे ? सांग, सांग पाहूं लवकर. "

तो म्हणाला, " मी आतां फार पाल्हाळ लावीत नाहीं. थोडक्यांत तुम्हांला सांगतों कीं, तुमचा मुलगा, ऑरेस्टेस, हा मरण पावला ! "

ही बातमी ऐकल्याबरोबर राणीनें थोडेंसें दुःख व्यक्त केलें व नंतर तो खरोखरच मरण पावला कीं काय आणि त्याला कशानें मृत्यु आला याबद्दलचा प्रश्न तिनें त्याला विचारला. तेव्हां त्या म्हाताऱ्या मनुष्यानें ऑरेस्टेसच्या मरणाची हकीकत बऱ्याच सविस्तर रीतीनें वर्णन केली. परंतु त्यांतील थोडक्यांत सारांश एवढाच कीं, एका रथाच्या शर्यतीमध्यें आपले घोडे भरधांव पिटाळीत असतां कांहीं अपघात होऊन तो एकाएकीं मरण पावला.

ही हकीकत ऐकल्यानंतर राणीच्या मनाची स्थिति फार चमत्कारिक झाली. या बातमीबद्दल आपण आनंद मानावा कीं खेद मानावा, हें तिला कांहींच समजेना. तरी पण एकंदरींत आपला मुलगा मेला यांतच आपला फायदा आहे, असेंही एकदा दिला वाटे. परंतु आपल्या मुलाच्या मरणामध्यें आपलें हित असावें इतकी स्थिति आपल्याला यावी, याबद्दलही तिला फिरून वाईट वाटे. तिच्या मनाची अशी स्थिति पाहून त्या वृद्ध चाकरानें तिला थोडें टोचून विचारलें, बाईसाहेब, या बातमीमध्यें आपल्याला इतकें वाईट वाटण्यासारखें काय आहे ? त्यावर ती म्हणाली, आई होणें हें एक महत् पाप आहे. आपल्यावर कांहींही संकटें आलीं, तरी

तीं चालतील. पण आपण ज्याला जन्म दिला, त्याला कांहीं कमी जास्ती झालें, तर मात्र तें आईला सहन होईनासें होतें. हें ऐकून तो नोकर म्हणाला, तर मग एकूण मी ही बातमी सांगण्याकरतां जो एवढ्या मोठ्या आशेनें आलों, त्या माझें येणें फुकटच गेलें म्हणावयाचें. तेव्हां राणी त्याला म्हणाली कीं, "तूं केवळ असेंच समजूं नकोस. ऑरेस्टेस खरोखर मेला, अशाबद्दल जर तूं खात्री करून देशील, तर तुझी खेप फुकट जाणार नाहीं. तो जेव्हां येथून गेला, तेव्हां तो अगदीं लहान होता; त्यामुळें तो मला ओळखीत नाहीं किंवा मी त्याला ओळखीत नाहीं; परंतु मी त्याच्या बापाचा खुन केला आहे अशी त्याची कल्पना दृढ असल्यामुळें तो माझा सूड घेण्याची वाट पहात बसला आहे, अशा बातम्या माझ्या कानावर आल्या असल्यामुळें त्याच्या भीतीनें रात्रीची मला झोंप सुद्धां येत नव्हती. तेव्हां आतां ही बातमी खरी असेल, तर मी एकदाची या काळजींतून मुक्त तरी होईन !" असें बोलत बोलत ती राणी आणि तो नोकर हीं दोघेंही राजवाड्याकडे निघून गेलीं.

मागाहून थोड्याच वेळांत ही खोटी आणि मुद्दाम पसरविलेली बातमी इलेक्ट्राला कळली; परंतु ती खोटी आहे हें मात्र तिला कळलें नाहीं. त्यामुळें ती आपल्या भावासाठीं फारच शोक करूं लागली. ती म्हणाली, " ऑरेस्टेस, तूं मरण पावलास, ही फार वाईट गोष्ट झाली. तूं येशील आणि आपल्या बाबांचा सूड उगवशील, या आशेनें मी तुझ्या येण्याची नेहमीं वाट पहात असें ! तो तूंच आतां या जगांतून निघून गेलास ! आतां मी कोणीकडे जाऊं ? माझा सर्वस्वी घात झाला. ज्यांनीं आपल्या बापाला मारिलें, त्यांच्याच जाचाखालीं गुलामगिरीमध्यें राहण्यापेक्षां आतां दुसरा कांहीं मार्ग नाहीं. याच्यापेक्षां मला मरण येईल, तर फार बरें !"

ती अशा रीतीनें शोक करीत असतां तिची बहीण, क्रिसोथेमिस, ही मोठ्या उत्सुकतेनें तिला एक आनंदाची बातमी सांगण्याकरितां धांवत धांवत तेथें आली, आणि आपल्या बहिणीला म्हणाली, " मी तुला एक चांगली बातमी सांगण्याकरितां आलें आहे."

इले०—माझ्या सर्व दुःखांचा अगदीं कडेलोट होऊन गेला आहे. आतां मला कोणत्या चांगल्या बातमीपासून सुख मिळणार आहे ?

क्रिसो०—आपला भाऊ, ऑरेस्टेस, हा हल्लीं येथें आलेला आहे ! कां ही बातमी चांगली नव्हे काय ?

इले०—तुला वेड लागलें आहे.

क्रिसो०—नाहीं ! मी बाबांची शपथ घेऊन सांगतें कीं, मी म्हणतें तें अगदी खरें आहे. ऑरेस्टेस येथें आलेला आहे.

इले०—तुला हें कोणी सांगितलें ? आणि तुझा या गोष्टीवर विश्वास तरी कसा बसला ?

क्रिसो०—मी आपल्या डोळ्यांनीं ज्या गोष्टी पाहिल्या आहेत, त्यांवरून मी हें म्हणतें. हें कांहीं सांगोसांगी नव्हे. मी आतांच बाबांच्या समाधीच्या वृंदावनाकडे गेलें होतें. तेथें मी कांहीं खुणा पाहिल्या. त्यावरून माझी खात्री झाली आहे कीं, ऑरेस्टेस हा येथें आलेला असलाच पाहिजे.

इले०—तुझ्या वेडेपणाची मला कींव येते !

क्रिसो०—कां बरें ? मी जी ही बातमी तुला सांगत आहें, ती ऐकून तुला बरें वाटत नाहीं, असें दिसतें.

इले०—तूं अशी वेड्यासारखी बरळत कां सुटली आहेस, हें मला समजत नाहीं !

क्रिसो०—पण मी ज्या गोष्टी आपल्या डोळ्यांनीं पाहिल्या आहेत, त्या मी खऱ्या कां मानूं नयेत ?

इले०—वेडे, तुला काय सांगावें ! आपला भाऊ मरण पावला आहे. आतां तो येण्याची आशाच नको !

क्रिसो०—पण तूं तरी हें कशावरून म्हणतेस ? तुला हें कोणी सांगितलें ?

इले०—त्याच्या मरणाच्या वेळीं जो जवळ होता, अशा एका माणसाकडून ही बातमी माझ्या कानावर आली आहे.

क्रिसो०—हें तर मोठें आश्चर्यच आहे, म्हणावयाचें. मला खरी वाटली म्हणून ही चांगली बातमी सांगण्याकरितां मी तुझ्याकडे आलें होतें. पण आतां मी हें भलतेंच ऐकत आहें. आतां काय करावयाचें ?

इले०—आतां काय करावयाचें तें मी सांगतें ऐक. मी तर असें ठरविलें आहे. ऑरेस्टेस जिवंत होता तोंपर्यंत तो येऊन आपल्या बाबांचा सूड घेईल, आणि आपल्याला या जाचांतून सोडविल, अशी आशा होती. पण आतां तो मरण पावल्यामुळें ती आशा समूळ नाहींशी झाली आहे. तेव्हां आतां तूं आणि मी मिळून आपण दोघींनींच हें सूड घेण्याचें काम तडीस नेलें पाहिजे. आतां आपल्याला कोणाचा आधार उरलेला नाहीं. आणि आपलीं लग्नें तरी कोण करून देणार आहे ! राणी आणि तिचा हल्लींचा नवरा हे आपलीं लग्नें कधींही करून देणार नाहींत. कारण आपलीं लग्नें केली असतां आपल्याला जे मुलगे होतील, ते आपले वैरी होतील हें त्यांना समजत नाहीं असें नाहीं. तेव्हां माझ्या मनांतून आपण आधीं आपल्या बाबांचा सूड उगवावा असें आहे; आणि मग आपण आपल्या योग्यतेप्रमाणें कोणा तरी राजपुत्रांशीं आपलीं लग्नें लावून घेऊं. आपण असें केलें, तर आपला नांवलौकिक वाढेल आणि लोक आपली कीर्ति गातील. आपला निर्देश करून लोक असें म्हणतील कीं, त्या पहा दोघी बहिणी कशा शूर आणि शहाण्या आहेत ! आपल्या जिवाची परवा न करितां त्यांनीं आपल्या बापाचा सूड उगविला, या त्यांच्या धैर्याबद्दल आणि पराक्रमाबद्दल आपण सर्वांनीं त्यांची तारिफच केली पाहिजे ! म्हणून मी म्हणतें कीं, आपण धैर्य धरून हें काम केलें पाहिजे. कारण उच्च कुलांत जन्माला येऊन अशा नीच अवस्थेमध्यें आपण जिवंत राहणें हें खरोखर लज्जास्पद आहे !

क्रिसो०—तुझ्या या विचारांबद्दल मला फार आश्चर्य वाटतें. किती झालें, तरी आपण बायका. आपलें काय चालणार आहे ? आपले शत्रु फार बलाढ्य आहेत. आणि दैवाची त्यांच्यावर तूर्त पूर्ण कृपा आहे. त्यांच्यापुढें आपण काय करणार ! तेव्हां तूं आपला राग आवरून ठेव आणि हे विचार मनांतून काढून टाक.

आपल्या बहिणीच्या या कल्पना इलेक्ट्राला मुळींच पसंत पडल्या नाहींत. व त्यामुळें तिचें पित्त खवळून जाऊन त्या दोघी बहिणींचें चांगलेंच भांडण जुंपलें. परंतु अशा रीतीनें भांडण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें पाहून त्यांपैकीं क्रिसोथेमिस ही मुकाट्यानें राजवाड्यामध्यें निघून गेली आणि इलेक्ट्रा एकटीच विचार करीत बसली. इतक्यांत वेषांतर केलेला ऑरेस्टेस हा तेथें आला. व ऑरेस्टेस ज्या गांवीं रहात होता, तेथील कांहीं महत्त्वाची बातमी राजाला सांगण्याकरितां आपण आलों आहों, असें त्यानें सांगितलेलें ऐकल्याबरोबर इलेक्ट्रा त्याच्याकडे वळली आणि त्याला म्हणाली, " आम्ही येथें जी एक वाईट बातमी ऐकिली आहे, ती खरी किंवा खोटी, याच्याबद्दल तुला कांहीं माहित आहे काय ? "

ऑरे०—तुम्ही कोणती वाईट बातमी म्हणतां, तें मला कांहीं माहित नाहीं. मी फक्त ऑरेस्टेसबद्दलची बातमी सांगण्याकरितां आलों आहें.

इले०—त्याच्याबद्दल काय बातमी आहे ?

ऑरे०—त्याच्याबद्दल दुसरी काय बातमी असावयाची आहे ? तो शर्यतींत पडून मरण पावला, तेथें त्याचें दहन केलें, आणि पुढील संस्काराकरितां या त्याच्या अस्थि या कुंभांत भरून आणिल्या आहेत !

ही हकीकत जेव्हां इलेक्ट्रानें ऐकली, तेव्हां आपला भाऊ खरोखरच मेला अशी तिची खात्री होऊन तिनें तो अस्थिकुंभ त्याच्या हातांतून आपल्या हातांत घेतला, आणि ती करुणस्वरानें विलाप करूं लागली. ती म्हणालीः—" ऑरेस्टेस, काय हा प्रसंग ! तुझ्या येण्याची मी कशी वाट पहात होतें, आणि तूं हा कसा आला आहेस ! लहानपणीं तुझा जीव वांचविण्याकरितां मी तुला येथून दूर पाठविलें, तेव्हां तूं किती सुंदर आणि देखणा दिसत होतास ! आणि आतां तूं हा परत कशा अवस्थेमध्यें आला आहेस ! याच्यापेक्षां तूं तेव्हांच मरण पावला असतास, तरी फार बरें झालें असतें ! कारण, तूं जिवंत राहून माझ्या हातून तुझें संगोपन कांहीं एक झालें नाहीं ! मी तुझ्या कांहीं उपयोगी पडलें नाहीं ! आणि तुझ्या आईचीही तुझ्यावर ममता नव्हती ! अशा स्थितींत तुझा देहांत झाला ! बाबाही मेले आणि तूंही मेलास ! तेव्हां आतां मलाही जगून काय करावयाचें आहे? कारण, मी

असें पहातें कीं, जीं माणसें मरतात, तीं ह्या जगांतील संकटांपासून सुटतात!" हे शब्द बोलत असतां इलेक्ट्राला अतिशय दुःख होत होतें. तें पाहून ऑरेस्टेसला फार वाईट वाटलें आणि त्यानें विचारलें कीं, "तूं जी एवढें दुःख करीत आहेस, त्या तुजवर एवढें संकट तरी काय कोसळलें आहे?"

इले०—खून करणाऱ्या लोकांच्या सहवासांत मला रहावें लागतें! याऱ्यापेक्षां आणखी संकट तें कोणतें असावयाचें?

ऑरे०—त्यांनीं कोणाचा खून केला आहे?

इले०—माझ्या बाबांचा. आणि त्यांच्या जाचांत मला रहावें लागते.

ऑरे०—तुला कोणाचा जाच आहे?

इले०—खुद्द माझी आईच मला जाच करते!

ऑरे०—या जाचांतून तुला सोडविणारा कोणी नाहीं काय?

इले०—कोणी नाहीं! एक जण होता! पण तो मरण पावल्याचा पुरावा तूं घेऊन आला आहेस!—पण तूं माझी इतकी विचारपूस कां करीत आहेस? आणि माझी तुला इतकी दया कां येत आहे?

ऑरे०—तूं उगी रहा आणि तो अस्थिकुंभ इकडे दे. म्हणजे मी तुला सर्व कांहीं सांगतों.

इले०—नाहीं, नाहीं, तो कुंभ मी देणार नाहीं. कारण माझ्या भावाची एवढीच काय ती आठवण आतां माझ्यापाशीं राहिली आहे!

ऑरे०—तूं असें भलभलतें कांहीं एक बोलूं नको. तुला दुःख करण्याला कांहींच कारण नाहीं.

इले०—काय? प्रत्यक्ष माझा भाऊ मरण पावला असून सुद्धां मला दुःख करण्याला कांहीं कारण नाहीं, असें तूं म्हणतोस?

ऑरे०—खरेंच कांहीं कारण नाहीं. आणि या अस्थींशीं तरी तुझा काय संबंध आहे?

इले०—कां बरें? या माझ्या भावाच्या अस्थि नव्हेत काय?

ऑरे०—अग वेडे, यांत का तुझा खरा भाऊ आहे?

इले०—तर मग त्याला कोठें पुरलें आहे?

ऑरे०—कोठें नाहीं. जिवंत माणसाला पुरण्याची तरी काय जरूरी आहे ?

इले०—तर मग काय तो अजून जीवंत आहे ?

ऑरे०—जर मी जिवंत आहें, तर--

इले०—मग तूंच कीं काय माझा भाऊ !

ऑरे०—होय! मीच तुझा भाऊ ! आणि माझेंच नांव ऑरेस्टेस. मी मेलेला नाहीं ! ही पहा बाबांच्या हातची खूण माझ्याजवळ आहे. ती पाहिलीस म्हणजे तुझी खात्री होईल!

नंतर इलेक्ट्रानें जेव्हां ती खूण पाहिली, तेव्हां तिच्या मनाची खात्री झाली. आणि आपला भाऊ ऑरेस्टेस आपल्याला भेटल्याबद्दल तिला अतिशय आनंद झाला. नंतर बऱ्याच वेळपर्यंत त्या दोघांच्या दुःखदुःखाच्या गोष्टी झाल्यानंतर पुढें सूड उगाविण्याचें कृत्य कसें काय घडवून आणावयाचें याच्याबद्दल त्या दोघांच्यामध्यें खलबतें सुरू झालीं. त्यांत इलेक्ट्रानें असें सांगितलें कीं, राजा एजिस्थस हा हल्लीं राजवाड्यांत नाहीं. तो बाहेर गेला असून राणी एकटी आहे. तेव्हां तावडतोब काम उरकून घ्यावें हें बरें. हें त्यांचें बोलणें चाललें आहे, इतक्यांत ऑरेस्टेसचा म्हातारा नोकर तेथें आला आणि त्यानेंही आपल्या धन्याला तशीच सल्ला दिली. "ऑरेस्टस खरोखरच मरण पावला आहे, अशी सर्वांची समजूत झाली आहे. तूं ऑरेस्टेस आहेस हें कोणालाही माहित नाहीं. आणि राणी राजवाड्यामध्यें एकटी आहे. तेव्हां आतां वेळ दवडणें बिलकूल उपयोगी नाहीं !" असें त्यानें सांगितलें. तेव्हां ती गोष्ट ऑरेस्टेसला पसंत पडून तो तयारीला लागला. त्यानें प्रथमतः देवाची प्रार्थना केली. आणि नंतर इलेक्ट्राला बरोबर घेऊन तो राजवाड्यांत गेला. आंत जातांना त्यानें इलेक्ट्राला मुद्दाम बाहेर बसविलें होतें. राजा एजिस्थस किंवा दुसरें कोणी बाहेरून आलें, तर इलेक्ट्रानें आपल्याला तावडतोब सूचना द्यावी, यासाठीं त्यानें ही योजना केली होती. त्या योजनेप्रमाणें इलेक्ट्रा बाहेर बसली असतां कांहीं वेळानंतर तिच्या कानावर पुढील शब्द आले. " अरे ! आपल्या आईवर दया कर ! " हे शब्द कोणाचे आहेत हें बरोबर ओळखून इलेक्ट्रा बाहेरून म्हणाली, " पण आईनें कधीं आपल्या मुलावर दया केली

नाहीं! किंवा त्या मुलाच्या बापावरही दया करण्याचें तिच्या मनांत कधीं आलें नाहीं!" त्यानंतर कांहीं वेळानें फिरून "मेलें! मेलें!" असा आवाज ऐकूं आला. आणि नंतर लगेच रक्तानें थबथबत असलेली तरवार हातांत घेतलेला ऑरेस्टेसही आंतून बाहेर आला. इतक्यांत राजा एजिस्थस जो कोठें बाहेर गेला होता, तोहि तेथें आला; आणि रथांच्या शर्यतीमध्यें ऑरेस्टेस मरण पावला म्हणून बातमी घेऊन येणारे ते जासुद कोठें आहेत, असें विचारूं लागला. तेव्हां ते आंतमध्यें आहेत, असें इलेक्ट्रानें सांगितलें. तेव्हां ते खरोखरच ऑरेस्टेसचें प्रेत बरोबर घेऊन आले असले पाहिजेत व ते त्या मृत शरीरासह आंत बसले असले पाहिजेत, असें वाटून एजिस्थस याचा आनंद पोटांत मावेनासा झाला. आणि त्या आनंदाच्या भरांत तो बोलूं लागला, "उघडा, राजवाड्याचे सगळे दरवाजे उघडा, आणि सगळ्या लोकांना आपली खात्री करून घेऊं द्या. आणि अजून जर कोणाला ऑरेस्टेस येणार असल्याबद्दलचा भ्रम असला, तर त्यांना हें ऑरेस्टेसचें प्रेत समक्ष पाहूं द्या."

राजाचा असा हुकूम झाल्याबरोबर राजवाड्याचे दरवाजे उघडण्यांत आले. त्या वेळीं वस्त्रानें आच्छादिलेलें असें एक मृत शरीर खरोखरच सर्वांच्या नजरेस पडलें. तेव्हां एजिस्थस म्हणाला, "त्या प्रेताच्या तोंडावरील पांघरूण काढा, आणि सर्वांची खात्री होऊं द्या!" त्या वेळीं ऑरेस्टेस पुढें सरसावून म्हणाला कीं, "महाराज, तें झांकण आपणच दूर करावें, हें बरें." ही सूचना पसंत पडून तो तें वस्त्र दूर करण्याकरितां उद्युक्त झाला; परंतु अशा आनंदाच्या प्रसंगीं आपली राणी आपल्या जवळ जरूर पाहिजे असें मनांत आणून त्यानें तिला बोलावून आणण्यास सांगितलें. तेव्हां फिरून ऑरेस्टेस म्हणाला, "महाराज, राणीसाहेब आपल्याजवळच आहेत! त्या कांहीं दूर नाहींत!" इतक्यांत राजा एजिस्थस यानें तोंडावरलि झांकण दूर केलें आणि पाहिलें, तों खरोखरच राणी दूर नव्हती! कारण तें राणीचेंच प्रेत होतें! तें पाहिल्याबरोबर एजिस्थसच्या मनामध्यें एकदम प्रकाश पडला, आणि त्या परकी मनुष्याकडे वळून तो त्याला म्हणाला, "तर मग तूं ऑरेस्टेसच असला पाहिजेस!" "यांत काय संशय! मी ऑरेस्टेसच आहें,

आणि तूं माझ्या बापाला जेथें मारिलेंस तेथें तुझा खून पाडण्याकरितां मी आलों आहें !" असें म्हणून ऑरेस्टेसनें त्याला आंत ओढून नेलें आणि तेथें त्याला ठार मारून आपल्या बापाचा सूड घेण्याची प्रतिज्ञा त्यानें पुरी केली !

---

# श्रद्धा.

मनुष्याच्या मनाचे जे अनेक धर्म आहेत, त्यांपैकीं श्रद्धा हा एक महत्त्वाचा धर्म आहे. हा धर्म ज्या मनामध्यें वास करीत असतो, तें मन ऐहिक व्यवहारांना फारसें उपयोगी असो किंवा नसो, परंतु पारलौकिक प्रगतीच्या संबंधानें पाहतां श्रद्धायुक्त मन ही एक अजब चीज आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. श्रद्धेच्या उलट मनाचा धर्म म्हटला म्हणजे संशय हा होय. श्रद्धा आणि संशय ही एक महान् वैऱ्यांची जोडी आहे. जेथें संशय आहे, तेथें श्रद्धा कधींही यावयाची नाहीं. संशय इहलोकींच्या प्रपंचाला फायदेशीर असतो; आणि श्रद्धा ही मरणोत्तर कालीन आध्यात्मिक उन्नतीला कारणीभूत होते. प्रपंचांत श्रद्धाळु मनुष्य फसण्याचा फार संभव असतो. कां कीं, तेथें त्याला अनेक लोकांशीं व्यवहार करावा लागतो, आणि ते सर्वच लोक कांहीं प्रामाणिक असतात, असें नाहीं. त्यांपैकीं कांहीं प्रामाणिक असतील, तर कांहीं अट्टल लुच्चे असतील. अशा ठिकाणीं प्रामाणिक समजून त्यांच्यावर विश्वास ठेविला असतां त्यांत नुकसान नाहीं, हें खरें आहे; परंतु त्याच श्रद्धाळु मनोवृत्तीनें जर कोणी

दुसऱ्या लबाड लोकांनाही प्रामाणिक समजून त्यांच्याशीं निर्धास्तपणानें वागेल, तर तो केव्हां तरी गोत्यांत पडल्यावांचून रहाणार नाहीं. तेव्हां अशा स्थितींत सर्वांच्याचबद्दल मनामध्यें संशय ठेवून परीक्षेनें त्यांच्या प्रामाणिकपणाची खात्री पटल्यानंतर मग त्यांच्यावर विश्वास ठेवणें हें योग्य असतें. प्रामाणिक माणसाचा आपण संशय घेतला, आणि परीक्षेमध्यें तो प्रामाणिक ठरला, तर ती इष्टापत्तिच होय; आणि लबाड मनुष्याचा आपल्याला संशय आला, आणि त्याच्या परीक्षेमध्यें तो लबाड म्हणूनच ठरला, तर संशयानें आपल्याला आधीं जागें करून ठेविलें होतें, हाही आपला फायदाच होय. एवंच कशीही स्थिति असली, तरी व्यवहारामध्यें संशय हा आपल्या फायद्याचाच असतो. परंतु परमार्थामध्यें मात्र याच्या अगदीं उलट स्थिति असते. आपले शास्त्रकार किंवा गुरु—जे आपल्याला आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखविण्याला प्रवृत्त झालेले असतात—त्यांचा हेतु कांहीं आपणाला फसविण्याचा नसतो. शास्त्रकारादिकांच्या ठिकाणीं फसविण्याचा हेतु मुळीं उत्पन्नच होत नाहीं. शास्त्रकार हजारों वर्षांपूर्वीं होऊन गेलेले; आणि त्यांच्या शास्त्रांप्रमाणें चालणारे आम्ही त्यांच्या मागून हजारों वर्षांनीं जन्मास आलेले! अशा स्थितींत एका कोटींतील लोकांनीं दुसऱ्या कोटींतील लोकांना फसवावयाचें कसें? आणि तें काय म्हणून? हल्लींच्या लोकांनीं पूर्वींच्या लोकांचा असा काय अन्याय केला आहे, कीं ज्यासाठीं त्यांनीं यांना खोटीं मतें सांगून भलत्याच वाटेला लावावें? सारांश, असल्या बाबतींत फसविण्याचा हेतु असणें शक्यच नाहीं. तरी पण त्या शास्त्रकारांच्या मताविषयींही मनुष्यांच्या मनामध्यें संशय उत्पन्न होतोच. संशय हा मनाचा पहिला धर्म आहे, आणि श्रद्धा हा मनाचा दुसरा धर्म आहे. आधीं पुष्प आणि मग फल, हा जसा वृक्षांचा क्रम, त्याचप्रमाणें आधीं संशय आणि मग श्रद्धा, हा मनाच्या धर्मांचा क्रम होय. या सामान्य नियमाच्या दृष्टीनें पाहिलें असतां मनामध्यें संशय उत्पन्न होणें यांत कांहीं फारसें गैर नाहीं. जसें पुष्प येणें हें फळाचें पूर्व चिन्ह होय, तद्वत्च संशय उत्पन्न झाला असतां, आतां त्या संशयाची निवृत्ति होऊन मनामध्यें श्रद्धा दृढ होईल, अशी आशा करण्याला जागा उत्पन्न होते. आणि म्हणून संशय हा चांगला. परंतु व्यवहारांतील

संशय हे अशा स्वरूपाचे असतात कीं, त्यांच्या विषयांचें ज्ञान येथल्या येथें होऊं शकतें. आणि त्यामुळें उत्पन्न झालेल्या संशयाचें निरसन होण्याला येथें जागा असते. एखाद्या मनुष्यापाशीं आपण हजार रुपयांची ठेव ठेवल्यावर तो प्रामाणिक आहे किंवा अप्रामाणिक आहे, याबद्दल मनाला संशय वाटूं लागला, तरी त्याच्याकडून ते हजार रुपये परत आले, म्हणजे तो संशय संपला. असें पारमार्थिक विषयांतील संशयांचें होत नाहीं. जेथें घोडा आणि मैदान जवळच असतात, आणि जेथें प्रत्यक्ष प्रमाणानेंच संशयांचे निर्णय होतात, तेथें श्रद्धेची बिलकुल अपेक्षाच नसते. काळोखांत कांहीं उभें आहे असें दिसत असतें; आणि तो झाडाचा बुंधा आहे किंवा मनुष्य आहे, असा संशय मनामध्यें उत्पन्न होत असतो; परंतु त्याच्याजवळ जाऊन त्याला हात लावून पाहिलें, म्हणजे संशयाचें निरसन होतें; आणि हा मनुष्य नसून झाडाचा एक खुंट आहे, असें स्पष्ट ज्ञान होतें. त्या ठिकाणीं मग त्या पूर्वीच्या संशयग्रस्त मनुष्याला मोठ्या आग्रहानें कांहीं सांगावें लागत नाहीं कीं, "बाबा, हा स्थाणु आहे, अशी तूं याच्यावर श्रद्धा ठेव !" जेथें प्रत्यक्ष प्रमाण आहे, तेथें श्रद्धेची थोरवी काय ? प्रत्यक्ष सूर्य उगवला असतां "बाबा हा सूर्य उगवला आहे, अशी तूं आपल्या मनामध्यें दृढ श्रद्धा ठेव !" अशी श्रद्धेसाठीं कोणाची याजना करावी लागत नाहीं. सर्व संशयांचें खरें मारक म्हटलें म्हणजे प्रत्यक्ष ज्ञान हेंच होय. तें प्रत्यक्ष ज्ञान या दृश्य जगामध्यें संभवतें. परंतु जेथें अदृश्य व्यवहाराच्या गोष्टी येतात, आणि जेथें त्यांच्याबद्दल संशय उत्पन्न होतो, तेथें प्रत्यक्ष प्रमाण प्रवृत्त होत नसल्याकारणानें, दुर्गम प्रदेशांत गाड्या चालण्याइतकी मोठी वाट नसली म्हणजे बैलांवरून किंवा शेळयामेंढ्यांवरून ओझीं नेऊन जसा कार्यभाग करून घ्यावा लागतो, त्याप्रमाणें शाब्दप्रमाण आणि श्रद्धा यांच्यावरच तेथें भिस्त ठेवावी लागते. सारांश, श्रद्धा हा प्रत्यक्ष प्रमाणाचा प्रतिनिधि आहे, असें म्हटल्यास हरकत नाहीं. जेथें प्रत्यक्ष सोमवल्ली मिळत नसेल, तेथें इतर वल्ली तिचा प्रतिनिधि म्हणून घ्यावी; त्याप्रमाणें जेथें प्रत्यक्ष प्रमाण मिळणें शक्य नाहीं, तेथें श्रद्धा या प्रतिनिधीचा उपयोग करणें भाग पडतें. परंतु प्रत्यक्ष प्रमाणानें मनाचें जे समाधान होतें, तें श्रद्धेनें होत नाहीं, असा तर पुष्कळांचा अनुभव

आहे; व श्रद्धेविरुद्ध पुष्कळांची कुरकुर आहे, ती तरी हीच. परंतु याचा दोष श्रद्धेकडे नाहीं. श्रद्धेची नेमणूक ही बोलून चालून टेंपररी आहे. अध्यात्मिक विषयांतील ही संशयांची निवृत्ति करण्याच्या कामावरील कायमची नेमणूक म्हटली म्हणजे प्रत्यक्ष प्रमाणाचीच आहे. परंतु तें प्रत्यक्ष प्रमाण या चर्मचक्षूच्या टप्यांत येणें शक्य नसल्याकारणानें मनाची तात्पुरती समजूत घालण्याकरितां ही श्रद्धेची योजना करण्यांत आलेली आहे. युक्लिडच्या सिद्धांतशास्त्राची सर्व रचना प्रत्यक्ष प्रमाणावरच केलेली आहे. तरी पण सर्वच गोष्टी प्रथमारंभींच प्रत्यक्ष प्रमाणानें सिद्ध करून देणें शक्य नसल्याकारणानें त्या व्यावहारिक शास्त्रामध्येंही कांहीं गोष्टी गृहीत धराव्या लागल्या आहेत. ह्या ज्या सिद्धांतशास्त्रांतील गृहीत गोष्टी, तीच अध्यात्मशास्त्रांतील श्रद्धा होय. अध्यात्मशास्त्र म्हणजे मरणानंतरच्या गोष्टी मरणाच्या आधीं बोलण्याचें शास्त्र ! अशा शास्त्रांतील ज्या प्रदेशांत प्रत्यक्षाची गति नाहीं, त्या प्रदेशांत श्रद्धेची काठी टेंकीत टेंकीत हळुहळूच मार्गक्रमण केलें पाहिजे.

अध्यात्मशास्त्रांत प्रत्यक्ष प्रमाणाला अवकाश नाहीं, असें जें वर प्रतिपादन करण्यांत आलें आहे, त्याच्या अर्थाचा थोडासा ज्यास्त खुलासा करणें अवश्य आहे. आपल्या आत्म्याच्या देहपतनोत्तरकालीन स्थितीसंबंधानें शास्त्रांत कित्येक गोष्टी सांगितल्या आहेत. त्यांच्याबद्दल आपल्या मनामध्यें संशय उत्पन्न होतो. त्या खऱ्या आहेत असें तूं मान, असें श्रद्धा आपल्याला सांगत असते. परंतु तेवढ्यानें आपलें मन संतुष्ट न होतां, ‘ हें असें खरोखरच आहे, असें मला प्रत्यक्ष दिसलेंच पाहिजे, ’ अशी प्रत्येक मनुष्याला हांव सुटते. परंतु असल्या बाबतींत प्रत्यक्ष ज्ञान हें असंभवनीय होय. त्या गोष्टी येथें कोणालाही प्रत्यक्ष दिसत नाहींत. मानवी कोटीच्या वरच्या कोटींतील जीवांना त्या गोष्टी दिसत असतील. परंतु मानवी इंद्रियें हीं कांहीं एका विवक्षित मर्यादेपर्यंतच ज्ञानग्रहण करण्याला समर्थ असतात. तिच्या पलीकडचें ज्ञान त्यांना होत नाहीं. पशुपक्ष्यादिकांच्यापेक्षां आपली ज्ञानग्रहणशक्ति जशी जास्त आहे, त्याचप्रमाणें आपल्यापेक्षां वरच्या कोटींत गेलेले जे जीव असतील त्यांची ज्ञानग्रहणशक्ति कदाचित् जास्त असेल. अशा कोटींतील जीवांना जें प्रत्यक्ष दिसत असेल, तें आपल्याला या

मानवी देहाच्या आवरणामध्यें प्रत्यक्षतेनें दिसणें अशक्य आहे. त्यांना जें प्रत्यक्ष दिसत असेल, तें आपण त्यांच्या कोटींत प्रवेश करीपर्यंत श्रद्धेच्या बळावर खरें मानून आपली तहान भागवून घेतली पाहिजे. ही मानवी देहाची अल्पज्ञानग्रहणशक्ति पाहून तिला जोड देण्याकरितांच श्रद्धेची योजना करण्यांत आलेली आहे. व ही जी तात्पुरती योजना केलेली आहे, ती फार दूरदर्शीपणाची आहे. आज जर श्रद्धा न अंगीकारावी, तर आपल्या ज्ञानाची मर्यादा अगदीं आकुंचित होऊन बसते; व आपला लहानसा डोळा जेवढें दाखवील, तेवढेंच आपलें ज्ञान, अशी स्थिति येऊन पोहोंचते. जे श्रद्धा मानीत नाहींत, ते ज्ञानाच्या संकुचित मर्यादेमध्यें कोंडले जातात. हा त्यांचा एक प्रकारचा तोटाच आहे. परंतु आपण जर श्रद्धेच्या टेकडीचा आश्रय करूं, तर लगेच आपल्या ज्ञानदृष्टीचें क्षितिज किती तरी विस्तीर्ण होतें! तो पारलौलिक देखावा प्रत्यक्ष पाहण्याची वेळ येई तोंपर्यंत या श्रद्धेच्या उंचवट्यावरून त्या देखाव्याची रमणीयता आपण थोडीबहुत अनुभवली, तर त्यांत आपला फायदाच आहे. या टेकडीवरून श्रद्धा आपल्याला जें दाखवील, तो जर निवळ भ्रम असेल, तर गोष्ट वेगळी. परंतु योगमार्गानें प्राचीन आणि अर्वाचीन शास्त्रकारांनीं आणि सत्पुरुषांनीं ज्या गोष्टी प्रत्यक्षवत् पाहिल्या आहेत, त्यांचा आपल्या अंगांत त्या प्रत्यक्ष पाहण्याचें सामर्थ्य येईपर्यंत श्रद्धेच्या साधनानें अनुभव घेतला असतां त्यांत कांहीं गैर नाहीं. चांगलें पोहतां येऊं लागेपर्यंत भोपळ्यांच्या सांगडीवर बसून पाण्यावर तरंगण्याचा अनुभव घेतला, तर त्यांत काय अयोग्य आहे? जेव्हां पोहतां येऊं लागेल, तेव्हां प्रत्येक जण भोपळे फेकून देतच आहे! त्याचप्रमाणें जेव्हां पारलौकिक प्रत्यक्षाचे अनुभव येऊं लागतील, तेव्हां मग श्रद्धेची मातब्बरी नाहीं. पण तोंपर्यंत ती अवश्यक आहे. ज्ञानाच्या बाजारांत श्रद्धा हें एक गरिबीचें–पण प्रामाणिकपणाचें–लक्षण आहे. जो सर्वज्ञ परमेश्वर आहे, किंवा जे त्याच्याच कृपेनें सर्वज्ञ महात्मे झालेले आहेत, आणि त्यामुळें ज्यांना सर्व गोष्टी प्रत्यक्ष दिसत आहेत, त्यांना–ज्ञानाच्या बाजारांतील त्या धनाढ्यांना–त्या लक्षाधिशांना–त्या कोट्यधीशांना–श्रद्धेची कांहीं किंमत नाहीं. ज्यांच्यापाशीं रोख पैसा असतो, त्यांना उधारीची काय जरूर?

पत, क्रेडिट, प्रॉमिसरी नोट, इत्यादि साधनें ज्यांच्यापाशीं रोख पैसा नाहीं, त्यांच्याकरितां होत ! पारलौकिक प्रत्यक्ष ज्ञानाचा रोख पैसा लागेल तितका ज्यांच्यापाशीं आहे, त्यांना श्रद्धेच्या उधारीची कधीं गरजच पडत नाहीं. परंतु आपण मानवी प्राणी या ज्ञानाच्या बाजारांत निव्वळ भिकारी जन्मास आलेले आहों. आपल्या जवळच्या ज्ञानाच्या पैशाची पुंजी अगदीं थोडी आहे. आपल्या सत्कर्मांच्या परिणामानें आपली जसजशी उत्क्रांति होत जाईल, तसतसें आपल्याला तें ज्ञानधन पुढें विपुल मिळणार आहे, यांत शंका नाहीं. पण तें मिळण्याची पात्रता आपल्या अंगीं येण्याकरितां आणि तोंपर्यंतचे आपले व्यवहार चालण्याकरितां, आपल्या श्रद्धेच्या पतीवर आपलें दरिद्री दुकान आपल्याला चालविलें पाहिजे. मनुष्याला परमेश्वरानें ज्ञानेंद्रियें फक्त पांचच दिलेलीं आहेत. परंतु अतींद्रिय ज्ञानार्जनाला साधनीभूत असें एक सहावें इंद्रिय मनुष्य प्राणी आपण आपल्याकरितां निर्माण करून घेऊं शकतो ! तें सहावें इंद्रिय श्रद्धा हें होय ! जेथें पंचज्ञानेंद्रियांचें ज्ञान थांबतें, तेथें श्रद्धेपासून मिळणाऱ्या ज्ञानाला सुरवात होते !

अशा प्रकारचा हा ज्ञानेंद्रियाचा श्रद्धारूपी सहावा दरवाजा ज्यांच्या अंतःकरणामध्यें उघडला आहे, त्यांचा पुढील आध्यात्मिक मार्ग फार सुगम होतो. श्रद्धेची संवय एकदा मनाला लागत गेली, म्हणजे त्या मनाला काय काय साध्य होणार नाहीं ? या श्रद्धेची योग्यता भगवद्गीतेमध्यें एके ठिकाणीं तर फारच वर्णलेली आहे. " यो यच्छ्रद्धः स एव सः " या चरणांत असें सांगितलें आहे कीं, जो जशी श्रद्धा धरील, तो तसा होईल ! हें वाटेल तितक्या मोठेपणाचें भगवंतांनीं आपल्या हातांत दिलेलें साधन कांहीं लहानसान नाहीं. अंध श्रद्धा ही अहितकारक आहे, यांत शंका नाहीं. परंतु जी डोळस श्रद्धा आहे, किंवा भगवद्गीतेच्या सतराव्या अध्यायामध्यें सात्त्विक, राजस आणि तामस, अशा ज्या तीन प्रकारच्या श्रद्धा सांगितल्या आहेत, त्यांपैकीं जिला सात्त्विकी श्रद्धा असें म्हणतां येईल, तसल्या प्रकारच्या श्रद्धेनें मनुष्याच्या मनावर—आणि तेणेंकरून त्याच्या उत्क्रांतीवर—फारच चांगले परिणाम होतात. संशयापासून सामान्य लौकिक व्यवहारामध्यें काय फायदे होतात, हें वर सांगितलेंच

आहे. परंतु जरी लौकिक व्यवहारामध्यें तसले कांहीं फायदे असले, तरी एकंदरींत संशय ही मनाची अत्यंत क्षुद्र वृत्तिच होय. संशय आणि श्रद्धा या दोन मनोवृत्तींची अध्यात्म—व्यवहारामध्यें तुलना केली, तर असें दिसून येतें कीं, मनाची संशय ही अत्यंत नीच वृत्ति होय, आणि श्रद्धा ही मनाची अत्यंत उच्च आणि उदात्त वृत्ति होय. संशय कोणीही अधम मनोवृत्तीचा मनुष्य घेईल, परंतु श्रद्धा ठेवणें ही गोष्ट एकाही अनुदार आणि अनुत्क्रांत मनुष्याच्या हातून होणें शक्य नाहीं. संशय म्हणजे ज्ञानाचा अभाव, आणि श्रद्धा म्हणजे भावी ज्ञानाची आगाऊ खात्री! संशय जसा कोणीही मनुष्य घेऊं शकेल, त्याचप्रमाणें एकादी गोष्ट प्रत्यक्ष पाहिली म्हणजे त्या प्रत्यक्षावर विश्वास ठेवणें, हें सुद्धां काम कोणीहि करूं शकेल. प्रत्यक्षावर विश्वास ठेवण्यांत कांहीं मोठा पुरुषार्थ नाहीं. ती अगदीं साधी गोष्ट आहे. परंतु जी गोष्ट प्रत्यक्ष नाहीं, तिच्याबद्दल संशय न घेतां, तिजविषयीं दृढ विश्वास ठेवणें, याला मनाचें एक प्रकारचें धैर्य लागत असतें. भित्रा मनुष्य, कोत्या मनाचा मनुष्य, संशयी वृत्तीचा मनुष्य कोणत्याही अप्रत्यक्ष आणि अज्ञात गोष्टीसंबंधानें विश्वास ठेवण्याला नेहमीं कचरत असतो. परंतु धीर, गंभीर, सात्त्विक आणि उदात्त, अशा मनोवृत्तींचा मनुष्य निर्धास्तपणें अप्रत्यक्ष आणि अज्ञात वस्तूंवाही विश्वास धरतो. हा विश्वास—ही श्रद्धा—ज्यांच्या ठिकाणीं निसर्गसिद्ध आहे, ते खरोखर पुण्यवान् आणि भाग्यवान् होत. परंतु स्वभावतः ज्यांचें मन श्रद्धायुक्त नाहीं, त्यांना ती श्रद्धा आपल्या मनामध्यें इतर साधनांनीं उत्पन्न करून घेतां येणार नाहीं, असें नाहीं. परमेश्वर, पुनर्जन्म, सत्कर्मांचे सत्परिणाम, शास्त्रग्रंथ, इत्यादि गोष्टींवर विश्वास ठेवण्याला विवेकी मनुष्याला फारसें कठिण आहे, असें नाहीं. 'ज्यांनीं कधीं कोणाला फसविलें नाहीं, आपल्याला फसविण्याचें ज्यांना कांहीं विशेष कारण नाहीं, व जे नेहमीं एकधर्मानें आणि एकनियमानेंच प्रवर्तित होऊन राहिलेले आहेत, त्यांच्यावर आणि त्यांच्या शब्दांवर श्रद्धा ठेवण्यास काय अडचण आहे!' अशा प्रकारचा विवेक केल्यानें आपली श्रद्धा आपल्याला वृद्धिंगत करून घेतां येईल. आपण संशय वाढवीत बसलों, तर संशय वाढतील; आणि श्रद्धा वाढवूं लागलों, तर श्रद्धा वाढेल. आपण जसें पेरूं, तसें उगवेल, असा सृष्टीचा नियम जर

आपल्याला पावलोपावलीं सत्यस्वरूपामध्यें आढळून येत आहे, तर आपल्या अंतःकरणरूपी क्षेत्रामध्यें संशय आणि अश्रद्धा यांची पेरणी करून काय फायदा आहे ? जशी श्रद्धा धरावी तसें होण्याचा धर्म ज्यां सृष्टीमध्यें आहे, त्या सृष्टींत आपण श्रद्धेच्या ऐवजीं अश्रद्धेचा आणि संशयाचा आग्रह धरिला, तर कल्पवृक्षाच्या झाडाखालीं उपाशी मरणारांमध्यें आणि आपल्यामध्यें काय फरक राहिला ?

अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति ।
नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ॥
अश्रद्दधानाः पुरुषा धर्मस्यास्य परन्तप ।
अप्राप्य मां निवर्तन्ते मृत्युसंसारवर्त्मनि ॥
अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत् ।
असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह ॥

या वर दिलेल्या भगवदुक्तीमध्यें संशयी वृत्तीचे आणि अश्रद्धेचे फार भयंकर परिणाम वर्णिले आहेत. अध्यात्मविषयक प्रश्नांच्या बाबतीमध्यें अश्रद्धा असल्याच्या योगानें जीं पारलौकिक फलें तीं तर अंतरतातच; परंतु ऐहिक सुखाचाही त्यापासून नाश होतो. "नायं लोकोऽस्ति न परः" "निवर्तन्ते मृत्युसंसारवर्त्मनि" 'न च तत्प्रेत्य नो इह" या वचनांत इह–पर अशा दोन्ही ठिकाणच्या सुखांचा नाश होत असल्याबद्दल स्पष्ट उल्लेख आहे. तेव्हां असले भयंकर परिणाम जिच्यापासून उत्पन्न व्हावयाचे, ती संशयी वृत्ति टाकून देऊन शास्त्रवचनांवर आणि सृष्टिधर्मावर श्रद्धा ठेवणें हेंच श्रेयस्कर होय.

परंतु संशय टाकावा आणि श्रद्धा धरावी, असें जरी कोणी कितीही वेळां सांगितलें, तरी मनाची वृत्ति एकदम कधींही बदलत नाहीं. मन हें उत्क्रांतितत्त्वावर नेहमीं चाललेलें आहे. तें मन मूळचें संशयी वृत्तीचें असलें, तर जगांतील सत्य सिद्धांताविषयीं त्या मनामध्यें जेव्हां जेव्हां संशय उत्पन्न होतील, तेव्हां तेव्हां ते वर सांगितल्या प्रकारच्या अनेक

विवेकांनीं वरचेवर बंद करून टाकिले पाहिजेत. अशी मनाला संवय लागतां लागतां संशय उत्पन्न होण्याची क्रिया बंद पडत जाईल. इतकें झालें, म्हणजे आपल्या मनामध्यें श्रद्धेची लागवड करण्याला निर्मळ असें क्षेत्र तयार झालें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. शेतांत चांगल्या धान्याचें पीक उगवण्याला त्यांतील कांटेरी झाडें ज्याप्रमाणें प्रथम उपटून टाकिलीं पाहिजेत, त्याप्रमाणें संशय हे आपल्या मानसक्षेत्रांतील कंटक आहेत. त्यांचा नाश होऊन ते फिरून उद्भवत नासे झाले, म्हणजे श्रद्धेच्या वृद्धीचें निम्में काम झालें. अध्यात्मिक विषयांमध्यें मनुष्याच्या मनांत जे संशय उत्पन्न होतात, त्यांपैकीं कांहीं स्वाभाविकपणें उद्भवतात. ते वर सुचविलेल्या प्रकारानें उत्पन्न झाल्याबरोबर दाबून टाकिल्यानें त्यांचा लय होणें सुकर आहे. परंतु या स्वाभाविक उत्पत्तीशिवाय कित्येक कृत्रिम कारणांनींही मनामध्यें संशय उत्पन्न होत असतात. या कृत्रिम कारणांमध्यें अग्रस्थान नास्तिक ग्रंथांना आणि त्यांतील मतांना दिलें पाहिजे. नास्तिक ग्रंथांतील मतें मनामध्यें फार विक्षेप उत्पन्न करितात; व लढाईत एखादा किल्ला जसा सुरुंग लावून कोसळून पाडला जातो, त्याप्रमाणें परमेश्वर, परलोक, पुनर्जन्म, पापपुण्य, परमपावन धर्म, इत्यादिकांची इमारत त्यांच्या योगानें अगदीं जमीनदोस्त होऊन जाते. हीं नास्तिक मतें पूर्वपक्ष या दृष्टीनें अत्यंत आदरणीय आहेत. खंडन करण्यासाठीं तीं आपल्याला पाहिजे आहेत. आपल्या अंगांतील शक्ति वाढविण्याकरितां आणि आपलें मल्लविद्येचें ज्ञान वृद्धिंगत करून घेण्याकरितां ज्याप्रमाणें आपल्यापाशीं कुस्ती करणारा कोणी तरी प्रतिपक्षी पाहिजे असतो, त्याप्रमाणें सिद्धांतमताच्या दार्ढ्याकरितां आपल्याला असले नास्तिक मताचे पूर्वपक्ष मिळाले, तर ते आपल्याला पाहिजेच आहेत. परंतु त्यांच्याशीं कुस्ती करून त्यांना पाडण्याची ज्यांच्या अंगांत ताकद नाहीं, त्यांनीं त्यांच्याकडून आपला पराभव करून घेण्याकरितां त्यांची संगति करणें बरोबर नाहीं. कोंवळ्या झाडांचें ज्याप्रमाणें वादळाच्या वाऱ्यापासून संरक्षण करावें लागतें, त्याप्रमाणें कोंवळ्या मनांचें संरक्षण असल्या नास्तिक मतांपासून फार काळजीपूर्वक करावयाला पाहिजे आहे. आपल्यामध्यें कांहीं नास्तिक ग्रंथ नाहींत असें नाहीं. परंतु पाश्चात्य वाङ्मयामध्यें त्यांचा भरणा फार मोठा आहे

पाश्चात्य तत्त्ववेत्ते हे बहुतेक आधिभौतिक तत्त्वांचाच विचार करितात. त्या तत्त्वांच्या पलीकडील अज्ञेय प्रदेशामध्यें ते फारसा संचार करीत नाहींत. तर्कशास्त्राच्या नियमांप्रमाणें बरोबर अनुमानें करण्यामध्यें ते तत्त्ववेत्ते मोठे कुशल असतात. त्यामुळें जड वस्तूंच्या स्वभावावरून काढलेल्या अनुमानांनीं भरलेले त्यांचे लेख आपाततः मोठे रमणीय दिसतात. परंतु आधिभौतिक विचारांची मर्यादा उल्लंघन करून अध्यात्मविषयांच्या विचाराच्या प्रदेशामध्यें संचार करण्याची त्यांना महत्त्वाकांक्षा नसल्यामुळें, किंवा तसें करण्याला लागणारी मनाची विशिष्ट परिस्थिति त्यांना अनुकूल नसल्यामुळें, किंवा ज्या अदृश्य प्रदेशामध्यें गमन करण्याला मार्ग स्पष्ट दिसत नाहीं, तेथें विनाकारण धडपड करणें हें निष्फल आहे, अशी त्यांची समजूत असल्यामुळें, तिकडील तत्त्वज्ञान्यांचे विचार बहुतेक ज्ञेय सृष्टीच्या हद्दीवर येऊनच थबकतात. या कारणामुळें आपल्याकडील अध्यात्मदृष्टीनें त्यांना एक प्रकारचें नास्तिकत्व प्राप्त झालें आहे. त्यांच्या विचारांची विशदता आणि प्रतिपादनाचें कौशल्य यांच्या योगानें त्यांच्या या नास्तिकपणासही एक प्रकारचा मोहकपणा आलेला आहे. आणि त्यामुळें त्यांच्या त्या जडवादामध्यें मनुष्य चटकन भुलून गुरफटून जातो. याकरितां असल्या प्रतिष्ठित कुतर्कांपासून अलिप्त राहण्याविषयीं प्रत्येकानें फार खबरदारी घेतली पाहिजे. पूर्वेकडील शास्त्रें आणि पश्चिमेकडील शास्त्रें यांच्यामध्यें अस्मान आणि जमीन यांच्याइतकें अंतर आहे. रासायनिक मिश्रणें आणि पृथक्करणें, विद्युच्छक्तीचे धर्म आणि उष्णतेचे परिणाम, लोहचुंबकाचे नियम आणि परमाणूंच्या क्रिया, इत्यादि अनेक जडसाधनांच्या दिव्याच्या प्रकाशानें जेवढें दिसेल तेवढें पाहण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. परंतु या भौतिक सृष्टीच्या पलीकडील अतींद्रिय गोष्टींविषयीं ज्ञान करून देणारा आपल्याकडील जो योगमार्ग त्याची—त्या सूर्यप्रकाशाची—तिकडील लोकांना कल्पनाही नाहीं. तत्त्वज्ञानाची बाजू सोडून त्यांच्याकडील धर्माकडे पाहिलें, तर त्यांचा धर्म परमेश्वर आणि जीव यांच्यामध्यें पृथक्त्व भेदभाव ठेवीत असतो. परंतु आपल्याकडील धर्म हा जीव आणि ब्रह्म यांचें तादात्म्य प्रतिपादन करीत असल्यामुळें आपला एक मोठा फायदा झालेला आहे. तो हा कीं, परमेश्वराचे जे गुणधर्म

तेंच त्याच्याशीं एकरूप असणाऱ्या जीवाचेही गुणधर्म आहेत. अशी दृढभावना असल्यामुळें आपल्यालाही अतींद्रिय ज्ञान प्राप्त करून घेतां येईल, अशी महत्त्वाकांक्षा उत्पन्न होऊन तिचा परिपोष आणि परिपाक आपल्या योगशास्त्रामध्यें झालेला आहे. यावरून हें दिसून येईल कीं, पूर्व आणि पश्चिम या दोन्ही देशांतील लोकांच्या आध्यात्मिक शास्त्रांतील कार्यांच्या मर्यादा आणि महत्त्वाकांक्षा अगदीं भिन्न भिन्न झालेल्या आहेत. पाश्चात्य लोकांचें मुख्य साधन रसायनशास्त्र, यंत्रशास्त्र, इत्यादि होय. आर्य लोकांनीं या जड शास्त्रांचा तर यथावकाश उपयोग केलेला आहेच; पण त्यांचें मुख्य साधन म्हटलें म्हणजे योगशास्त्र हें होय. पाश्चात्य लोकांच्या ज्ञानाची धांव फक्त जड आणि दृश्य सृष्टीपर्यंत होय. पण आपल्याकडील तत्त्ववेत्त्यांनीं जड आणि दृश्य सृष्टीचा जितका उपयोग करून घ्यावयाचा, तितका करून घेऊन शिवाय त्याच्या पलीकडे अदृश्य सृष्टींतील प्रमेयेंही योगबलानें ज्ञात करून घेण्याचा प्रयत्न त्यांनीं सफल करून इष्ट हेतु साधला आहे. शनीच्या भोंवतीं कांहीं उपग्रह फिरत असलेले आम्हांला प्रत्यक्ष दिसतात, असें ज्यांनीं दुर्बिणीचा कधीं उपयोग केला नाहीं त्यांना सांगितलें, तर ती गोष्ट जशी त्यांना पटणार नाहीं, त्याचप्रमाणें या योगबलाच्या दुर्बिणींतून दिसणाऱ्या अतींद्रिय गोष्टी—ती दुर्बिण ज्यांच्यापाशीं नाहीं अशा जडवाद्यांना—संभवनीय वाटावयाच्या नाहींत. तेव्हां या आध्यात्मिक शास्त्राच्या बाबतींत पूर्व आणि पश्चिम यांच्यामध्यें मुख्य फरक हा आहे कीं, ही योगशास्त्राची दुर्बिण पूर्वेकडील लोकांजवळ आहे, आणि पश्चिमेकडील लोकांजवळ नाहीं. त्यामुळें हिंदूंच्या वेदांतशास्त्रांतील उच्च आणि अतींद्रिय प्रमेयांना पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांतून कोठेंही जागा मिळाली नाहीं. त्यावरून अशा तत्त्वज्ञान्यांच्या ग्रंथांतून जर या गोष्टी सांगितलेल्या नाहींत, तर त्या खऱ्या तरी असतील कशावरून, असा साहजिकपणेंच त्या पुस्तकांच्या वाचनानें मनामध्यें विक्षेप उत्पन्न होतो. म्हणून अशा रीतीनें ज्यांना नास्तिकत्वाचा संसर्गदोष लागलेला आहे, अशीं पुस्तकें मनाच्या अप्रगल्भ अवस्थेमध्यें जितकीं कमी वाचलीं जातील, तितकीं चांगलीं. त्यांत योगमार्गजन्य अतींद्रिय ज्ञान नसावयाचेंच, तर केवळ जडवादात्मक गोष्टी असावयाच्या.

ही दृढ भावना मनामध्यें ठेवून त्या पुस्तकांचें जडवादाच्या अभ्यासासाठीं परिशीलन केलें, तर कोणतीही हरकत नाहीं. परंतु एरवीं आपल्या श्रद्धेला हानिकारक आणि संशयाला बलदायक अशीं तत्त्वज्ञानें खलीत बसण्यापासून कांहीं तादृश फायदा नाहीं.

अशा रीतीनें नैसर्गिक आणि कृत्रिम अशा उभयविध संशयांचें बीज उच्छेदून टाकल्यानंतर श्रद्धेची वाढ आपल्या मनामध्यें जेणेंकरून होईल, असे प्रयत्न आपण केले पाहिजेत. परमेश्वराचा परम कारुणिकपणा लक्षांत आणावा, आणि 'असल्या परमेश्वरावर मी श्रद्धा ठेवूं नको काय ?' असा प्रश्न आपल्या मनाला विचारावा. अशा प्रसंगीं त्या परमेश्वरावर श्रद्धा ठेवूं नको, असें कोणतेंही मन सांगणार नाहीं. परमेश्वराची अनंत शक्ति, सृष्टीचा अनंत विस्तार, पापपुण्यांचे बिनचूक परिणाम, असल्या या प्रचंड सामर्थ्यापुढें आपण उभें रहावें, आणि 'यांच्या न्यायीपणावर आणि नियमितपणावर मी श्रद्धा ठेवूं नको काय ?' असें आपल्या मनाला विचारावें. अशा तुलनात्मक प्रसंगीं 'तूं या लबाडांवर विश्वास ठेवूं नको,' असा सल्ला कोणतेंही मन देणार नाहीं. अशा प्रकारच्या उपायांनीं आपण आपल्या मनाला श्रद्धेचे धडे प्रत्यहीं शिकवीत असावें. आपल्या मनांतील श्रद्धा वाढविण्याला कांहीं कांहीं वेळाही मोठ्या अनुकूल असतात. आपण मोठे श्रीमंत आहों, चैनींत दिवस चालले आहेत, अधिकारमदानें डोळे धुंद झालेले आहेत, अशा वेळीं जर आपण म्हणूं कीं, आपली श्रद्धा या वेळीं वाढवावी, तर ती कधीं वाढावयाची नाहीं. उलट अशा वेळीं असलेली श्रद्धा नाहींशी होण्याचीच फार भीति असते. श्रद्धेच्या वाढीला अनुकूल वेळ म्हटली, म्हणजे संकटाचीच होय. आपण हालांत आहों, विपत्तींत दिवस काढीत आहों, जवळ पैसा नाहीं, दुपारची वेळ आली तर घासभर अन्न मिळण्याची भ्रांत आहे, मुलेंबाळें रोगानें आणि व्याधीनें ग्रस्त झालेलीं आहेत, जे आपले मित्र होते ते आपले हाडवैरी बनले आहेत, अशा अवस्थेंत—जेव्हां आशेचा एकादा लहानसा किरणही दिसत नाहीं तेव्हां—आपली श्रद्धा वाढवून घेण्याची ती मोठी चांगली संधि असते. ती सुदैवानें ज्यांना प्राप्त होईल, त्यांनीं ती कधींही फुकट दवडूं नये. तेव्हां परमेश्वर, परलोक,

पापपुण्य, इत्यादि सर्व आपल्या मनाच्या अगदीं जवळ आलेलीं असतात. तीं आपले हात पुढें करीत असतात, आणि आपलें मन त्यांच्याकडे आशायुक्त दृष्टीनें पाहत असतें. अशा वेळीं त्यांचा व आपला स्नेहभाव जमवून घेतला, तर तो तेव्हांच जमतो.

अशा प्रकारची श्रद्धा वाढविण्याची संवय आपण एकदां मनाला लावून दिली, म्हणजे जेव्हां जेव्हां अनुकूल प्रसंग येतील, तेव्हां तेव्हां त्या मनाचा कांटा संशयी वृत्तीकडे बिलकूल न झुकतां तो सदोदित श्रद्धेच्या बाजूलाच वळलेला दिसेल. मनाला ज्याची संवय लावावी, त्याच त्याच गोष्टी मन वारंवार करतें. याकरितां त्याला एकदां चांगल्या गोष्टींची संवय लावून दिली, म्हणजे त्याचा कल नेहमीं चांगल्या गोष्टींकडेच राहील. आणि ही संवय एकदां लागली, म्हणजे ती या जन्मापुरतीच आहे, असें नसून ती पुढील जन्मींही तोच क्रम पुढें चालू ठेवील. जे पुनर्जन्मवादी आहेत, त्यांच्या मताप्रमाणें मन हें उत्क्रांतितत्त्वाच्या अनुरोधानें पूर्वींच्या अनेक जन्मांच्या संस्कारांचा निष्कर्ष बरोबर घेऊन नवीन जन्मामध्यें देहसंयुक्त होत असतें. आपण पुष्कळ लोक असे पाहतों कीं, एखादी श्रद्धेच्या अपेक्षेची गोष्ट निघाली, तर त्यांची श्रद्धा त्या गोष्टीवर ताबडतोब बसते. ते कधीं तिचीं कारणें विचारीत नाहींत; किंवा हें असें कां झालें आणि तें तसें कां झालें, याच्या विषयींच्या उपपत्तीच्या आकांक्षेनें ते कधीं अडून बसत नाहींत. अशा कारणांसाठीं किंवा अशा उपपत्त्यांसाठीं कोणी जिज्ञासूनें अडून बसूं नये, असा यांतील तात्पर्यार्थ नव्हे. एकएकदां प्रत्येक मनुष्याच्या मनाला अशा प्रकारच्या शंकासमाधानांमधून जावें हें लागतेंच. परंतु त्या प्रश्नोत्तरांसाठीं न थांबतां ज्यांची एकदम श्रद्धा बसते, अशा लोकांबद्दल असेंच म्हणावें लागतें कीं, त्यांचीं मनें केव्हां तरी एकदां कोठल्या तरी पूर्व जन्मामध्यें असल्या या संशयी वृत्तीच्या प्राथमिक परिस्थितीमधून अनुभव घेऊन निघून आलेलीं असलीं पाहिजेत. आणि त्यामुळेंच त्यांची इहजन्मीं एकदम श्रद्धा बसत असली पाहिजे. दैव आणि प्रयत्न यांच्या वादामध्येंही अशी एक कल्पना करण्याचा प्रघात आहे कीं, दैवानें एखादी गोष्ट साध्य होते, असें जेथें आपण फक्त इहजन्मींच्या दृष्टीनें म्हणतों, तेथें अनेक पूर्वजन्मांच्या

दृष्टीनें पाहिलें, तर असेंच म्हणावें लागतें कीं, जें दैव म्हणून म्हणतात तें दुसरें कांहीं नसून जन्मांतरीं केलेल्या अनेक प्रयत्नांचाच तो समुच्चय होय. पूर्व जन्मामध्यें आपण आपल्या पापांनीं अगर पुण्यांनीं आपल्या मनाला जितक्या उत्क्रांतीपर्यंत आणून ठेवूं, तितक्या उत्क्रांतीपासून आपण आपल्या नवीन जन्मांतील व्यवहारांना सुरवात करितों. मागें जें आपण संचित केलें असेल, तें सर्व इहजन्मीं आपल्याला फिरून प्राप्त होतें.

अयतिः श्रद्धया थोपेतो योगाच्चालितमानसः ।
अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति ॥

या श्लोकामध्यें अर्जुनानें कृष्णाला जो प्रश्न विचारला आहे, त्या प्रश्नाचें उत्तर देतांना भगवान् श्रीकृष्ण असेंच सांगतात कीं, बुद्धीमध्यें जी श्रद्धा एकदां दृढ झाली, ती नाश न पावतां मनुष्य जेव्हां फिरून जन्मास येतो त्या वेळेस, त्यानें पूर्वजन्मीं ज्या दर्ज्याला आपली बुद्धि आणून ठेविली असेल, त्या दर्जाची बुद्धि त्याला फिरून प्राप्त होते. आणि तेथपर्यंत उत्क्रांत झालेली बुद्धि घेऊन तो तिला ज्यास्त उत्क्रांतलिा नेण्याच्या प्रयत्नाला प्रारंभ करितो.

तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् ।
यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनंदन ॥

या श्लोकांत भगवंतांनीं जें तत्त्व सांगितलें आहे, त्या तत्त्वाच्या अनुरोधानें मनुष्याच्या मनाची उत्क्रांति ही जन्मोजन्मीं चालली आहे. हा जर अदृश्य सृष्टींतील सूक्ष्म क्रम आपण लक्षांत घेतला, तर संशयी वृत्ति टाकून श्रद्धायुक्त मन करण्याची संवय लाविल्यापासून आपण आत्महित कसें व किती करून घेऊं शकूं, याची बरोबर कल्पना आपल्या मनामध्यें येईल. संशयी वृत्तीमध्यें कांहीं खरें सुख नाहीं. मी कशी शंका काढली; मला हा जो संशय सुचला, तो पूर्वी कोणालाही सुचला नव्हता; माझ्या बुद्धींत इतकी कुशाग्रता असल्यामुळेंच मला हा प्रश्न उत्थापित करितां आला; माझ्या या पूर्वपक्षाचें समाधान कोणालाही करतां यावयाचें नाहीं; अशा प्रकारचा कदाचित् एक बौद्धिक आनंद मनाला संशयापासून क्षणभर होईल. पण त्या आनंदाची काय किंमत आहे ? तो अहंकारमूलक आनंद आणि तो अज्ञानमूलक गर्व यांच्यापेक्षां, ज्याला या शंकांचें समा-

धान झालेलें आहे, त्याचा आनंद आणि त्याचा गर्व किती तरी मोठा आहे ! आपल्याला या शंका आल्या,किंवा त्या शंकांचें आपल्यासारख्याच अल्पबुद्धीच्या इतर लोकांना समाधान करतां आलें नाहीं, तर त्यावरून आपल्या बुद्धीच्या क्षुद्रपणाशिवाय आणि कोतेपणाशिवाय दुसरें काय सिद्ध होणार आहे ! आपल्याला त्या गोष्टी समजल्या नाहींत, म्हणून त्या मुळीं अस्तित्वांतच नाहींत, असें तर होऊं शकत नाहींना ! परमेश्वर आहे; त्याची घडामोड रोज चालली आहे; सृष्टीचा प्रपंच अव्याहतपणें पसरला आहे; पाप-पुण्यांचे परिणाम सूक्ष्मपणानें घडून येत आहेत; या सर्व गोष्टी जर अप्रतिहतपणानें चाललेल्या आहेत, तर त्या कशा चाललेल्या आहेत हें एकाद्या क्षुद्रबुद्धीला समजलें नाहीं, किंवा दुसऱ्या कोणाला त्याचें समाधान करतां आलें नाहीं, म्हणून काय झालें ? अशा स्थितींत आपल्या बुद्धीचा कोतेपणा लक्षांत आणून तिला श्रद्धेची जोड देणें हेंच श्रेयस्कर नाहीं काय! आज आपल्याला परमेश्वर दिसत नाहीं, तरी तो आहे अशी श्रद्धा ठेवून आपण चालल्यास आपलें मन उत्क्रांत होईल, व उदात्त होईल. आणि आपण जसजसे उत्क्रांतीच्या वातावरणामध्यें वर वर जाऊं, आणि जास्त जास्त पात्रता संपादन करूं, तसतशी त्या आदितत्त्वाला आपली करुणा येऊन या त्रैलोक्याच्या घडामोडीचीं काय काय रहस्यें आहेत, याचें प्रत्यक्ष ज्ञान तो आपल्याला करून देईल. असा एक दिवस कधीं तरी उगवणार नाहीं काय! खात्रीनें उगवेल !

# प्रस्थानत्रयीची एकवाक्यता.

कोणताही विषय घेतला, तरी त्या विषयाचें सांगोपांग प्रतिपादन करणारे असे कांहीं तरी प्रमुख आणि प्रतिष्ठित ग्रंथ त्या विषयामध्यें मानलेले असतात. त्या विषयामध्यें जे पारंगत झालेले पंडित असतात, त्या सर्वांनीं ते आद्य आणि अभियुक्त ग्रंथ वाचलेले असतात, त्यांचा ते वारंवार उल्लेख करीत असतात, आणि त्यांना ते सदोदित पूज्य मानीत असतात. त्या विषयावर अवांतर अर्वाचीन ग्रंथ कितीही झालेले असले, तरी सिद्धांतग्रंथत्वाचा म्हणून जो कांहीं मान असतो, तो त्या मान्य ग्रंथांनाच देण्यांत येतो. त्या ग्रंथांतील वचनांचे आधार म्हणून दाखविण्यांत येतात, व त्यांतील आधार दाखविले गेले, म्हणजे प्रतिपक्षी ते कबूल करून गप्प बसतात. असले प्रमाणभूत आणि प्रमुख ग्रंथ ज्याप्रमाणें सर्व शास्त्रांमधून असतात. त्याप्रमाणें ते वेदांतशास्त्रामध्येंही आहेत. आणि वेदांतशास्त्र हें सर्व शास्त्रामध्यें प्रमुख असल्या कारणानें त्या वेदांतशास्त्रांतील जे प्रमुख ग्रंथ ते साहजिकपणेंच सर्व वाङ्मयांतील आणि सर्व विषयांतील प्रमुख ग्रंथांमधील प्रमुख ग्रंथ होत. असे हे वेदांत शास्त्रांतील प्रमुख आणि प्रशंसनीय ग्रंथ म्हटले म्हणजे मुख्यत्वेंकरून उपनिषदें, ब्रह्मसूत्रें, आणि भगवद्गीता हे होत. व ह्या तीन ग्रंथांच्या समुच्चयाला प्रस्थानत्रयी असें म्हणण्याचा परिपाठ आहे. या प्रस्थानत्रयीसंबंधानें असा एक प्रचार रूढ झालेला आहे कीं, आपल्यांतील आचार्य ही जी श्रेष्ठ पदवी ती प्राप्त करून घेण्याची ज्या कोणाला महत्त्वाकांक्षा असेल, त्यानें या प्रस्थानत्रयीवर भाष्यें लिहून त्यांतील तिन्ही ग्रंथांची एकवाक्यता करून दाखविली पाहिजे. ह्या तिन्ही ग्रंथांचा समन्वय आपआपल्या मताच्या सिद्धांतामध्यें होत आहे, असें सप्रमाण सिद्ध करून दाखविल्यामुळेंच आपल्या वेदांतामध्यें शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य आणि वल्लभाचार्य, असे हे

चार निरनिराळ्या पंथांचे प्रवर्तक ' आचार्य ' ह्या बहुमानाला पात्र झालेले आहेत. आपल्या वेदांतशास्त्राच्या प्राचीन पद्धतीप्रमाणें आणि परंपरेप्रमाणें ही सर्व व्यवस्था ठीक आहे. परंतु एकवाक्यता करून दाखविण्यासाठीं ज्या ह्या तीन ग्रंथांची निवड करून सांगड घालण्यांत आलेली आहे, त्यांच्यामध्यें एकवाक्यतेची स्वाभाविक बीजें कितपत आहेत, हा एक निरभिमानतेनें आणि न्यायानियमानुरोधानें निर्णय करण्यासारखा प्रश्न आहे. म्हणून तो प्रश्न आपल्यापुढें घेऊन त्याच्या विचाराकडे आपण वळूं.

उपनिषदें हा वेदाचा एक भाग आहे. वेदाच्या इतर मंत्रांतून ज्याप्रमाणें यज्ञयागादिक कर्मांचा वगैरे विचार प्रतिपादिलेला असतो, त्याप्रमाणें या उपनिषद्भागामध्यें नसून त्यांतून बहुधा ज्ञानकांडाचाच विचार केलेला आहे. परंतु उपनिषदांतील विषयांची मांडणी व्यवस्थित स्वरूपाची नाहीं. एका ठिकाणीं एक विषय सांगितलेला असला, तर त्याचा अवशिष्ट भाग दुसरीकडेच कोठें तरी सांगितलेला असतो. एकदा एखादी गोष्ट सांगितलेली असली, तरी फिरून तिची कारणावांचून पुनरावृत्ति करण्यांत येते. आणि कित्येक ठिकाणीं तर एकदां सांगितलेल्या मताच्या अगदीं विरुद्ध असें मत प्रतिपादन करण्यांत येतें. अशा प्रकारच्या संकीर्ण स्वरूपाच्या ग्रंथाची एकवाक्यता करून दाखविणें अत्यंत जरुरीचें होतें. एरवीं उपनिषदांसारख्या उत्कृष्ट ग्रंथाची उपयुक्तता आणि योग्यता अवगत झाली नसती. म्हणून सर्व उपनिषदांतील अनेक वाक्यांची एकवाक्यता सिद्ध करून दाखविण्यासाठीं ब्रम्हसूत्रें रचण्यांत आलीं. अशा प्रकारचा उपनिषदें आणि ब्रम्हसूत्रें यांच्यामधील संबंध असल्या कारणानें त्या दोघांच्यामध्यें विरोधपरिहारपूर्वक एकवाक्यता प्रस्थापित करून दाखविण्याची प्रतिज्ञा करणें हें सयुक्तिकपणाचें आहे.

परंतु भगवद्गीतेची गोष्ट तशी नाहीं. हें तर सुप्रसिद्धच आहे कीं, भगवद्गीता हा महाभारतांतील एक भाग आहे. आणि महाभारत हा कांहीं वेदांतशास्त्राच्या प्रतिपादनाचा एखादा ग्रंथ नसून तो मुख्यत्वेंकरून द्वापरांतीं घडलेल्या गोष्टींचा इतर इतिहासांप्रमाणें एक पौरुषेय इतिहास आहे. तेव्हां अर्थातच असल्या इतिहासाच्या ग्रंथामध्यें पौरुषेय व्यवहारा-

ऱ्याच गोष्टी यावयाच्या. तेव्हां एकीकडे असल्या पौरुषेय व्यवहाराच्या गोष्टी आणि दुसरीकडे उपनिषदांतील व ब्रह्मसूत्रांतील अपौरुषेय परमार्थाचे सिद्धांत यांच्या मध्यें वस्तुसिद्ध एकवाक्यता कशी असणार ? भगवद्गीतेमध्यें श्रीकृष्ण ही व्यक्त स्वरूपाची देवता ( Personal God ) आहे; आणि उपनिषन्मूलक ब्रह्मसूत्रांमध्यें तर अव्यक्त अशा ब्रह्माचें सर्व प्रतिपादन भरलेलें आहे. तेव्हां अशा या दोन स्वभावतः भिन्न कोटींतील ग्रंथांची स्वाभाविक एकवाक्यता कशी होणार ? यांना एकवाक्यतेच्या सूत्रांमध्यें ओवण्याची बळजबरी करण्याचा प्रयत्न केलेला पाहिला, म्हणजे 'श्वानं युवानं मघवानम्' ह्या चरणाची कोणालाही आठवण झाल्यावांचून राहणार नाहीं. एकवाक्यता करूनच दाखवावयाची म्हटलें, तर ती वाटेल त्यांची करून दाखवितां येईल. फार काय, तीन आणि सात ह्या दोन आंकड्यांचीही एकवाक्यता करून दाखवितां येईल! कारण, जहदजहल्लक्षणेनें तिहींतील दोहोंचें न्यूनत्व आणि सातांतील दोहोंचें अधिकत्व यांचा त्याग केला, म्हणजे झाली दोहोंमध्यें एकवाक्यता! परंतु ही स्वाभाविक एकवाक्यता नव्हे. एकवाक्यतेपासून चित्ताचें समाधान व्हावयाचें हें जें इष्ट कार्य तें असल्या कृत्रिम एकवाक्यतेपासून न होतां उलट मनामध्यें संशय आणि विषाद मात्र उत्पन्न होतात. ब्रह्मसूत्रें आणि भगवद्गीता दोन्ही मूळचीं एका पातळींतील नसल्याकारणानें यांची जेव्हां एकवाक्यता करून दाखविण्यांत येतें, तेव्हां ब्रह्मसूत्रांना आपल्या पातळीमधून खालीं उतरविण्यांत येत नसून भगवद्गीतेला वरच्या पातळीमध्यें नेण्यांत आलेलें असतें. वेदांतांतील 'तत्त्वमसि' हें प्रसिद्ध सिद्धांतवाक्य क्षणभर उपमेसाठीं घेऊन बोलावयाचें म्हटलें, तर ब्रह्मसूत्रें हीं तत्पदस्थानीय होत, आणि भगवद्गीता ही त्वंपदस्थानीय होय. सारांश; भगवद्गीतेवर चोहोंबाजूंनीं पसरलेलें जें व्यक्तस्वरूप देवतेचें आवरण तें बाजूला काढून ठेवून तिची ब्रह्मसूत्रांशीं एकवाक्यता केली आहे. पण हें जुळणार कसें ? भगवद्गीतेंतील व्यक्ताव्यक्त स्वरूपाचा देव ( Personal God ) असल्यामुळें त्या ग्रंथाची भाषा निराळी, विचारसरणी निराळी, आणि कांहीं कांहीं सिद्धांत सुद्धां थोडेसे निराळे! आणि असें असणें हें अगदीं स्वाभाविकही आहे. अशा ग्रंथाची एखाद्या अव्यक्त-तत्त्व-प्रतिपादनपर ग्रंथाशीं मारून

मुटकून एकवाक्यता करण्याचा प्रसंग आणिला म्हणजे तेथें शब्दांच्या ओढाताणी, अर्थांचे फेरबदल, लक्षणांचे सुळसुळाट, तात्पर्यांचे विपर्यास, इत्यादि प्रसंग हे यावयाचेच; आणि सरलतेच्या ऐवजीं वक्रता, व स्वाभाविकपणाच्या ऐवजीं कृत्रिमपणा हे गुण उत्पन्न व्हावयाचेच. पूर्वीच्या कित्येक विद्वान आणि समंजस अशा पंडितांच्या हातूनही भगवद्गीतेचा अर्थ करण्याच्या बाबतींत वर वर्णन केलेला प्रकार जर कोठें घडून आलेला असेल, तर भगवद्गीतेंतील सरळ शब्दांपासून उत्पन्न होणारा सरळ तात्पर्यार्थ त्यांना कळण्यासारखा नव्हता म्हणून नव्हे, तर या व्यक्तस्वरूपदेवताप्रतिपादित भगवद्गीतेचा अव्यक्तब्रह्म-प्रतिपादनपर वेदांतसूत्रांशीं मिळता होईल असा विशिष्ट प्रकारचाच तात्पर्यार्थ आपण काढला पाहिजे, अशा आग्रहानें ते आपल्याला बांधून घेत असल्यामुळें त्यांच्या अर्थांतील स्वाभाविकपण नाहींसा होऊन त्या अर्थांत खेचाखेची, धरपकड, जुलूम, जबरदस्ती इत्यादि प्रकार आढळून येतात. आणि याच्या उलट या प्रस्थानत्रयीच्या एकवाक्यतेच्या निर्बंधानें आपल्या अर्थाला नियंत्रित करून घेण्याची आवश्यकता ज्यांना नाहीं, त्यांच्या भगवद्गीतेच्या सरळ अर्थांचें वक्रीभवन होण्याचें कांहीं कारणच नाहीं. कां कीं, त्यांना दुसऱ्याच्या वातावरणांतून जावयाचेंच नाहीं. जेव्हां श्रीकृष्ण भगवद्गीता बोलले, तेव्हां त्यांच्या डोक्यांत हें खात्रीनें नव्हतें कीं, आपण येथें अर्जुनाला जें कांहीं सांगत आहों, तें भगवान् बादरायणांनीं ब्रम्हसूत्रांमध्यें जें प्रतिपादिलें आहे, किंवा ते त्यांत जें प्रतिपादित करणार आहेत, त्याच्याशीं अगदीं जुळतें असलें पाहिजे. मग बोलते वेळीं वक्त्याच्या मनामध्यें जो अभिप्राय असणें शक्य नाहीं, तो त्याच्यावर बळजबरीनें लादण्यापासून खरें स्वारस्य कसें उत्पन्न होणार ? जीवात्मा आणि परमात्मा हे एकच आहेत, जीव हा कधीं मरत नाहीं, ज्ञानानें त्याला मुक्ति प्राप्त होते, इत्यादि जे वेदांतशास्त्रांतील सामान्य आणि सर्वमान्य सिद्धांत आहेत, त्यांच्या विरुद्ध श्रीकृष्णांनीं भगवद्गीतेमध्यें कांहीं प्रतिपादन केलें नाहीं, हें खरें आहे; व तेवढ्यापुरती एकवाक्यता निर्विवाद आहे, हेंही खरें आहे; तरी पण बाकीचीं जीं भगवद्गीतेमध्यें भिन्नतेचीं अनेक स्थळें आहेत, त्यांच्यावर समन्वयाचें साम्राज्य दडपून देण्यांत काय हंशील आहे ?

आपल्या वेळीं जे कांहीं सर्वमान्य ग्रंथ प्रचलित असतील, ते आपल्या बाजूचेच आहेत व त्यांचीं मतें आपल्यासारखींच आहेत, असें दाखविण्याच्या इराद्यानें प्रथमतः ही एकवाक्यतेची कल्पना प्रचारांत आली असावी, असें दिसतें. परंतु या कल्पनेच्या परिपूर्ततेसाठीं शद्बांचे स्वाभाविक अर्थ आणि वक्तयांचे मूळचे अभिप्राय बदलले गेले, तर मग त्यांत गोडी काय राहिली? ज्यांच्या आधारावर ब्रम्हसूत्रें रचलेलीं आहेत, तीं उपनिषदें आणि भगवद्गीता हीं वस्तुतः पाहिलें असतां त्या दोघांतील भाषा, कल्पना, वगैरेंच्या, तुलनेवरील अगदीं भिन्न भिन्न काळांतलि आहेत, हें उघड आहे. आणि कालगतीच्या मानानें मतांमध्येंही बदल होत जातो. ही गोष्टही अगदीं निर्विवाद आहे. आपल्या हिंदुधर्मांतलि वेदग्रंथांच्या नित्यत्वाविषयींची आणि अपौरुषेयत्वाविषयींची रूढ व आवश्यक कल्पना क्षणभर बाजूला ठेवून ऐतिहासिक आणि चिकित्सक बुद्धीनें बोलावयाचे झालें, तर कांहीं:पाश्चात्यांच्या मताप्रमाणें वेदांपैकीं संहितेचा भाग आधीं झाला, नंतर ब्राह्मणग्रंथ झाले. व त्यांच्या पाठीमागून आरण्यकें आणि उपनिषदें अस्तित्वांत आलीं. आणि त्यांच्या नंतरच्या कालांत सूत्रग्रंथ, स्मृतिग्रंथ इतिहासपुराणें वगैरे निर्माण झालीं.निरनिराळ्या प्रकारच्या ग्रंथसमूहांच्या रचनेच्या काळांच्या दरम्यान कदाचित् शेंकडो, आणि क्वचित् हाजारोंही, वर्षें लोटलेलीं असण्याचा संभव आहे. आणि हीं जीं अनेक वर्षें मध्यंतरी जात असत. तीं फुकट जात नसत. तीं आपआपल्या वेळच्या मतांवर कांहीं तरी परिणाम घडवीत असत. आणि बदललेले सिद्धांत पुढील पिढीच्या हवालीं करीत असत, त्यामुळें हे जे वर दिलेले निरनिराळे कालविभाग आहेत, त्यांतून देवता व त्यांची स्तुति, यज्ञ व त्यांचीं फलें, ज्ञान व त्याचे मार्ग, इत्यादिकांच्या बाबतींत फार फरक होत गेलेले आहेत. एका काळांत ज्या इंद्रवरुणादिक देवता प्रमुख होत्या. त्या कालांतरानें मागें पडल्या; एकदा अग्निष्टोम,ज्योतिष्टोम इत्यादि यज्ञयागादिकांचें जें स्तोम माजलें होतें, तें कांहीं काळानें पार नाहींसें होऊन यज्ञांत जी हिंसा सांगितली होती तीच करणें बरोबर नाहीं असें एक मत निघालें, आणि यज्ञादिकांपासून मिळावयाचें मुख्य फल जो स्वर्ग तोच खुद्द अनित्यपणाच्या हल्लयांनीं डळमळूं लागला! व देवतांची स्तुति

आणि यज्ञांची विधानें इत्यादिकांची जी जागा ज्ञानानें एकदा पटकाविली होती, ती जागा त्या ज्ञानालासुद्धां भक्तीच्या माऱ्यापुढें कधीं कधीं सोडावी लागलेली आहे. अशी स्थित्यंतरें आणि मतांतरे ढळढळीत होत गेलेलीं आढळून येत असतां, त्या सर्व कालविभागांतील ग्रंथांमधून एकच मत प्रतिपादिलें गेलेलें आहे, असें प्रतिपादन करणें हें केव्हांही सयुक्तिक होणार नाहीं. या वर दिलेल्या कालविभागापैकीं उपनिषदें हीं एका कालविभागामध्यें पडतात, आणि भगवद्गीता ही त्याहून भिन्न अशा एका कालविभागामध्यें पडते. भगवद्गीतेला जरी " इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायाम् " इत्यादि ठिकाणीं उपनिषद् असें म्हटलेलें असलें, तरी हें म्हणणें अगदीं अर्वाचीन काळांतील कोणाचें तरी असलें पाहिजे. खुद्द श्रीमद्व्यासांनीं सरसकट सगळ्या महाभारताबरोबर लिहिलेल्या एवढ्याच ह्या गीतेच्या अठरा अध्यायांच्या शेवटीं तेवढें " भगवद्गीतासूपनिषत्सु " असें लिहिलें असेल, असें संभवत नाहीं. व खुद्द शंकराचार्यही आपल्या शारीरभाष्यांत श्रुतींचे आधार दाखविणाऱ्या सूत्रांच्या प्रवचनामध्यें इतर उपनिषदांचे आधार दाखवून झाल्यानंतर ' स्मृतेश्च, ' अपि च स्मर्यते, ' इत्यादि सूत्रांवरील विवेचनामध्यें भगवद्गीतेंतील श्लोकांचे स्मृतींतील म्हणून आधार देतात. शिवाय उपनिषदांची भाषा आणि विचारपद्धति व भगवद्गीतेची भाषा आणि विचारपद्धति यांच्यामध्यें जी भिन्नता आहे, ती तर अगदींच स्पष्ट आहे. तेव्हां उपनिषदें ज्या कालमर्यादेंत निर्माण झालीं, त्याहून भिन्न अशा कालमर्यादेमध्यें भगवद्गीता निर्माण झाली असली पाहिजे, हें उघड आहे. आणि या भिन्न भिन्न कालमर्यादांमधून जर भिन्न भिन्न मतांतरें उत्पन्न होतात असें आपणाला ऐतिहासिक परीक्षणावरून दिसतें, तर मग एका काळांतील उपनिषदांवरून रचिलेल्या ब्रह्मसूत्रांशीं भिन्न काळांतील भगवद्गीतेची एकवाक्यता करण्याचा प्रयत्न करण्यांत आला, तर तो सर्वांशीं सफल होण्याची कधीं तरी आशा आहे काय !

शिवाय एका बाजूला उपनिषदें आणि ब्रह्मसूत्रें व दुसऱ्या बाजूला भगवद्गीता यांच्या एकवाक्यतेच्या वाटेमध्यें दुसरी एक—म्हणजे एका नवीन कल्पनेची—अडचण आहे. ती कल्पना म्हटली म्हणजे अवताराची

कल्पना होय. भगवान् श्रीकृष्ण हा परमात्म्याचा या पृथ्वीवर पूर्णांशानें झालेला अवतार होय, ही कल्पना सर्व महाभारतामध्यें आणि त्यामुळें भगवद्गीतेमध्येंही प्रधान आहे. परंतु ही अवताराची कल्पना उपनिषद्भागामध्यें कोठेंही आपलें अस्तित्व प्रस्थापित करीत असलेली आढळून येत नाहीं. वेदामध्यें द्यावापृथिवी, पूषन्, उषस्, अग्नि, वायु, वरुण, इत्यादि ज्या देवता वर्णिलेल्या आहेत, त्या केवळ या सृष्टींतील भिन्न भिन्न शक्ति होत. त्यांच्यांत सशरीर अवताराची कल्पना नाहीं. व ह्या निसर्गाच्या जड शक्तींना चालना देणारी कोणी तरी एक मध्यवर्ती चिच्छक्ति असली पाहिजे, ही मंत्रभागाच्या पुढच्या पायरीवरची कल्पना घेऊन उपनिषद्भाग चैतन्यरूप परब्रह्माच्या प्रतिपादनाला प्रवृत्त झालेला आहे. तें परब्रह्म—जें सर्व विश्वभर व्यापलेलें आहे—तें परब्रह्म आपल्या सर्व शक्तींसहवर्तमान एका कोणत्या तरी मनुष्यदेहामध्यें आविष्ट आणि अवतीर्ण झालेलें आहे, असें प्रतिपादन करण्या इतक्या परिपक्वतेला कल्पनेची वाढ अद्यापि उपनिषदत्कालापर्यंत आलेली दिसत नाहीं. रुक्ष आणि केवळ तत्त्वविवेचनात्मक अशा त्या कालामध्यें परब्रह्म निर्गुण आणि निराकारच राहिलें, तर त्यांत कांहीं मोठें आश्चर्य नाहीं. त्याला सगुणत्व आणि साकारत्व देण्याला काव्यमय कल्पनेच्या कालाचीच अपेक्षा होती. ती अपेक्षा नीरस उपनिषदांनंतरच्या रसात्मक आणि काव्यमय अशा कालमर्यादेंत परिपूर्णतेला जाऊन अनेक अंशावतारांच्या नंतर भगवंताच्या पूर्णांश अवताराची कल्पना प्रथम कल्पनाशक्तीच्या कक्षेंत आणि नंतर काव्येतिहासांच्या कवनांत अवतीर्ण झाली. अव्यक्त परब्रह्मानें निखिल वस्तुजाताला नामरूप देऊन त्याचें व्याकरण केलें खरें; परंतु खुद्द त्या परब्रह्मालाच जेव्हां नामरूप देण्याची वेळ आली, तेव्हां कवि आणि भक्त यांच्याशिवाय हें कृत्य करण्याला दुसरें कोण समर्थ असणार ? असा ह्या अवतारकल्पनेचा इतिहास आहे. तेव्हां ही अवताराची, म्हणजे व्यक्तस्वरूपाच्या देवा ( Personal God ) ची कल्पना उपनिषदांमध्यें नसल्यामुळें आणि भगवद्गीतेमध्यें असल्यामुळें या दोन्ही ग्रंथांतून प्रतिपादिलेल्या मतांमध्यें आणि मार्गांमध्यें साहजिकपणें पुष्कळ अंतर पडलेलें आहे. तेव्हां असल्या ग्रंथांची कदाचित् एकवाक्यता कोणी करून दाखविली, तरी त्यांत काय अर्थ आहे ?

उपनिषदें आणि ब्रह्मसूत्रें यांच्यामधील परब्रह्म अव्यक्त स्वरूपाचें आणि भगवद्गीतेंतील परब्रह्म व्यक्त स्वरूपाचें असा मूळांत फरक असल्यामुळें पुढें या दोन्ही बाजूंच्या सिद्धांतांमध्येंही फार मोठा फरक पडलेला आहे. उपनिषदांवरून रचलेलीं जीं ब्रह्मसूत्रें त्यांच्यावरील भाष्यामध्यें शंकराचार्यांनीं परिणामवाद आणि विवर्तवाद असे दोन वाद सांगितलेले आहेत. यांपैकीं परिणामवाद म्हणजे नैयायिकांचा कार्यकारणसंबंधवाद होय. कारणावांचून कार्य नाहीं; कांहीं कार्य उत्पन्न झालें असेल, तर त्याला कांहीं तरी कारण असलेंच पाहिजे; अशा प्रकारचा जो सार्वत्रिक सिद्धांत त्यालाच वेदांतशास्त्रामध्येंहि प्रथमतः प्रमुखत्व देण्यांत आलेलें आहे. यालाच पर्यायानें कर्म असेंही म्हणण्यांत येतें. कर्म कोणाला चुकलें नाहीं, भोगावांचून कर्माचा क्षय नाहीं, अशा प्रकारच्या या सर्वसामान्य लौकिक वचनांच्या मूळाशीं देखील या कार्यकारणभावाच्या सिद्धांताच्या छायेशिवाय दुसरें कांहीं नाहीं. या सृष्टीमध्यें सर्वांना त्यांचीं त्यांचीं कर्में लावून देण्यांत आलेलीं आहेत. आणि त्या त्या कर्मांप्रमाणें ही पंचभूतात्मक सृष्टि चाललेली आहे. अग्नीचें जाळण्याचें कर्म आहे, आणि पाण्याचें आर्द्र करण्याचें आहे. हीं कर्में तीं सदोदित करीत रहाणार. कांहीं केल्यानें त्यांच्या या धर्मांमध्यें फरक पडावयाचा नाहीं. स्त्रियांमध्यें कामजनकत्व, शत्रूमध्यें क्रोधजनकत्व, द्रव्यामध्यें लोभजनकत्व, अशा प्रकारचे जे अनेक धर्म आढळून येतात, तेही वरच्याच सारखे होत. यांच्या शक्ति कधीं बदलावयाच्या नाहींत. असल्या या कर्मांच्या—आणि कर्मानें आणि कार्यकारणभावानें निगडित होऊन बसलेल्या—परिस्थितीमध्यें मनुष्य येऊन पडला, तर त्याची या भवचक्रांतून सुटका व्हावयाची कशी, असा प्रश्न वेदांतशास्त्रांतील तत्त्ववेत्त्यांच्या पुढें परिणामवादाच्या अंगीकारामुळें येऊन उभा रहातो. या प्रश्नाचें समाधान आपलेकडील वेदांतशास्त्रवेत्त्यांनीं विवर्तवादाचा आश्रय करून केलेलें आहे. " परिणामवादाच्या नियमांप्रमाणें—कार्यकारणभावाच्या मुशीमधून—कर्मांचे कायदे पाळीत—आणि आपआपलें गुणधर्म अढळ रीतीनें संभाळीत——जें हें जग प्रवृत्त झालेलें आहे, त्याच्याशीं तूं आपला संबंधच तोडून टाक; तुला त्याच्याशीं करावयाचें आहे काय! तें जग आहे मुळीं मिथ्या; तें मुळीं उत्पन्नच झालेलें

नाहीं. हें जें दिसतें आहे तो सगळा भ्रम आहे; रज्जूवर भासणारा सर्प, शिंपीवर भासणारें रजत किंवा वाळवंटावर भासणारें मृगजल, हीं जशीं खोटीं, त्याचप्रमाणें ब्रह्मावर आभासमान होणारें हें सर्व जग केवळ मायारूप होय." अशा प्रकारच्या विवर्तवादाचें प्रतिपादन करून हें जग मिथ्या आहे आणि ब्रह्म तेवढें सत्य आहे, असें ज्ञान झालें म्हणजे मोक्ष प्राप्त होतो—असा वेदांतशास्त्रानें सिद्धांत बांधला आहे. परिणामवादाप्रमाणें जगाचें रहाटगाडगें चाललें आहे, आणि त्या जगाला विवर्तवादाप्रमाणें तुच्छ मानल्याशिवाय त्याच्या परिभ्रमणामधून आपली सुटका नाहीं, अशी वेदांतशास्त्राची सामान्यतः मांडणी आहे.

अशा मांडणीमध्यें भक्तीला अवसर कोठें मिळणार! येथें कोणाची भक्ति करावयाची आणि त्या भक्तीला ऐकणार कोण! पंचभूतांना त्यांची शक्ति देऊन एकदां हें जग निर्माण करून ब्रह्म जें स्वस्थ बसलें आहे, तें ह्या सृष्टिरचनेंत बिलकुल ढवळाढवळ करूं इच्छीत नाहीं. त्यानें एकदा कर्माचा कायदा घालून दिलेला आहे; व जसें कर्म असेल तसें फळ मिळेल, असें कायमचें ठरवून टाकलें आहे. आपलें कर्म आणि पंचमहाभूतांचे धर्म यांच्यामध्यें जर कधीं बदल व्हावयाचा नाहीं, हें ठरलेलें आहे, तर मग भक्ति, कृपा, इत्यादिकांना या निष्ठुर आणि न बदलणाऱ्या जगामध्यें काय अवकाश? तूं माझ्या हाताचा दाह करूं नको, अशी अग्नीची शंभर वर्षें भक्ति करून त्याची विनवणी केली, तरी निखाऱ्यावर ठेवलेल्या हाताला चटका बसावयाचा कधीं तरी थांबणार आहे काय? समुद्राची अतिशय भक्ति केली आणि तूं मला बुडवूं नको अशी दीन वाणीनें आणि सद्गदित अंतःकरणानें अष्टभावयुक्त होऊन त्याची करुणा भाकली, तरी समुद्रांत पडलेल्या न पोहतां येणाऱ्या मनुष्याला कोणता तरी समुद्र वर तरंगून धरील काय? हीच स्थिति प्रत्येक बाबतींत आहे. एका भक्तानें हांक मारली म्हणजे इकडे जा, आणि दुसऱ्या भक्तानें हांक मारली म्हणजे तिकडे जा, किंवा एका भक्ताच्या खुषामतीकरितां एक नियम मोड व दुसऱ्या भक्ताच्या खुषामतीकरितां दुसरा नियम मोड; अशा प्रकारची अनवस्था उत्पन्न करून सोडण्याला ब्रह्म बिलकुल तयार नाहीं. सारांश, भक्तीचा सिद्धांत आणि कर्माचा सिद्धांत हे अगदीं परस्परविरुद्ध आहेत; या दोन्ही तत्त्वांच्या

धोरणानें हें जग कधींही चालूं शकणार नाहीं. भक्तीच्या तत्त्वाचा अंगीकार केला, तर कर्माच्या नियमाला रजाच दिली पाहिजे. कर्माचा कडक अंमल आणि त्यांत भक्तीच्या पक्षपाताची मध्येंच ढवळाढवल यांच्या योगानें कोणतेंही साम्राज्य सुरळीत चालावयाचें नाहीं. अशी स्थिति असल्यामुळें तर्कशास्त्राच्या आणि तत्त्वविवेचनाच्या कसोटीला उतरणारा जो केवळ कर्माचा सिद्धांत तोच वेदांतशास्त्रामध्यें स्वीकारण्यांत आलेला आहे.

परंतु उपनिषदें आणि ब्रह्मसूत्रें यांच्यामधील ही स्थिति भगवद्गीतेमध्यें अगदीं बदलून गेली. येथें ( Personal God ) म्हणजे व्यक्तस्वरूपाचा देव अवतीर्ण झाल्याबरोबर त्याच्याचबरोबर ही भक्तीची कल्पना उत्पन्न होऊं लागली. अवतारावस्थेमध्यें देव भक्ताला सांगूं लागला कीं, तूं माझी भक्ति कर, म्हणजे मी तुला सर्व संकटांपासून आणि पातकांपासून मुक्त करीन, आणि भक्तालाही तें खरें वाटूं लागलें. व त्याच्या योगानें कर्माच्या कडकपणाची कल्पना शिथिल होऊन भक्तीच्या वशिल्याची कल्पना बळावत चालली. जे सृष्टनियम अभेद्य असे वाटत होते आणि जे पंचभूतांचे गुणधर्म त्रिकालाबाधित म्हणून गणले जात होते, ते देवाच्या मध्यस्थीनें आणि रदबदलीनें पालटले जातील, अशी अशास्त्रीय कल्पना कमकुवत लोकांच्या मनांत प्रकट झाली. कर्माच्या कल्पनेनें मनुष्याच्या मनामध्यें एक प्रकारचा धीटपणा आणि बेफिकीरपणा उत्पन्न होतो. कर्मानुसार जें कांहीं व्हावयाचें असेल तें जर चुकत नाहीं, तर मग मी सत्य आणि उचित अशा मार्गापासून च्युत कां होऊं, अशा विचारसरणीनें मनुष्याच्या दृढ निश्चयामध्यें पर्वतासारखा अढळपणा आलेला असतो. परंतु कर्माच्या कल्पनेपासून उत्पन्न होणारी ही तेजस्विता भक्तीच्या अमलांत पार मावळून जाते. भक्तीच्या तोंडपुजेपणानें खुष होऊन जाऊन, चित्रगुप्ताच्या कचेरींत आपली स्वतःची भिड खर्च करून व दुसऱ्या अनंत प्राण्यांचीं हिताहितें बाजूला सारून माझे तेवढे आपलपोटेपणाचे हेतु देव खात्रीनें परिपूर्ण करील, अशा भ्रामक आशेच्या जाळ्यामध्यें गुरफटून गेलेला मनुष्य अगदीं पंगु होऊन जातो. असा जरी कर्म आणि भक्ति या मार्गांत मोठा फरक आहे, तरीही अवताराच्या कल्पनेबरोबर भक्तीची कल्पना प्रबळ होणें हें अगदीं अपरिहार्य होतें. आणि तशी

ती भगवद्गीतेमध्यें प्रबळ झालेलीही आहे. भगवद्गीतेंत कर्माच्या सिद्धांताचें प्रतिपादन नाहीं असें नाहीं, परंतु त्याच्या बरोबरीनेंच भक्तीचेंही महत्त्व वर्णिलेलें आहे. आणि पुढील भक्तिमार्गाच्या ग्रंथांतून तर भक्तीचें स्तोम फारच पराकाष्ठेला गेलेलें आहे. व अखेरीस या उपक्रमाचा असा उपसंहार झालेला आहे कीं, कर्मकल्पनामूलक वेदांतशास्त्राच्या प्रस्थानत्रयीमध्यें भगवद्गीतेची जी गणना करण्यांत येत होती, ती बदलली जाऊन भक्तितत्त्वमूलक जो भक्तिमार्ग त्या मार्गाच्या प्रस्थानत्रयीमध्यें भागवत, गीता आणि ज्ञानेश्वरी अशा स्वरूपानें भगवद्गीतेची गणना होऊं लागलेली आहे. यावरून भगवद्गीतेमध्यें भक्तितत्त्वाला किती प्राधान्य आहे हें कोणाच्याही सहज लक्षांत येईल. अस्तु. अशा रीतीनें कर्म आणि भक्ति या दोन तत्त्वांमध्यें किती भिन्नता आहे आणि त्यांपैकीं वेदांतसूत्रांत कर्माला कसें प्राधान्य दिलेलें आहे, आणि भगवद्गीतेमध्यें भक्तीची महती कशी वर्णिली आहे, याचें येथवर दिग्दर्शन करण्यांत आलेलें आहे. त्यावरून सुद्धां हें कोणाच्याही लक्षांत येण्यासारखें आहे कीं, ब्रह्मसूत्रांतील कर्मवाद आणि गीतेंतील भक्तिमार्ग या उभयतांच्या सिद्धान्तांमध्यें पुष्कळ विरोध असल्यामुळें त्यांची अन्योन्य एकवाक्यता करण्याचा प्रयत्न समाधानकारक रीतीनें सफळ होणें शक्य नाहीं.

येथपर्यंत वर भक्तीचें जें स्वरूपविवेचन करण्यांत आलें, तें केवळ 'कर्मवाद विरुद्ध भक्तिवाद,' या सबबाला अनुसरून होय. परंतु स्वतंत्र रीतीनें पाहिलें असतां भक्तिवाद हा एक अत्युत्तम मार्ग आहे. हा आचरणाला सोपा असून मानसिक परिणामाच्या दृष्टीनें त्याचा उपयोग फार मोठा आहे. आणि स्त्री, शूद्र, इत्यादिकांना तर तो फारच उपयोगी आहे, हें भगवद्गीतेंतील—

" स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यांति परां गतिम् । "

या वचनावरून स्पष्ट होत आहे. आणि प्रस्थानत्रयीच्या एकवाक्यतेच्या विरुद्ध पौरुषेयत्वभेद, कालभेद, कल्पनाभेद, सिद्धांतभेद, इत्यादि वर जीं अनेक कारणें दाखविण्यांत आलेलीं आहेत, त्यांच्याबरोबर आणखी हेंही एक अधिकारभेदाचें कारण दाखवितां येण्यासारखें आहे. तें असें कीं, प्रस्थानत्रयीपैकीं उपनिषदें आणि वेदांतसूत्रें यांनीं प्रतिपा-

दिलेला जो धर्म तो वैदिक असल्या कारणानें स्त्रीशूद्रादिकांना मुळीं त्यामध्यें अधिकारच पोंचत नाहीं. परंतु भगवद्गीतेंतील धर्माचा दरवाजा पाहिजे त्याला उघडा ठेवण्यांत आलेला आहे. व ही गोष्ट शंकराचार्यांच्या शारीर-भाष्यामध्येंही (अध्याय १ पाद ३ अधिकरण १०) स्पष्टपणें सांगण्यांत आलेली आहे. यावरूनही या दोन मार्गांमध्यें किती अंतर आहे, हें दिसून येतें. तेव्हां या कारणासाठींही त्या दोहोंमध्यें एकवाक्यता करून दाखविण्याचा प्रयत्न करणें बरोबर नाहीं.

पूर्वीं सांगितलेले परिणामवाद आणि विवर्तवाद व हा भक्तिवाद यांची तुलना करून पाहिली असतां असें दिसून येतें कीं, परिणामवाद हा ( Objective ) आहे, आणि विवर्तवाद व भक्तिवाद हे ( Subjective ) आहेत. जड आणि चेतन असे जे या सृष्टिरचनेमध्यें दोन विभाग दिसतात, त्यांपैकीं परिणामवाद हा जड सृष्टीला अनुलक्षून आहे; व विवर्तवाद आणि भक्तिवाद हे त्या सृष्टींतील चैतन्यधर्माला अनुलक्षून आहेत. कारणापासून कार्य उत्पन्न होत जावें असा नियम एकदां या जड सृष्टीला जो घालून दिला आहे, त्याप्रमाणें हें रहाटगाडगें चाललेलें आहे. कर्मरूपी कारण घडलें कीं, फलरूपी त्याचें कार्य ही जडसृष्टि आपल्याला दिल्यावांचून रहावयाची नाहीं. हा जो कार्यकारणभावाचा अखंड संबंध त्याचें खंडन कसें करावयाचें या प्रश्नाचा उलगडा वैराग्य व विवर्तवाद यांच्या साहाय्यानें होतो. हें सर्व जग नश्वर आहे, तेव्हां याच्यामधील वस्तुजातावर आसक्ति ठेवण्यांत कांहीं अर्थ नाहीं, अशी मनुष्यप्राणी आपल्या मनाची समजूत करून घेतो; व एखादे वेळीं तर त्याची अशी दृढ भावना होऊन जाते कीं, हें जग नश्वर आहे इतकेंच नव्हे, तर तें मुळीं उत्पन्नच झालेलें नसून तें उत्पन्न झालेलें असल्यासारखें जें दिसतें, तो केवळ अज्ञानमूलक आभास आहे. तेव्हां अशा प्रकारचें ह्या अज्ञानाचें यथार्थ ज्ञान झालें, म्हणजे केवळ आभासमान परंतु वस्तुतः अविद्यमान अशा या भवचक्रापासून आपण मुक्त होऊं शकूंच, अशा निश्चयाला तर्कशास्त्राच्या नियमांनीं तो बरोबर येऊन पोंचतो. या विचारसरणीमध्यें तो दुसऱ्या कोणावर अवलंबून रहात नाही. परंतु भक्तिमार्गामध्यें त्याची विचारसरणी याच्याहून कांहींशी भिन्न असते. विवर्तवादमूलक ‘ ज्ञानान्मोक्षः ’ हा मार्ग

व भक्तिमार्ग हे दोन्हीही ( Subjective ) असून आपल्या मनोधर्मावर अवलंबून आहेत हें खरें. परतु पहिल्या मार्गांतल्यापेक्षां दुसऱ्या भक्तिमार्गाच्यां वेळीं मनाची अंतःस्थिति आणि विचारसरणी बदलेली असते. भक्तिवश झालेलें मन असें म्हणतें कीं, तुमचा परिणामवाद आणि कर्मवाद नेमगर्दी खरा असेल; जगामधील कोणतेही पदार्थ आपले गुणधर्म सोडण्याला तयार नसतील; आणि कर्माबद्दल फळ भोगलेंच पाहिजे, हेंही खरें असेल; परंतु जडसृष्टीसंबंधानें हें सर्व जरी खरें असलें, तरी या जड सृष्टीला ज्यानें हे नियम घालून दिले, तो चैतन्ययुक्त आणि चैतन्यस्वरूप परमेश्वर ते बदलूं शकणार नाहीं काय ? एखादा राजा आपल्या प्रजेच्या नियंत्रणासाठीं आपल्या अधिकाऱ्यांच्या हातांत कांहीं कायदे करून देतो. हे कायदे सहसा बदलावयाचे नसतात, हें खरें. परंतु त्या राजाच्या मनाला वाटलें, तर तो प्रसंगविशेषीं ते कायदे बदलूं शकणार नाहीं, असें का आहे ! त्याप्रमाणेंच परमेश्वराची गोष्ट असली पाहिजे. आतां कोणी असें विचारील कीं, परमेश्वरानें स्वतःच घालून दिलेले कायदे तो बदलूं शकेल, हें जरी खरें असलें, तरी असें करण्याला त्याला कारण काय ? याला उत्तर एवढेंच कीं, भक्तीनें संतुष्ट झालेला परमेश्वर तसें करतो. याशिवाय याला दुसरें कारण कांहीं नाहीं. कारणाची अपेक्षा असणें हें कर्मवादाचें व कार्यकारणभावाचें लक्षण होय. कर्मवादांत कारण पाहिजे. परंतु भक्तीशिवाय अन्य कारणांचा अभाव हेंच भक्तिमार्गाचें मुख्य स्वरूप होय. कारणांपासून कार्यें घडवून आणावयाचीं, अशीच जर अपेक्षा असती, तर मग कर्मवाद होताच, मग या दुसऱ्या भक्तिमार्गाचें अवलंबन करण्यांत विशेष काय होता ? सारांश, एका कारणापासून दुसरें कार्य, त्यापासून तिसरें कार्य, किंवा एका कर्मापासून दुसरें फळ, त्यापासून तिसरें फळ, ही जी कंटाळवाणी व कधींही न संपणारी लांबच लांब दोरी, ती एकदम मधेंच कातरून टाकणारी भक्ति ही सौम्य आणि सुंदर अशी एक कातरी आहे.

शिवाय दुसरें एक अनुमानही करतां येण्यासारखें आहे. तें असें कीं, आपण प्रत्येक मनुष्य कांहीं निश्चय आणि नियम करितों. परंतु त्यांत फेरफार करण्याविषयीं कोणी विनवणी केली असतां, आपल्या मनाला दया उत्पन्न होते, व आपण केलेला नियम बदलतों. हा आपल्या-

मधील दयेचा धर्म आपल्यांत आला कोठून ! मूळ कारणामध्यें जर तो नसेल, तर तो कार्यामध्यें कोठून उत्पन्न होईल? याकरितां भक्ति-वशतेचा धर्म मूळ परमेश्वरामध्यें असला पाहिजे, अशी अनुमिति काढण्याला कांहीं हरकत नाहीं. अशी अनेक प्रमाणांवरून या सृष्टीच्या एकंदर व्यवस्थेमध्यें भक्तीलाही कोठें तरी जागा असली पाहिजे, असें दिसतें.

अशा रीतीनें भवबंध तोडून मुक्ति देणारीं ज्ञान आणि भक्ति हीं जीं दोन साधनें येथपर्यंत वर्णिलेलीं आहेत, त्यांची एकमेकांशीं तुलना करून पाहतां असें दिसतें कीं, ज्ञानमार्गांत ब्रह्माच्या अव्यक्तरूपाची कल्पना प्रधान असते, आणि भक्तिमार्गांत तें ब्रह्म व्यक्तस्वरूप झालेलें आहे, अशी ( Personal God ) ची कल्पना प्रधान असते. त्यामुळें स्वाभाविकपणेंच ज्ञानमार्ग अद्वैती राहतो, आणि भक्तिमार्ग द्वैती होतो. ज्ञानमार्ग हा उद्योगवादासारखा आहे. आणि भक्तिमार्गाचें दैववादाशीं साम्य आहे. ज्ञानमार्गांतील मोक्षाच्या प्रक्रियेच्या पायऱ्या अशा कीं, मनुष्यप्राणी प्रथमतः नित्यानित्यवस्तुविवेकाच्या योगानें सुखोपभोगाविषयीं विरक्त होतो; नंतर शमदमादि संपत्तीच्या योगानें त्याचें मन निर्मळ होऊन त्या मनावर ' तत्त्वमसि ' 'अहं ब्रह्मास्मि' या वेदांततत्त्वांचा संस्कार होतो; पुढें श्रवण, मनन व निदिध्यासन, यांच्या योगानें या महावाक्याच्या भावार्थाला मनामध्यें दार्ढ्य येऊन 'मीच ब्रह्म आहें' असें ज्ञान झालें, म्हणजे त्या ज्ञानापासून तो मुक्त होतो. आतां भक्तिमार्गद्वारें प्राप्त होणाऱ्या मोक्षाची उपपत्ति कशी असते तें आपण पाहूं. श्रीमद्भागवतामध्यें आरंभींच याचें वर्णन फार सुंदर रीतीनें केलेलें आहे. तें असें:—

शुश्रूषोः श्रद्दधानस्य वासुदेवकथारुचिः ।
स्यान्महत्सेवया विप्राः पुण्यतीर्थनिषेवणात् ॥ १६ ॥
शृण्वतां स्वकथां कृष्णः पुण्यश्रवणकीर्तनः ।
हृद्यन्तःस्थो ह्यभद्राणि विधुनोति सुहृत्सताम् ॥ १७ ॥
नष्टप्रायेष्वभद्रेषु नित्यं भागवतसेवया ।
भगवत्युत्तमश्लोके भक्तिर्भवति नैष्ठिकी ॥ १८ ॥
तदा रजस्तमोभावाः कामलोभादयश्च ये ।
चेत एतैरनाविद्धं स्थितं सत्त्वे प्रसीदति ॥ १९ ॥

एवं प्रसन्नमनसो भगवद्भक्तियोगतः ।
भगवत्तत्त्वविज्ञानं मुक्तसंगस्य जायते ॥ २० ॥
भिद्यते हृदयग्रंथिश्छिद्यन्ते सर्वसंशयाः ।
क्षीयन्ते चास्य कर्माणि दृष्ट एवात्मनीश्वरे ॥ २१ ॥

स्कंध १, अध्याय २.

सारांश, ज्ञानाच्या मार्गानें जा, किंवा भक्तीच्या मार्गानें जा, मनुष्य कोणत्याही मार्गानें गेला, तरी तो अखेरीस मुक्तीच्या मुक्कामाला जाऊन पोहोंचतो. 'ज्ञानान्मोक्षः' या मार्गाचें प्रतिपादन करीत असतां त्या मार्गातील अगदीं शेवटची अशी जी जीवन्मुक्त स्थिति तिच्या स्वरूपाच्या दिग्दर्शनाच्या प्रसंगीं शंकराचार्यांनीं मुंडकोपनिषदांतील 'भिद्यते हृदयग्रंथिः' हा जो श्लोक दिलेला आहे, तोच श्लोक भागवतांतील वरील उताऱ्यामध्यें भक्तिमार्गाच्या अंतिम स्थितीसंबंधानें दिलेला आहे. त्यावरून ज्ञानानें किंवा भक्तीनें मुक्ति हें एकच फल सारखेंच प्राप्त होतें, हें उघड आहे. इतकें ज्ञानाच्या बरोबरीचें भक्तीचें महत्त्व ब्रह्मसूत्रांमध्यें बिलकुल वर्णिलेलें नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्यामध्यें भक्तीचें नांवही नाहीं. उपनिषदांतून ज्या कांहीं उपासना सांगितलेल्या आहेत, त्यांचें विवेचन ब्रह्मसूत्रांच्या तिसऱ्या अध्यायांत केलेलें आहे. परंतु त्या उपासना आणि अर्वाचीन काळांतील ही भक्ति यांच्यामध्यें फारच थोडें साम्य आहे. ही भक्ति जशी भगवद्गीतेंत सांगितलेली आहे आणि बादरायणाच्या वेदांतसूत्रांत सांगितलेली नाहीं, तशीच स्थिति कपिलांच्या सांख्यसूत्रासंबंधानेंही झालेली असल्याचें आढळून येतें. श्रीमद्भागवतामध्यें जी कपिलगीता म्हणून दिलेली आहे, आणि जिच्यामध्यें कपिलांच्या सांख्यसूत्रांतीलच तत्त्वें प्रतिपादिलीं आहेत, तिच्यामध्यें भक्तांचें किती तरी वर्णन आलेलें आहे. परंतु त्याच कपिलमहामुनींचीं मूळ सांख्यसूत्रें पाहिलीं, तर त्यांत भक्तीचें गौरव केलेलें कोठेंच आढळत नाहीं. फार काय, पण निश्रेयसप्राप्तीसाठीं प्रवृत्त झालेलीं न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्वमीमांसा आणि उत्तरमीमांसा, हीं जीं षड्दर्शनें त्यांच्या सूत्रग्रंथांपैकीं एकाहि ग्रंथामध्यें भक्तीचें

प्रतिपादन नाहीं. तात्पर्य, भक्तीची कल्पना ही मानवी कल्पनेच्या वाढीच्या इतिहासामधील अलीकडच्या काळांतील आहे. ती उपनिषदें व ब्रह्मसूत्रें यांत नाहीं, आणि भगवद्गीतेमध्यें आहे. हा जो विरोध दिसून येतो, त्याच्याकरितांही या ग्रंथत्रयामध्यें एकवाक्यता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणें कितपत फलद्रूप होईल, याचा विचार शांत चित्तानें करणें अवश्यक आहे.

आतां कोणी असें म्हणेल कीं, जर गीतेमध्यें द्वैतमूलक भक्ति स्पष्ट आहे, तर उपनिषदें आणि ब्रह्मसूत्रें यांचा शंकराचार्यांच्या प्रमाणें अद्वैतपर अर्थ न लावतां रामानुजादिकांच्या प्रमाणें द्वैतपर अर्थ लावावा; म्हणजे हे तिन्ही ग्रंथ द्वैतपर लाविले गेल्यानें त्यांच्या एकवाक्यतेमध्यें कांहीं अडचण येणार नाहीं. परंतु असेंही करून जमावयाचें नाहीं. कारण, गीता हा जसा मूळचाच द्वैताला जास्त अनुकूल ग्रंथ आहे, त्याप्रमाणें उपनिषदें आणि ब्रह्मसूत्रें हे ग्रंथ मूळचेच अद्वैताला जास्त अनुकूल आहेत. हा एक स्वतंत्रच विषय असून तो फार विस्तीर्ण आहे. त्याचें येथें समग्र समालोचन करणें शक्य नाहीं. तरी पण थोडक्यांत एवढें सांगण्याला कांहीं हरकत नाहीं कीं, गीता अद्वैतपर लावणारांना जशा अडचणी येतात, तशाच—किंबहुना त्यांहूनही जास्त—अडचणी उपनिषदें आणि ब्रह्मसूत्रें द्वैतपर लावणारांच्या वाटेंत येतात. सारांश, अमक्या आचार्यांच्या मताप्रमाणें ग्रंथ लावण्याचा किंवा अमक्यांच्या प्रमाणें न लावण्याचा हा प्रश्न नाहीं. वक्त्याच्या मूळ अभिप्रायाप्रमाणें ग्रंथ लावण्याचा हा प्रश्न आहे. कोणत्याही ग्रंथाचा जो सरळ अर्थ प्राप्त होत असेल, तो घ्यावा, आणि तसा घेतला असतां उपनिषदें व ब्रह्मसूत्रें यांचा सरळ अर्थ अद्वैताकडे व गीतेचा द्वैताकडे जास्त कलतो. आणि म्हणून त्यांची समाधानकारक एकवाक्यता होणें शक्य नाहीं. या तिघां भावांपैकीं दोघांचीं तोंडें एकीकडे आणि तिसऱ्याचें तोंड त्यांच्या उलट, अशी जर स्थिति आहे, तर त्यांना एकाच घरांत मारून मुटकून ठेवण्यांत व रोज त्यांच्या ओढाताणी चालूं देण्यांत फायदा काय? ज्या दोघांचें पटतें आहे, त्यांना एकत्र राहूं देऊन बाकीच्याला सुखानें विभक्त राहूं दिलें, तर बिघडतें काय? असो.

येथपर्यंत एका बाजूला उपनिषदें आणि ब्रह्मसूत्रें व दुसऱ्या बाजूला भगवद्गीता यांच्यामधील एकवाक्यतेच्या विरुद्ध पौरुषेयत्वापौरुषेयत्वभेद, व्यक्ताव्यक्तभेद, कालभेद, अवतारकल्पनाभेद, सिद्धांतभेद, अधिकारिभेद, भक्त्यभावभेद, इत्यादि जीं कांहीं कारणें दृग्गोचर होतात, तीं विचाराकरितां विवेचकांच्या पुढें मांडण्यांत आलेलीं आहेत. याच्या उलट एकवाक्यतेच्या बाजूचीं जीं कारणें आहेत, त्यांचेंही मधून मधून जरूरीप्रमाणें उद्घाटन केलेलें आहे. व अस्वाभाविक एकवाक्यतेच्या ताणामुळें स्वाभाविक अर्थाची कांहीं प्रसंगीं ताटातूट कशी होते, याचेंही आविष्करण केलेलें आहे. तेव्हां या सर्व एकत्र जमा केलेल्या साधक बाधक प्रमाणांची तुलना करून तुलनेचा कांटा कोणत्या अंगाला झुकतो, याचा प्रत्येकानें आपापल्या मनाशीं शांतपणानें विचार करून काय तें ठरवावें, अशी वाचकांना विनंति आहे.

---

## दुसरे बाजीरावसाहेब स्वाधीन होण्याच्या वेळचीं

# मालकम साहेबांचीं कारस्थानें.

दुसरे बाजीरावसाहेब पेशवे ह्यांचा सर्वच इतिहास दुःखमय आहे; परंतु त्यांत सुद्धां त्यांच्या कारकीर्दीच्या शेवटाचा इतिहास अतिशयच दुःखमय आणि दुर्दैवाच्या दुर्विलसितानें अतिशयच भरलेला असा आहे. खडकीच्या आणि कोरेगांवच्या लढाईतील पराभवांनीं पुण्याच्या गादीबद्दल त्यांची बहुतेक निराशा झाल्यानंतर ते महाराष्ट्रांतील या ठिकाणापासून त्या ठिकाणाकडे एखाद्या निराश्रिताप्रमाणें कोठें तरी आश्रय मिळण्याकरितां भटकत होते. परंतु दुर्दैवाला या जगांत कोठेंहि आश्रय नसतो ! नागपु-

ऱ्या भोसल्यांपाशीं त्यांचें कारस्थान जमेना, म्हणून अगदीं शेवटची आशा म्हणून त्यांनीं माळव्यांत जाण्याकरितां नर्मदेच्या बाजूला आपला मोर्चा फिरविला. शिंदे, होळकर, हे पूर्वींच्या आपल्या मराठा कॉन्फिडरसीमधील इमानी सरदार आहेत, तेव्हां त्यांच्या मुलखांत आपण गेल्यास तेथें कांहीं तरी आश्रय मिळेल, असें बाजीरावसाहेबांस वाटून ते ब्ऱ्हाणपुऱ्या वाटेनें अशीरगडच्या बाजूनें आपल्या मोडक्या तोडक्या सैन्यानिशीं आणि थोड्याशा शिल्लक राहिलेल्या सरदारांनिशीं माळव्यांत जाण्याकरितां निघाले. व सातपुड्यांतलि शिंदव्याच्या घाटानें जाऊन महेश्वराजवळ नर्मदा उतरून माळव्यांतून दौलतराव शिंद्याकडे जावें, असा त्यांचा हेतु होता. ही १८१८ च्या मे महिन्यांतील गोष्ट आहे. यानंतर पुढें थोडक्याच दिवसांनीं सुमारें एक महिन्याच्या आंतच बाजीरावसाहेब सर जॉन मालकमसाहेबांच्या स्वाधीन झाले. या वेळचा प्रसंग फार हृदयद्रावक आहे. बाजीरावसाहेब तर ह्या वेळीं अगदीं हतवीर्य झालेले होते, व केव्हांना केव्हां तरी आणि कोणाच्या ना कोणाच्या तरी स्वाधीन होण्यावांचून आतां त्यांना गत्यंतरच राहिलेलें नव्हतें. तरी पण अशा प्रसंगीं सर जॉन मालकम यांनीं बाजीरावसाहेबांना आपल्या जाळ्यांत पूर्णपणें अडकवून घेण्याकरितां एका पाठीमागून एक कसकशा युक्त्या केल्या आणि त्यांच्या मानभावीपणाच्या धोरणाला दुर्दैवानें कसें यश येत गेलें, हा एक मोठा शिक्षणप्रद इतिहास आहे. इंग्लिश लोक वरून कसे गोड बोलतात, पण आंतून त्यांचीं गुप्त कारस्थानें कशीं चाललेलीं असतात, वरून ते गंभीरपणा कसा दाखवित असतात, पण आंतून ते कसे अधीर झालेले असतात, ते बाहेरून सभ्यपणा कसा दाखवितात, पण आंतून दुसऱ्यांचीं माणसें फोडण्याचा ते मोठ्या शिष्टपणानें कसा प्रयत्न करीत असतात, वगैरे अनेक गोष्टी या प्रसंगींच्या इतिहासावरून उघडकीस येण्यासारख्या आहेत.

माळव्यांत शिरण्याच्या उद्देशानें बाजीरावसाहेब नर्मदेकडे येऊं लागले, त्या वेळीं ब्रिगेडियर जनरल मालकम हे माळव्यामध्यें होते. त्यांना बाजीरावांचा माळव्यांत शिरण्याचा उद्देश असल्याची बातमी समजल्याबरोबर त्या प्रयत्नाला विरोध करण्याची त्यांनीं तावडतोब तयारी सुरू केली. माळव्यांतलि पेंढाऱ्यांचें बंड नुकतेंच मोडण्यांत आलें होतें; व तेथें

नुकतीच शांतता प्रस्थापित करण्यांत आलेली होती. अशा ठिकाणीं बाजीराव आल्यास फिरून दंगेधोपे सुरू होतील, अशी मालकमसाहेबांना भीति होती; व ती निराधार होती असेंहि नाहीं. पुष्कळसे हताश होऊन घरीं बसलेले पेंढारी लोक बाजीरावासारख्या पुढाऱ्याची मोठ्या उत्कंठेनें वाटच पहात होते. शिवाय शिंदे, होळकर, हे माळव्यांतील राजे पेशव्यांचे जुने नोकर; त्यांचा इंग्लिशांनीं जरी अलीकडे कित्येक लढायांतून पराभव केलेला होता, तरी खुद्द बाजीरावसाहेब माळव्यांत येऊन उभे राहिले, तर माळव्यांतील पेंढाऱ्यांप्रमाणेंच शिंदे, होळकर, वगैरे पेशव्यांच्या जुन्या सरदारांनाहि स्वदेशभक्तीचें आणि स्वामिनिष्ठेचें फिरून स्फुरण उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं, अशी मालकमसाहेबांना धास्ती वाटत होती. त्यामुळें त्यांनीं बाजीरावाला माळव्यांत येऊं न देण्याचा निश्चय केला; व त्यासाठीं बुद्धिबळाच्या डावांत राजाला निरनिराळ्या ठिकाणाहून निरनिराळ्या मोहऱ्यांचे शह देऊन ज्याप्रमाणें त्याची गति कुंठित करण्यांत येते, त्याप्रमाणें ब्रिगेडियर जनरल मालकम यांनीं चोहों बाजूंनीं बाजीरावसाहेबांच्या हालचालींच्या विरुद्ध कडेकोट बंदोबस्त करण्याची तयारी चालविली. बाजीरावसाहेबांनीं माळव्यांत यावयाचें म्हणजे त्यांनीं कोठें तरी नर्मदा ओलांडलीच पाहिजे. म्हणून नर्मदेच्या कांठीं जेथें जेथें उताराच्या जागा होत्या, तेथें तेथें मालकमसाहेबांनीं आपल्या सैन्यांचे चौकी पहारे बसविले. त्याचप्रमाणें सातपुड्याच्या ज्या ज्या घाटांतून माळव्यांत उतरण्याचे रस्ते होते, तेथेंहि त्यांनीं लष्करी ठाणीं बसविलीं. चोळीमहेश्वरपासून थोडक्याच अंतरावर नर्मदेच्या कांठीं असलेल्या मंडलेश्वराच्या किल्ल्यांत त्यांनीं ले. कर्नल स्मिथ ह्याला पाठविलें. तो किल्ला पेशव्यांच्या ताब्यांत होता व तेथें नर्मदेला उतार असे. परंतु तो किल्ला कर्नल स्मिथ ह्यांनीं आपल्या ताब्यांत बळकावून घेतल्यामुळें तेथील उताराची वाट बंद झाली. हरदा हंडिया येथील किल्ल्यावर लेफ्टेनंट कर्नल रसेल ह्याला त्यांनीं कांहीं पलटणी देऊन ठेविलें. त्याचप्रमाणें महेश्वराच्या पश्चिमेस सुमारें २५ कोसांवर चिखलदा या ठिकाणीं नर्मदेला एक उतार होता. म्हणून तेथेंहि कांहीं सैन्य पाठविण्यांत आलें. व त्याशिवाय हुशंगाबादच्या पश्चिमेस सुमारें २० कोसावर कोठरा म्हणून एक ठिकाण आहे, तेथन बाजीरावाला नर्मदा-

पार जातां येऊं नये म्हणून तेथें ज. वॉटसन ह्याच्या हाताखालीं कांहीं सैन्य ठेव-ण्यांत आलें होतें. त्याचप्रमाणें नर्मदेच्या पलीकडील डोंगरांत आनछोड व पिपळदा ह्या खिंडींतील वाटांचें संरक्षण करण्याकरितांहि थोडें थोडें लष्कर ठेवण्यांत आलें होतें. सारांश, नर्मदेच्या कांठाकांठानें पश्चिमेस धारपासून तो पूर्वेस भोपाळ संस्थानच्या हद्दीपर्यंत बाजीरावाला कोठेंहि नर्मदा उत-रतां येऊं नये, अशी मालकमसाहेबांनीं थोडक्याच वेळांत व्यवस्था केली. ही समोरच्या म्हणजे उत्तरेकडच्या बाजूची व्यवस्था झाली. पण त्याशिवाय दक्षिणेंतून जालन्याकडून ब्रिगेडियर जनरल डोव्हटन यांच्या ताब्यांतील इंग्लिशांचें कांहीं लष्कर बाजीरावाचा पाठलाग करीत येत होतें, तेंही या वेळीं अर्थातच बाजीरावाच्या पिछाडीला होतें. सारांश, बऱ्हाणपुराजव-ळील अशीरगडच्या आसपासच्या बुद्धिबळाच्या पटावर बाजीरावाला जिकडे जिकडे म्हणून जाणें शक्य होतें, तीं तीं सगळीं अघाडीचीं आणि पिछा-डीचीं घरें सर जॉन मालकम ह्यांच्या प्याद्यांनीं, उंटांनीं आणि घोड्यांनीं शह देऊन बंद करून टाकलीं होतीं. इतकी तयारी करून सर जॉन मालकम हे महू येथें आपला तळ देऊन पुढें काय होतें हें पहात व आपण काय केलें पाहिजे ह्याचा विचार करीत बसले होते. अशा स्थितींत बाजीरावसाहेबांचे कोणी वकील आपल्याकडे तहाचें बोलणें करण्याकरितां येणार आहेत अशी त्यांना बातमी लागली; व सन १८१८ च्या मे महि-न्यांतील १६ व्या तारखेच्या रात्रीं खरोखरच पेशव्याचें पत्र घेऊन आनंद-राव यशवंत चंदीचंदावरकर व आणखी दोघे असामी मालकम-साहेबांच्या छावणींत येऊन दाखल झाले. मालकमसाहेब हे आपले मोठे जुने दोस्त आहेत, व ते आपल्या ह्या आपत्कालीं आपल्याला कांहीं उपयोगीं पडतील, अशा आशेनें बाजीरावसाहेबांनीं हे आपले वकील मालकमसाहेबांकडे पाठविले होते. पण त्या बिचाऱ्या भोळ-सर बाजीरावसाहेबांना काय माहीत कीं, आपल्या ह्या जुन्या दोस्तानें आपण माळव्यांत येणार ही बातमी ऐकल्याबरोबर माळव्यांतील आपल्या येण्याच्या सर्व वाटा आडवून टाकण्यासाठीं ठिकठिकाणीं कडेकोट नाके-बंदी केली आहे! वेडगळ लोक फसतात ते असेच! वास्तविक पाहिलें असतां मालकमसाहेब हे बाजीरावाचे मित्र नसून त्यांचें राज्य हरण करून घेऊं

इच्छिणारे त्यांचे शत्रुच होते. तरी पण बाजीराव त्यांनां आपले मित्र म्हणून म्हणत असतां, मी तुमचा खरा मित्र नाहीं, तुमचें राज्य घेण्याची आंम्हां इंग्लिशांची इच्छा आहे. आणि म्हणून मी तुमचा मित्र नसून शत्रु आहें, असें त्या प्रामाणिक मालकमसाहेबांनीं बाजीरावसाहेबांना एका शब्दानें सुद्धां कळूं दिलें नाहीं! उलट त्यांनीं आपलें हें मित्रत्वाचें पांघरूण बिलकूल फाटूं न देतां शेवटपर्यंत कायम ठेवलें होतें! आणि असेंच करावें लागतें, तेव्हां कोठें लोक फसतात! नाहीं तर खरें सांगून कोण आपलें राज्य दुसऱ्याच्या हवालीं करणार आहे!

मालकमसाहेब हे बाजीरावसाहेबांचे दोस्त (साहेब आणि नेटिव राजे ह्यांची दोस्ती कशाप्रकारची असते हें वर दिसून आलेंच आहे व पुढें ह्याच्याहि पेक्षां जास्त चांगलें दिसून येणार आहे) असल्यामुळें ब्रिटिश सरकारच्या आणि आपल्या दरम्यान फिरून मालकमसाहेबांच्या मध्यस्थीनें स्नेहभाव उत्पन्न केला जावा, अशी बाजीरावसाहेबांची इच्छा होती, व त्यासंबंधी बोलणें करण्याकरितां मालकमसाहेबांनीं आपल्या छावणीमध्यें यावें, असा बाजीरावसाहेबांनीं आपल्या वकिलाबरोबर निरोप पाठविला होता. भोळसर बाजीराव! हताश झालेला बाजीराव! त्या बिचाऱ्याच्या मनांत बिलकुल कपट नव्हतें. पण मालकमसाहेबांच्या कपटी मनाला मात्र आपण बाजीरावाच्या छावणींत जावें, असें बिलकुल वाटेना. म्हणून मालकमसाहेबांनीं आपल्या दोस्ताच्या छावणींत जाण्याचें नाकारलें. परंतु आपलेकडील लेफ्टेनंट लो आणि ले. मॅक्डोनल्ड ह्या दोन इसमांना त्यांनीं बाजीरावाकडे पाठविण्याचें कबूल केलें. ह्या कृत्यांत मालकमसाहेबांचे पुष्कळ गुप्त राजकीय हेतु होते. आपण बाजीरावाकडे गेलों तर आपला कमिपणा दिसेल आणि शिवाय आपण तिकडे जाऊन तहाच्या अटी जमल्या नाहींत आणि बाजीरावावर उलट हल्ला करण्याचा प्रसंग आला, तर आपण जाग्यावर नसल्यामुळें आपल्याला सैन्याच्या हालचाली ताबडतोब करतां येणें अशक्य होईल; या दोन कारणांसाठीं मालकमसाहेबांनीं स्वतः जाण्याचें नाकारिलें. पण आपल्या हाताखालचे इसम पाठविण्यांतही त्यांचे अनेक डाव होते. बाजीरावसाहेबांविषयीं आपली कळकळ व्यक्त करावी, हा त्यांत एक हेतु होताच. पण आपले दोन इसम आपण पाठविले म्हणजे बाजीरा-

त्यांच्या मनांत आपल्या दोस्तीबद्दल ज्यास्त विश्वास उत्पन्न होऊनं त्यानें आपल्यावर ज्यास्त भरंवसा टाकण्याला तयार व्हावें, हा त्यांत दुसराही हेतु होता. पण ह्याच्याहिपेक्षां हे जे दोघे इसम दोस्त म्हणून पाठविण्यांत येत होते, त्यांच्या जाण्यांत आणखीसुद्धां ज्यास्त वाईट हेतु होते. जे वकील किंवा दोस्त ह्या दर्जानें जातात, त्यांनीं हेराचीं विश्वासघाताचीं कामें करावयाचीं नाहींत, हा शिष्टसंप्रदाय आहे. परंतु लेफ्टेनंट लो आणि मॅक्डोनल्ड ह्या दोघांनीं पेशव्यांच्या छावणींत दोस्त म्हणून जाऊन पेशव्यांच्या सैन्याची खरी स्थिति काय आहे, ह्याची प्रत्यक्ष माहिती मिळवून यावें, हाही त्यांना पाठविण्यांतील मालकमसाहेबांचा नीचपणाचा गुप्त हेतु होता! पेशव्यांची स्थिति काय आहे, त्यांची तह करण्याची खरोखरच इच्छा आहे किंवा नाहीं, वगैरे पहावें आणि पेशव्यांच्या मनांत तहाची इच्छा असेल तर त्यांचें मन वळवून त्यांना युक्तीयुक्तीनें लवकर मालकमसाहेबांच्याकडे घेऊन यावें, हीं कामें लेफ्टेनंट लो ह्यांच्याकडे सोपविण्यांत आलेलीं होतीं!

बाजीरावसाहेबांचे दोस्त, सर जॉन मालकमसाहेब, ह्यांनीं बाजीरावांच्या सर्व वाटा अडवण्याची कशी व्यवस्था केली होती, हें आपण पूर्वी पाहिलेलेंच आहे. त्यानंतर आतां आपले दोस्त बाजीरावसाहेब ह्यांना आपल्या तहाच्या जाळ्यांत अडकवून घेण्याकरितां मालकमसाहेब काय काय कारस्थानें करीत होते, हा प्रसंगही पाहण्यासारखा आहे. ह्यांपैकीं पहिली युक्ति लेफ्टेनंट लो ह्यांना पुढें पाठविण्याची ही होय. महूच्या छावणींतून ता. १८ मे रोजीं पेशव्यांच्या वकिलाबरोबर लेफ्टेनंट लो हे बाजीरावाकडे जाण्याकरितां मंडलेश्वराच्या वाटेनें निघाले. तरी पण आणखी जास्त सावधपणा ठेवण्याकरितां ता. २० मे रोजीं लेफ्टेनंट लो ह्यांना पाठीमागून आणखीही असा एक निरोप पाठविण्यांत आला कीं, तुम्ही एकदम पेशव्यांच्या वकिलाबरोबर पेशव्यांकडे न जातां फक्त आपले दोन कोणी तरी नेटिव एजंट पुढें पाठवावे व पेशव्यांकडून फिरून बोलावणें आलें तरच लेफ्टेनंट लो ह्यांनीं मागून जावें. इंग्लिश लोक या प्रसंगीं किती सावधपणा ठेवीत होते, हें ह्यावरून दिसून येतें. ता. २० ला हा निरोप पाठविल्यानंतर व बाकीच्या कांहीं व्यवस्था केल्यानं-

तर ब्रिगेडियर जनरल मालकम हे स्वतःहि लो साहेबांच्या पाठीमागून महूचा मुक्काम सोडून ता. २२ मे रोजीं मंडलेश्वर येथें येऊन राहिले, व तेथूनंहि मजल दरमजल कूच करून मालकमसाहेबांनीं ता. २७ मे रोजीं बाजीरावसाहेबांच्या छावणीच्या अलीकडे कांहीं अंतरावर मेटावल येथें येऊन आपला तळ दिला. लेफ्टेनंट लो आणि पेशव्यांचे वकील हे त्यांच्या आधीं फक्त एकच दिवस काय ते येऊन पोचले होते, व लेफ्टेनंट लो ह्यांनीं आपल्या छावणीमध्यें भेटण्याकरितां यावें असा बाजीरावाकडून त्याच दिवशीं त्यांना निरोप आलेला होता. म्हणून त्याप्रमाणें ब्रिगेडियर जनरल मालकम यांनीं लोसाहेबांना पुढें पाठवून दिलें, व त्यांच्याबरोबर असा एक निरोपही पाठविण्यांत आला कीं, " बाजीरावसाहेबांनीं आतां उगीच दिवस फुकट घालविण्यांत अर्थ नाहीं. एक लढाई तरी करणें किंवा दुसरा मार्ग म्हणजे स्वाधीन होणें. ह्याच्याशिवाय तिसरी तोड आतां कांहीं उरलेली नाहीं. पण हल्लींच्या स्थितींत लढाई करणें हें अशक्य असल्यामुळें पेशव्यांनीं इंग्लिशांच्या कृपाळुपणावर अवलंबून राहून त्यांच्या स्वाधीन व्हावें व तेंहि शक्य तितक्या लवकर व्हावें, हाच उत्तम मार्ग होय !" बाजीरावाचे अगदीं जीवश्च कंठश्च दोस्त म्हणून मालकम साहेबांनीं त्यांना हा त्यांच्या फायद्याचा निरोप पाठविला होता ! इंग्रजी मित्र कसे परोपकार करीत असतात आणि इंग्रजी कृपाळुपणा लोकांचें कसें कल्याण करीत असतो, हें अजून याच्या पुढेंच जास्त चांगलें दिसून यावयाचें आहे ! लेफ्टेनंट लो यांच्याबरोबर असा निरोप पाठवून त्यांना पेशव्यांकडे धाडून दिल्यानंतर ता. २९ मे रोजीं लेफ्टेनंट लो आणि बाजीरावसाहेब ह्यांची मुलाखत झाली. आपले दोस्त मालकम-साहेब हे आपल्याला पेशव्यांच्या गादीवर पुण्यास राहूं देतील अशी बाजीरावसाहेबांना फार आशा होती; परंतु लो साहेबांच्या मुलाखतींत ती आशा सफळ होण्याचीं चिन्हें कमी दिसूं लागलीं; आणि मालकम-साहेबांकडे जाऊन त्यांच्या स्वाधीन होण्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं, असें स्पष्ट दिसूं लागलें. त्यामुळें अखेरीस मालकमसाहेबांच्या भेटीला येण्याचें बाजीरावसाहेबांनीं कबूल केलें. बाजीरावसाहेबांचा मुक्काम बऱ्हाण-पुरच्या उत्तरेस ६।७ कोसांवर आणि अशीरगडच्या पश्चिमेस ३।४ कोसां-

वर धोलकोट ह्या ठिकाणीं होता. व तेथून कांहीं अंतरावर सर जॉन मालकम यांची छावणी मेटावल येथें होती. व ह्या दोन ठिकाणांच्या दरम्यान कांहीं डोंगराळ प्रदेश होता. ह्या डोंगराच्या खिंडीच्या पलीकडील मैदानावरील खैरी या गांवीं दोघांची मुलाखत होण्याचें ठरलें. पहिल्यानें ता. ३१ मे हाच मुलाखतीचा दिवस ठरला होता; पण पाठीमागून तो दिवस बदलून जूनच्या १ तारखेला बाजीराव आणि मालकमसाहेब ह्यांची गांठ पडली. खैरीच्या मैदानावर सदर मुलाखतीकरितां कित्येक तंबू ठोकण्यांत आले होते. व ठरलेल्या दिवशीं बाजीरावसाहेब संध्याकाळीं ५ वाजतां आपल्या तंबूमध्यें येऊन दाखल झाले. व नंतर पाठीमागून थोड्या वेळानें ब्रिगेडियर जनरल मालकम हेहि तेथें येऊन पोंचले. खैरीचा घांट ही सातपुड्याच्या डोंगरांतील एक खिंड आहे; त्या खिंडीच्या खालील सुमारें अर्धा मेल अंतरावरील मैदानांत भेटीची जागा ठरली होती. पण बाजीरावसाहेबांना इंग्रजांच्या कारस्थानीपणामुळें आपल्या सुरक्षिततेबद्दल फार धास्ती वाटत असल्यामुळें खैरीच्या डोंगरावर त्यांनीं तोफा डागल्या होत्या व कित्येक हत्यारबंद आरबही त्यांनीं पहाऱ्याकरितां तेथें ठेविले होते. व त्याशिवाय बाजीरावसाहेबांनीं आपल्या बरोबर २००० दोन हजार लोक आणावेत, मालकमसाहेबांनीं आपलें सैन्य सुमारें ५।६ कोस मागें ठेवून फक्त थोडे लोक बरोबर घेऊन यावें, आणि मुलाखत झाल्यानंतर बाजीरावसाहेबांची इच्छा असेल तर त्यांना त्यांच्या धोलकोटच्या छावणीमध्यें सुरक्षितपणें परत जाऊं देण्यांत यावें, असें ठरलेलें होतें. त्या ठरल्याप्रमाणें सर्व व्यवस्था होऊन वर सांगितल्याप्रमाणें बाजीराव आणि मालकम ह्यांच्या खैरीच्या मैदानावर गांठी पडल्या. दरबार तंबूंतच भरला होता, तरी पण दरबारचा थाट अगदीं पुण्यांतल्याप्रमाणें करण्यांत आला होता. पहिल्यानें दरबारांत उभय बाजूंनीं औपचारिकपणाचे कुशलप्रश्न झाल्यानंतर बाजीराव आणि मालकम हे दोघेहि एका निराळया तंबूमध्यें खाजगी भाषण करण्याकरितां गेले. तेथें त्यांची २।३ तास पर्यंत मुलाखत चाललेली होती. या मुलाखतींत बाजीरावसाहेबांनीं आपल्या दुर्दैवाची सर्व कहाणी फार करुणास्पद रीतीनें मालकम साहेबांपुढें सांगितली; तरी पण मालकमसाहेबांच्या मनांत करुणा क्वचितच उत्पन्न झाली

असेल. बाजीरावसाहेब म्हणाले. " तुमच्या इंग्लिश लोकांत माझे एकंदर काय ते तीन स्नेही ! एक कर्नल क्लोजसाहेब, दुसरे जनरल वेलस्ली आणि तिसरे तुम्ही ! त्यांपैकीं क्लोज साहेब हे तर मरून गेले आहेत आणि वेलस्लीसाहेब जवळ नाहींत; अशा स्थितींत माझे सगळे जुने नोकर-चाकर मला सोडून चालले आहेत अशा—वेळीं तुम्ही माझे जे बाकी राहिलेले खरे मित्र आहांत, त्या तुमच्यावर आतां माझा सर्व भरंवसा आहे ! " ह्या भाषणांत बाजीरावसाहेब मालकमसाहेबांना आपला शिल्लक उरलेला तिसरा खरा मित्र म्हणून जेव्हां संबोधित होते, तेव्हां ते शब्द ऐकत असतां बाजीरावाला त्याच्या राज्यासह हस्तगत करून घेऊं पाहणाऱ्या मालकमसाहेबांच्या मनाला आंतून काय वाटत होतें, ह्याबद्दलचें वर्णन कोणीहि केलेलें नाहीं; तरी पण प्रत्येकाला त्या वेळच्या त्यांच्या मनाच्या स्थितीबद्दल कल्पना करतां येण्यासारखी आहे ! मालकमसाहेबांनीं बाजीरावसाहेबांना निक्षून सांगितलें कीं, " ब्रिटिश सरकारकडून तुमचें राज्य तुम्हांला परत मिळणें शक्य नाहीं, व त्याच्याबद्दल तुमच्या मनांत उगीच खोट्या आणि भ्रामक आशा उत्पन्न करण्यांत तुमचा एक स्नेही या नात्यानें मला कांहीं एक अर्थ दिसत नाहीं. तेव्हां सरकारकडून तुम्हांला जें कांहीं देण्यांत येईल तें मुकाट्यानें पतकरून तुम्ही ताबडतोब माझ्या स्वाधीन व्हावें, ह्यांतच हल्लीं शहाणपणा आहे ! " बाजीरावसाहेबांनीं मालकमसाहेबांच्या पुढें आर्जव करण्याची अगदीं शिकस्त केली. परंतु त्यांना कांहीं द्रव आला नाहीं. दुसऱ्या दिवशीं फिरून आणखी एक मुलाखत व्हावी, अशी बाजीरावसाहेबांची विनंति होती; पण तीही मालकमसाहेबांनीं मान्य केली नाहीं. आणि तसें करण्यांत बाजीरावसाहेबांना जास्त वेळ विचार करण्याला न मिळतां ताबडतोब स्वाधीन होणें भाग पडावें, हाच त्यांच्या दोस्तांचा स्तुत्य हेतु होता ! असो. ह्याप्रमाणें त्या दिवशींची ही मुलाखत रात्रीं सुमारें ९ वाजतां खलास झाली. व नंतर मालकमसाहेब आपल्या छावणीकडे गेले आणि खैरीच्या मैदानाच्या पलीकडील खिंड ओलांडून पेशवेहि आपल्या मुक्कामाला जाऊन पोंचले.

वरील मुलाखतींत ज्या गोष्टींची वाटाघाट झाली, त्या येणेंप्रमाणें होत्या:—बाजीरावसाहेबांनीं पुण्याच्या गादीवरील आपला हक्क कायमचा

सोडून आपल्या बरोबरच्या थोड्याश्या मंडळीसह मालकमसाहेबांच्या छावणींत यावें; तेथें त्यांचा योग्य मानमरातब राखला जाईल; व तेथून त्यांना काशीला किंवा दुसऱ्या कोणत्याहि त्यांना पसंत असलेल्या उत्तर हिंदुस्थानांतील एखाद्या पवित्र क्षेत्राच्या ठिकाणीं पाठविण्यांत येईल. बाजीरावसाहेबांना गव्हर्नर जनरल योग्य ती नेमणुक खर्चाकरितां करून देतील; परंतु ती नेमणुक सालिना ७।८ लक्षापेक्षां कमी असणार नाहीं. एवढी हमी मालकमसाहेबांनीं घेतली होती, व बाजीरावसाहेबांनीं जर ह्या अटी कबूल केल्या, तर त्यांचे जे सरदार त्यांच्यापाशीं इमानेइतबारें वागल्यामुळें नुकसानींत आले असतील, त्यांच्याकडेहि योग्य लक्ष दिलें जाईल. ह्या सगळ्या अटी मान्य करून बाजीरावसाहेबांनीं मालकमसाहेबांच्या छावणींत तावडतोब आलें पाहिजे; परंतु २४ तासांच्या अवधींत ते न येतील, तर फिरून लढाईला सुरवात करण्यांत येईल ! अशा रीतीनें २४ तासांची मुदत देऊन ह्या अटींचा एक खलिता ता. १ जून रोजीं रात्रीं मालकमसाहेबांनीं तयार करून ता. २ जून रोजीं सकाळीं तो बाजीरावसाहेबांकडे इंग्रजांकडून पाठविण्यांत आला.

हा खलिता ता. २ जून रोजीं बाजीरावसाहेबांकडे जाऊन पोंचल्यानंतर बाजीरावसाहेबांच्या छावणींत फारच गडबड उडून गेली. २४ तासांची मुदत ही अगदीं थोडी वाटूं लागली. व तेवढ्या मुदतींत काय तें ठरविण्याकरितां वरच्यावर इकडून तिकडे जासूद पाठविण्यांत येऊं लागले. मालकमसाहेबांनीं हा निर्वाणीचा निरोप पाठविला, त्याच्या पूर्वींच, किंबहुना मंडलेश्वराहून बाजीरावाच्या छावणीकडे मालकमसाहेब यावयास निघाले त्या वेळींच, त्यांनीं लढाईचा प्रसंग आला तर आपल्या सैन्याच्या निरनिराळ्या तुकड्यांची कशी योजना असावी ह्याच्या बद्दलची सर्व व्यवस्था करून ठेवलेली होती. कॅ. स्मिथ ह्यांचें जें लष्कर मंडलेश्वर येथें होतें, तें घेऊन त्यांनीं नर्मदा उतरून पलीकडे यावें, असा त्यांना हुकूम करण्यांत आला होता. त्याचप्रमाणें लेफ्टेनंट कर्नल रसेल यांनीं बाजीरावसाहेब ईशान्येच्या दिशेनें पळूं लागल्यास त्याला अडविण्यासाठीं त्या बाजूला येऊन अपला तळ देऊन बसावें, असें ठरविण्यांत आलें होतें. शिवाय बाजीरावाच्या पिछाडीकडे ब्रिगेडियर जनरल डोव्हटन यांचें लष्कर

बऱ्हाणपुरच्या जवळ येऊन पोंचलेलें होतेंच; व तिकडून अशीरगडच्या आसपास त्र्यंबकजी डेंगळयाचे कोणी लोक आढळल्यास त्यांच्यावरही हल्ला करावा, अशी ब्रिगेडियर जनरल डॉव्हटन यांची तयारीही होती. अशा रीतीनें मालकमसाहेबांनीं आपलीं ठाणीं बसवून बाजीरावसाहेबांना चोहोंकडून वेढून टाकलें होतें. व अशा रीतीनें बाहेरून आपल्या लष्करानें वेढून ठेविल्यानंतर मग मालकमसाहेब आंतून आपल्या तहाच्या अटींनीं बाजीरावसाहेबांना वेढण्याचा प्रयत्न करूं लागले होते. अशा रीतीनें बाजीरावसाहेबांना दुहेरी वेढा देण्यांत आलेला होता. व इतक्या अडचणींतून बाजीरावसाहेबांना सुटून जाणें शक्य नव्हतें. त्यांनीं आपलें कांहीं सामान-सुमान व कांहीं माणसें अशीरगडच्या किल्ल्यावर पाठविलीं होतीं; त्या वेळीं अशीरगडचा किल्ला शिंद्यांच्या ताब्यांत होता; व यशवंतराव लाड या नांवाचा शिंद्यांच्या तर्फेचा किल्लेदार तेथें मुख्य होता. त्याची बाजीरावसाहेबांना पूर्ण मदत होती. व बाजीराव तेथें पावसाळ्यांत चार महिने जाऊन राहिले असते, तर पावसाळ्यांत अशीरगडचा किल्ला जिंकून घेणें इंग्लिशांना बिलकुल शक्य नव्हतें. त्यामुळें आपल्या तहाच्या अटी जुळल्या नाहींत, तर कदाचित् बाजीरावसाहेब अशीरगडच्या किल्ल्याच्या आश्रयाला जातील व तेथून ते लढतील, अशी मालकमसाहेबांच्या पोटांत एक भीति होती; आणि म्हणून तसें कांहीं एक न होण्याकरितां मालकमसाहेब आपल्या तहाच्या अटींची अगदीं लगट करीत होते; व बाजीरावसाहेबांना विचार करण्याकरितां वेळ न मिळतां त्यांनीं ताबडतोब आपल्या स्वाधीन व्हावें ह्यासाठीं मालकमसाहेबांची एकसारखी धडपड चाललेली होती ! व त्याकरितां इंग्रजी मुत्सद्दीपणामध्यें गैर न मानल्या जाणाऱ्या अशा अनेक युक्त्या ते उपयोगांत आणीत होते ! इंग्लिश लोक आपला सभ्यपणा आणि सात्त्विकपणा बाह्यात्कारी कायम टिकवून आंतून प्रतिपक्षांत हळु हळू सभ्यपणानें कशी फूट पाडीत असतात, ह्याचें एक चांगलें उदाहरण ह्या ठिकाणीं पहावयाला मिळतें. साताऱ्चे महाराज,खुद्द बाजीरावांचे बंधु चिमणाजीआप्पा, तासगांवकर पटवर्धन, निपाणकर आप्पा देसाई, नारोपंत आपटे, वगैरे मंडळींनीं बाजीरावसाहेबांना ह्या वेळीं जरी सोडून दिलें होतें व पुष्कळ लोक इंग्लिशांच्या

फितुरीनें फितुर होऊन घरीं निघून गेले होते, तरी विठ्ठलराव विंचूरकर, आबा पुरंदरे, गोखले, वगैरे पेशव्यांचे इमानी सरदार या वेळींही आणि ह्या स्थितीमध्येंही बाजीरावांच्यापाशीं होते. ज्यांनीं आपली स्वामिनिष्ठा इतक्या संकटांतूनहि कायम टिकविली होती, ते इंग्रजी फितुरीस बळी पडण्याचा फारच थोडा संभव होता. तरी सुद्धां त्यांच्यावर देखील आपल्या इंग्रजी कौशल्याचा प्रयोग करून पाहण्याला मालकमसाहेबांनीं कमी केलें नाहीं. बाजीरावसाहेबांनीं इंग्रजांच्या स्वाधीन होण्याच्या ज्या अटी वर दिल्या आहेत, त्यांत बाजीरावसाहेब तावडतोब २४ तासांत आपल्या स्वाधीन झाले तर त्यांच्या पदरच्या इमानी नोकरचाकरांची आणि सरदारदरकदारांची योग्य तजवीज लावण्यांत येईल, असें एक कलम मालकमसाहेबांनीं घातलेलें होतें. सकृद्दर्शनीं पाहिलें, तर हें कलम त्य सरदारांसंबंधींच्या औदार्याचें निदर्शक आहे, असें वाटून कोणीही मनुष्य इंग्रजी दिलदारपणाच्या भ्रांतीनें फसून जाईल, यांत संशय नाहीं! पण या कलमाचा फायदा एका अयोग्य रीतीनें घेण्याचा मालकमसाहेबांनीं मोठया शिताफीनें एक अत्यंत नीच आणि निंद्य प्रयत्न या वेळीं सुरू केला. विंचुरकर, पुरंदरे, गोखले, ह्यांच्यापैकीं जी सरदार, मंडळी त्या वेळीं बाजीरावाच्या जवळ होती, ते सगळे जहागिरदार मोठे इमानी होते, हें सर जॉन मालकम यांना माहित होतें, व तसें त्यांनीं कबूलहि केलें आहे. तरी पण अशा लोकांवरसुद्धां त्यांनीं आपळा गळ टाकण्याला कमी केलें नाहीं! बाजीरावसाहेबांनीं तावडतोब इंग्लिशांच्या स्वाधीन व्हावें, ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट घडवून आणण्याला तुम्ही मदत कराल, तर तुमच्या जहागिरी तुमच्याकडे कायम ठेवण्याची व्यवस्था केली जाईल, अशी लालूच मालकमसाहेबांनीं विंचूरकर, पुरंदरे वगैरे मंडळींना अनेक वेळां दाखविली आतां प्राप्त झालेल्या स्थितींत बाजीरावांना यश मिळण्याचा बिलकुल संभव नाहीं आणि इंग्रजांच्या स्वाधीन होण्याशिवाय त्यांना आतां दुसरा कोणताही मार्ग शिल्लक उ लेला नाहीं, अशी मालकमसाहेबांनीं ह्या सरदारांची फिरून फिरून खात्री करून दिली; व तुम्ही पेशव्यांना आमच्या स्वाधीन होण्याला उद्युक्त करून त्या कामांत यश संपादन केलें, तरच तुमच्या जहागिरींचा

आम्ही तुमच्या मर्जीप्रमाणें निकाल लावूं, ही गोष्ट्री मालकमसाहेबांनीं त्या सरदारांच्या मनावर अनेक वेळां ठसविली. या वेळच्या संभाषणांतील मालकमसाहेबांचें कौशल्य आणि कौटिल्य वाखाणण्यासारखें आहे! सरदार मजकूर आपल्या धन्याशीं बेइमान होण्याला तयार होत नाहींत, असें दिसूं लागल्यावर मालकमसाहेबांनीं आपल्या कोटिक्रमाचा थोडासा ओघ बदलून त्यांना असें सांगितलें कीं, " तुम्ही आपल्या धन्याशीं बेइमान व्हावें किंवा असल्या नाजुक प्रसंगीं तुम्ही त्यांचें मन दुखवावें, असें माझें मुळींच म्हणणें नाहीं; तुम्ही इतक्या स्वामिनिष्ठेनें आपल्या धन्याजवळ वागत आहांत, यामुळें तुमच्याबद्दल मला मोठा आदर वाटत आहे; परंतु या वेळीं जर तुम्ही योग्य सल्ला दिला नाहीं आणि बाजीरावांच्या हातून इंग्लिशांच्या स्वाधीन होण्याचें कृत्य तुम्ही जर आपल्या सदुपदेशानें घडवून आणिलें नाहीं, तर त्यापासून बाजीरावसाहेबांचें आणि तुमचें असें दोघांचेंहि नुकसान मात्र होणार आहे! बाजीरावसाहेबांच्या सभोंवती अजूनहि कित्येक बदसल्लागार माणसें आहेत. त्याच्या सल्ल्यानें बाजीराव साहेबांचें येथपर्यंत नुकसान झालेलें आहे. आणि याच्याहि पुढें जर बाजीरावसाहेब त्या बदसल्लागार लोकांच्या सल्याप्रमाणें वागतील, तर ते आपलें जास्त नुकसान करून घेण्याला मात्र प्रवृत्त होतील. आणि असें असूनही अशा स्थितींत सुद्धां तुम्ही आपलें वजन खर्च न करितां आणि त्यांना स्वाधीन होण्याचा सल्ला कनवाळूपणें न देतां स्वस्थ बसाल, तर तुमच्या ह्या अप्रासंगिक कनवाळूपणाला लोक भित्रेपणा असें नांव देतील! व ह्या प्रसंगीं तुम्ही आपलें कर्तव्यकर्म बजावलें नाहीं, असा तुमच्यावर दोष येईल! इतकेंच नव्हे, तर तुम्ही आपल्या यजमानाशीं कृतघ्नपणा केला, असाही तुमच्यावर आक्षेप येईल! व शिवाय तुमच्या जहागिरी कायम राखण्याच्या बाबतींत आम्ही तुमच्यावर जी मेहेरबानी दाखवावयाची, तीहि मग आम्हांला दाखवितां येणार नाहीं! आणि म्हणून मला तुम्हांला शेवटीं निक्षून असें सांगितलें पाहिजे कीं, उद्यांचे दिवसांत बाजीरावसाहेब माझ्या छावणींत येऊन दाखल झाले नाहींत, तर मी तुमच्याबद्दल कांहींएक पर्वा करणार नाहीं, व तुमच्या जहागिरीच्या प्रश्नाबद्दलहि मी बिलकुलसुद्धां विचार करणार नाहीं!" या आयागोच्या

सारख्या भाषणांत मालकमसाहेब कशा उलटयां सुलटया कोटया करीत होते आणि कसे डावपेंच लढवीत होते, हें कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे. हल्लींचे अधिकारी नेमस्तांना हाताशीं धरून त्यांच्याशीं अगदीं अशीच भाषा बोलत असतात. फितुरीकडे मन वळविण्याची ही सभ्यपणाची आणि प्रतिष्ठितपणाची पद्धत होय. व या पद्धतीनें पुष्कळ लोकांना शिष्टपणानें फसविण्याला अवघडाहि जात नाहीं. यांत चांगल्या सद्गुणाच्या नांवाखालीं फितुरी खजरोसपणें बोलतां येते! आणि स्वार्थ व परमार्थ दोन्हीहि बुडविण्यापेक्षां परमार्थ साधत नसेल तर स्वार्थ तरी कां बुडवावा, अशा खोटया कोटिक्रमाच्या खड्ड्यांत या योगानें भोळसर मनुष्य अगदीं अनायासानें येऊन पडतो! ही साखर पेरून फसविण्याची आणि आमिष दाखवून जाळ्यांत गुंतविण्याची इंग्रजी पद्धत खरोखरच फार चांगली आहे! परंतु सुदैवानें बाजीरावाचे सरदार मात्र या जाळ्यांत या युक्तीनेंहि सांपडेनात! म्हणून मग मालकमसाहेबांनीं त्यांना आणखीहि धाकदपटशा देण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले:— "तुमची स्वतःची फारशी किंमत आहे असें नाहीं; परंतु हल्लीं तुम्ही आपल्या धन्याच्या जवळ आहांत यामुळें तुम्हाला एक प्रकारचें महत्त्व आलेलें आहे; पण त्याचा उपयोग करून तुम्ही आपल्या दृढ निश्चयानें आणि सदुपदेशानें आपल्या धन्याचें मन वळविलें, तर त्यांत कांहीं तरी फायदा आहे; परंतु त्याचा कांहीं एक उपयोग न करितां तुम्ही आपल्या धन्याचें आणि आपलें स्वतःचेंहि नुकसान करून घेतलें, तर मग उद्यां तुम्हांला कोण विचारणार आहे!" अशा प्रकारचीं संभाषणें तारीख २ जून रोजीं रात्रीं बाजीरावाकडील वकील आणि मालमसाहेब यांच्या दरम्यान चाललीं असतां बरीच रात्र झाली. ११ वाजून गेले. तेव्हां बाजीरावांचे वकील आपल्या छावणीकडे परत जाण्याकरितां निघाले. त्या वेळीं मालकमसाहेबांनीं त्यांना जातां जातां आणखी एक नवीन धमकीच्या मात्रेचा वळसा दिला! ते म्हणाले कीं, "मी भेटावयाच्या छावणींत येऊन पोंहोचल्यानंतर दुसऱ्या दिवशीं बाजीरावसाहेबांनीं आपलें कांहीं जडजवाहीर आणि सामानसुमान अशिरगडच्या किल्ल्यांत पाठवून दिलें असल्याचें मला कळलें आहे; व त्यावरून त्या किल्ल्याचा

आश्रय घेण्याचा बाजीरावसाहेबांचा विचार असल्याचें उघड दिसत आहे. परंतु तुम्ही जर त्यांना तसें करूं द्याल, तर तुम्ही आणि तुमचीं माणसें ह्यांच्यावर काय प्रसंग कोसळेल, हें मला सांगतां येत नाहीं ! "

ही धमकी देऊन झाल्यानंतर बाजीरावाचे वकील रातोरात आपल्या छावणीकडे परत जाऊं लागले. तेव्हां आतांपर्यंत चालविलेल्या एकापुढील एक साळसूदपणाच्या डावपेचांनीं तृप्त न होऊन मालकमसाहेबांनीं आणखी एक शेवटची लबाडी केली, व मागच्या सगळ्या फितूर करण्याच्या अनेक युक्त्यांवर त्यांनीं हा शेवटचा कपटीपणाचा कळस चढविला. त्याची हकीकत अशी आहे. आदल्या दिवशीं तयार करून स्वाधीन होण्याच्या अटींचा जो एक खलिता बाजीरावसाहेबांकडे पाठविण्यांत आला होता, त्यांत बाजीरावसाहेब २४ तासांच्या आंत आपल्या स्वाधीन झाले, तर त्यांच्या सरदारांच्या जहागिरी वगैरे कायम ठेवण्यांत येतील, असें एक सरदारांच्या तोंडाला पाणी सुटाविणारें कलम घालून ठेविलेलें होतें, हें मागें सांगितलेलेंच आहे. त्या खलित्याची एक प्रत मालकमसाहेबांच्या एका कारकुनानें चोरून पेशव्यांच्या वकिलांस पाहण्याकरितां म्हणून दिली; व ही प्रत मी तुम्हांला मालकमसाहेबांच्या नकळत चोरून दाखवीत आहें, असाहि त्या कारकुनानें बहाणा केला ! छावणींतून बाहेर जातां जातां त्या कारकुनानें दिलेली ती त्या खलित्याची नक्कल बाजीरावाच्या वकिलांनीं वाचून पाहिली; व ती ते वाचीत असतांना त्यांच्या चेहऱ्यावर काय परिणाम होतो हें तो कारकून लक्षपूर्वक रीतीनें पहात होता ! तेव्हां त्या खलित्यांत बाजीरावाच्या सरदारांच्या संबंधानें जें कलम होतें, तें वाचीत असतांना त्यांना समाधान वाटलें, असें त्यांच्या चेहऱ्यावरून त्या कारकुनास दिसलें ! ती प्रत वाचून झाल्यावर पेशव्यांचे वकील पेशव्यांच्या छावणीकडे गेले आणि मालकमसाहेबांचा पोपट मालकमसाहेबांकडे आला ! त्या कारकुनानें एवढा वेळपर्यंत हें जें नाटक केलें तें सर्व मालकमसाहेबांच्या शिकवणीवरूनच केलेलें होतें ! मी हा गुप्त कागद मालकमसाहेबांच्या न कळत चोरून तुम्हांला दाखवीत आहें हें सगळें खोटें असून तूं हा कागद दाखवून त्यांच्या मनावर त्यांतील कलमांचा काय परिणाम होतो तो पाहून मला कळव, असें खुद्द मालकमसाहेबांनींच त्याला

सांगितलें होतें; व ही गोष्ट त्यांनीं आपल्या तोंडानें कबूलहि केली आहे! जे बाजीरावसाहेब मालकमसाहेबांना आपले दोस्त म्हणून म्हणत होते, त्यांच्या संबंधानें त्यांचे हे दोस्त ही लबाडीची युक्ति योजीत होते, हें पाहिलें, म्हणजे कोणालाहि असल्या कपटी आचरणाची किळस आल्यावांचून राहणार नाहीं! असल्या लबाड्या करण्यांत कांहीं नैतिक कमीपणा आहे आणि तो आपल्या मोठेपणाला आणि बाह्यात्कारी प्रामाणिकपणाला शोभण्यासारखा नाहीं, ही कल्पनाही कित्येकांच्या डोक्यांत येत नाहीं!

यानंतर बाजीरावसाहेबांच्या मनावर जास्त दहशत बसविण्याकरितां आणि त्यांचें मन जास्त घाबरवून सोडण्याकरितां आणि आपण आतां अगदीं निकरावर आलों आहोंत असें भासविण्याकरितां मालकमसाहेबांनीं आणखीहि एक युक्ति योजण्याचा निश्चय केला! मेटावलच्या छावणींत मालकमसाहेब मे महिन्याच्या अखेरीस अखेरीस येऊन राहिले, त्या वेळीं आपल्यावर बाजीरावसाहेबांचा विश्वास बसावा व आपल्या छावणींतील आपल्या हालचालींच्या सर्व बातम्या बाजीरावसाहेबांना कळविण्याला आपली कांहीं एक हरकत नाहीं असें दिसावें, म्हणून मालकमसाहेबांनीं बाजीराव साहेबांच्या बातमीदारांना मुद्दाम बोलावून आणून आपल्या छावणीमध्यें ठेवून घेतलें होतें; व त्यांनीं डाक ठेवून मालकमसाहेबांकडील खबर—बात आपल्या हलकाऱ्यांबरोबर बाजीरावाकडे खुशाल राजरोसपणें पाठवावी, अशी तजवीज केली होती. ह्या दिखाऊ उदारपणाचा आणि मोकळेपणाचा जितका फायदा घ्यावयाचा तितका घेऊन झाल्यानंतर मालकमसाहेबांनीं त्याच गोष्टीचा आतां दुसऱ्या बाजूनें फायदा घेण्याची युक्ति योजिली! मालकमसाहेबांनीं त्या बाजीरावाच्या बातमीदाराला बोलावून आणून असें सांगितलें कीं, "आम्ही मोठ्या उदार मनानें आणि मोकळेपणानें तुम्हांला आमच्या छावणींतून एवढा वेळपर्यंत बातम्या पाठविण्याची परवानगी दिली होती. परंतु बाजीराव साहेबांना जर आमच्या अटी पसंत होत नसतील, तर आतां यापुढें तुम्हांला येथें राहूं देणें बरोबर नाहीं. म्हणून तुम्हीं इतःपर माझ्या छावणींत न राहतां येथून आतांच्या आतां निघून जावें. व मीहि उद्यां सकाळीं या छावणींतून निघून खैरीच्या मैदानावर येत आहें. आणि बाजीराव-

साहेबांच्या मनांतून जर आमच्या अटी मान्य करावयाच्या असतील, तर त्यांनीं तेथें मला १२ वाजेपर्यंत येऊन भेटलें पाहिजे ! आणि तसें झालें नाहीं, तर ईशान्येच्या बाजूनें कर्नल रसेल यांनीं त्र्यंबकजी डेंगळ्यांच्या लोकांवर आणि पिछाडीकडून बऱ्हाणपूरच्या बाजूनें ब्रिगेडियर जनरल डोव्ह-टन यांनीं बाजीरावांच्या लोकांवर हल्ला करावा, असेंहि मी आपल्या लष्करी लोकांना हुकूम दिलेले आहेत ! व ही बातमी तुम्ही बाजीरावसाहे-बांना कळवावी, अ ी माझी इच्छा आहे !" असें सांगून माल्कमसाहेबांनीं त्या बातमीदारांना आपल्या छावणींतून काढून बाजीरावाकडे मुद्दाम परत पाठविलें. या त्यांच्या कृत्यांतील आणि रागाच्या खोट्या आविर्भावांतील बाजीरावसाहेबांना घाबरवून टाकण्याचा हेतु अगदीं स्पष्ट होता. अशा रीतीनें हा आणखी एक शह माल्कमसाहेबांनीं बाजीरावांच्या हालचालींवर चालू केला.

ह्या सगळ्या एकापाठीमागून एक रचल्या जाणाऱ्या कारस्थानांचा बाजीरावसाहेबांच्या मनावर व्हावयाचा तो परिणाम होतच होता. त्यांचें मन अगदीं गोंधळून गेलें होतें व आतां आपण काय करावें हें त्यांना कांहीं सुचेनासें झालें होतें. माल्कमसाहेबांच्या मागणीप्रमाणें त्यांनीं ता ३ जून रोजीं इंग्लिशांच्या छावणींत येऊन स्वाधीन व्हावयाला पाहिजे होतें; परंतु बाजीरावांच्या धार्मिक दृष्टीनें त्या दिवशीं कांहीं कुयोग होता व त्या दिवशीं त्यांचीं कांहीं धार्मिक कृत्येंही व्हावयाचीं होतीं. म्हणून त्या दिवशीं जाण्याचा बेत रहित करावा अशी त्यांची इच्छा होती. ही बातमी लेफ्टेनंट लो ह्यांच्या मार्फत जेव्हां माल्कमसाहेबांना कळली, तेव्हां आपण घातलेला घाट चांगलासा जमत नाहीं आणि आपल्या म्हणण्याप्रमाणें बाजीरावसाहेब आपल्या छावणींत येऊन ताबडतोब आपल्या स्वाधीन होत नाहींत, असें दिसून आल्यावरून माकमसाहेबांनीं आणखी एक युक्ति योजिली ! बाजीरावसाहेब येत नाहींत, यामुळें आप-ल्याला अतिशय संताप आलेला आहे, असा रागाचा आविर्भाव आण-ण्याचा त्यांनीं निश्चय केला ! माल्कमसाहेबांची छावणी आणि पेश-व्यांची छावणी यांच्या दरम्यान मधल्या वाटेवर मुद्दाम पेशव्यांकडच्या बातम्या वगैरे समजण्याकरितां लेप्टेनंट लो ह्यांची छावणी ठेवण्यांत

आलेली होती. त्यांना मालकमसाहेबांनीं असा निरोप पाठविला कीं, पेशव्यांकडील कोणीहि लोक आतां निरोप घेऊन आले, तरी तुम्ही त्यांना इकडे येऊं देऊं नये ! व मालकमसाहेब आतां रागावलेले असल्यामुळें त्यांनीं पेशव्यांकडील लोकांना बंदी केली आहे असें सांगावें ! व ही बंदी खरोखरच केली आहे असें भासविण्याकरितां व त्याची बातमी बाजीरावांच्या कानांवर जाऊन पोंचविण्याकरितां आपल्या छावणीच्या रस्त्यावर त्यांनीं कित्येक घोडेस्वारही उभे करून ठेवण्याचा हुकूम सोडला ! आपण रागावलों आहोंत, ही बातमी अशा रीतीनें कर्णोपकर्णीं बाजीरावसाहेबांच्या कानावर जावी, एवढ्याच हेतूनें हीं सगळीं ढोंगें उभारण्यांत आलेलीं होतीं ! यावरून आपलें कार्य साधण्यासाठीं खोट्या रागाचा आवेशही इंग्लिश लोक बरकरणी कसा आणतात, हें दिसून येण्यासारखें आहे.

अशा प्रकारची योजना करून मालकमसाहेब ता. ३ जून रोजीं सकाळीं सहा वाजतां आपल्या छावणींतून निघाले आणि खैरीच्या मैदानावर सुमारें ९ वाजतां येऊन पोंचले. त्या वेळीं पेशव्यांकडील आनंदराव यशवंत चंदीचंदावरकर हे अतिशय भीत भीत मालकमसाहेबांना भेटण्याकरितां आले, व आजचा वाईट दिवस असल्यामुळें बाजीरावसाहेब आज येऊं इच्छित नाहींत असें त्यांनीं सांगितलें. "ते आज आले नाहींत, तर आजचा दिवस त्यांना जास्त वाईट होईल !" असें मालकमसाहेबांनीं त्यावर उत्तर दिलें. त्यानंतर आनंदराव म्हणाले कीं, "त्यांना इकडे येण्याला फार भीति वाटत आहे. तेव्हां त्यांना धीर देण्याकरितां तुमच्याकडील कोणी तरी मनुष्य तुम्ही पाठवा." यावर मालकमसाहेबांनीं विचारिलें कीं, "त्यांना कसली भीति वाटत आहे ! मी ज्या अटी पाठविल्या आहेत, त्या त्यांना कबूल नाहींत का ?" "त्या त्यांना कबूल होतील" असें आनंदरावांनीं सांगितलें. "मग त्यांना कसली भीति वाटत आहे ? मी कांहीं विश्वासघात करीन, अशी क त्यांची कल्पना आहे ?" असें मालकमसाहेबांनीं रागानें विचारलें. त्यावर आनंदरावांनीं असा खुलासा केला कीं, "तुम्ही विश्वासघात कराल ही त्यांना भीति नाहीं; परंतु ते तुमच्याकडे

आले, म्हणजे कदाचित् तुम्हांस गव्हर्नर जनरलच्या हुकूम असल्यास तुम्ही त्याप्रमाणें त्यांच्यावर चौकीपहारे बसवाल, आणि असें झालें तर ही आपली मानखंडना होईल, असें त्यांना वाटत आहे. यावर मालकम साहेबांनीं आनंदरावांना तावडतोब असा जबाब दिला कीं, "तुम्ही आतांच्या आतां माघारे जा आणि बाजीरावसाहेबांना माझा असा निरोप सांगा कीं, गव्हरनर जनरलचा मला असा कोणताही हुकूम नाहीं, व असें माझ्या हातून कांहीं एक होणार नाहीं. तुम्हांला ज्या अटी हल्लीं नमूद करण्यांत आल्या आहेत, त्या उदारपणाच्या आहेत. पण तुम्ही त्या आतां कबूल केल्या नाहींत, तर पुढें तुम्हांला कांहीं एक मिळणार नाहीं!" हा निरोप घेऊन आनंदराव यशवंत हे तावडतोब घोड्यावर बसून माघारे गेले. त्यांच्याबरोबर बाजीरावसाहेबांचें मन वळवून त्यांना आपल्या छावणींत लवकर घेऊन येण्याकरितां मालकम-साहेबांनीं आपल्या जवळचा आणखी कोणी एक ब्राह्मण इसमहि पाठविला होता, व त्याच्याबरोबर त्यांनीं असाहि एक निरोप पाठविला होता कीं, पेशव्यांच्या बरोबर थोड्याशा मराठे सरदारांनीं मात्र यावें आणि त्यांच्या खेरीज दुसऱ्या कोणीहि येतां कामा नये!

आनंदराव यशवंत यांनीं आणलेला हा निरोप ऐकून बाजीराव-साहेबांचें मन मालकमसाहेबांच्या छावणींत त्याच दिवशीं तावडतोब जाण्याकडे हळुहळु वळत चाललें होतें. परंतु इतक्यांत अशीरगडच्या किल्ल्याच्या बाजूनें कांहीं तोफांचे आवाज ऐकूं आले! बाजीरावसाहे-बांचे पिछाडीला बऱ्हाणपुरच्या आणि अशीरगडच्या बाजूला ब्रिगेडियर जनरल डोव्हटन यांची पलटण चाल करून आलेली होती हें सांगितलें आहे. त्यांच्याकडून आपल्यावर हा हल्ला होत आहे कीं काय, अशी वरील तोफांचे आवाज ऐकून बाजीरावसाहेबांना धास्ती वाटूं लागली. व त्यामुळें आतां मालकमसाहेबांच्या छावणींत जाऊन त्यांच्या स्वाधीन होण्याशिवाय दुसरा मार्ग व उरलेला नाहीं, असें त्यांच्या मनाला वाटून त्यांनीं माल-कमसाहेबांकडे जाण्याचा निश्चय ठरविला, व त्याप्रमाणें बाजीरावसाहेब ता. ३ जून १८१८ रोजीं सकाळीं सुमारें ११ वाजतां मालकमसाहेबांच्या छावणींत येऊन दाखल झाले!

अशी ह्या दुःखकारक प्रसंगाची दुःखकारक हकीकत आहे. त्याची आठवण झाली असतां कोणत्याहि महाराष्ट्रीयाच्या मनाला दुःख झाल्यावांचून रहावयाचें नाहीं. म्हणून असले शोकजनक प्रसंग जितके स्मरणांतून निघून जातील, तितके ते चांगलेच! तरी पण इंग्रज लोकांचीं बाहेरचीं सभ्य आचरणें आणि आंतील कुटिल कारस्थानें कशीं असतात हें मालकमसाहेबांच्या उदाहरणावरून दाखविण्याला हा प्रसंग उपयोगी असल्यामुळें त्याचें या ठिकाणीं अशा रीतीनें विस्तृतपणानें वर्णन करण्यांत आलेलें आहे.

---

# शब्दांच्या वाढीचा इतिहास.

या एकंदर सृष्टीचे जड आणि चेतन असे दोन विभाग आहेत. यांपैकीं पहिल्यानें कोणते उत्पन्न झाले आणि मागून कोणते निर्माण करण्यांत आले, हें सांगणें कठिण आहे. स्थूल आणि जड सृष्टीमधून उत्क्रांति होत होत अखेरीस चैतन्य हा धर्म उत्पन्न झाला किंवा सूक्ष्म चैतन्यापासून स्थूलत्व जास्त जास्त वाढत जातां जातां अखेरीस जड सृष्टीमध्यें त्याचें पर्यवसान झालें, हे प्रश्न फार बिकट आहेत, व ते अद्यापि कोणाला समाधानकारक रीतीनें सुटलेले नाहींत. पूर्णतेला पोहोंचलेल्या वर्तुळांतील प्रारंभींचा आद्य बिंदु कोणता, हें सांगणें जसें अशक्य आहे, त्याचप्रमाणें वरील गोष्टींचा उलगडा करणें अशक्य आहे. तरी पण समजुतीच्या सोईसाठीं कित्येकांच्या धर्मग्रंथांतून अमुक वस्तु पहिल्यानें निर्माण झाली, मग तिच्या पाठीगून दुसरी वस्तु निर्माण झाली, अशा

प्रकारचा क्रम सांगण्यांत येतो. बायबलमध्यें हें क्रमवारीचें वर्णन आलेलें असल्याचें पुष्कळांना माहीतच आहे. परंतु असले क्रम हे अगदीं चुकीचे व तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें अगदीं उपहासास्पद आहेत, हें कोणालाही सांगण्याची अवश्यकता आहे असें नाहीं. आपल्यामध्येंही श्रुतींतून, स्मृतींतून आणि पुराणांतून कित्येक ठिणाणीं अशीं पौर्वापर्यबोधक सृष्टीच्या उत्पत्तीचीं क्रमविशिष्ट वर्णनें आलेलीं नाहींत असें नाहीं; परंतु तीं वर्णनें केवळ निदर्शनासाठीं म्हणून दिलेलीं होत. आपल्याकडील पूर्वीचे तत्त्ववेत्ते अलीकडच्या कांहीं थोड्याशा पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांपेक्षां फार सूक्ष्म दृष्टीचे आणि दूर दृष्टीचे विवेचक होते. सृष्टीचा प्रारंभ हा जर खरोखर मानिला, तर पुष्कळ अनिष्टापत्ति प्राप्त होतील, ही अडचण त्यांच्या लक्षांत केव्हांच आलेली होती; आणि म्हणून तर त्यांनीं या संसाराचें आणि सृष्टीचें, इतर आणखी कांहीं गोष्टींप्रमाणें, एक चक्र बनवून टाकलें आहे; आणि बायबलांतल्या सात दिवसांच्या सृष्टीचें अडाणी तत्त्वज्ञान अस्तित्वांतही आलें नव्हतें, त्याच्या आधींपासून त्यांनीं जगाला हें जाहीर करून ठेविलें आहे कीं, या जगाच्या चक्राला उत्पत्तिही नाहीं आणि अंतही नाहीं. सृष्टीच्या अनादित्वाचें हें उत्कृष्ट आणि बाधरहित तत्त्व आपल्या इकडील तत्त्ववेत्त्यांनीं प्रस्थापित करून बाकीच्या अल्पज्ञ लोकांकरितां पुन्या झालेल्या वर्तुळाच्या सुरवातीचा बिंदु शोधून काढण्याच्या कामाचा दरवाजा खुला ठेविला आहे!

सारांश, तत्त्वज्ञानाच्या सोईच्या दृष्टीनें हें जग अनादि आहे हा सिद्धांत आबाधित होय. परंतु व्यवहाराच्या सोईच्या दृष्टीनें कधीं कधीं गौणत्वानें सृष्टीच्या प्रारंभाची कल्पना करण्यांत येते; व सृष्टींतील निरनिराळ्या पदार्थांच्या उत्पत्तीचे क्रम प्रतिपादित करण्यांत येतात; आणि आपल्या इकडच्या श्रुतिस्मृत्यादिक ग्रंथांमधून जीं क्रमाचीं वर्णनें कित्येक ठिकाणीं आढळतात, तीं अशाच दृष्टीनें दिलेलीं होत, हें उघड आहे. अशा दृष्टीनें सृष्टीची जी उत्पत्ति सांगण्यांत येते, त्यांत एकेक जड वस्तु एकामागून एक निर्माण करण्यांत आल्या, असें सांगण्यांत येतें. आणि त्यांच्या पाठीमागून सचेतन मनुष्य प्राणी निर्माण केला गेला, असें प्रतिपादन केलेलें आढळतें. ही जी एकंदर जड सृष्टि हीच

आधिभौतिक सृष्टि होय, आणि सचेतन मनुष्याचा प्रांत हा अध्यात्म सृष्टीचा प्रांत होय. आधीं निर्माण झालेल्या जड सृष्टीच्या या आधिभौतिक प्रांताच्या मध्यभागीं उभा राहून जेव्हां मनुष्यप्राणी त्या आपल्या भोंवतीं आसमंतात् पसरलेल्या जड वस्तूंच्या अफाट विस्ताराकडे पहिल्यानें पाहूं लागला असेल, तेव्हां त्याच्या अंतःकरणामध्यें किती आश्चर्य उत्पन्न झालें असेल! पण अंतःकरणांत खेचून भरलेलें आश्चर्य म्हणजे कांहीं एखादी निरुपद्रवी गोष्ट नव्हे. एखाद्या भाड्यांत ठासून भरलेली दारू ही जशी स्फोट पावून आवाज उत्पन्न करिते, त्याचप्रमाणें त्या पहिल्या अंतःकरणांत उत्पन्न झालेल्या त्या पहिल्या आश्चर्यापासून स्फोटरूपी ध्वनि उत्पन्न झाला असला पाहिजे! हाच पहिला शब्द होय. अशा रीतीनें उत्पन्न झालेला हा पहिला ध्वनि पुढें जगाच्या व्यवहारामध्यें शब्दाच्या रूपानें नाना प्रकारचीं कार्यें करूं लागला. आपल्या भोंवतीं पसरलेल्या असंख्य जड वस्तूंना व्यवहारासाठीं निरनिराळीं नांवें देण्याची अवश्यकता मनुष्याला उत्पन्न झाली, व तो आपल्या बुद्धीच्या मगदुराप्रमाणें नवीन नवीन शब्द निर्माण करूं लागला. आपल्या उपनिषदांमधून "नामरूपे व्याकरवाणि" इत्यादि वाक्यांतून याच नामकरणाच्या विधीचा उल्लेख करण्यांत आलेला आहे. बायबलामध्येंहि जड सृष्टीच्या उत्पत्तीनंतर जो मनुष्य अस्तित्वांत आला, तो त्या जडवस्तूंना त्यांचीं निदर्शक अशीं नांवें देऊं लागला, असें वर्णन आढळतें. या आद्यकालीन उल्लेखावरून मनुष्याच्या सृष्टीनंतर त्याच्याकडून शब्दांच्या सृष्टीला कशी सुरुवात झाली असावी आणि तिची कशी वाढ होत गेली असावी याची कोणालाहि सहज कल्पना करितां येईल! मनुष्य जेव्हां आपल्या भोंवतालच्या पदार्थांना पहिल्यानें नांवें देऊं लागला असेल, त्या वेळेला त्याच्या त्या नांवांच्या शब्दांची संख्या अल्प असणें हें अगदीं साहजिक आहे; व त्याची बुद्धिमत्ता आणि त्याच्या गरजा ह्या जसजशा वाढत चालल्या, तसतशी त्याच्या शब्दांची संख्याही वाढत गेली असली पाहिजे, हेंही उघड आहे. या सृष्टींतील परमेश्वरानें निर्माण केलेल्या निरनिराळ्या वस्तूंची संख्या ही बहुतेक नेहमींचीच कायम आहे. व ती आज जितकी आहे तितकीच बहुतेक पूर्वींही होती आणि पुढेंही बहुतेक तितकीच

कायम राहील. त्यांतल्या कांहीं वस्तु मनुष्य विसरतो आणि कांहीं त्याला नवीन उपलब्ध झाल्या अशा वाटतात. परंतु वास्तविक पाहिलें असतां सृष्ट पदार्थांची संख्या ही सदोदित सारखीच कायम असते. परंतु मनुष्य मात्र प्रारंभीं प्रारंभीं या इतक्या सगळ्या असंख्य सृष्ट पदार्थांना नांवें देण्याच्या कठिण कामामध्यें अगदीं दुर्बळ व कमकुवत असतो. अगदीं पहिल्या मनुष्याच्या शब्दांची संख्या अगदीं थोडी! रानटी अवस्थेमध्यें राहणाऱ्या रानटी लोकांच्या शब्दांचीही संख्या त्याचप्रमाणें फार नियमित असते. त्यांना स्वाभाविकपणेंच फार थोडया वस्तूंची जरूरी लागते. पण आपल्याला जरूर लागणाऱ्या वस्तूंना नांवें देण्याइतके शब्द शोधून काढण्याला देखील ज्यांच्या अप्रबुद्ध बुद्धीला पंचाईत पडते, ते लोक अनवश्यक वस्तूंच्या नांवांचे शब्द शोधून काढण्याची रिकामी उठाठेव कशाला करीत बसतील? या कारणामुळें अगदीं पहिल्या रानटी मनुष्यांचा शब्दसंग्रह सहजच अगदीं अल्प असतो.

असंख्य सृष्ट पदार्थांचा समुद्र सभोंवार पसरलेला व त्यांत शब्दांच्या अभावीं जिव्हा असूनही मुका बनलेला मनुष्य वेडा होऊन गेलेला, अशी पहिली स्थिति असते. या स्थितींत परमेश्वराच्या सृष्टीची विलक्षण संपत्ति आणि मनुष्याच्या मतीचें दारिद्र्य हीं दोन्ही तुलनेनें चांगलीं व्यक्त होत असतात. या दारिद्र्याच्या अवस्थेंतून आपलें डोकें वर काढून आपण शब्द-संपत्तीमध्यें श्रीमंत झालें पाहिजे, ही तळमळ मनुष्याच्या मनाला या स्थितींत लागूं लागते, आणि तो आपले शब्दसंग्रह विस्तृत करण्याच्या प्रयत्नाला सुरवात करतो. पण मनुष्यानें कितीहि प्रयत्न केले आणि त्यानें आपले शब्द कितीहि वाढविले, तरी तो आपल्या डोक्यानें परमे-श्वराच्या शक्तीशीं टक्कर देण्याला आणि आपल्या शब्दांनीं परमेश्वराच्या सृष्टी-तील सगळे पदार्थ व्यापून टाकण्याला कधींहि समर्थ होणार नाहीं. हल्लींच्या काळांतील जो मनुष्य आपल्याला अतिशय सुधारलेला असें समजत असतो, आणि आपण सुधारणेच्या आणि उत्क्रांतीच्या अगदीं कळसाला पोहों-चलों आहों असें मानीत असतो, त्याच्यापाशीं देखील ज्यांना लावण्याला योग्य शब्द नाहींत, अशा किती तरी वस्तु या परमेश्वराच्या जगामध्यें आहेत! त्यांच्या मानानें पाहिलें, तर हा हल्लींच्या काळांतील सुधारलेला

मनुष्य देखील अगदीं रानटीच होय ! मग हा हल्लींचा सुधारलेला रानटी मनुष्य ज्या पूर्वींच्या रानटी मनुष्याला स्वतःच्या ज्ञानाच्या घमेंडीनें रानटी समजतो, त्याच्या अज्ञानाची आणि अल्पज्ञत्वाची दुर्दशा तर विचारावयालाच नको !

या पहिल्या रानटी मनुष्याच्या सभोंवती " आम्हांला आमच्या नांवांचे शब्द दे ! " " आम्हांला आमच्या नांवांचे शब्द दे ! " असा आक्रोश करीत असलेल्या असंख्य वस्तूंचा गराडा पडलेला असतो; आणि " आम्हांला खावयाला अन्न दे ! " " आम्हांला खावयाला अन्न दे ! " असें ओरडत सुटलेल्या दुष्काळग्रस्त प्रजेच्या किंकाळ्यांनीं ज्याप्रमाणें एखादा प्रजाधिपति गांगरून गेलेला असतो, त्याप्रमाणें त्या मनुष्याची स्थिति होते. इतके असंख्य पदार्थरूपी लोक मागणेकरी, आणि याच्यापाशीं त्यांना शब्दाच्या रूपानें द्यावयाला एक फुटकी कवडीही नाहीं, अशी नादारीची आणि अठराविश्वे दारिद्र्याची स्थिति त्याला प्राप्त होते. अशा या केविलवाण्या प्रसंगांतून बाहेर पडण्याकरितां मनुष्य कसकशा युक्त्या उपयोगांत आणीत असतो, याचें अवलोकन करणें फार मनोरंजक आहे.

शब्दाचें उत्पत्तिस्थान म्हणजे जिव्हा होय. परंतु या वागिंद्रियाच्या अंगीं आरंभीं अनेक शब्द उत्पन्न करण्याची अद्यापि शक्ति आलेली नसल्याकारणानें तें इंद्रिय दुसऱ्या इंद्रियांची मदत घेऊन कसें तरी आपलें काम उरकून घेण्याचा प्रयत्न करूं लागतें. अशा स्थितींत शब्दांच्या अभावीं मनुष्य पायांनीं बोलण्याचा प्रयत्न करतो, हातांनीं बोलण्याची खटपट करतो आणि डोळ्यांनांही आपल्या मदतीला बोलावण्याला तो मागें पुढें पहात नाहीं. ज्या वस्तु त्याच्यापासून बऱ्याच लांब असतील त्यांच्याजवळ पायांनीं चालत जाऊन तो त्या वस्तु दुसऱ्याला दाखवितो; ज्या जवळ असतील त्यांच्याकडे तो हातानें बोट करून दाखवितो; आणि ज्या त्याहूनही जवळ असतील त्यांना उद्देशून तो मानेनें किंवा डोळ्यानें सूचना करितो. हेही सगळे मनुष्याच्या पहिल्या कोशांतील अनभिलिखित आणि अनुच्चारित असे एक प्रकारचे शब्दच होत ! हे जे शब्द मनुष्याच्या कोशसंग्रहांत एकदां पहिल्यानें

शिरले, ते तेथें कायमचेंच बिऱ्हाड देऊन राहिलेले आहेत आणि त्यांच्या जागीं जरी आतां त्यांचे वाचक असे स्पष्ट शब्द निर्माण झालेले आहेत, तरीही ह्या नानाविध अभिनयांनीं आपलें एकदां बळकाविलेलें स्थळ आणि महत्त्व आपल्या कबजांत कायम राखून ठेविलें आहे.

आकड्यांच्या भाषेमध्यें प्रमाण मांडतां येण्याकरितां आपण जर अशी कल्पना केली कीं, जगाच्या प्रारंभीं परमेश्वरानें निर्मिलेल्या वस्तूंची संख्या—कांहीं तरी—, उदाहरणार्थ, शंभर होती, तर त्या वेळीं पहिल्यानें मनुष्याच्या जवळची तद्वाचक शब्दांची संख्या शून्य होती; म्हणजे ० : १०० असें पहिलें प्रमाण होतें. हें प्रमाण मनुष्य हळुहळु बदलूं लागला. त्यानें निरनिराळ्या तत्त्वांवर निरनिराळ्या वस्तूंना निरनिराळे शब्द लावण्याचा संकेत सुरू केला. निरनिराळे स्वर आणि निरनिराळीं व्यंजनें यांच्या उलट्या सुलट्या मिश्रणानें एकमेकांपासून विभिन्न असे निरनिराळे ध्वनि उत्पन्न करण्याची कला त्यानें शोधून काढिली व उपयोगांत आणिली. या कल्पनेच्या खाणींतून त्याला निरनिराळीं शब्दरत्नें सांपडूं लागलीं व त्यांच्यावर तो आपला चरितार्थ चालवूं लागला. व्याकरणशास्त्रामध्यें सर्व शब्दांच्या मुळाशीं कोणता तरी धातु असतो, आणि अशा प्रकारच्या धातूंपासून सर्व शब्द उत्पन्न झालेले आहेत, असें सांगण्यांत येतें; आणि नुसतें असें सांगण्यांत येतें, इतकेंच नव्हे, तर बरेच साधित शब्द अमुक अमुक धातूपासून साधलेले आहेत, असें व्युत्पत्तीनें सिद्धही करून देण्यांत येतें. परंतु आपण ज्या प्राथमिक अवस्थेमध्यें जाऊन या शब्दशास्त्राच्या उत्पत्तीचा विचार करीत आहों, त्या ठिकाणीं सर्व शब्द धातुजन्य असले पाहिजेत, ही वैयाकरणांची उपपत्ति सयुक्तिक रीतीनें फारशी लागू पडत नाहीं. कारण, पहिल्या रानटी अवस्थेमध्यें जेव्हां मनुष्य असेल, तेव्हां तो कोणते शब्द पहिल्यानें साहाजिकपणें उत्पन्न करील? पदार्थवाचक किंवा धातुवाचक? त्याच्या पहिल्या गरजा म्हटल्या म्हणजे खाण्यापिण्याच्या, रहाण्याच्या, वगैरे जिनसांच्या ह्याच होत. त्यांचे शब्द तो पहिल्यानें अस्तित्वांत आणील, हें अगदीं स्वाभाविक आणि अवश्यक दिसतें, हें कोणीहि कबूल करील. त्याच्या नजरेपुढें त्याच्या गरजेच्या ज्या अनेक वस्तु दिसत

असतील, त्यांना तो पहिल्यानें नांवें देईल. पाणी पिण्याचे ओढे, मारून खावयाचे पशुपक्षी, सावली देणारीं झाडें, निवाऱ्याच्या कामासाठीं उपयोगी पडणाऱ्या डोंगरांच्या गुहा, इत्यादि त्याच्या जवळच्या आणि जरूरीच्या अनेक गोष्टींनाच तो आधीं नांवें शोधून काढील, हेंच जास्त संभवनीय दिसतें. या वस्तूंच्या शब्दांची जितकी जास्त जरूरी लागते, तितकी धातुवाचक शब्दांची लागत नाहीं. धातु हे नेहमीं क्रियावाचक असतात. इतर शब्दांच्या मानानें एकंदर व्यवहारामध्यें क्रियांची संख्या नेहमींच कमी असते. रानटी मनुष्यांची गोष्ट तर बाजूलाच असो, पण चांगल्या सुधारलेल्या लोकांची भाषा घेतली, तर त्यांत देखील आपल्याला काय आढळून येतें ? एखाद्या सुधारलेल्या माणसाचें एखादें दहा शब्दांचें वाक्य घेतलें, तर त्यामध्यें क्रियेचा द्योतक असा धातुवाचक शब्द एखादाच असतो. आणि बाकीचे नऊ शब्द दुसऱ्या कांहीं तरी पदार्थांचे वाचक असतात. आतां जर चांगल्या सुधारलेल्या माणसांच्या भाषेमध्यें क्रियापदांचें इतर शब्दांच्या मानानें इतकें थोडें प्रमाण आढळतें,तर रानटी मनुष्यांच्या नवीन बनणाऱ्या कोशामध्यें तें प्रमाण वदलणें मुळींच शक्य नाहीं. तेव्हां अशा स्थितीमध्यें सगळे शब्द धातुजन्य असले पाहिजेत, हें वैयाकरणांचें तत्त्व बरोबर रीतीनें लागू पडणें शक्य नाहीं. हें तत्त्व व्याकरणशास्त्रामध्यें शिस्तवारपणा आणि एकसूत्रीपणा उत्पन्न करण्याच्या इराद्यानें मागाहून अंतःप्रमाणांच्या अनुरोधानें किंवा क्वचित् बळजबरीनें अमलांत आणलेलें असलें पाहिजे. व्याकरणशास्त्र हें सुधारणेच्या काळांतील उत्क्रांतीच्या उच्च दर्जावर जात चाललेल्या लोकांचें शास्त्र आणि शस्त्र आहे. या शास्त्रांत सुधारलेल्या लोकांनीं प्राथमिक काळांत नव्हत्या अशा पुष्कळ गोष्टी नवीन उत्पन्न केलेल्या आहेत. व्याकरणशास्त्रांतलि लिंगभेद, सर्वनामांचे उपयोग, विभक्त्यांचे प्रकार, इत्यादि सुधारलेल्या आणि सूक्ष्म विचाराच्या अनेक भानगडी रानटी मनुष्याला क्वचितच अवगत असतात. आणि म्हणूनच उत्क्रांतीच्या मार्गांत मागसलेल्या अशा किती तरी लोकांच्या भाषेमध्यें लिंगांचा घोटाळा, विभक्तिप्रत्ययांचे अभाव, इत्यादि गोष्टी अजूनही आढळून येतात. हे त्यांचे रानटीपणाचे अवशेष होत. व त्यांनीं आपला रानटीपणा कितीही स्वच्छ कपड्यांनीं आणि इतर

साधनांनीं झांकून टाकण्याचा प्रयत्न चालविला असला, तरीही वर दिलेल्या प्रकारचीं सूक्ष्म स्वरूपाचीं घरभेदी चिन्हें त्यांचा अवशिष्ट राहिलेला नैसर्गिक रानटीपणा चव्हाट्यावर आणून मांडल्याशिवाय रहात नाहींत.

असो. या विवेचनावरून हें उघड दिसतें कीं, रानटी मनुष्य हस्तपादादिकांच्या खुणांनंतर कांहीं सांकेतिक ध्वनींच्या खुणांचा आश्रय करतो. हे त्याचे सांकेतिक शब्द होत. अशा अशा अमुक क्रमानें अमुक ध्वनि तोंडावाटे निघाला, म्हणजे त्याचा आपण अमुक अर्थ समजूं, अशा प्रकारचा संकेत रानटी मनुष्यांनीं पहिल्यानें आपल्यामध्यें ठरवून, त्यांनीं आपले पहिले शब्द बनविण्याला सुरवात केली असली पाहिजे. व हे ध्वनि उच्चारतांना त्यांच्या सभोंवतीं चोहोंकडे बोलत, फिरत असलेल्या पशुपक्ष्यांचें त्यांनीं अनुकरण केलेलें असलें पाहिजे. आणि ह्या रानटी मनुष्यांची पहिली भाषा संकेतात्मक असली पाहिजे, हें तत्त्व जर आपण कबूल करूं शकतों, तर पशुपक्ष्यादिकांचीही तशीच कांहीं तरी सांकेतिक भाषा त्यांच्या त्यांच्यामध्यें रूढ असली पाहिजे, हें गूढ मान्य करण्याला आपल्याला फारशी अडचण पडणार नाहीं. अमुक एका तऱ्हेनें मादी ओरडली, म्हणजे तिच्या पिलांनीं त्याचा अमुक अर्थ समजावा, अशा स्वरूपाचे संकेत ठरवून पशुपक्ष्यांनींही आपले व्यवहार जगाच्या प्रारंभापासून आतांपर्यंत चालविले आहेत. व त्यांचेंच अनुकरण करून पहिल्या रानटी अवस्थेंतील मनुष्यांनीं हा संकेताचा प्रघात सुरू केला असला पाहिजे. ' अस्मात् शब्दादयमर्थो बोद्धव्य इति ईश्वरेच्छा संकेतः ' अशी संकेताची व्याख्या आपल्यांतील शब्दशास्त्रवेत्ते देतात. परंतु वस्तुतः हे संकेत बनविण्यांत ईश्वराचा अर्थाअर्थी कांहीं एक संबंध नसतो. या सगळ्या गोष्टी मनुष्यच आपआपसांत ठराव करून आणि त्याप्रमाणें वर्तन करून घडवून आणतात. हल्लींची तारायंत्राची भाषा, दिव्यांच्या किंवा भिंगांच्या हालचालींनीं निरोप कळविण्याची भाषा, हे सगळे संकेतच होत. यांत जसा देवाचा कांहीं एक हात नाहीं, त्याचप्रमाणें मनुष्यांच्या भाषेच्या संकेतामध्येंही देवाचा कांहीं एक संबंध नाहीं. तें सर्व मनुष्यकृत आहे. आतां ईश्वराच्या इच्छेवांचून या

जगांतील पान देखील हलत नाहीं, हा जो सामान्य सिद्धांत आहे, त्याला अनुलक्षून मनुष्याच्या भाषेच्या पहिल्या संकेताला सुद्धां ईश्वरेच्छा हें एक सामान्य आणि साधारण कारण मानावयाचें असेल, तर त्याला हरकत नाहीं.

अशा रीतीनें संकेतानें शब्दांच्या वाढीला सुरवात होते. व एकेका पदार्थावर एकेक शब्द वारंवार होणाऱ्या उपयोगाच्या सामर्थ्यानें रूढ होऊन बसतो. या रीतीनें एकेका पदार्थाला एकेक शब्द मिळण्याची क्रिया सुरू होते. आणि एकेका पदार्थाला दाखविणारा निदान एकेक तरी शब्द मनुष्यापाशीं असला पाहिजे, ही मनुष्याची अवश्यकता आहे. एकेक पदार्थाचें निदर्शक असें एकेक पद असलें, म्हणजे मनुष्याचा व्यवहार साधारणपणें कसा तरी उपपन्न होऊं शकेल. गणिताच्या भाषेंत बोलावयाचें असेल, तर पुन्हा शंभर पदार्थांना शून्य शब्द अशी जी मनुष्याची प्राथमिक अवस्था होती, ती जाऊन तिच्या जागीं शंभर पदार्थांना निदान शंभर शब्द तरी मनुष्याच्याजवळ असणें अवश्य आहे. आपल्या पोटाला पुरेसें अन्न मनुष्याच्याजवळ असलें पाहिजे, त्याला राहण्याकरितां जागा असली पाहिजे, या जशा मनुष्याच्या अवश्यकतेच्या गोष्टी, त्याचप्रमाणें प्रत्येक पदार्थाला त्याचा दर्शक असा निदान एक तरी शब्द असला पाहिजे, हीही अवश्यकतेची गोष्ट होय. ही जरुरीची गरज भागविण्याच्या प्रयत्नांत मनुष्यानें अभिनय आणि संकेत यांच्याशिवाय आणखीहि दुसऱ्या कित्येक युक्त्या उपयोगामध्यें आणिलेल्या आहेत. संकेतानें जे शब्द रूढ झाले, त्या मूळ भांडवलावर मनुष्यानें आपला वाढीदिढीचा व्यवहार आणि व्यापार सुरू केला. एखाद्या सांकेतिक शब्दानें जो पदार्थ दाखविला जाऊं लागला, त्याच्याजवळ दुसरा एखादा पदार्थ असला किंवा स्वरूपानें तत्सदृश असला, तर त्या दुसऱ्या पदार्थाचाही हाच सांकेतिक-शब्द दर्शक होऊं लागला. अशा रीतीनें एका शब्दानें दोन दोन पदार्थ कांहीं तरी निमित्तानें किंवा संबंधानें दर्शविले जाण्याला सुरवात होऊन त्या योगानें एकेका शब्दाला दोन दोन अर्थ मिळूं लागले. कार्यकारण-भाव, अवयवावयविभाग, संनिधान, सादृश्य, नित्यसंयोग, अव्यभिचरित साहचर्य, इत्यादिकांपासून उत्पन्न होणारे लक्षणेचे अनेक प्रकार सुरू झाले; आणि लक्षणेनें शब्दांची व्यापकता जास्त वाढूं लागली.

हा वर सांगितलेला प्रकार नामांच्या उत्पत्तीसंबंधाचा होय. अशाच तऱ्हेनें क्रियापदांचीही उत्पत्ति आणि वाढ होत गेली असली पाहिजे. परंतु या क्रियापदांच्या बाबतीमध्येंही मनुष्यांचे सांकेतिक शब्द थोडे, आणि मनुष्याच्या क्रियांची संख्या जास्त, अशी स्थिति असल्यामुळें एकेक क्रियावाचक शब्दानें निरनिराळ्या अनेक क्रिया दाखविण्याचा प्रचार सुरू झाला असला पाहिजे. व हेंच तत्त्व ' धातूनामनेकार्थत्वात् ' हा जो हेतु वारंवार देण्यांत येतो, त्यांत गोविलेलें आहे.

अशा रीतीनें नामवाचक व क्रियावाचक अशा दोन्ही प्रकारच्या एकेक शब्दाला अनेक अनेक अर्थ देण्याची क्रिया सुरू होऊन, त्या योगानेंही शब्दांची संख्या वाढूं लागली. एका शब्दाला अनेक अर्थ देण्याच्या या क्रियेमध्यें दिसावयाला जरी शब्दांची संख्या प्रत्यक्ष जास्त वाढलेली दिसली नाहीं, तरी जितके निरनिराळे अर्थ त्या शब्दांनीं दाखविले जावयाचे, तितके ते शब्द वास्तविक निरनिराळेच होत. अशा दृष्टीनें त्यांची परिगणना केली असतां, त्या शब्दांची संख्या पर्यायानें वाढलेलीच आहे, असें म्हणण्यास कोणताही प्रत्यवाय नाहीं.

याप्रमाणें एका ठिकाणचा रानटी मनुष्य ज्याप्रमाणें पूर्वी आपला शब्दसंग्रह वाढवीत होता, त्याचप्रमाणें दुसऱ्याही निरनिराळ्या ठिकाणचे रानटी लोक आपापले शब्दसंग्रह वाढवीत असले पाहिजेत; आणि त्यांच्या जेव्हां एकमेकांशीं व्यवहारासाठीं गांठी पडूं लागल्या असतील, त्या वेळीं साहजिकपणेंच एकांचे सांकेतिक शब्द दुसऱ्यांच्या सांकेतिक शब्दांमध्यें मिसळले असले पाहिजेत. आणि यांचा संकेत त्यांनीं उचलावा आणि त्यांच्या संकेताचें ग्रहण यांनीं करावें, अशा प्रकारच्या अन्योन्यविनिमयानेंही प्रत्येकाच्या शब्दसंख्येमध्यें भर पडत गेली असावी.

त्याचप्रमाणें एकदा जरी एखाद्या शब्दाचा सांकेतिक अर्थ ठरला, तरी तो शब्द उच्चारण्याच्या क्रियेमध्यें अनेक नैसर्गिक, स्थानिक अगर दोषमूलक कारणांनीं फरक पडून अशा निरनिराळ्या रीतीनें उच्चारिले गेलेले शब्द हे पर्यवसानीं निरनिराळे स्वतंत्र शब्दच होऊन बसले. असले शब्द हे बहुधा अपभ्रंशाच्या कोटीमध्यें येतात. वयाच्या मानानें लहान मुलें, किंवा संस्काराच्या कमतरतेमुळें स्त्रिया वगैरे, किंवा स्थानिक उच्चार-

पद्धतीच्या भिन्नतेमुळें निरनिराळ्या ठिकाणचे लोक एकच शब्द निरनिराळ्या स्वरूपाचा कसा बनवितात व रूढ करतात, हें आपण हल्लींही पहातों. व हीच क्रिया भाषेच्या आद्यकालीन स्थितीमध्येंही घडून येत असली पाहिजे, अशी कल्पना केल्यास ती असयुक्तिक ठरण्याचें कांहीं एक कारण नाहीं. सारांश, परकीय लोकांपासून घेतलेले शब्द आणि शब्दांचीं अपभ्रष्ट स्वरूपें ह्यांच्या योगानेंही मनुष्याचा कोश वाढत जाऊं लागला.

येथपर्यंत शब्दांच्या वाढीची नैसर्गिक मजल येऊन पोहोंचल्यानंतर याच्या पुढील वाढीला मनुष्याच्या कृत्रिम उपायांनीं पुष्कळ हातभार लाविलेला दिसतो. येथपर्यंत शब्दांची वाढ झाली, म्हणजे याचा अर्थच हा कीं, त्या मानानें मनुष्याच्या डोक्यांतील बुद्धीचीही वाढ झालेली असलीच पाहिजे. आधीं डोक्यांत गरजेमुळें स्फूर्ति उत्पन्न होते आणि नंतर मग ती गरज जिव्हेला बोलावयाला लाविते,हा सामान्य सिद्धांत सदोदित अबाधित आहे. ज्यांच्या डोक्यांत कल्पना थोड्या, त्यांच्या तोंडांत शब्दसंग्रहही थोडाच. आणि त्या डोक्यांतील कल्पना जसजशा वाढत जातील, तसतसा त्या मानानें तोंडांतील शब्दसंग्रहही वाढत गेला पाहिजे. आणि तो शब्दसंग्रह जेव्हां नैसर्गिक रीतीनें जास्त वाढूं शकत नाहीं, तेव्हां तो वाढविण्याकरितां कृत्रिम मार्गांचा उपयोग करण्याची कल्पना सुचणें अगदीं अपरिहार्य आहे. या क्रमानें हळुहळू मूळच्या सिद्ध शब्दांपासून थोडया फार फरकानें साधित शब्द उत्पन्न करण्याची युक्ति मनुष्यानें उपयोगांत आणिली असली पाहिजे. व ही युक्तिही त्याला खुद्द सृष्टीच्या युक्तीपासूनच सुचलेली असणें अशक्य नाहीं. सृष्टिदेवता तरी काय करते ? सृष्टीमध्यें जे इतके निरनिराळे पदार्थ उत्पन्न झालेले दिसतात आणि ज्यांच्याकरितां मनुष्याला तितके निरानिराळे शब्द उत्पन्न करावयाचे आहेत, ते पदार्थ तरी स्वतः कसे उत्पन्न झालेले आहेत ? त्यांपैकीं पुष्कळ पदार्थ आपल्या मूळ कारणांपासून कांहीं तरी विकार पावूनच उत्पन्न झालेले आहेत, असें मनुष्य पहातो. आणि मूळ पदार्थ जर विकार पावून उत्पन्न झालेले असले, तर त्याच युक्तीनें तद्वाचक शब्दही कांहीं तरी विकारानें आणि फेरफारानें आपणही कां उत्पन्न करूं नयेत, असें मनुष्याला

वाटलेलें असणें अगदीं स्वाभाविक आहे. दुधापासूनच जर दुधाची खीर झालेली असली, तर 'पयस्' या शब्दापासून 'पायस' असा शब्द मनुष्यानें ही कां साधित करूं नये? सारांश, थोड्या फार विकारांनीं आणि कांहीं प्रत्ययांच्या मदतीनीं मनुष्यानें मूळ शब्दांपासून विकार पावलेले साधित शब्द बनविण्याला सुरवात करून त्या योगानेंही त्यानें आपला शब्दसंग्रह बराच वृद्धिंगत केला.

याशिवाय मनुष्याचा आणखी एक उपाय म्हटला म्हणजे एका शब्दानें जर एखाद्या पदार्थाचें द्योतन होत नसेल, तर एकाच्या मदतीला दुसरे आणखी शब्द घेऊन त्यांनीं तो कार्यभाग घडवून आणणें हा होय. अशा रीतीनें शब्दांनीं बनविलेले जे संघ त्यांनाच व्याकरणाच्या भाषेमध्यें समास असा पारिभाषक शब्द लावण्यांत येतो. 'शब्दांच्या विभक्तींचा लोप होऊन अनेक शब्द एकत्र जोडले गेले म्हणजे तो सामासिक शब्द होतो,' ही सामान्य व्याकरणांतील समासाची व्याख्या सामान्य कार्याकरितां ठीक आहे. परंतु पुराणस्थितिसंशोधनाच्या दृष्टीनें पहावयाचें असल्यास रानटी मनुष्यानें आधीं समास बनविले किंवा आधीं विभक्तिप्रत्यय बनवून मग त्यांचा लोप करून नंतर मग समास बनविले, हा एक सूक्ष्म रीतीनें विचार करण्यासारखा प्रश्न आहे. जें निसर्गानुकूल असेल तें पहिलें, आणि जें कृत्रिम असेल तें मागाहूनचें, हा एक ठोकळ नियम आहे. रानटी मनुष्यापाशीं आतां कांहीं शब्द तयार झालेले आहेत. त्यांतले दोन किंवा अधिक शब्द एकत्र करून एखाद्या नवीन कल्पनेचा अगर पदार्थाचा वाचक असा एखादा नवीन शब्द तयार करणें ही गोष्ट त्याच्या ठिकाणीं साहजिक आहे. विभक्तीचे प्रत्यय ही एक मनुष्याच्या उत्क्रांतींतील वरच्या पायरीची खूण आहे. त्यामध्यें साहजिकपणा बिलकूल नसून ते प्रत्यय कृत्रिमपणानें उत्पन्न केलेले आहेत. आणि या प्रत्ययांच्या संबंधानें कित्येकांचें असेंही मत आहे कीं, हे प्रत्यय म्हणजे मूळचे कांहीं तरी स्वतंत्र शब्दच असले पाहिजेत; परंतु कालांतरानें त्या स्वतंत्र शब्दांमध्यें फेरबदल होतां होतां अखेरीस त्यांच्या कांहीं तरी खुणा हल्लींच्या प्रत्ययांच्या रूपानें अवशिष्ट राहिलेल्या असल्या पाहिजेत. ही कल्पना खरी

आहे असें मानलें, तर एका शब्दापुढें दुसरा शब्द ठेवून त्यांचा सामासिक शब्द बनविण्याची प्रवृत्ति हीच प्रमुख ठरते. आतां विभक्तिप्रत्यय हे जर मूळचे स्वतंत्र शब्द नसतील, आणि निरनिराळे संबंध दाखविणाऱ्या अशा जर त्या कांहीं कृत्रिम खुणाच असतील, तर कृत्रिमपणा हा साहजिकपणाच्या पाठीमागूनच साहजिकपणें अस्तित्वांत येत असल्याकारणानें समास करण्याची प्रवृत्ति हीच पहिली असावी, असें उघड दिसतें. कित्येक जुन्या भाषांतून विभक्तींचे प्रत्यय न लागतां नुसते शब्दच वाक्यामध्यें येऊन बसलेले आढळतात. व त्या वाक्यांतील पूर्वापर संबंधावरून त्या शब्दांच्या कोणत्या विभक्त्या असल्या पाहिजेत हें मनांत आणून त्या वाक्यांचा अर्थ करून घ्यावा लागतो. यावरून सुद्धां भाषेच्या वाढीमध्यें अशी एक अवस्था दिसून येते कीं, ज्या वेळीं भाषेमध्यें मूळ शब्द होते, परंतु त्यांचे संबंध दाखविणारे विभक्तिप्रत्यय अस्तित्वांत आलेले नव्हते. यावरून सुद्धां समास करण्याची प्रवृत्ति आधींची असावी, असें म्हणावें लागतें.

अशा अनेक उपायांनीं आणि युक्त्यांनीं मनुष्य आपलें शब्दभांडार वाढवूं लागला. पहिल्यानें त्याच्यापाशीं मुळींच शब्द नव्हते. तेव्हां शंभर सृष्ट पदार्थांना शून्य शब्द असें प्रमाण होतें. पुढें शब्द निर्माण केले जातां जातां एक एक पदार्थाला एकेक शब्द जेमतेम मिळण्यापर्यंत मजल येऊन ठेपली असावी; म्हणजे शंभर सृष्ट पदार्थाला शंभर शब्द, असें मनुष्याच्या जवळच्या शब्दांचें प्रमाण पडण्यापर्यंत प्रगति झाली असली पाहिजे. ही प्रगति म्हणजे जो मनुष्य पूर्वी उपाशी मरत होता, त्याला कसेंबसें पोटभर अन्न मिळण्याची स्थिति होय. आणि ज्याप्रमाणें प्रत्येक मनुष्याला निदान पोटभर खावयाला मिळालें पाहिजे, ही अवश्यकतेची गोष्ट होय, त्याचप्रमाणें प्रत्येक पदार्थाला दर्शविणारा निदान एक तरी शब्द मिळाला पाहिजे, ही अवश्यकतेची गोष्ट होय. परंतु मनुष्य प्राणी हा एकदां ज्ञानाच्या वाढीच्या मार्गाला लागला आणि त्याची बुद्धि विकास पावूं लागली, म्हणजे मग तो अर्ध्या वाटेवर क्वचित्च थांबतो. त्याप्रमाणें मनुष्याच्या शब्दांची संख्या दिवसेंदिवस जास्त जास्तच वाढूं लागली. ज्याच्यापाशीं शंभर रुपये झाले, तो हजार रुपये मिळण्याची

इच्छा करूं लागतो, हें जसें 'निःस्वो वष्टि शतं शती दशशतं' इत्यादि श्लोकांत भर्तृहरीनें म्हटलें आहे, त्याप्रमाणें शंभर पदार्थांना शंभर शब्द या प्रमाणांत शब्दांची वाढ झाली असतां तेथेंच न थांबतां पूर्वींच्या उपलब्ध झालेल्या साधनांनीं मनुष्य आपल्या शब्दांची संख्या त्याच्या पुढेंही वाढवूं लागला. याच्या पुढील प्रगती म्हणजे मनुष्यांच्या शब्दभांडाराच्या श्रीमंतीचे दिवस होत. या श्रीमंतीच्या काळांत पूर्वीं जेथें एकेका पदार्थाला एकेक शब्द सुद्धां वेळेवर मिळण्याला मारामार पडावयाची, तेथें एकेका पदार्थाला दहा दहा शब्द मिळूं लागले! ज्याला पूर्वीं खावयास मिळत नसे त्याला पोटभर खावयाला मिळूं लागून शिवाय शिल्लक टाकण्याला आणि अजीर्ण होण्यालाही पुरेल इतकें अन्न जसें मिळूं लागावें, तशी शब्दांच्या वाढीची स्थिति होत चालली. असें होण्याचें एक विशेष कारण असें कीं, परमेश्वरानें ही सृष्टि एकदांच कायमची निर्माण करून ठेवलेली असल्याकारणानें त्यांतील सृष्ट पदार्थांची संख्या नियमित आहे. ते पदार्थ कांहीं सहसा फारसे वाढत नाहींत. परंतु त्या पदार्थांना नांवें देणारी मनुष्याची बुद्धि ही कांहीं त्या जड पदार्थांप्रमाणें नियमित नाहीं. तिची शक्ति अनियमित आणि अमर्याद आहे. सृष्ट पदार्थांची वाढ खुंटलेली आहे. परंतु मानवी बुद्धीच्या अनियंत्रितपणामुळें शब्दांची वाढ मात्र एकसारखी वाढतच चाललेली आहे. जगाच्या उत्पत्तीबरोबर पदार्थांची उत्पत्ति संपली; परंतु त्या पदार्थांना द्यावयाच्या शब्दांची उत्पत्ति मात्र जगाच्या उत्पत्तीपासून सुरू झाली असून ती सर्वकाळपर्यंत अव्याहतपणें चालूच राहणार आहे. तेव्हां अशा प्रकारच्या या शर्यतीमध्यें सृष्ट पदार्थांचा घोडा केव्हां तरी मागें पडून तद्वाचक शब्दांचा घोडा केव्हां तरी त्याच्यापुढें जाणार, हें खास. मनुष्याची कल्पकता जागृत होऊन ती या सृष्ट पदार्थांकडे निरनिराळ्या दिशांनीं आणि निरनिराळ्या दृष्टींनीं पाहूं लागली, त्या वेळीं तिला त्या एकाच पदार्थांचीं जीं जीं निरनिराळीं स्वरूपें दृग्गोचर झालीं, त्यांना अनुलक्षून मनुष्यानें त्या त्या पदार्थांना निरनिराळे शब्द लागू केले. त्या पदार्थांचे निरनिराळे गुणधर्म जे शोधाअंतीं दिसूं लागले, त्यांवरूनही मनुष्यानें कांहीं शब्दयोजना केल्या. आणि अशा रीतीनें एकेका पदार्थाला दहा

दहा वीस वीस प्रतिशब्द मिळून शब्दांची उधळपट्टी होण्याला सुरवात झाली. मनुष्याचें शब्दभांडार जें पूर्वी कोरडें ठणठणीत होतें, त्याला शीग लागून त्यांतून शब्द सांडूं लागले ! आणि ज्या भाषासुंदरीच्या अंगावर घालण्याकरितां मनुष्यापाशीं पूर्वी फुटका मणीसुद्धां नव्हता, त्या भाषासुंदरीच्या अंगावर घालण्याकरितां आतां इतकीं शब्दरत्नें तयार झालीं कीं, इतकीं सगळीं कोठें घालावयाचीं आणि इतक्यांचें काय करावयाचें, असा प्रश्न होण्याची वेळ आली. आणि ही स्थिति आपल्या संस्कृत भाषेमध्यें विशेषत्वानें दृष्टोत्पत्तीस येते. संस्कृतांतील अनेक कोशांपैकीं एक अमरकोशच घेतला व त्यामध्यें एकेका पदार्थाला किती शब्द दिलेले आहेत हें पाहिलें, तर संस्कृत भाषेची संपत्ति आणि श्रीमंती किती वाढलेली आहे, याची कोणालाही चांगली कल्पना आल्यावांचून राहणार नाहीं. अमरकोशाच्या पहिल्याच कांडांतील कित्येक शब्दांकडे लक्ष पोंचाविलें, तर कांहीं ठळक ठळक पदार्थांच्या प्रतिशब्दांचें प्रमाण पुढें दिल्याप्रमाणें आढळतें. * ( येथें कांहीं शब्द देऊन त्यांच्यापुढें जे आंकडे घातलेले आहेत, तितके प्रतिशब्द त्या पदार्थाला अमरामध्यें बहुशः सांपडतात असें समजावें. )

स्वर्ग ९; देव२६; दैत्य १०; इंद्र ३५; अग्नि ३१; सूर्य ३७; सर्प २५; मदन २०; वायु २०; आकाश १६; मेघ १५; वीज १०; चंद्र २०; किरण ११;रात्र १२; समुद्र १४; नदी १२; जल २७; कमल १७.

पुष्कळ आंकड्यांपैकीं हे थोडेसे आंकडे वर दिलेले आहेत. परंतु यावरून जो मुद्दा स्पष्ट करावयाचा आहे, तो चांगल्या रीतीनें सिद्ध होतो. अगदीं नेहमींच्या प्रचारांतले अग्नि, वायु, आकाश, पाणी, मेघ, सर्प,

* वेदांत येणाऱ्या शब्दांचा कोश जो निघंटु त्यांतही अशाच पद्धतिनें शब्द दिलले आहेत. व ती निघंटूची पद्धति पाहूनच अमरसिंहानें आपल्या अमरकोशांत तिचें अनुकरण केलें असावें, असें दिसतें. अमुक एका शब्दाला अमुक अमुक प्रतिशब्द जे असतील ते देऊन त्यांची संख्याही निघंटूंत दिलेली आहे. ही निघंटूतील प्रतिशब्दांची संख्या कधीं कधीं शंभरापर्यंतही गेलेली आहे !

वगैरे पदार्थ घेतले, तर त्यांना वर दिलेल्या आंकड्यांप्रमाणें संस्कृत भाषेंत जितके प्रतिशब्द आढळतात, तितके दुसऱ्या कोणत्याही भाषेमध्यें आढळणें शक्य नाहीं; इतकी ही संस्कृत भाषा श्रीमंत आणि धनाढ्य आहे ! आणि अशा दृष्टीनेंही जर हिला कोणी गीर्वाणभाषा असें नांव दिलें, तर त्यांत कांहीं अयथार्थता उत्पन्न होईल, असा मुळींच संभव नाहीं. पूर्वीच्या संस्कृत भाषेपेक्षां हल्लींच्या प्रचलित पाश्चिमात्य भाषांतून एकंदर शब्दांची संख्या जास्त सांपडेल, यांत शंका नाहीं. अमरकोशामध्यें संस्कृत भाषेंतील जे शब्द दिलेले आहेत, त्यांची संख्या ठोकळ मानानें दहा हजारांच्या वर भरेल. त्या मानानें हल्लींच्या इंग्रजींतील शब्दांची संख्या पाहिली, तर ती साडेचार लाखांच्या वर जाईल, असा अदमास आहे. परंतु या फरकाचीं कारणें अनेक आहेत. संस्कृत भाषा ही हल्लीं मृतप्राय आहे. उलट इंग्रजी भाषा ही हल्लीं अतिशय जोरांत आहे. शिवाय तिची ही साडेचार लाखांची खानेसुमारी दुसऱ्या भाषांतून इंग्रजींत घुसलेल्या शब्दांना धरून करण्यांत आलेली आहे. आणखी एक कारण असें आहे कीं, हल्लीं नवीन शोध आणि शास्त्रें हीं इतकीं झालीं आहेत कीं, त्यांच्या योगानें भाषेमध्यें नवीन नवीन शब्दांच्या अनेक भरत्या झालेल्या आहेत. शिवाय संस्कृतच्या पाठीमागूनची इंग्रजी भाषा आहे. त्या इंग्रजी भाषेच्या हल्लींच्या काळापर्यंत जर संस्कृत भाषेची एकसारखी अव्याहत वाढ होत राहिली असती, तर तिच्यामध्येंही नवीन शब्दांचा भरणा झाला असता. या प्रकारच्या अनेक कारणांमुळें शब्दांच्या संख्येच्या बेरजेच्या एकंदर आंकड्यांवरून या दोन भाषांच्या श्रीमंतीची तुलना करणें योग्य होणार नाहीं. ती तुलना भ्रामक होईल. सुसंपन्नतेची खरी तुलना एकेका पदार्थाला एकेका भाषेमध्यें किती शब्द आहेत, यावरूनच होण्यासारखी आहे. आणि तशा दृष्टीनें पाहतां संस्कृत भाषेच्या मानानें इंग्रजी वगैरे भाषांचें दारिद्र्य किती आहे, हें चांगलें निदर्शनाला येतें. पाणी हा एक नेहमींच्या व्यवहारामध्यें सामान्य पदार्थ आहे. याला संस्कृतामध्यें जर सत्तावीस प्रतिशब्द आढळतात, तर इंग्रजीमध्यें—या विस्तीर्ण आणि बलाढ्य अशा इंग्रजी साम्राज्याच्या इंग्रजी भाषेमध्यें—निदान सात तरी प्रतिशब्द मिळावेत कीं नाहींत ? परंतु कोणतीही इंग्रजी डिक्शनरी घ्या आणि तिच्या-

मध्यें Water हा शब्द काढून पहा! आणि त्या ठिकाणीं त्याला किती प्रतिशब्द दिलेले आहेत ते मोजून पहा. मोजण्याकरितां बोटें घालतांना बोटांना तसदी पडेल ही भीतिच नको! डिक्शनरी उघडून पाहिल्या-बरोबर त्या ठिकाणीं या श्रीमंत इंग्रजी भाषेचें गरीबपण आणि निर्धनत्व व नादारपण ताबडतोब आढळून येतें. अशा प्रकारच्या तुलना इतरही पुष्कळ शब्दांच्या बाबतींत करतां येण्यासारख्या आहेत.

हा संस्कृत आणि इंग्रजी भाषांतील चढाओढीचा भाग प्रस्तुतच्या बाबतींत फारसा महत्त्वाचा नाहीं. परंतु ह्या दोन्हीही भाषांतील शब्दांच्या आंकड्यांच्या प्रमेयावरून मनुष्यानें आपली शब्दसंपत्ति निरनिराळ्या दिशांनीं कशी वाढविलेली आहे, हें चांगलें व्यक्त होतें. इंग्रजी भाषेमध्यें साडेचार लक्ष शब्द असले, तर त्याचा अर्थ असा कीं, या जगांतील सृष्ट पदार्थांपैकीं साडे चार लक्ष पदार्थांना आणि कल्पनांना मनुष्यानें आपल्या शब्दांचीं पांघरुणें घातलीं आहेत; आणि संस्कृतामध्यें 'पाणी' या एका पदार्थाला सत्तावीस प्रतिशब्द आहेत, याचा अर्थ असा कीं, एका शब्दानें जेथें गरज भागते, तेथें बाकीचे सवीस शब्द शिलकेमध्यें राखून ठेवण्याइतकी श्रीमंती संस्कृत भाषेच्या अंगामध्यें उत्पन्न झालेली आहे.

इतक्या श्रीमंतीचा उपयोग काय, असा कदाचित् या ठिकाणीं कोणी प्रश्न विचारील, तर त्याचें उत्तर असें आहे कीं, एखाद्याच्या जवळ पैसे पुष्कळ झाले, म्हणजे त्यांच्यापासून तो जसे सुवर्णादिकांचे अलंकार घडवितो, त्याप्रमाणें असल्या शब्दरत्नांच्या संचयानें चांगले कवि निर-निराळ्या प्रकारचे अलंकार निर्माण करण्याला समर्थ होतात. लघु अक्षरांचे शब्द, गुरु अक्षरांचे शब्द, कोमल वर्णांचे शब्द, कठोर वर्णांचे शब्द, लहान शब्द, मोठे शब्द, समानवर्णात्मक शब्द, द्व्यर्थी शब्द, इत्यादि एकाच अर्थाचे अनेक शब्द जिव्हाग्रीं असले, म्हणजे हा शब्द नाहीं तर तो शब्द अशा रीतीनें योग्य शब्द पसंत करून यमकें, अनुप्रास, श्लेष, इत्यादि अलंकार आणि वैदर्भी, गौडी, लाटी, पांचाली, वगैरे रीति, यांचा पूर्णपणें उपयोग करून आपल्या काव्याला सौंदर्य आणण्याची संधि

कवींना जितकीं सांपडते, तितकी दुसऱ्या भाषेंतील लेखकांना क्वचित्च सांपडत असेल. व याचें महत्त्व काव्याच्या प्रांतामध्यें फार मोठें आहे.

असो. येणेंप्रमाणें हा शब्दांच्या वाढीचा इतिहास आहे. यांत शब्दांच्या अभावापासून तों शब्दांच्या उधळपट्टीपर्यंत शब्दांची वाढ मनुष्यानें आपल्या कल्पकतेनें निरनिराळ्या युक्तया योजून कशी केली, हें आपण पाहिलें आहे. पहिल्या ओंकारापसून तों शेवटच्या उच्चारल्या जाणाऱ्या वर्णापर्यंत अगर शंकराच्या डमरूमधून जीं 'अ इ उण्' इत्यादि वर्णात्मक सूत्रें निघालीं, त्यांच्यापासून तों शेवटच्या वर्णोच्चारापर्यंत, जे हे नानाविध ध्वनि उत्पन्न होतात, व शब्दांचें स्वरूप पावतात, तेंच शब्दब्रह्म होय. या शब्दब्रह्मानें सर्व सृष्ट पदार्थांच्या सृष्टीला कसें व्यापिलें आहे, हें आपण वरील विवेचनांमध्यें पाहिलें आहे. अमूर्त परब्रह्मानें या जगामध्यें जीं कित्येक मूर्त मायास्वरूपें धारण केलेलीं आहेत, त्यांपैकीं शब्दब्रह्माच्या मूर्तस्वरूपाचा हा सर्व प्रपंच आहे. याच्या चिंतनामध्यें आणि परिशीलनामध्येंही एक प्रकारचा आनंद आहे. व या आनंदाचा ओघही अखेरीस त्या सच्चिदानंदाच्याच प्रवाहामध्यें जाऊन सायुज्य पावतो.

# महाराष्ट्र भाषेंतील वेदान्तपर ग्रंथ लिहिण्याच्या पद्धतीचें पर्यालोचन.

वेदान्त हा विषय फार महत्त्वाचा आहे. त्या विषयाची अपेक्षा प्रत्येक मनुष्याला अतिशय असते. आपल्या जीवनाचें ध्येय काय, हें मनुष्याली या वेदान्तशास्त्राच्या प्रमेयांवरून ठरवितां येतें. आपण येथें आलों कां, आणि आपल्याला पुढें जावयाचें आहे कोठें, या दुर्ज्ञेय गोष्टीचें यथार्थ ज्ञान होण्यावरच जन्म आणि मरण यांच्या दरम्यानचा मनुष्याचा व्यवहार बरोबर रीतीनें नियमित करतां येण्यासारखा असतो. मागें झालें काय, आणि पुढें व्हावयाचें आहे काय, याच्या धोरणावरच मध्यंतरींच्या अवकाशांत आपण करावयाचें काय, याचा निश्चय ठरवावयाचा असतो. सारांश, आपला जो सर्व व्यवहार पुढच्या परमार्थिक उपयोगासाठीं असतो, तो वेदान्ताच्या कल्पनांवर अवलंबून असतो. इहजन्मींचा व्यवहार चुकला, तर तो पुढील पारमार्थिक हिताचा नाश करतो; व परमार्थाच्या कल्पना चुकीच्या झालेल्या असल्या, तर त्या चुकीच्या कल्पनांवर चालणाऱ्या मनुष्याचा सर्व ऐहिक व्यवहार व्यर्थ होतो. याकरितां–स्वार्थाकरितां आणि परमार्थाकरितांही–वेदान्तशास्त्राचा विचार अत्यंत अवश्यक आहे. हा विचार अनेक विद्वान् लोक अनादिकालापासून करीत आलेले आहेत. व त्यांच्या विचारांचा फायदा त्यांच्या पाठीमागून आलेल्या आपल्यासारख्या लोकांना करून घेतां येण्यासारखा आहे. संस्कृतमध्यें या विषयावर अनेक उपयुक्त ग्रंथ झालेले आहेत. व त्यांच्या अनुरोधानें आणि स्वतंत्र स्फूर्तीनें महाराष्ट्र भाषेमध्येंही अनेक ग्रंथ झालेले आहेत व होत आहेत.

परमार्थासंबंधानें कोणीही ग्रंथकार ग्रंथ लिहावयाला प्रवृत्त झाला, तर त्या ग्रंथांत आपल्याला कोणकोणते विषय आणावयाचे आहेत, ते कोणत्या क्रमानें एकापुढें एक मांडावे, त्यांचा प्रारंभ कोठून करावा, आणि विषयाच्या महत्त्वाप्रमाणें आणि काठिन्याप्रमाणें त्यांचा क्रम चढवीत नेऊन अखेरीस आपल्या प्रतिपाद्य विषयाची परिसमाप्ति कोणत्या अत्यंत इष्ट अशा आपल्या अंतिम ध्येयामध्यें करावी, या गोष्टींचा विचार ठरवून नंतर मग तो अनुबंधचतुष्टयाच्या नियमानुसारानें ग्रंथरचना करण्याला प्रारंभ करितो. वेदांत हा विषय आधींच गहन आणि दुर्बोध आहे; त्याच्या प्रतिपादनांत जितकी स्वच्छता असेल, त्या मानानें वाचणाराचें मन संशयादिक मलांपासून स्वच्छ होतें. नाहीं तर विषय घोंटाळ्याचा आणि पद्धतीहि चक्रव्यूहाची, अशी स्थिति झाली, तर संशयाच्या चक्रव्यूहांतून मनोरूपी अभिमन्यूला बाहेर पडण्याची मुळींच आशा नको. वेदांत विषयावर संस्कृतमध्यें पुष्कळ ग्रंथ आहेत. आणि त्यांतील भावार्थ आणि मुख्यार्थ घेऊन मराठीमध्येंही पुष्कळ ग्रंथ लिहिले गेलेले आहेत. परंतु संस्कृतांतील वेदांतग्रंथ व मराठींतील वेदांतग्रंथ यांच्या रचनेच्या पद्धतीमध्यें पुष्कळ अंतर आहे. आणि त्या अंतरास कारणेंही आहेत. संस्कृतांतील वेदान्ताचे लेखक हे बहुधा महान् पंडित होते. व्याकरण, न्याय, पूर्वमीमांसा, इत्यादि बुद्धीला सूक्ष्मता आणि कुशाग्रता देणाऱ्या शास्त्रांमध्यें पारंगत झाल्यानंतरच ते पंडित उत्तरमीमांसेवरील ग्रंथ लिहिण्याला प्रवृत्त होत असत. न्याय आणि पूर्वमीमांसा हीं आपल्यामधील शास्त्रें अशीं आहेत कीं, त्यांचे संस्कार ज्या मनावर एकदां झाले, तें मन सदोदित नियमित पद्धतीचाच अंगीकार करील, व त्या मनाला न्यायसिद्ध मार्ग सोडून अणुरेणुभरही इकडे तिकडे कोणी गेलेलें सहन व्हावयाचें नाहीं. रस्ते आंखून घेऊन तेवढ्यांतच अगदीं नियमित मर्यादेमध्यें ग्रंथाचे विषय यावयाचे आणि त्यांचें प्रतिपादन व्हावयाचें, अशी संस्कृत लेखकांची पद्धत असे. एखादा शब्द कमी अगर जास्ती होऊं द्यावयाचा नाहीं, किंवा एखाद्या भलत्याच विषयाला दुसऱ्या चालू विषयाच्या खिडकीमधून उगीच डोकावूं द्यावयाचें नाहीं, अशाबद्दल ते फार दक्षता ठेवीत असत. संस्कृतमधील मूळ ग्रंथांवर टीका

लिहिण्याचा पुष्कळ प्रघात आहे. असल्या टीकाग्रंथांतील टीकाकार मूळ टीकाविषयक ग्रंथामध्यें अव्यवस्था आढळल्यास, कोठें पूर्वापर प्रतिपादनाचा संबंध जुळत नसल्यास, कोठें लिहिण्याचा हेतु स्पष्ट कळत नसल्यास, अगर आणखी कांहीं मूळामध्यें संदिग्धता असल्यास, त्या सर्व गोष्टींच्या स्पष्टीकरणासाठीं आणि उद्घाटणासाठीं कसे धडपडत असतात, आणि कशा क्लृप्त्या लढवून मूळ लेखकाच्या लेखाची सुसंगता संस्थापित आणि स्थिर करण्याचा प्रयत्न करीत असतात, हें ज्यांना माहीत आहे, त्यांना, संस्कृतांतील पूर्वींच्या लोकांच्या मनामध्यें न्याय-मीमांसादिकांच्या सर्वत्र अवश्यक अशा नियमांना अनुसरून विषय प्रतिपादन पद्धतशीर आणि मुद्देसूद असण्याविषयीं किती कळकळ वसत असे, हें सांगावयाला पाहिजे आहे, असें नाहीं. या कारणानें संस्कृतांतील वेदान्तग्रंथांमधील विषयविवेचनाच्या बाबतींत अव्यवस्था, असंबद्धता किंवा अस्ताव्यस्तपणा, हे दोष क्वचितच आढळतात. परंतु संस्कृतमधून मराठीमध्यें वेदान्तांतील विषय प्रतिपादिले जाऊं लागले, तेव्हां ही स्थिति अगदीं बदलून गेली. जसजसे मराठी भाषेमध्यें ग्रंथ निर्माण होऊं लागले, तसतशी संस्कृत भाषा आणि तिच्यांतील सद्गुण साहजिक-पणेंच मागें पडूं लागले. संस्कृत ग्रंथ हे विद्वानांकरितां होते, तर मराठीं-तील ग्रंथ हे बोलून चालून प्रतिज्ञापूर्वक स्त्रीशूद्रादिक जे अल्प बुद्धीचे लोक त्यांच्याकरितां होते. विद्वानांनीं विद्वानांकरितां लिहिलेले ग्रंथ आणि विद्वानांनीं व अविद्वानांनीं अविद्वानांकरितां लिहिलेले ग्रंथ यांच्या पद्धतींमध्यें साहजिकपणें अंतर पडलेंच पाहिजे. मराठी भाषेमध्यें जे नवीन लेखक झाले, त्यांनीं मराठी भाषेचें महत्त्व वर्णन करणें हें स्वाभा-विकच होतें, आणि तसें करतांना कित्येक ठिकाणीं कित्येकांचे हातून संस्कृत भाषेचा त्या मानानें अगौरव आणि उपमर्द होणें हेंही स्वाभा-विकच होतें. अशा रीतीनें संस्कृताला गौणत्व येऊं लागलें, आणि त्याबरोबरच संस्कृत वाणींतील गुणही हळुहळू मराठी भाषेच्या क्षितिजा-वरून लोप पावूं लागले. शिवाय संस्कृत भाषेंतील टापटिपीचें आणि पद्धतशीरपणाचें मराठीमध्यें अनुकरण करण्याचीही कोणाला फारशी इच्छा होती, असें नाहीं. संस्कृतमधील साधारण गोळाबेरीज घेऊन ती मराठी

भाषेमध्यें आपल्या श्रोत्यांपुढें मांडावयाची, याहूनही पलीकडची इच्छा असलेली कोठें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. ज्यांच्या योगानें विषयाच्या प्रतिपादनाला व्यवस्थितपणा आणि पद्धतशीरपणा प्राप्त होतो, अशीं जीं उपरिनिर्दिष्ट न्यायमीमांसादिक शास्त्रें, त्यांच्याबद्दल अभिरुचि, आदर किंवा अध्ययन, यांची कोणाला अवश्यकता तर वाटत नव्हतीच, पण उलट या सद्ग्रंथनिर्मितीच्या मित्रांबद्दल तुच्छता आणि तिरस्कार मात्र कित्येक प्रसंगीं मोठ्या फुशारकीनें व्यक्त केलेले आढळतात. वेदाध्ययनापासून तों थेट शास्त्राध्ययनापर्यंत सर्व कांहीं निरुपयोगी आहे, असलीं विधानें एका प्रकारच्या आवेशामध्यें केलेलीं मराठी कवींच्या काव्यांतून शोधूं गेल्यास थोडीं थोडकीं आढळतील, असें नाहीं. हीं विधानें त्यांनीं जरी वेदान्ताच्या एका विशिष्ट आणि श्रेष्ठ भूमिकेवर बसून केलेलीं होती, तरी त्यांच्या तोंडच्या त्या विधानांचा आपल्या व्यवहारावर आणि वाङ्मयावर परिणाम झाल्याशिवाय राहिलेला नाहीं. हा जो विद्यादेवीचा उघड उघड अनादर आणि उपमर्द मराठी लोकांनीं चालविलेला होता, त्याचा परिणाम त्यांच्या ग्रंथांवर दिसून येतो.

जुन्या मराठीमध्यें जे मोठमोठे लेखक झाले आहेत, त्यांच्या अंगामध्यें एक प्रकारचा मोठा दांडगा गुण होता. तो गुण भक्ति हा होय. भक्तीचा गुण त्यांच्या रोमरोमामध्यें भरला होता. त्यांच्या आचरणांत भक्ति भरलेली होती. त्यांच्या तोंडांतून प्रेमळ काव्याच्या रूपानें भक्ति बाहेर पडत होती. व त्यांच्या डोळ्यांतून भक्तीचे प्रेमाश्रु गळत होते. या भक्तीच्या बळाच्या जोरावर पूर्वींचे मराठी साधु कवि जशी लौकिक प्रपंचांत तशीच काव्यविषयक प्रपंचामध्येंही कशाची पर्वा बाळगीत नसत. त्यांच्या अंतःकरणामधून भक्तीच्या अतिरेकाचा प्रवाह इतक्या तुफानी वेगानें वहात असे कीं, तो आपल्या वाटेंत येणाऱ्या लहान मोठ्या सर्व नियमांच्या झाडांझुडपांना पार खणून नेत असे. अशा रीतीनें जरी व्यवहाराच्या आणि वाङ्मयाच्या निबंधनांना भक्ति धाब्यावर बसवीत असे, तरी त्या भक्तीनें युक्त अशा त्या पूर्वींच्या भगवद्भक्तांच्या कृत्यांमध्यें किंवा काव्यांमध्यें रसहानि बहुधा होत नसे. व तसें होण्याचें कांहीं कारणही नव्हतें. कां कीं, काव्याच्या प्रदेशापुरतें बोलावयाचें म्हणजे अलंकारशास्त्रा-

मध्यें जसे शृंगार, वीर, करुण, हास्य, इत्यादि रस सांगितले आहेत, तसाच वत्सलता, शांति इत्यादि स्थायिभावमूलक असा भक्ति हाही एक रस बहुतेक साहित्यशास्त्रकारांनीं स्विकारलेला आहे. तेव्हां तो रस ज्यांत परिपूर्णपणें भरलेला आहे, तें काव्य काव्य या दृष्टीनें उत्कृष्ट झालेंच पाहिजे. जेव्हां कोणत्याही मनोविकाराची तार अगदीं वरच्या व शेवटच्या सप्तकांतील उच्च सुरामध्यें वाजत असेल, जेव्हां कोणताही एखादा मनोधर्म अगदीं पराकाष्ठेपर्यंत उद्दीपित झालेला असेल, तेव्हां तशा स्थितींतील मनुष्याच्या तोंडांतून जे जे उद्गार निघतील, तें तें एक उत्कृष्ट काव्यच झालें पाहिजे. अशी जर सामान्य मनोविकारांच्या सामर्थ्याची स्थिति आहे, तर मग जेथें नामसंकीर्तनाची एकाग्रता, जेथें नारद, वाल्मीकि, शुक, उद्धव, इत्यादिकांसारख्यांचे परमपवित्र उपदेश, आणि जेथें प्रत्यक्ष भगवंताच्या सगुणस्वरूपाचें दर्शन, त्या भक्तिरसाच्या प्रचंड प्रवाहामध्यें कोणत्या रसाची उणीव भासणार आहे ? आणि कोणतें काव्य हीनरस होणार आहे ? सामान्य लेखकही असल्या विषयाच्या वर्णनामध्यें वरिष्ठ प्रतीचा कवि म्हणून भासावयाचा; मग प्रतिभादेवीचा मूर्तिमंत अवतार ज्ञानेश्वर, प्रेमळपणाचा मूर्तिमंत अवतार नामदेव, आणि कडकडीत वैराग्याचा मूर्तिमंत अवतार तुकाराम, यांच्यासारख्या कवींच्या काव्यांच्या उत्कृष्टपणाची योग्यता काय वर्णन करावी ? हा भागवतधर्मांतील भक्तिपंथ महाराष्ट्रभाषेंत प्रथमतः ग्रंथरूपानें श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं प्रचलित केला; व त्यांचे पाठीमागून त्या पंथामध्यें अनेक साधु आणि कवि झाले. केव्हांहि झालें तरी कवित्वापेक्षां साधुत्वाची योग्यता अर्थातच जास्त असावयाची. तेव्हां या भक्तिपंथामध्यें जे अनेक लोक झाले, त्यांच्यापैकीं जे अलौकिक प्रकारचे साधु होते, त्यांच्या साधुत्वाला जनता जास्त मान देत असे. त्यांच्यांतील काव्यगुणावगुणाकडे कोणी फारसें लक्ष देत नसे. तुकाराम महाराजांनीं एका प्रसंगासंबंधानें बोलतांना " परस्त्रीचे ठायीं जो कां नपुंसक । त्याचे अंगा राख असो नसो ॥ " इत्यादि अभंगामध्यें ज्या प्रकाराचें वर्णन केलें आहे, त्या प्रकाराचें अनुकरण करून बोलावयाचें झाल्यास ज्यांच्या अंगामध्यें उत्कृष्ट साधुत्व बाणलेलें आहे, " त्यांच्या काव्यीं गुण असो नसो " अशाच प्रकारची त्यांच्या संबंधाची लोकांची भावना असे. व अशी भावना

असणें हें अगदीं स्वाभाविकही आहे. कारण, साधुत्व हें ईश्वरीय आहे, आणि कवित्व हें मानवीय आहे. साधुत्व हें परलोकोपयोगी आहे, आणि कवित्व हें केवळ ऐहिक आहे. असा फरक असल्यामुळें कवित्वापेक्षां साधुत्व हें लोकांना जास्त पूज्य होत होतें, यांत कांहीं विशेष नाहीं. जे भिंतींना चालवित होते आणि रेड्यांना बोलवीत होते; जे दगडी देवांच्या तोंडांत घास भरवीत होते आणि दगडी देवळांचीं तोंडें फिरवीत होते; जे मेलेलीं माणसें जिवंत करीत होते, आणि जिवंत माणसांना उद्धरीत होते; ज्यांच्या अभंगांच्या वह्या पाण्यांतहि भिजत नव्हत्या आणि ज्यांचा देह विमानांतून वैकुंठास जात होता; अशी ज्यांच्या साधुत्वाबद्दल लोकांची दृढभावना, त्यांच्या ओव्यांतील आणि अभंगांतील गुणदोषांसंबंधानें कोण पर्वा करीत बसणार ! या सृष्टींतील अद्भुत सामर्थ्यांच्या पुढें मनुष्यांचे किरकाळ कल्पनांचे विचार नेहमींच दिपून आणि लोपून जातात ! परंतु महाराष्ट्रभाषेमध्यें कित्येक जे चांगले साधु झाले, ते व चांगले कविहि जसे झाले, तसेच जर सगळे झाले असते, तर तें ठीक झालें असतें. परंतु सृष्टिक्रमामध्यें सदोदित असें होणें शक्य नाहीं. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, असल्या विभूति कांहीं फारशा स्वस्त नसतात. सृष्टिकर्त्यांच्या दुकानामध्येंही असलीं रत्नें वेताबाताचींच शिल्लक असतात. त्यामुळें महाराष्ट्रांत पुढें पुढें असें होऊं लागलें कीं, या भक्तिपंथामध्यें साधुत्वाच्या आणि कवित्वाच्या अशा दोन्हीहि बाबतींमध्यें कमी कमी दर्जाचे लोक उत्पन्न होऊं लागले. तरी पण सामान्यजनसमूह अज्ञानावस्थेंत असल्या कारणानें व त्याच्यामध्यें परीक्षकपणा आणि चिकित्सकपणा फारसा जागृत झालेला नसल्या कारणानें, एखादा अगदीं सामान्य आणि रेम्याडोक्या हरिभक्तिपरायण असला, तरी तो प्रत्यक्ष ज्ञानेश्वर किंवा तुकाराममहाराज आहे अशी त्या ढोंगी लोकांबद्दल भोळे लोक आपली भावना करून घेत. आणि त्यामुळें त्यांच्या साधुत्वाविषयीं वाजवीपेक्षां जास्त अशी भलतीच कल्पना झाल्याकारणानें त्यांच्या काव्यांतील गुणदोषांकडे दुर्लक्ष्य होऊन त्यांच्या अगदीं टाकाऊ ओव्यांनाही साधुवाक्यांचा मान मिळूं लागला. आणि अशा रीतीनें मराठी भाषेच्या सराफकट्यामध्यें वाईट माल चांगल्या भावानें खपूं लागला.

आपण साधु होऊन कविता करूं लागलों, म्हणजे मग आपल्या अंगामध्यें फारशी विद्वत्ता नसली, तरी आपल्या कवितेचें कांहीं अडावयाचें नाहीं, व आपण त्यांत वाटेल तें दडपून दिलें, किंवा प्रमाणांचा अभाव असतांहि प्रमेयाची सिद्धि झाल्याचें ठासून सांगितलें, किंवा कसलाही गचाळ आणि गाबाळ ग्रंथ कंटाळवाणा होईपर्यंत भाराभर लिहिला, तरी त्याला वाईट म्हणण्याची कोणाची छाती होणार नाहीं; अशी कल्पना स्वाभाविकपणें त्या वेळच्या खालच्या दर्जाच्या असाधु कवींच्या मनामध्यें उत्पन्न होऊं लागली. अंगीं विद्वत्ता नसेल, तर साधुपणाचा आविर्भाव आणावा आणि देवाच्या नांवाखालीं कांहीं तरी संबद्ध किंवा असंबद्ध, विश्वसनीय किंवा अविश्वसनीय, अशा गोष्टी लिहून काढाव्या, आणि त्याला कोणी नांवें ठेवूं लागल्यास हा दुष्ट आहे, छलक आहे, निंदक आहे, नास्तिक आहे, देवाचा द्रोह करणारा आहे आणि भक्तीचा विरोध करणारा आहे, अशा प्रकारचा उलट त्यालाच शह द्यावा, अशी युक्ति अमलांत येऊं लागली. आणि ह्या युक्तीच्या संरक्षणाच्या छत्राखालीं ढोंगी साधुत्व आणि वाईट कवित्व यांचा अभ्युदय मोठ्या झपाट्यानें झाला. पूर्वीच्या ज्ञानेश्वरादिकांसारख्या मोठमोठ्या साधुकवींनीं एका विवक्षित भूमिकेवरून विद्वत्तेला जें गौणत्व दिलेलं होतें, तें या पुढील हलक्या दर्जाच्या मंडळींनीं सरसकट प्रस्थापित करून, खरी भक्ति—किंवा खरी भक्ति नसल्यास तिच्या ऐवजीं ढोंगी भक्ति—असली म्हणजे विद्वत्तेची आपल्याला कांहीं एक अपेक्षा नाहीं, अशा प्रकारच्या एका हानिकारक मनःस्थितीपर्यंत त्यांनीं मजल आणून ठेवली. विद्वत्तेसंबंधानें अशी परिस्थिति झाल्यावर, मग विद्वत्तेच्या अंगांपैकीं व्याकरण, न्याय, मीमांसा, इत्यादि कुशाग्रतोत्पादक शास्त्रांच्या अध्ययनाची अपेक्षा कोण बाळगणार ? आणि या नियामक शास्त्रांच्या राजसत्तेच्या संस्काराचा दाब नसल्यामुळें जिकडे तिकडे स्वाभाविकपणेंच अंदाधुंदी आणि बेबंदशाई सुरू झाली. शिवाय अशा स्थितीमध्यें जे विषय विवेचनाकरितां या मंडळीकडून घेतले जात असत, तेही हलकेसलके नसून ईश्वर, माया, पुरुष, प्रकृति, अहंकार, गुणत्रय, पंचभूतें, पंचीकरण, जगदुत्पत्ति, जीव, जन्ममरण, पुनर्जन्म, कर्म, मोक्ष,

अशांसारखे अत्यंत बिकट आणि अत्यंत अज्ञेय असे असावयाचे! जे साधु म्हणून मिरवावयाचे, त्यांनीं असल्या गहन विषयांचीच निवडणूक केली पाहिजे, हें उघडच आहे! हे विषय मूळचेच कठिण, आणि त्यांतून ते लिहिण्यामध्यें व्यवस्थितपणा नसला, म्हणजे तर घोंटाळा चक्रवाढव्याजाच्या दरानें वाढत जावयाचा! शिवाय एकदां जें कोणी लिहिलेलें असेल, त्याचेंच चर्वितचर्वण पुढच्या ग्रंथांमधून चाललेलें असावयाचें! त्यांत कोणी नवीन शंका काढील, किंवा नवीन समाधान सांगेल, असें सहसा व्हावयाचें नाहीं. आणि ओंवी वगैरेसारख्या कोणत्या तरी छंदामधून हें घोटाळ्याचें विवेचन चाललें असल्यामुळें या छंदाच्या निर्बंधानें त्या घोंटाळ्यामध्यें उलट जास्तच भर पडत असे. आणखीही एक घोंटाळ्याचें कारण असें झालें कीं, मूळचे मराठींतील चांगले लेखक हे थेट संस्कृतांतील ज्ञानाच्या झऱ्यावर आपलें पाणी भरून घेत असत; परंतु पुढील मंडळीमध्यें मराठीच्या अभिमानाची आणि संस्कृताच्या उपमर्दाची विशेष गोडी असल्यामुळें, मूळ संस्कृताविषयीं अज्ञानी असलेल्या या मंडळीला आपली तहान दुसऱ्यांनीं मराठीच्या भांड्यांत भरून ठेवलेल्या सांचवणीच्या पाण्यावर भागवून घ्यावी लागत असे. त्यामुळेंही विषयामध्यें संदिग्धता जास्त राहूं लागली. विषय दुर्ज्ञेय, ग्रंथ घोंटाळ्याचे आणि लोक अज्ञानी, अशा या गुणत्रयाच्या—अथवा दुर्गुणत्रयाच्या—संमेलनापासून आणखीही एका गोष्टीची उत्पत्ति झाली. ती अशी कीं, गुरु आणि शिष्य ह्यांचें बंड विशेष जोरानें माजूं लागलें. जेथें ग्रंथांची विवेचनपद्धति स्फटिकासारखी शुद्ध आहे, आणि जेथें ते ग्रंथ वाचून समजण्याइतकी बौद्धिक शक्ति वाचकांच्या मनामध्यें आहे, तेथें गुरुशिष्यभावाच्या स्तोमाची अपेक्षा तरी काय आहे? जें ग्रंथांत लिहितां यावयाचें नाहीं, तेवढेंच कानांत सांगण्याकरितां कदाचित् गुरूंची गरज शिल्लक राहील. परंतु एवढ्यापुरतेच गुरु ठेवावयाचे आणि बाकीचें काम ग्रंथांनीं भागवावयाचें, इतकी ज्या समाजाची बौद्धिक उन्नति आणि उत्क्रांति झालेली आहे, त्या समाजामध्यें ढोंगी गुरूंची आणि मूर्ख शिष्यांची लोकसंख्या साहजिकपणेंच पुष्कळ कमी होईल. जुन्या संस्कृत वाङ्मयाचें परीक्षण केलें असतां त्यांत या गुरुशि-

त्यांचीं स्तोत्रें कोठें फारशीं–निदान मराठींतल्या इतकीं–आढळत नाहींत. लोक ग्रंथ वाचीत असत, आणि त्यांतील भावार्थ समजून लक्ष्यांत घेत असत. प्रत्येक साध्य गोष्टीसाठीं त्यांना कानमंत्राची जरुरी लागत नव्हती. परंतु अशिक्षित समाज ही कान फुंकणाऱ्या गुरूंच्या पिकाची एक फार सुपीक जमीन आहे. आणि त्याचा अनुभव आपल्याकडे पदोपदीं आलेला आहे.

अशा रीतीनें विद्वत्ता आणि भक्ति यांची फारकत झाली. पूर्वींचे संस्कृतांतील वेदान्ताचे लेखक हे फारसे भक्त नव्हते, आणि अलीकडचे मराठींतील वेदान्ताचे लेखक हे फारसे विद्वान् नव्हते. आणि येथें असाही एक प्रश्न उत्पन्न होतो कीं, शास्त्र या दृष्टीनें वेदान्ताचें विवेचन करण्याला कोणाची अवश्यकता आहे ? विद्वत्तेची कीं भक्तीची ? वेदान्तविषयाच्या यथास्थित प्रतिपादनामध्यें नुसती भक्ति काय करणार ? या शास्त्रांत विषय कोणकोणते यावेत, त्यांचा क्रम कसा असावा, त्यांतील प्रमेयें प्रमाणांनीं कशीं सिद्ध करावीं, तीं सुलभ रीतीनें समजून देण्याकरितां मार्मिक ग्रंथकारानें काय योजना करावी, इत्यादि गोष्टींच्या कामांत भक्तीचा काय उपयोग होणार ? भक्तीनें अंतःकरण पवित्र होईल, नेत्र अश्रूंनीं ओले होतील, कंठ सद्गदित होईल, आणि सर्वांग रोमांचित होईल; परंतु याच्या पलीकडे ग्रंथलेखनाच्या कामांत भक्तीच्या हातून दुसरें काय व्हावयाचें आहे ? ग्रंथलेखनांत विद्वत्ता हेंच प्रधान अंग आहे. तें असून भक्ति असेल, तर विशेष चांगलें. पण भक्ति नसली, तरी विद्वत्तेचें ग्रंथलेखनाचें काम अडून राहील, असें मात्र नाहीं. उलट विद्वत्तेचें साहाय्य नसलें, तर मात्र एकट्या भक्तीचें ग्रंथलेखनाचें काम फारसें चांगलें होईल, असें नाहीं. याचीं उदाहरणें मराठी वाङ्मयांतील उत्तरकालीन कांहीं भारुड ग्रंथांमधून चांगलीं दिसून येतात. वेदान्त शास्त्राचे आद्य प्रतिपादक श्रीमत् शंकराचार्य हे कांहीं भक्तकोटीमध्यें प्रामुख्येंकरून पडण्यासारखे नव्हते. याच्या उलट महाराष्ट्रभाषेचे आणि त्या भाषेंतील वेदान्ताचे आद्य प्रतिपादक श्रीमत् शंकराचार्य–जे श्रीज्ञानेश्वर महाराज–ते विद्वानही होते व भक्तही होते. त्यामुळें त्यांच्या ग्रंथामध्यें विद्वत्तेचें जितकें कार्य व्हावयाचें तितकें सगळें होऊन शिवाय त्यामध्यें भक्तीचा प्रेमळ-

पणाही उत्पन्न झालेला आहे. परंतु हें विद्वत्तेचें आणि भक्तीचें प्रमाण पुढें पुढें चुकत चाललें. विद्वत्ता कमी होत चालली, आणि ढोंगी भक्तीचें प्रमाण जास्त वाढूं लागलें. याचे एकंदर परिणाम वेदांतविषयक ग्रंथलेखनावर काय झाले, हें वर सांगितलेंच आहे. विद्वत्ता ही कठिण आणि भक्ति ही सोपी. सज्ञान समाजामध्यें विद्वत्ताप्रेरित ग्रंथांचा प्रसार होतो, आणि जनसमूह अशिक्षित झाला असतां त्यामध्यें भक्तिप्रचुर ग्रंथांचें प्राबल्य वाढतें. जसा खटपटीचा आणि सज्ञानपणाच्या अवश्यकतेचा कर्ममार्ग मागें पडला, आणि सोपा व अडाणीपणामध्येंही समजण्याला शक्य असा भक्तिपंथ पुढें सरसावला, त्याचप्रमाणें विद्वत्तेचा वेदांत मागें पडला आणि भक्तीचें तट्टू अशिक्षित समाजामध्यें पुढें दामटलें गेलें. समाजाच्या अशिक्षितपणाच्या अवस्थेचें आणखीही एक चिन्ह आहे. सुशिक्षित समाजाला प्रमाणबद्ध विस्तृत ग्रंथ झेंपतात. परंतु ज्यांच्या मनाची ज्ञानग्रहणशक्ति फारशी परिपक्वतेला पोंचलेली नसते, अशा समाजाला आणि त्यांतील लोकांना लहान लहान काव्यें, स्फुट कविता, चुटके, उपाख्यानें, त्रोटक ओंव्या किंवा परस्परांशीं फारसे संबद्ध नाहींत असे अभंग, अशा जातीचेंच वाङ्मय पसंत पडतें. व तसलेंच वाङ्मय इतर विषयांवरच्या वाङ्मयाप्रमाणें वेदांतविषयावरही पूर्वीं प्रसिद्ध होत होतें.

परंतु हल्लींची स्थिति बदललेली आहे. हल्लींच्या काळांत दोन तीन शतकांच्या पूर्वींच्या ग्रंथ लिहिण्याच्या पद्धतींत फेरफार करणें अवश्यक आहे. वेदांतविवेचनासारख्या विषयाला पद्यरचनेपेक्षां गद्यरचना जास्त चांगली, ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. व यासंबंधानें आतां कोणाला सूचना देण्याचेंही कारण उरलें नाहीं. कां कीं, हल्लीं 'तूं आपला वेदांतविषयावरील ग्रंथ ओंव्यांमध्यें किंवा अभंगामध्यें लिही,' असें मुद्दाम आग्रहानें सांगितलें, तरीही कोणी ऐकणार नाहीं! तसेंच वेदांतांतील तुटक तुटक विषयांवर त्रोटक चुटके लिहिण्याचीही पद्धत सोडून दिली पाहिजे. तसेंच कोठला तरी एखादा अभंग किंवा कोणती तरी एखादी ओंवी घेऊन तिचा आधार दाखवून आपला सिद्धांत स्थापित करावा, ही पद्धतीही फारशी चांगली नाहीं. कारण एक अभंग जर एका अर्थाचा मिळाला, तर दुसरा अभंग त्याच्या अगदीं उलट अर्थाचा दाखवून

देतां येण्यासारखा असतो. त्यामुळें खऱ्या सिद्धांताचा निश्चय ठरणें कठिण होतें. वेदांमध्यें आणि उपनिषदांमध्यें कित्येक ठिकाणीं अशींच परस्पर-विरोधी अनेक वाक्यें सांपडतात. परंतु आचार्यांसारख्या संस्कृतांतील ग्रंथकारांनीं त्या वाक्यांची चिकित्सापूर्वक मिमांसा करून त्यांच्या संबंधानें एकेकदां सिद्धांत ठरवून ठेविलेले आहेत. तसें मराठींत झालेलें नाहीं. वस्तुतः तसे प्रयत्न मराठींतील श्रेष्ठ साधुकवींच्या संबंधानें व्हावयाला पाहिजे आहेत. श्रीज्ञानेश्वरमहाराज किंवा श्रीतुकाराममहाराज, यांच्या सारख्यांनीं निरनिराळ्या प्रसंगांच्या ओघानें निरनिराळे उद्गार काढिलेले आहेत; ते एकत्र करून त्यांच्या वचनांत कोठें विरोध असतील, तर त्यांची एकवाक्यता करून ब्रह्म, माया, जगदुत्पत्ति, जीवात्मा, मोक्ष, इत्यादि अनेक विषयांसंबंधानें त्यांच्या मतांचा निष्कर्ष काय निघतो, याविषयीं संगतवार आणि पद्धतशीर असे ग्रंथ तयार झाले, तर ते फार महत्त्वाचे होतील. व तसले वेदान्तावरील निश्चयात्मक ग्रंथ महाराष्ट्र वाङ्मयाला आज पाहिजे आहेत. अध्यात्मविषयक प्रश्न पुष्कळ आहेत आणि बिकटही आहेत. व त्यांचीं समाधानकारक उत्तरें आपल्याला कळावीं, अशी पुष्कळांची उत्कट इच्छाही आहे. ही इच्छा पद्धतशीरपणानें आणि मीमांसामूलक विवेचनानें तृप्त होण्याचीं साधनें उत्पन्न होतील, तर त्यांचें प्रेमपूर्वक स्वागत कोणता चिकित्सक वाचक करणार नाहीं ? परंतु तीं साधनें पद्धतशीर आणि मीमांसामूलक मात्र असलीं पाहिजेत. उगीच घोंटाळा आणि गडबडगुंडा असतां कामा नये. आपल्यांत आणि विशेषतः आपल्यामधील वेदांतांत गडबडगुंडा आधींच पुष्कळ झालेला आहे. त्यांत नवीन ग्रंथकारांनीं आणखी जास्त भर घातली नाहीं, म्हणून त्यांच्यावर कोणीही रागावणार नाहीं. नवीन ग्रंथ जो करावयाचा, तो लोकांचें मन घोंटाळ्यांत घालण्यासाठीं नाहीं, तर त्यांतून काढण्यासाठीं होय, ही गोष्ट विशेषतः वेदान्तग्रंथ लिहितांना प्रत्येकानें आपल्या डोळ्या-पुढें ठेवणें अत्यंत अवश्यक आहे. शास्त्र हें कांहीं कोणाच्या घरचें नाहीं. मनुष्याच्या बुद्धीच्या आकलनशक्तिप्रमाणें प्रत्येकाच्या बुद्धीला जितकें कांहीं नवीन सुचेल, तितकें त्यांत भर घालून तें वृद्धिंगत करावयाचें, अशी वृत्ति नेहमीं शास्त्रांच्या संबंधानें असावी. म्हणजे साहजिकपणेंच त्या

शास्त्रांमध्यें प्रामाणिकपणा उत्पन्न होत जातो. जें प्रमाणांनीं सिद्ध करतां येण्यासारखें असेल, तें प्रमाणांनीं सिद्ध करून दाखवावें; व जें नसेल, तें प्रमाणांनीं सिद्ध करतां येत नाहीं, म्हणून स्पष्ट सांगावें. मनुष्याच्या बुद्धीला समजण्यासारख्या अमुक गोष्टी आहेत, आणि त्यांच्या पलीकडच्या गोष्टी अतींद्रिय आहेत, असा स्पष्ट विषयविभाग करून दाखवावा. अमुक गोष्टी प्रत्यक्ष व अनुमान या प्रमाणांनीं सिद्ध होतात, व अमुक गोष्टी शाब्द प्रमाणाच्या भिस्तीवर मान्य कराव्या लागतात, असें उघड उघड बोलावें. होतां होईल तों शाब्द प्रमाणावर अतिभार टाकूं नये. माझ्या बुद्धीला इतकें इतकें समजतें, व याच्या पलीकडील गोष्टी मी श्रद्धायुक्त असल्यामुळें मानतों, किंवा अश्रद्धावान् असल्यामुळें मानीत नाहीं, असें जें खरें खरें असेल, तें स्पष्ट सांगावें. खरें सांगण्यापासून कोणत्याही शास्त्राची कधींही हानि झालेली नाही. उलट दांभिकपणापासून शास्त्राच्या प्रगतीचें नुकसान झालेलें आहे. ईश्वर आणि मनुष्य, परमात्मा आणि जीवात्मा, यांच्या परस्परसंबंधांचें विवेचन सामान्यतः या अध्यात्मशास्त्रामध्यें येत असल्या-कारणानें, सर्व मनुष्यांना ज्या गोष्टी साधारण असतील, त्याच गोष्टी सिद्धांत म्हणून घेतल्या जाव्यात. आणि म्हणून एकाद्या विवक्षित लोकां-मधील शाब्दप्रमाण दुसऱ्या लोकांच्या शाब्दप्रमाणाशीं विरोधी असेल, तर अन्य प्रमाणांनीं निर्णय होईपर्यंत आपल्याच शाब्दप्रमाणांचा आग्रह आणि अभिमान धरणें व दुसऱ्यांचा अधिक्षेप करणें, इत्यादि गोष्टी शास्त्रीय विवेचनामध्यें ज्या अगदीं गैर मानिलेल्या आहेत, त्यांचा आपण होतां होईल तों बिलकूल अवलंब करूं नये. अशा पद्धतीनें स्वतंत्र रीतीनें वेदांता-वर ग्रंथ लिहिले, किंवा ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम, यांच्यासारख्यांच्या ग्रंथांमधून त्यांच्या मतांचा निष्कर्ष काढून तो व्यवस्थित रीतीनें लोकांपुढें मांडला, तर त्यापासून आपल्या समाजाचा खरोखर पुष्कळ फायदा होईल.

# पूर्वजन्म आणि पुनर्जन्म.

संत बहिणाबाई या नांवाच्या एका संत बाईचे कांहीं अभंग नुकतेच प्रसिद्ध झाल्यापासून त्यांच्याकडे बऱ्याच लोकांचें लक्ष वेधून गेलें आहे, असें त्यासंबंधानें अलीकडे कित्येकांचे जे कांहीं लेख कोठें कोठें प्रसिद्ध झाले आहेत, त्यावरून दिसून येतें. बहिणाबाई या जुन्या संत कवयित्रीची नवीन कविता वाचक वर्गापुढें आल्यानंतर ती नवी म्हणून तिजकडे लक्ष वेधणें हें तर स्वाभाविकच आहे; परतु ती कविता चांगली आहे, म्हणूनही तिजकडे लोकांचें लक्ष लागत आहे, हें त्यांत विशेष आहे या बहिणाबाईंच्या कवितांच्या संग्रहामध्यें अनेक विषय आलेले आहेत, व जो तो टीकाकार आपल्या मनाच्या आवडीप्रमाणें आणि बुद्धीच्या ऐपतीप्रमाणें त्यांतील कांहीं विषय निवडून घेऊन त्यांवर आपल्या लेखणीचें टोंक झिजवीत आहे. इतर संत कवींच्या ग्रंथांतून प्रायः जे विषय असतात, तशाच प्रकारचे मनःपर अभंग, भक्तिपर अभंग, त्रिगुणवर्णन, अनुतापावर अभंग, संतमहिमा, सद्गुरुमहिमा, तुलसीमाहात्म्य, ज्ञानपर अभंग, ब्रह्मकर्माचे अभंग, संतसंगावर अभंग, टोणप्याचे अभंग, मनोबोधाचे अभंग, भक्ताभक्तवर्णन, मनास उपदेश, इत्यादि विषय बहिणाबाईंच्या कवितेंत पुष्कळ आलेले आहेत. परंतु त्यांच्या कवितासंग्रहामध्यें निर्याणाचे अभंग म्हणून जो एक भाग आहे, तो अचार्वितत्वाच्या दृष्टीनें आणि इतरही अनेक दृष्टींनीं विशेष महत्त्वाचा आहे. म्हणून बाकीचे विषय सोडून त्या अगम्य आणि अज्ञेय प्रदेशामध्यें प्रवेश करण्याचा आपण शक्य तेवढा प्रयत्न करूं.

आपण इहलोकीं जन्माला येण्याच्या पूर्वीं आपल्याला जन्म नव्हता, आणि आपण इहलोकांतून एकदां मरून गेल्यावर आपल्याला

पुनरपि जन्म नाहीं, असें मानणारे कित्येक नास्तिक लोक आणि धर्म-पंथ आहेत. परंतु अशांची संख्या एकंदरींत या जगांत फार कमी आहे. याच्या उलट पूर्वजन्म आहे आणि पुनर्जन्महीं आहे, असें मानणारे लोक आणि धर्म याची मोजदाद केली असतां ती खात्रीनें पुष्कळ पटीनें जास्त भरेल. या जास्त लोकांची या विषयासंबंधानें कांहीं प्रत्यक्ष प्रमाणांवरून खात्री पटलेली असते, असें नाहीं. तरी पण असल्या गोष्टींवर विश्वास ठेवण्याकडे मानवी मनाची थोडीशी स्वाभाविकच प्रवृत्ति असते. त्यामुळें या गोष्टी खऱ्या म्हणून धर्माच्या औपचारिक दृष्टीनें मानल्या जातात.परंतु या सांप्रदायिक विश्वासाच्या थराच्या खालीं बहुतेक मनांतून एक संशयाचा गुप्त थर असतोच. व 'या पूर्वजन्माच्या आणि पुनर्जन्माच्या प्रश्नासंबंधानें इहजन्मीं जर कांहीं थोडा बहुत प्रत्यक्ष अगर दुसऱ्या कांहीं प्रकारचा पुरावा मिळेल, तर तो मला पाहिजे आहे,' असें तो संशय प्रत्येक मनुष्याच्या मनाशीं हळुच बोलत असतो. त्या संशयाच्या निवृत्ती-साठीं जें कोठें कांहीं प्रमाण मिळेल, त्याचें परीक्षण करणें अवश्य आहे.

बऱ्याच साधूंच्या निर्याणासंबंधाचे अभंग सुप्रसिद्ध आहेत. ज्ञाने-श्वर, निवृत्ति, सोपान, मुक्ताबाई, यांच्या निर्याणासंबंधाचे नामदेवाचे अभंग वाचून ज्यांचें अंतःकरण सद्गदित आणि शरीर रोमांचित होत नाहीं, असा मनुष्य विरळाच आढळून येईल. तुकाराम महाराजांच्या निर्याणप्रसंगासंबंधाचेही असेच कित्येक कवितात्मक उल्लेख वाचण्यांत येतात. परंतु बहिणाबाईच्या निर्याणाच्या अभंगांमध्यें एक विशेष आहे. व तो हा कीं, त्यांतील हकीगत बहिणाबाईनीं स्वतः सांगितलेली आहे. हे अभंग सुमारें ३४।३५ आहेत. हे अभंग लिहिण्याचा प्रसंग असा आहे कीं, बहिणाबाईच्या वयाला ७२ वर्षें लोटल्यावर आतां आपला अंत-काळ समीप आला आहे, असें जाणून त्यांनीं आपल्या पुत्राला तो होता त्या गांवाहून आपल्याजवळ बोलावून आणिलें, व आजपासून पांच दिव-सांनीं—म्हणजे आश्विन शुद्ध १ चे दिवशीं—आपण देह ठेवणार, असें त्यास सांगितलें. तेव्हां गोदावरीच्या कांठीं जेथें तो पुत्र रहात होता, त्या तीर्थाचे ठिकाणीं आपल्या आईला नेऊन तिनें देह ठेवल्यावर मग त्या क्षेत्रांत तिची समाधि बांधावी, अशी पुत्राची इच्छा होती. ती त्यानें व्यक्त केल्या-

वर बहिणाबाई त्याला इतर सर्व तीर्थांपेक्षां आत्मज्ञानाच्या तीर्थाचें महत्त्व किती श्रेष्ठ आहे, हें मोठ्या मार्मिकपणानें पुढील अभंगामध्यें सांगत आहे. तो अभंग येणेंप्रमाणें:—

आत्मज्ञाना ऐसें तीर्थ कोण दुजे । ज्ञानिया उमजे पूर्व पुण्यें ॥ १ ॥
जेथें हें मानस केलें असे शुद्ध । तीर्थ हें प्रसिद्ध वेदशास्त्रीं ॥ २ ॥
तयाच्या मज्जनें जन्म गेले बारा । शुद्ध ते अंतरा करावया ॥३॥
तेरावा हा जन्म लाधलें साधन । तया तर्थीं स्नान जन्म नाहीं ॥ ४ ॥
केले वो प्रयास साधनाचे कष्ट । होतें योगभ्रष्ट म्हणोनिया ॥ ५ ॥
वासना मळीण शुद्ध झाली येथ । ज्ञानियासी तीर्थ तेंची खरें ॥ ६ ॥
वृत्तिशून्य होय मानस तें ज्ञानीं । तीर्थ सर्वांहुनी श्रेष्ठ तेंचि ॥ ७ ॥
विचारूनी बरें पाहे तूं अंतरीं । बाह्य तीर्थांतरीं हेत नाहीं ॥ ८ ॥
बहेणी म्हणे वृत्ति झालिया निमग्न । तीर्थांची ते संज्ञा तेची खरी ॥ ९ ॥

या अभंगांत जो तेरा जन्मांचा उल्लेख आलेला आहे, त्यावरून हल्लींच्या पूर्वींचे ते बारा जन्म कोणकोणते म्हणून मुलानें साहजिकपणें प्रश्न केल्यावरून बहिणाबाईनीं पूर्वींच्या आपल्या बारा जन्मांची हकीकत बऱ्याच विस्तृत रीतीनें वर्णिली आहे. आपल्या संस्कृत आणि मराठी वाङ्मयांतून, जुन्या भारत भागवतादिकांसारख्या इतिहासपुराणांतून आणि नव्या भक्तिरसाच्या भाविक ग्रंथांतून पूर्वींच्या जन्मांची आणि पुनर्जन्मांचीं वर्णनें प्रसंगवशात् पुष्कळ आलेलीं आहेत. परंतु बहिणाबाईनीं दिलेल्या वर्णनाइतकीं ती सविस्तर नाहींत. शिवाय बहिणाबाईचे बारा पूर्वजन्म हे अगदीं अलीकडच्या काळांतलि असल्यामुळें ते पौराणिक प्रदेशापेक्षां अधिक विश्वासार्ह आणि विचारार्ह वाटणें स्वाभाविक आहे. बहिणाबाईनीं आपल्या सर्व जन्मांची जी हकीकत दिलेली आहे, ती विहंगम दृष्टीनें वाचकांच्या चटकन लक्षांत यावी आणि त्यांतील विधानांची वाचकांना सहज तुलना करतां यावी, या हेतूनें ती माहिती कोष्टकाच्या रूपानें वर्गीकरण करून खालीं दिली आहे.

| जन्माचा अनुक्रम | जन्माचें गांव. | जात. | वय | पुरुष किंवा स्त्री जन्म. | नांव. | बाप. | आई. | पूर्वजन्मीं पुत्र कोण होता. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | बेटावद | वैश्य | १३ | स्त्री | वारुणी | केदार | रूपवंती | सेवक. |
| २ | फल्गुतीरीं कुमचक्र | ,, | २८ | ,, | | सात्त्विक | | सुवर्मागुरूचा पुत्र. |
| ३ | गोदातीरीं ब्रह्मगिरि | ,, | २४ | ,, | हेमकला | वर्धमान | भामिनी | भाऊ. |
| ४ | | गवळी | | ,, | | | | |
| ५ | | | | ,, | | | | |
| ६ | | | | ,, | | | | |
| ७ | | | ६६ | ,, | | | | |
| ८ | वेरुळ | क्षेत्री | १८ | ,, | | धर्मदत्त | | |
| ९ | | ,, | ९ | ,, | | | तेचि | |
| १० | | ब्राह्मण | ४२ | ,, | | कौशिक | माता | पहिला पुत्र |
| ११ | प्रवरासंगम | माध्यांदिन | ४३ | ,, | सौजिन्या | गोकर्ण | अद्भुता | गुरुबंधुपुत्र |
| १२ | लाखखणी | ,, | ३६ | ,, | | रामचंद्र | जानकी | |
| १३ | देवगांव | वाजसनेयी | ७२ | ,, | बहिणाबाई | | जानकी | |
| | | | ३५१ | | | | | |

या कोष्टकांत ज्या सदराखालीं कांहीं माहिती दिलेली नाहीं, त्या सदरासंबंधानें ती माहिती मूळ अभंगामध्येंच दिलेली नसल्यामुळें येथें दाखल केलेली नाहीं, असें समजावें. या कोष्टकावरून बहिणाबाईच्या तेरा जन्मांचें चित्र एकदम आपल्या डोळ्यांपुढें थोडक्यांत येतें. या कोष्टकांत तेरा जन्मांपैकीं अखेरच्या म्हणजे तेराव्या जन्माच्या अखेरीस बहिणा-

बाई ही मुक्त झालेली आहे. कारण ती एका अभंगामध्यें असें स्पष्ट म्हणत आहे कीं, "बहेणी म्हणे आतां नाहीं जन्म घेणें उठलें धरणें वासनेचें ॥" आणि मुक्त होण्याच्या स्थितीला येणें म्हणजे अर्थात् जीवाची अध्यात्मिक उन्नति अत्यंत परिपक्वतेला येऊन पोहोंचणें असाच अर्थ होय, हें उघड आहे एखादा जीव ताबडतोब उद्धरत नाहीं, तर उद्धरण्याच्या पूर्वी त्याला अनेक जन्म घ्यावे लागतात, याचें कारण काय? तर त्याची अध्यात्मिक उन्नति जशी व्हावयाला पाहिजे असते, तशी ती झालेली नसते. ही वाढ क्रमाक्रमानें होत असते, व ती एका जन्मामध्यें पुरी झाली नाहीं, तर ती पुरी करण्याकरितां जरूर लागतील तितके पुढील जन्म घ्यावे लागतात, अशी आपल्यामधील या विषयासंबंधींची कल्पना आहे. "अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम्" या भगवद्गीतेंतील वचनामध्येंही हाच भावार्थ सांगितलेला आहे. यालाच इंग्रजीमध्यें Evolution (उत्क्रांति) असें म्हणतात. ही आत्म्याची अध्यात्मिक उत्क्रांति होऊन अखेरीस तो आत्मा मुक्त होतो, हा सिद्धांत झाला. परंतु या सिद्धांताचीं उदाहरणें आपल्याला क्वचित्च प्रत्यक्ष पहावयास मिळतात. एखादा साधु किंवा संत ब्रह्मीभूत झाला असतां त्याचा आत्मा मुक्त झाला, असें आपण म्हणतों; परंतु त्याचा आत्मा कोणकोणत्या पायऱ्यांनीं केव्हां केव्हां आणि कसा कसा उत्क्रांत होत गेला, ही अदृश्य गोष्ट आपल्याला दृश्य कशी होणार? आणि या उत्क्रांतीच्या वाढीची साक्ष सामान्य जनांना प्रत्यक्ष कशी पटणार? ही गोष्ट मोठी दुर्लभ आहे. परंतु बहिणाबाईनीं मुक्त होण्याच्या पूर्वींच्या आपल्या बारा जन्मांची हकीकत सविस्तर वर्णन केलेली असल्यामुळें ती दुर्लभ गोष्टही येथें सुलभ झाली आहे, अशक्यतेला शक्यता प्राप्त झाली आहे, आणि अदृश्य गोष्टी मानवी दृष्टीच्या टप्यामध्यें येणें संभवनीय झालें आहे!

या अध्यात्मिक उन्नतीच्या वाढीचें चित्र या बहिणाबाईंच्या तेरा जन्मांच्या वर्णनामध्यें आपल्याला जसें पहावयाला सांपडतें, तसें तें अन्यत्र क्वचित्च दृष्टीस पडतें. अलीकडे पाश्चात्य देशांतून कांहीं प्रयोग करण्यांत येत असतात, व त्यांच्या द्वारें कित्येक विवक्षित व्यक्तींना समाधीमध्यें पूर्वजन्मांचें ज्ञान होतें, असें प्रसिद्ध करण्यांत येत असतें. स्टेड साहेबांच्या

रिव्ह्यु ऑफ रिव्ह्यूज नामक मासिक पुस्तकांतून व मानसशास्त्राविषयीं वगैरे लेख प्रसिद्ध करणाऱ्या इतर ग्रंथांतून अशा प्रकारचीं वर्णनें प्रसिद्ध झालेलीं असल्याचें पुष्कळांना माहीत असेलच. त्याचप्रमाणें आपल्यांतील योगवासिष्ठ नामक ग्रंथामध्येंही अशा प्रकारचीं वर्णनें आढळतात. महाभारत व अष्टादश पुराणें यांमध्येंही अशा प्रकारचे प्रसंग पुष्कळ वेळां वर्णिलेले आहेत. बाणभट्टाच्या सुप्रसिद्ध कादंबरी नामक ग्रंथामध्येंही दोन तीन जन्मांच्या हकीकतीचे उल्लेख आलेले आहेत. परंतु या सर्व नानाविध जन्मांच्या हकीकतीं त्या त्या जीवांच्या अध्यात्मिक उन्नतीच्या वाढीच्या दृष्टीनें दिलेल्या नाहींत. व शिवाय ते जन्म फार तर दोन तीनच वर्णिलेले आहेत. यामुळें त्यांच्यांतील हकीकतीच्या तुलनेवरून कोणतेही सामान्य नियम ठरवितां येणें शक्य नाहीं. परंतु बहिणाबाईच्या या उदाहरणामध्यें तेरा जन्मांची हकीकत आपल्यापुढें असल्यामुळें तुलनेनें कांहीं सामान्य नियम ठरविण्याचा प्रयत्न करण्याला आपल्याला थोडीबहुत तरी जागा आहे,ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे.म्हणून आपण त्या विचाराकडे वळूं.

परंतु हा विचार हातीं घेण्याचे आधीं आणखी एक शंका उत्पन्न होते. ती अशी कीं, बहिणाबाईनें हें दिलेलें आपल्या तेरा जन्मांचें वर्णन अगदीं यथार्थ असेल काय ! कोणीही सामान्य नास्तिक मनुष्य असें म्हणेल कीं, बहिणाबाईनें आपल्या भाविकपणाच्या आणि भोळेपणाच्या भरांत जी आपल्या पूर्वजन्मांची काल्पनिक कविता लिहिली, तीच जर सत्य नसेल, तर त्यांतील विधानांच्या तुलनात्मक विवेचनानें काढलेल्या सामान्य सिद्धांतांना तरी सत्यतेच्या दृष्टीनें काय किंमत असणार ? ही शंका अगदींच निराधार आणि निष्फळ आहे, असें नाहीं; परंतु जे वाचक हे निर्याणाचे अभंग मनामध्यें ही शंका ठेवून वाचतील, त्यांना देखील यांत बनावटपणाचा प्रयत्न केल्याचीं स्थळें शोधून काढण्याला पुष्कळ प्रयास पडतील; आणि ते प्रयासही बहुतेक अंशीं निष्फळच होतील. हे अभंग फार सरळ आणि स्वाभाविक दिसतात. अंतकाळच्या अदृष्टदर्शी अवस्थेमध्यें बाहिणाबाईला जी स्फूर्ति झाली, तिचेंच वर्णन यांत असावें, अशी प्रेमळ वाचकांची खात्री पटण्यासारखी आहे. प्रयत्न करून आणि बनावट रचून जर ही हकीकत लिहिण्यांत आलेली असती, तर

या हकीकतीमध्यें हल्लीं जे कित्येक दोष दिसून येत आहेत, ते ही बनावट हकीकत रचणाऱ्या जीवानें बहुधा त्यांत ठेविले नसते. वरील कोष्टकामध्यें आपण पाहिलें, तर पुष्कळ ठिकाणच्या सदरांतून कांहींच माहिती दिलेली नाहीं, असें आपल्याला आढळून येतें. मुख्यत्वेंकरून आपल्या मुलाचा आणि आपला मागील लागोपाठच्या बारा जन्मांमध्यें जो एकसारखा एकत्र सहवास होता, तो कसकसा होता, मागच्या निरनिराळ्या जन्मांतून आपण कोण होतों आणि त्याच वेळीं तेथें आपला मुलगा कोण होता, हें आपल्या मुलाला सांगण्याच्या उद्देशानें बहिणाबाइ ही हकीकत लिहिण्याला प्रवृत्त झाली आहे. असें असतां बहिणाबाईनें आपलें व आपल्या मुलाचें मागील फक्त पांचच जन्मांतील नातें सांगितलें आहे. व बनावट काव्यांतून नीटनेटकेपणाकडे सहसा इतकें दुर्लक्ष होणें शक्य नसतें. तसेंच बहिणाबाईनें मागील कित्येक जन्मांतील आपलीं, आपल्या बापाचीं, व आपल्या आईचीं कांहीं नांवें सांगितलीं आहेत. व बाकीचीं नांवें तशींच सांगावयाचीं राहून गेलेलीं आहेत. ही गोष्ट वरच्या सारखीच आहे. सारांश, या अभंगांतलि स्वाभाविकपणावरून त्यांत सत्यता असावी, असें वाटतें. शिवाय बहिणाबाई सारख्या पवित्र अंतःकरणाची बाई अंतकाळच्या सारख्या पवित्र—निदान मिथ्याचरणाच्या पातकाला अयोग्य—अशा वेळीं मुद्दाम जाणुन बुजून खोटी आणि बनावट हकीकत लिहिण्याला बसून हें काव्य रचील, ही गोष्ट संभवनीय दिसत नाहीं. परंतु असल्या कितीही गोष्टी सत्यतेच्या पुराव्यासाठीं जरी पुढें आणल्या, तरी मूळ शंका अगदीं नष्ट होईलच, असें म्हणतां यावयाचें नाहीं. तरी पण असत्यतेपेक्षां सत्यतेकडेच कोणाच्याहि मनाचा कांटा जास्त झुकेल, यांत शंका नाहीं. तेव्हां एवढ्या सारासार निर्णयानें यांत जितकी जितकी कांहीं सत्यता असेल, तितकीच गृहीत धरून तेवढ्यावरून जीवाची अध्यात्मिक उत्क्रांति कसकशी होत जाते, याचें आपण शक्य तेवढें परीक्षण करूं.

या अध्यात्मिक उत्क्रांतीच्या दृष्टीनें ६, ७, ८ व ९ नंबरच्या कोष्टकांचें फारसें महत्त्व नाहीं, हें उघड आहे. म्हणून तीं वगळून बाकीच्या कोष्टकांकडे आपण वळूं. कोष्टक नं.५ यांत बहिणाबाई आपल्या तेरा

जन्मांतून पुरुष किंवा स्त्री होती, हें नमुद केलें आहे. सामान्यतः पाहिलें असतां स्त्री जन्मापेक्षां पुरुषजन्म हा वरच्या दर्जाचा होय, व जर जीवात्म्याची सर्व बाजूनीं उत्क्रांति व्हावयाची असेल, तर स्त्री जन्मांत असलेल्या जीवात्म्याला पुरुष जन्म मिळावा, हें साहजिक दिसतें. परंतु बहिणाबाईची हकीकत खरी असेल, तर तिला लागोपाठ तेराही स्त्रीजन्मच प्राप्त झाले होते, असें दिसतें. व अखेरीस ती स्त्रीदेहांतूनच उद्धरून मुक्त झाली. यावरून असा निष्कर्ष निघतो कीं, मनाची उन्नति झालेली असली आणि वासनांचें बीज नष्ट झालेलें असलें, म्हणजे मग कोणताही स्त्रीचा अगर पुरुषाचा देह असला, तरी जीवात्मा त्यांतून उद्धरून जातो.

वरील कोष्टकाच्या मागील जें ४ नंबरचें कोष्टक आहे, त्यांत बहिणाबाईनें आपलीं निरनिराळया जन्मांतील जीं निरनिराळीं वयें दिलेलीं आहेत, तीं दाखल केलीं आहेत. उत्क्रांतितत्त्वाच्या दृष्टीनें पहातां वयाच्या संबंधानेंही सामान्य दृष्टीला असें वाटणें साहजिक आहे कीं, जो अधिक अधिक उत्क्रांत होत चालला, त्याला अल्पायुषी मरण न येतां तो दीर्घायु असावा. परंतु नंबर ४ च्या कोष्टकाच्या तुलनेवरून तसें मुळींच दिसून येत नाहीं. बहिणाबाईचें दीर्घजीवित्व उत्तरोत्तर सारख्या क्रमानें मुळींच वाढत गेलेलें नाहीं. यावरून असें म्हणावें लागतें कीं, जीवात्म्याची अध्यात्मिक उत्क्रांति आणि त्याच्या देहाचें दीर्घायुरारोग्य यांच्यामध्यें फारसा कांहीं संबंध नसावा. अमुक जन्मीं त्याचा देह लवकर कां पतन पावावा आणि अमुक जन्मीं तो दीर्घ काळ कां टिकावा, याच्या बद्दलचें नियमन करणारीं उत्क्रांतीशिवाय आणखी कांहीं तरी निराळीं कारणें असावीं, असें दिसतें.

कोष्टक नं. ३ यामध्यें बहिणाबाईच्या निरनिराळ्या जन्मांतील तिची जाति दिलेली आहे. तिचे पहिले तीन जन्म वैश्य जातींत झालेले आहेत. पुढें कांहीं जन्म गवळ्याच्या जातींत होऊन मग ती दोन जन्म क्षेत्री ( क्षत्रिय ) कुळांत जन्मलेली आहे. आणि नंतर शेवटचे तिचे चार जन्म ब्राह्मण कुळामध्यें झालेले आहेत. या जातीच्या कोष्टकामध्यें मात्र बहिणाबाईच्या बाबतींत उत्क्रांतीचें तत्त्व बऱ्याच रीतीनें अनुकूलपणें लागू पडतें. वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण या जातींच्या चढत्या पायऱ्या उत्क्रांतीच्या

चढत्या कलेबरोबर वाढत गेलेल्या दृष्टोत्पत्तीस येतात. परंतु इतर जातींतील लोक देखील उद्धरून गेल्याच्या कथा आपल्यामध्यें पुष्कळ आहेत. त्यामुळें जातीच्या उत्क्रांतीच्या पायऱ्यांनीं एकादा जीवात्मा जेव्हां ब्राह्मणत्वाच्या पायरीपर्यंत येऊन पोहोंचेल, तेव्हांच त्याची अध्यात्मिक उन्नति पुरी होऊन तो उद्धरेल, असा कांहीं नियम दिसत नाहीं. बहिणाबाईच्या बाबतीमध्यें ब्राह्मणत्व आणि मुक्ति हा केवळ काकतालीय न्याय झालेला आहे. तरी पण या बाबतीमध्यें मानसिक उत्क्रांतीच्या बरोबर भौतिक उत्क्रांतीच्या पायऱ्या चढत चढत गेलेल्या आहेत, एवढी गोष्ट निर्विवाद आहे.

बहिणाबाईच्या चरित्रांतील जेवढ्या गोष्टी कोष्टकांतून बसण्या सारख्या होत्या, तेवढ्या वरील कोष्टकांमध्यें बसविल्याच आहेत. परंतु ज्या कोष्टकांतून बसण्यासारख्या नाहींत, पण ज्यांचा अध्यात्मिक उत्क्रांतीच्या प्रश्नाच्या प्रसंगानें विचार करणें अवश्य आहे, अशा कित्येक गोष्टी बहिणाबाईच्या या तेरा जन्मांच्या अभंगांतून आहेत. त्यांपैकीं कांहीं गोष्टींचा दुसऱ्या एका मुद्याच्या दृष्टीनें आपण येथें विचार करूं. बहिणाबाईचे जर आपल्याला विदित झालेले असे एका मागून एक तेरा जन्म झाले आणि त्या तेरा जन्मांमधून तिच्या जीवात्म्याची उत्तरोत्तर अधिक अधिक उत्क्रांतिच होत चाललेली होती, तर कोणालाही साहजिकपणें असेंच वाटेल कीं, बहिणाबाईची जसजशी उत्क्रांति होत चालली होती, तसतसं तिला पुढील पुढील जन्मांतून जास्त जास्त सांसारिक सुख प्राप्त होत जावें. परंतु बहिणाबाईच्या तेराही जन्मांच्या चरित्रांचें परीक्षण करून पाहिलें, तरी त्यांत या तत्त्वाला कोठेंही सत्यत्व प्राप्त झालेलें दिसून येत नाहीं. सांसारिक सुखांतील मुख्य अंगें म्हटलीं म्हणजे स्त्रियांना पतिसुख आणि पुत्रसुख हीं होत. त्यांपैकीं बहिणाबाईला पहिल्या तीन जन्मांमध्यें या सुखांचें वारेंही लागलें नव्हतें. कारण त्या तीन जन्मांत तिचें मुळीं लग्नच झालेलें नव्हतें, असें वर्णन आढळतें. " नाहीं लग्न करूं दिधलें आपण ॥ " " न करूनि लग्न जाईल ते ॥ " " लग्न करूं नको ये कन्यकेचें । रूप विरक्तीचें हेमवती ॥ " अशा तिच्या पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या जन्मांतील लग्नांच्या हकीकतींविषयींचीं क्रमवार वचनें आहेत. बहिणाबाईचीं

पहिल्या तीन जन्मांतील वयें अनुक्रमें १३, २८ व २४ अशीं होतीं. इतकीं उपवर वयें झालेलीं असून त्या वेळच्या जुन्या काळींच्या चालीरीती-विरुद्ध बहिणाबाई अविवाहित कशी राहिली असेल, हें समजणें कठिण आहे. परंतु तिचें पहिल्या तीन जन्मीं लग्न झालेलें नव्हतें, हें तिच्या लिहिण्यावरून स्पष्ट होतें. तेव्हां या तीन जन्मांत तिला सांसारिक सुखाचा अनुभव लाभला नाहीं, हें उघड आहे. पुढल्या चार जन्मांत तिची या बाबतींतील कशी काय स्थिति होती, याबद्दल मुळांत कांहींच उल्लेख नसल्यामुळें हे मधले चार जन्म सोडून व त्याचप्रमाणें आणि त्याच कारणाकरितां नववाही जन्म वगळून बाकीच्या जन्मांकडे पाहिलें असतां त्यांपैकीं बहिणाबाईच्या आठव्या जन्माचीही कहाणी या बाबतींत दुःखमयच आहे. "लग्न केलें परी भ्रतार नासला। हितावह झाला तोहि मज ॥" ह्या अभंगांत वर्णन केल्या-प्रमाणें आठव्या जन्मीं तिचा भ्रतार नष्ट होऊन तिच्या संसाराचें मातेरें झालें. पुढें १०, ११, १२ व १३ या चारी जन्मांत तिचें लग्न होऊन तिला पतिसुख व कांहीं जन्मांत तिला पुत्रसुखही प्राप्त झाल्याचें वर्णन आहे. तरी पण सांपत्तिक स्थितीच्या दृष्टीनें पहातां तिचे हे शेवटले जन्म फारसे स्पृहणीय नव्हते. भिक्षा मागून तिनें चरितार्थ चालवावा, अशा प्रकारचीं वर्णनें यांतून आढळतात. सारांश, बहिणाबाईची जरी अध्यात्मिक उन्नति या सर्व जन्मांतून होत चाललेली होती, तरी त्या मानानें तिचें ऐहिक सुख जन्मोजन्मीं वृद्धि पावत चाललें होतें, असें दिसून येत नाहीं. आणि परमार्थाच्या दृष्टीनें पाहिलें असतां असें होणें हेंही स्वाभाविकच आहे. प्रपंचाच्या सुखांत मन रमलें, तर मग तें परमार्थाच्या सुखाला पात्र होण्याला व्यत्यय येईल; प्रत्यक्ष भ्रतार मरण पावला असतां, "हितावह झाला तोही मज" असें जें बहिणाबाईनें आपल्या आठव्या जन्माच्या हकिकतिमध्यें म्हटलें आहे, तेंही याच दृष्टीनें होय, हें उघड आहे.

बहिणाबाईच्या तेराही जन्मांच्या चरित्रांतील बहुतेक मुख्य मुख्य गोष्टींबद्दलचें विवेचन आपण येथपर्यंत केलें. आतां शेवटच्या परंतु सर्वां-हून जास्त महत्त्वाच्या अशा एकाच मुद्याचें विवेचन करावयाचें राहिलें आहे. तो मुद्दा म्हटला म्हणजे बहिणाबाईच्या प्रत्यक्ष अध्यात्मिक उत्क्रां-तीचा होय. ही उत्क्रांति होत असलेली आतांपर्यंत आपण ज्या अनेक

चाची तपासून पाहिल्या त्यांत कोठेंही आपल्याला स्पष्टपणें दृग्गोचर झाली नाहीं. तेव्हां अशी ही तिची अध्यात्मिक उत्क्रांति होत होती तरी कशी? ही असते तरी काय? आणि ही जाणावी तरी कशी? हे प्रश्न कोणाच्याही मनामध्यें उद्भवणें साहजिक आहे. या गोष्टीचीं कांहीं ज्ञापकें बहिणाबाईच्या या अभंगांतून आहेत. ती जन्मांच्या अनुक्रमानें आम्ही पुढें देतोंः—

### पहिला जन्म.

पूर्वील संस्कार होता कांहीं शुद्ध ॥<br>
दिधली ते दीक्षा शंकराचा मंत्र । जपे अहोरात्र खेळतांही ॥<br>
खेळतां देऊळ शंकराची मूर्ती । करितसे भक्ति प्रेमरसें ॥<br>
नावडेचि कांहीं आणिक सर्वथा । अखंडता चित्ता लागलीसे ॥

### दुसरा जन्म.

अठ्ठावीस वर्षे क्रमले तुजपाशी । आगर भक्तीसी करूनया ॥

### तिसरा जन्म.

रूप विरक्तीचें हेमवती ॥<br>
रागकला नाम ब्राह्मणाची सेवा । आठवी केशवा सर्वकाळ ॥

### चवथा जन्म.

गौळियाचे घरीं कन्याची होवोनी । गाई संरक्षणीं वर्ततसे ॥<br>
नामसंकीर्तन कालाची क्रमणा । संगति ते जाणा वैष्णवांची ॥<br>
आवडती देव तीर्थ क्षेत्र यात्रा । ब्राह्मणा सर्वत्रा पूजा करी ॥<br>
गाईचें रक्षण अरण्यांत वास । तंव झाला सहवास संन्याशाचा ॥<br>
देखोनी तयासी करीं नमस्कार । जाणोनी संस्कार कृपा केली ॥

पांचव्या व सहाव्या जन्मांतील या संबंधाची हकीकत मुळामध्यें कांहींच नाहीं.

### सातवा जन्म.

गौळियाचे घरीं गाईचें रक्षण । करूनी कीर्तन देह पोशी ॥<br>
मग भेटले ते सिद्ध आत्मज्ञानी । तेहीं ओळखूनी नेलें मज ॥<br>
म्हणती योगभ्रष्ट आहे हे विरक्त । दास्यत्वें सारीत काळ बहू ॥<br>
विरक्तीचें अंग ज्ञानाचा अभ्यास । करी रात्रंदिवस एकनिष्ठे ॥

सासष्टी वरुषें सातवीये जन्मीं । क्रमूनीया धर्मी प्रवर्तलीये ॥
अभ्यास करोनि टाकिलें शरीर ॥

### आठवा जन्म.

अठरा वरुषें क्रमिलीं आपण । करूनी श्रवण भागवत ॥

### नववा जन्म.

नववीये जन्मीं तथेंची जन्मलें । नऊ वरुषें केलें स्थान तेंची
तेची माता पिता तेचि बंधुवर्ग । अनुष्ठान सांग तेंचीं आम्हां ॥

### दहावा जन्म.

तुझा माझा गुरू संन्यासी केशव । तेणें विद्या सर्व प्रबोधिली ॥

### अकरावा जन्म.

( साता वरुषावरी केलें कन्यादान । पाहोनि निधान अतिज्ञानी ॥
अत्यंत विरक्त योगाभ्यासि ज्ञान । घालोनि आसन योग साधी ॥
नाम कीं तयाचें योगेश्वर ऐसें । सिद्धि त्या मानसें वोळंगल्या ॥ )
सेवेनें तयासी तोषविलें बहु । त्याचा माझा जीऊ एक झाला ॥
सांगितलें मज योगाचें आसन । धरूनीया ध्यान खेचरीचें ॥
गुरु तो भ्रतार सर्वस्व आमुचा । घेतलें सेवेचें सुख तेथें ॥

### बारावा जन्म.

तयाचीये पोटीं कन्येचिये रूपें । होऊनियां तपें साधियेलीं ॥
धरूनिया मौन वर्ततसें जनीं । बोलती वचनीं वाचा नसे ॥
( करूनिया लग्न दिधलेसें ब्राह्मणा । ज्योतिषि तो जाणा महा थोर ॥
तयासी प्रसन्न गणेश प्रत्यक्ष । बोलतसे साक्ष तयासी ते ॥ )
तयाचिया घरीं निराहार देहीं । सेवा सुख पाही घेतलें म्यां ॥
विरक्त मानस विषयभोगीं त्रास । सदा निजध्यास आत्मनिष्ठ ॥
रामचंद्र पिता राम-उपासक । अत्यंत विवेक ज्ञान तया ॥
माझे अंतरींचा जाणोनिया हेत । केलें माझें चित्त स्थिर तेणें ॥
लाऊनी समाधी बैसवी संनिध । अंतरीं तो बोध ठसावला ॥
स्वधर्म गौरव देऊनिया पति । सेवा आत्मस्थिति करी त्याची ॥

कोठें चित्त अणूमीतही न वैसें । सदा निजध्यासें देह वर्ते ॥
पडलें शरीर छत्तीस वरुषांत । व्हावें मुक्त परि शेष राहे ॥

## तेरावा जन्म.

या जन्मांत तुकाराम महाराजांचा बहिणाबाईवर अनुग्रह होऊन त्या मुक्त झाल्या, हें प्रसिद्धच आहे.

हे वर दिलेले उतारे वाचले असतां अध्यात्मिक उन्नतीच्या पायऱ्या कसकशा असतात, आणि वेदांतविषयक ग्रंथांतून त्यांचें जें वर्णन केलेलें असतें, त्यांच्याशीं हें बहिणाबाईनीं दिलेलें वर्णन कसें जुळतें, याच्याबद्दलची साक्ष कोणाही तज्ज्ञ वाचकाला तेव्हांच पटेल, यांत शंका नाहीं.

बहिणाबाईचें हें तेरा जन्मांचें वर्णन म्हणजे मानवी बुद्धीला अगम्य, अदृश्य आणि अज्ञेय प्रदेशाचें थोडेंसें दारच उघडलेलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. अशा दुर्लभ प्रसंगाचा फायदा घेऊन मानवी बुद्धीला बहुधा दुर्ज्ञेय अशा आणखी कांहीं ज्या शंका असतात, त्यांचें समाधान झाल्यास करून घ्यावें, अशी कोणाला जिज्ञासा उत्पन्न झाली, तर ती केवळ अस्थानींच आहे, असें केव्हांही म्हणतां येणार नाहीं. कोणी मांत्रिक, अंगांत आलेला, ज्योतिषी, किंवा सामुद्रिक आला असतां त्याला प्रश्न विचारून घेण्याची जशी स्वाभाविक प्रवृत्ति असते, तसाच बहुतेक हा प्रसंग आहे. म्हणून या प्रसंगीं आणखी एक प्रश्न उपस्थित करण्याकडे मानवी मनाची प्रवृत्ति होणें क्षम्य आहे. तो प्रश्न असा कीं, एका जन्मांतील मृत्यु आणि दुसऱ्या जन्माचा प्रारंभ यांच्यामध्यें किती काळ जातो ? बहिणाबाईच्या या तेरा जन्मांच्या हकीकतीमध्यें या प्रश्नाला कोठें कांहा उत्तर सांपडतें काय, याचा आपण थोडासा तपास करूं. छांदोग्योपनिषदामध्यें या प्रश्नाबद्दलचा उल्लेख क्वचित् प्रसंगीं आलेला आहे, व शंकराचार्यांनीं ब्रह्मसूत्रावर जें भाष्य लिहिलें आहे, त्यांतही ओघानें या विषयाचा उल्लेख केलेला आहे. परंतु कांहीं जन्म लवकर प्राप्त होतात आणि कांहींना पुष्कळ अवधि लागतो, असें फक्त सामान्यत्वेंकरून त्यांत सांगितलेलें आहे. कालासंबंधीं विशेष नियम कांहींच सांगितलेला नाहीं. महाभारत, पुराणें, योगवासिष्ठ, गुरुचरित्र, इत्यादिकांतून पूर्वजन्मांच्या ज्या कथा आहेत, त्यांत मधील अंतरें ठरविण्याला गमक अशीं प्रमाणें

फारच थोडीं आढळतात. त्यामुळें तेथें कांहींच निश्चय करितां येत नाहीं. प्लेटोनें, तसेंच थिऑसफिस्ट पंथांतील कित्येक लेखकांनीं, यासंबंधीं प्रसगवशात् जीं कांहीं विधानें केलेलीं आहेत, त्यांवरून त्यांच्या कल्पनेप्रमाणें एक जन्माचा शेवट आणि दुसऱ्या जन्माचा प्रारंभ यांच्यामध्यें शेंकडों वर्षें लोटत असलीं पाहिजेत, असें दिसतें. परंतु बहिणाबाईच्या या हकीकतीवरून इतकीं अतिशय वर्षें मध्यंतरीं लोटत असतील, असें दिसत नाहीं. बहिणाबाईनेंही मध्यतरीं किती वर्षें लोटत होतीं, याबद्दल कोठेंच कांहीं स्पष्ट उल्लेख केलेला नाहीं. परंतु तिचे तेराही जन्म लवकर लवकर होत गेले, असें अनुमान काढण्याला तिच्या कवितेमध्यें कित्येक ठिकाणीं कांहीं आधार आहेत. बहिणाबाई आपल्या आठव्या जन्मीं वेरूळ येथील धर्मदत्त नांवाच्या एका क्षत्रियाच्या पोटीं जन्मास येऊन अठरा वर्षांची होऊन निवर्तल्यानंतर फिरून "नववीये जन्मीं तेथेंचि जन्मलें । नऊ वरुषें केलें स्थान तेंची । तेची मातापिता तेची बंधुवर्ग ॥" असें बहिणाबाई सांगते. आठव्या जन्मांत बहिणाबाई धर्मदत्ताच्या पोटीं आली, तेव्हां त्याचें कमींत कमी वय धरलें, तरी तें निदान १८ वर्षांचें असलें पाहिजे. त्या वर्षीं त्याला मुलगी होऊन ती १८ वर्षांच्या वयाची होऊन मरण पावली असतां त्या वेळीं धर्मदत्ताचें वय ३६ वर्षांचें असलें पाहिजे. पुढें तीच मुलगी, म्हणजे बहिणाबाई, आपल्या नवव्या जन्मीं जेव्हां त्याच्या पोटीं आली, तेव्हां तो अतिशय वृद्ध झालेला असला, तर पराकाष्ठा ६० वर्षांचा झालेला असेल; कारण, या वयाच्या पलीकडे सामान्यतः संततिजननसामर्थ्य मानण्यांत येत नाहीं. तेव्हां अशा प्रकारची कल्पना केली, तरी बहिणाबाईचा आठवा जन्म आणि नववा जन्म यांच्या दरम्यान पराकाष्ठा २४ वर्षें गेलीं असावींत. याच्यापेक्षां कमीच गेला असलीं पाहिजेत; जास्त जाणें मात्र शक्य नाहीं.

बहिणाबाईनें आपल्या तेरा जन्मांच्या जिवंतपणाच्या आयुष्यांची म्हणून एकंदर बेरीज "तीन शतें आणि वरूषें एकावन्न । आयुष्य निर्माण तेरा जन्मीं ॥" या चरणांत ३५१ वर्षांची असल्याबद्दल सांगितलें आहे. त्या त्या जन्मांच्या त्या त्या आयुष्यमानांची बेरीज केली असतां ती ३५१ होते, हें खरें आहे. परंतु बहिणाबाईनें आपल्या चवथ्या, पांचव्या आणि

सहाव्या जन्मांचीं वयोमानें मुळींच कोठें सांगितलेलीं नाहींत. तीं अंदाजानें मिळवलीं असतां तिच्या तेरा जन्मांच्या आयुष्यमानाची बेरीज सुमारें ४०० वर्षांची होईल. म्हणजे अठराव्या शतकांतील बहिणाबाईचे तेरा जन्म लागोपाठ मधल्या अंतराशिवाय झाले असें मानलें, तर बहिणाबाईंचा या तेरा जन्मांपैकींचा पहिला जन्म चवदाव्या शतकांत झाला असावा, असें प्राप्त होतें. परंतु प्रत्येक जन्माच्यामध्यें कांहीं तरी अंतर गेलेलें असलेंच पाहिजे. परंतु तें अंतर फार नसावें, हें पूर्वींच्या आठव्या आणि नवव्या जन्मांमधील अंतराच्या विवेचनावरून दिसून येत आहे. याशिवाय आणखी एक कारण दिसत आहे, तें असें कीं, बहिणाबाईंनीं आपल्या जन्मांचीं ठिकाणें दिलेलीं आहेत, त्यांपैकीं पहिल्या जन्माचें ठिकाण "बेटावुद तापी तीरीं" असें दिलेलें आहे; हें ठिकाण म्हणजे खानदेश जिल्ह्यांतील हल्लींचें बेटावद हेंच गांव होय, याबद्दल कोणालाही शंका येण्याचें कारण नाहीं. आतां बेटावद हें नांव कांहीं फारसें जुनें नाहीं. हें पौराणिक नांव नाहीं. हें संस्कृत नांव नाहीं. हें अलीकडील कालांतील आणि अपभ्रष्ट भाषेंतील [व्युत्पत्तीच्या दृष्टीनें तळोदें (तल+उदक किंवा तल=देश) सावदें, शहादें वगैरेसारख्या खानदेशांतील इतर गांवांच्या नांवांशीं अंशतः साम्य असलेलें] कांहींतरी एक नांव आहे. तेव्हां आतां बहिणाबाई ही आपल्या पहिल्या जन्माचें ठिकाण आपल्या तेराव्या जन्माच्या भाषेंत बदलून न सांगतां पहिल्या प्रचलित असलेल्या रूढ शब्दोच्चारपद्धतीप्रमाणें स्वाभाविकपणें सांगत आहे, अशी सरळ कल्पना घेऊन जोंपर्यंत आपण चाललों आहों, तोंपर्यंत बेटावद या गांवाला ज्या काळीं बेटाउद असें म्हणत असतील, तो काळ चवदाव्या शतकापेक्षां पराकाष्ठा दोन तीन शतकांहून फारसा मागें असेल असें मानण्याला कांहीं कारण नाहीं. ही विचारसरणी आपण ग्राह्य धरली, तर दहा अकराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंतच्या दरम्यानच्या काळामध्यें बहिणाबाईचे हे तेरा जन्म झाले असावे, असें अनुमानानें म्हणतां येतें. याच्यापेक्षां जास्त अनुमानें काढण्याला मूळ ग्रंथांत जास्त आधार नाहींत; यामुळें या अज्ञेय प्रदेशांतील ज्ञान मिळविण्याची जिज्ञासा मोठ्या कष्टानें येथेंच थांबवावी लागत आहे, त्यास इलाज नाहीं.

# मदनदहन.

एकदा कोणी एका भाविक शिष्यानें आपल्या परमपूज्य गुरूला प्रश्न केला कीं, गुरु महाराज, आपल्या सारखे गुरुवर्य या पृथ्वीच्या पाठीवर फारच थोडे असतील; व आपल्यासारखेच सर्व गुरु असतील, तर मग मी जो आतां आपणांला प्रश्न विचारणार आहें, तो प्रश्न उत्पन्न होण्याला अवकाशच उरणार नाहीं. जे कोणी खरोखर पुण्यपावन महात्मे असतील, त्यांना माझा नमस्कार असो! परंतु आपल्याच तोंडून पुष्कळ वेळां असाधु वर्तनाच्या साधु पुरुषांच्या गोष्टी जेव्हां जेव्हां मी ऐकतों, तेव्हां तेव्हां अशी वस्तुस्थिति कां उत्पन्न व्हावी, असा प्रश्न माझ्या मनामध्यें उत्पन्न होतो. परंतु त्या प्रश्नाचें समाधान काय असावें, हें विचारण्याचें धारिष्ट माझ्या मनामध्यें नसल्यामुळें मी हा प्रश्न आपल्या मनांतल्या मनांत दाबून टाकतों.

गुरु म्हणाले, असें करण्याचें कांहीं कारण नाहीं. प्रश्न दाबून ठेवल्यानें त्याचें समाधान कधींही व्हावयाचें नाहीं. ज्या शंका उत्पन्न होतील, त्यांचें निरसन यथायोग्य स्पष्टीकरणानें झालें, तरच मन प्रफुल्लित आणि उदात्त होतें. आणि याकरितांच शिष्यांनीं न विचारलेल्याही प्रश्नांचीं समाधानें गुरु नेहमीं सांगत असतात. मग आतां तुझ्या मनामध्यें ही आकांक्षा उत्पन्न झालेली समजल्यानंतर तर ती तशीच अपरिपूर्ण स्थितीमध्यें ठेवणें कधींही योग्य होणार नाहीं. याकरितां मी तुला एक प्राचीन इतिहास सांगतों. तो फार महत्त्वाचा आहे. म्हणून तो तूं लक्षपूर्वक ऐक, आणि ऐकल्यानंतर तूं त्याचें लक्षपूर्वक मनन कर.

कोणत्याही मानवी राजांचीं युद्धें सुरू होण्याच्यापूर्वीं फार प्राचीन काळीं देव दैत्यांचीं युद्धें होत असत, हें तुला माहीतच आहे. तशांपैकीं एका युद्धांत तारकासुर या नांवाचा एक दैत्य विजयी होऊन अखेरीस तो

इतका प्रबळ झाला कीं, देवांना बंदिवासामध्यें कोंडून ठेवून तो तिन्ही लोकांवर राज्य करूं लागला. तेव्हां त्याला कसें जिंकावें हा देवांना मोठा विचार पडला. जे जन्मास आलेले आहेत, त्यांच्यापैकीं जे चांगले योद्धे असतील, त्यांनीं स्वराज्यसंरक्षणाकरितां लढण्याला पुढें यावें किंवा नाहीं, याच्याबद्दल (शत्रूशीं रण माजवावयाचें बाजूला राहून) पुष्कळ वेळां आपापसातच रणें माजलेलीं दृष्टोत्पत्तीस येतात. पण त्या वेळीं देवांवर याच्याही पलीकडचा दुर्धर प्रसंग येऊन गुदरलेला होता. जन्मास आलेले सगळे योद्धे हतवीर्य होऊन गेले असल्याकारणानें नवीन चांगला योद्धा जन्मास आणवून त्याच्याकडून शत्रूचा पराभव करविण्यापर्यंत देवांच्या प्रयत्नांना त्या वेळीं दूर जावें लागलें होतें. देवांना त्या वेळीं एक अप्रतिम वीर्याचा योद्धा उत्पन्न करावयाचा होता. असा योद्धा सामान्य मातापितरांच्या वीर्यापासून कसा उत्पन्न होणार ? अद्वितीय फळ पाहिजे असेल, तर त्याला बीज आणि भूमि हींही अद्वितीयच पाहिजेत. असल्या सामग्रीचा भ्रष्टाचरणी मनुष्यांच्यामध्यें नेहमीं तोटाच असावयाचा. परंतु देवांच्या घरीं त्याची काय उणीव ! आणि महादेवाच्या जवळ तर या अपेक्षेचें तपःसामर्थ्य वाटेल तितकें होतें. तेव्हां त्याच्याकडून जगदंबा पार्वतीच्या ठिकाणीं पुत्रोत्पत्ति करवावी, असा देवांनीं विचार केला. हा विचार ठरविणें फार सोपें होतें; परंतु त्याप्रमाणें सर्व योगायोग जुळवून आणणें तितकें सोपें नव्हतें. महादेव कैलास पर्वतावर समाधि लावून ध्यानस्थ बसलेले होते; आणि दक्षाच्या यज्ञामध्यें अपमान पावल्यामुळें आधीं क्रोधानें आणि मागाहून अग्नीनें दग्ध झालेली दाक्षायणी पार्वतीच्या रूपानें आपल्या पुनर्जन्माच्या बाल्यपरिसमाप्तीच्या वयोवस्थेमध्यें हिमालय पर्वताच्या अरण्य प्रदेशांमधून क्रीडा करीत फिरत होती. अशा या जोडप्याचा समागम जुळवून आणणें जवळ जवळ अशक्यच होतें. परंतु तारकासुराच्या परतंत्रतेनें परित्रस्त झालेल्या देवांच्या बुद्धीला या अशक्यतेवरही एक शक्यतेचा उपाय उपलब्ध झाला. इंद्रानें मदनाला बोलावून आणिलें, आणि शंकराच्या शरीरामध्यें संचार करून त्याच्या समाधीचा भंग करण्याविषयीं आज्ञा केली. मदनानें मोठ्या आनंदानें ती आज्ञा मान्य केली, आणि लागलीच हिमालय पर्वतावरील परिस्थितीमध्यें एकदम फरक पड-

ण्याला सुरवात झाली. बर्फानें वठून गेलेले वृक्षही पल्लवाच्छादित झाले. कोकिळा मंजुल कलकूजित करूं लागल्या. भगवान शशलांछनाच्या धवलज्योत्स्नेचे अमृतप्रवाह सर्वत्र वाहूं लागले. व हिमालयाच्या सर्व वनराजींमधून अप्सरांचें नृत्य आणि गायन सुरू झालें. अशा रीतीनें सभोंवताली ही जी परिस्थिति बदलून गेली, तिचा शंकराच्या समाधीवर हळु हळु परिणाम होत चालला. अशा संधींत पार्वतीलाही देवांनीं परिचर्येच्या मिषानें शंकरासन्निध आणवून ठेवण्याची आधींच तजवीज केली होती. तें पाहून ही वेळ फार उत्तम आहे, असें समजून मदनानें आपला पुष्पबाण सज्ज केला.

ह्या बाह्य कृत्रिम स्थितिविपर्ययाचा शंकाराच्या मनावर पुष्कळच परिणाम झाला. त्याच्या चित्ताची एकाग्रता होईना, समाधि ढळली, विषयांचे बंद झालेले दरवाजे किलकिले झाले, आणि एकाग्रतेपासून परावृत्त होऊन बहिर्मुख झालेली चित्तवृत्ति त्या विषयेंद्रियांच्या दरवाज्यांनीं बाहेर पाझरूं लागली. तेव्हां शंकर देहभानावर आल्यानंतर प्रथम आपल्या समाधीचा भंग केल्याबद्दल त्याला अतिशय क्रोध आला. आवेशानें त्याचें सर्वांग लाल झालें. नेत्र आरक्त झाले. आणि ज्याच्यामध्यें सदैव प्रत्यक्ष अग्नि वास करीत असतो, अशा त्या शंकराच्या तृतीय नेत्रांतून अति उग्र आणि अति भयप्रद अशा सहस्त्रावधि ज्वाला शेषाच्या जिव्हांप्रमाणें बाहेर पडूं लागल्या. अशा स्थितींत आपल्या समाधिभंगाचा अपराध कोणी केला, हें पाहण्याकरितां शंकर चोहोंकडे आपली दृष्टि फेकीत असतां आपल्यास शरसंधान करीत असलेला मदन समोरच शंकराला दिसला. तो दिसण्याचा अवकाश, तोंच शंकराच्या तृतीय नेत्रांतील क्रोधानलाच्या ज्वाला मदनाच्या अंगावर झेंपा घालूं लागल्या, आणि त्याच क्षणीं मदनाचें शरीर भस्मावशेष झालें.

हा येथपर्यंतचा कथाभग सर्वांना माहीतच आहे. पुराणांतून आणि काव्यांतून अनेक ठिकाणीं याचें वर्णन आलेलें आहे. परंतु ह्यानंतरची जी स्थिति झाली, तिचें वर्णन मात्र कोठेंही उपलब्ध नाहीं. आपल्यांतील जे अनेक ग्रंथ बुडाले, त्यांतच या कथाभागाचा ग्रंथ बुडालेला असला पाहिजे. तरी पण ज्यांनीं ते ग्रंथ वाचले होते, त्यांच्या तोंडून त्या वेळची हकीकत

कर्णपरंपरेनें आलेली मी ऐकिली आहे. ती तुला सांगतों. ती ऐकत असतांना तूं आपलें चित्त व्यग्र होऊं देऊं नकोस.

मदन दग्ध झाला, तेव्हां सर्वत्र मोठा हाहाकार झाला. मदनाच्या मागून मदनानें पसरलेली शृंगारविषयक सर्व माया मावळून गेली. रति शोक करूं लागली. शंकर अरण्यांत निघून गेले. पार्वतीचा मनोभंग झाला. आणि देवांच्या डोळ्यांतून दुःखाश्रु गळूं लागले. कारण, महादेव आणि पार्वती यांच्या समागमाची सर्व आशा आतां खुंटली, असें त्यांना वाटूं लागलें. परंतु महादेव व पार्वती या एका जोडप्याच्या समागमाची गोष्ट राहो. पण ह्या मदनक्रोधामुळें बाकीच्या समागमांची जगतामध्यें काय अवस्था झाली, याची कोणाला कांहीं तरी कल्पना आहे काय ? या वेळीं हिमालय पर्वतावर काय गडबड चालली होती, देवांनीं काय घाट घातला होता, आणि तो सर्व कसा ढासळून गेला, याबद्दलची जगांतील लोकांना कांहीं कल्पना नव्हती. तारकासुर प्रबळ झालेला आहे व देव परतंत्र झालेले आहेत, एवढी गोष्ट त्यांच्या कानावर होती. परंतु त्याच्या पुढील देवांनीं केलेल्या खटपटींची आणि कामदेवाच्या दहनाची मृत्युलोकच्या माणसांना बिलकूल वार्ताही नव्हती. ते मोठ्या आनंदांत होते, आणि त्यांचे सर्व व्यवहार नेहेमींप्रमाणें यथास्थित चालले होते. मदनाच्या अस्तित्वाच्या निश्चितत्वावर ते आपल्या मनांमध्यें आपल्या मनोराज्यांचे मनोरे उंच उंच उभारण्यामध्यें अगदीं निमग्न होऊन गेलेले होते. कोणी वडील माणसें आपापल्या वधूवरांच्या पत्रिका जमवून त्यांच्या लग्नांचे निश्चय करीत होतीं. कोणी वधू आणि वर स्वतःच आपले गांधर्व विवाह जुळविण्याच्या गडबडींत होते. कोणी झालेले विवाह कसे मोडावेत आणि दुसरे जास्त फायदेशीर किंवा जास्त प्रियकर संबंध कसे जुळवुन आणावेत, या मसलतींत होते. कोणी स्वकीय वधूसमागमाला विटून जाऊन परकीय चौर्यसमागमाची योजना करण्यांत गुंतलेले होते. कोणी आपल्या वेश्यांची धनतृष्णा आधीं शांत कशी करावी, या विवंचनेमध्यें झुरत पडलेले होते. मदनावेगामुळें कोणाला कुरूप दिसेनासें झालें होतें, कोणाला हीन जातीचा स्पर्श घाणेरडा वाटेनासा झाला होता, कोणाला लोकापवादाच्या लांछनाची पर्वा वाटेनाशी झाली होती, तर कोणाला सदुपदेश ऐकूं येईनासा झाला

होता ! कोणी स्त्रिया आपल्या प्रियकरांचीं चित्रें काढीत होत्या. कोणी कोणी त्यांना आपल्या दूतींबरोबर निरोप पाठवित होत्या. कोणी त्यांना पत्रें लिहिण्यांत गुंतलेल्या होत्या. कोणी विरहिणी आपल्या प्रियकरांच्या आगमनाची वाट पहात होत्या. कोणी कलहांतरिता आतां आपल्या प्रियाचें प्रसादन कोणत्या युक्तीनें करावें याबद्दल विचार करीत होत्या. कोणी वासकसज्जा सर्व तयारी करून आपल्या प्रियाच्या आगमनाला इतका उशीर कां लागला म्हणून उतावीळ झाल्या होत्या. कोणी अभिसारिका सूर्य लवकर मावळत नाहीं, म्हणून त्याला दूषणें देत होत्या. कोणी मुग्धा प्रथमप्रियसंगाच्या प्रसंगीं कसें वागावें याच्याविषयीं शिक्षण घेत होत्या. कोणी प्रौढा आपल्या प्रियाच्या रागावण्याला न जुमानण्याचा निश्चय करीत होत्या. शय्यामंदिरें सज्ज करण्यांत येत होतीं. पुष्पहार गुंफले जात होते. शीतोदकामध्यें वाळयाचा आणि कस्तुरीचा सुगंध मिश्रित करण्यांत येत होता. तांबूल तयार होत होते. मैलागिरि चंदन आणि कृष्णागरु यांच्या परिमळांनीं विलासमंदिरें सुवासित करण्यांत येत होतीं. सुगंधी पुष्पांनीं केशप्रसाधनाची तयारी चालली होती. कोमल पदतलांवर रंगवल्ली काढण्याकरितां अळिता भिजविला जात होता. उत्तम वस्त्रांच्या घड्या मोडण्यांत येत होत्या. जडावाचे दागिने क्रमानें बाहेर काढून ठेवण्यांत येत होते. दर्पणें स्वच्छ करण्यांत येत होतीं. गृहोद्यानांमधील दीर्घिकांमधून कारंजांचे फवारे सुटलेले असून त्यांमध्यें हंसपक्षी तरंगत होते. कमलांभोवतीं भ्रमर गुंजारव करीत होते. कोकिळांचा आणि वीण्यांचा पंचम सारखा जमविण्यांत येत होता. राग वृद्धिंगत होत होता. मान टाकण्यांत येत होता. विलास, माधुर्य, ललित, हाव, भाव, हे समुल्लसित होऊं लागले होते. व्रीडा लोप पावूं लागली होती. रोमांचादिक सात्त्विक विकार उत्पन्न होऊं लागले होते. नृत्यगायनादिकाची तयारी झालेली होती. आणि शृंगारविषयक काव्यवाचनाच्या परिसमाप्तीची लालसा उत्पन्न होऊं लागली होती. सारांश, शृंगाररस त्या वेळीं सर्वत्र पूर्णपणें भरांत आलेला होता. अशा वेळीं एकाएकीं कोणाला कांहीं मागमूस नसतां आणि सर्व जग प्रेमरसामध्यें आकंठ बुडून गेलें असतां त्या जगाच्या एका टोंकाला—हिमालयाच्या एका शिखरावर—ही मदनदहनाची अशी

एक अपूर्व गोष्ट घडून आली कीं, तिच्या योगानें ह्या जगतीतलावर चालत असलेल्या शृंगाररसाच्या विस्तीर्ण प्रपंचामध्यें अकस्मात् मोठी विलक्षण क्रांति घडून आली!

मदन म्हणजे ह्या जगांतील सर्व प्रेमाचें आगर. तो सर्व कामवासनांचा देव, म्हणूनच त्याला कामदेव हें नांव प्राप्त झालेलें. प्रेमरसाच्या सर्व झऱ्यांचा उगम त्या कामदेवापासून. त्याच्या बीजभूत आद्यमूर्तीचें पौराणिक वास्तव्य जरी स्वर्गलोकामध्यें होतें, तरी प्रत्येक प्राणिमात्राच्या मनामध्येंच त्याचें खरें वसतिस्थान असल्यामुळें त्याला मनोभव असें नांव प्राप्त झालेलें! अशा त्या व्यापक स्वरूपाच्या मदनाचा हिमालय पर्वतावर शंकराच्या क्रोधानलानें निःशेष दाह झाल्याबरोबर सर्व जगतीतलावरील प्रेमरसाचे झरे आटून जावेत, सर्व कामवासना नामशेष व्हाव्यात, आणि त्यामुळें पृथ्वीवर मोठा हाहाकार उडावा, हें अगदीं साहजिक होतें. प्राण जरी हृदयस्थ असला, तरी तेथून तो सर्व शरीराचे व्यापार चालवीत असतो; परंतु तो प्राण हृदयांतून निघून गेला, म्हणजे ज्याप्रमाणें शरीराचे सर्व व्यापार बंद पडतात, त्याप्रमाणें देव लोकामध्यें राहून सर्व मनुष्य लोकांच्या कामवासनांचे व्यापार चालविणारा प्राणभूत असा जो मदन, त्याचाच मुळामध्यें उच्छेद झाल्यामुळें जगांतील शृंगाराचे सर्व व्यापार बंद पडले, तर त्यांत कांहीं मोठेंसें आश्चर्य नाहीं. सारांश, मदनाचा देह तिकडे दग्ध झाल्याबरोबर इकडे पृथ्वीतलावर मोठे अनर्थ गुदरूं लागले, विलक्षण चमत्कार होऊं लागले, व्यवहारामध्यें भलभलत्याच उलथापालथी होऊं लागल्या, आणि फिरून—असें कां होतें—याचें कारणही कोणाला कळेना!

कधीं कोणी पाहिले नाहींत किंवा ऐकिले नाहींत, किंबहुना ज्यांची कधीं कोणाला कल्पनाही आली नाहीं, असे विविध प्रकार मदनाच्या निधनामुळें पृथ्वीतलावर घडून येऊं लागले. नवीन जुळत असलेलीं लग्नें मोडूं लागलीं; अथवा, जुनीं झालेलीं लग्नेंच टिकण्याची जेथें मारामार झाली, तेथें नवीन लग्नें कोठून जुळून येणार! जीं गुप्त गांधर्व विवाहाचीं जोडपीं एका क्षणापूर्वीं एकमेकांच्या हातांच्या बोटांत प्रेमाच्या आंगठ्या घालण्याला उत्सुक झालीं होतीं, तीं आतां एकमेकांकडे पाठ करून उभीं

राहिलीं. सूर्याला ग्रहण लागून त्याचें तेज मंद झाल्यानंतर जशीं लहान लहान नक्षत्रें दिवसास दिसूं लागतात, त्याप्रमाणें वेश्यागमन वाईट, गरोदर स्त्रीशीं विवाह चांगला नव्हे, हीनजाति संबंध हानिकारक होय, इत्यादि तत्त्वें अंधुकअंधुकपणें कित्येकांना दिसू लागलीं! फार काय सांगावें, प्रियकरांचीं अर्धीं काढून झालेलीं चित्रें तशींच अर्धवट पडून राहिलीं, व लिहून पुरीं झालेलीं पत्रेंही दूतींच्या हातीं देण्यांत आलीं नाहींत! विरहिणींची उत्सुकता उतरून गेली. जी कलहांतरिता रुसून बसली होती, ती तशीच रुसून बसली; तिला समजावण्याकारितां येतो आहे कोण? वासकसज्जांनीं आपल्या अंगावरचे अलंकार जड झाल्यामुळें काढून टाकले. अभिसारिकांनीं अभिसरणाचे बेत बंद केले. मुग्धा, मध्यमा व प्रौढा, यांच्यांतील भेदांमधील गोडी नाहींशी झाली. पुष्पहार शुष्क होत चालले. सुगंधी अत्तरांतील सुवास उडून गेला. विडे वाळून गेले. शरीरप्रसाधनाच्या सर्व क्रिया संपुष्टांत आल्या. वेलींनीं वृक्षांना घातलेले विळखे ढिले पडले. चक्रवाक आणि चक्रवाकी यांचा रात्रीं विरह झाला, तरी त्यांचा नेहमींचा तो आक्रोश सुरू होईना. मयूर आणि मयूरी यांच्या नृत्यांतील ताल जमेनासा झाला. उत्सुकता नाहींशी झाली. विलास विलयाला गेला. प्रेमरसाचा समुद्र आटून गेला. संभोग शृंगार संपला. आणि उदासीनता जिकडे तिकडे उच्छृंखल झाली!

हें स्थित्यंतर एकाएकीं कसें उत्पन्न झालें, याची प्रथमतः कोणालाच कांहीं कल्पना नसल्याकारणानें कित्येक प्रसंगीं पहिल्यापहिल्यानें कांहीं भ्रममूलक चमत्कारही झाले. कोणी प्रियकरानें संकेतकाल ठरविला असून त्या वेळीं तो आला नाहीं, यावरून तो दुसऱ्या कोणा तरी स्त्रीकडे गेला असावा, अशा कल्पनेनें कोणी मुग्धा उगीच रागावली. दुसरी कोणी स्त्री उदासीन दिसूं लागली, त्यावरून ती अन्यगतचित्ता असावी, असा तिच्या संशयी पतीला विनाकारण भ्रम झाला. अशा कोठें कोठें कांहीं मिथ्या कल्पना उत्पन्न झाल्या. तरी पण मागाहून या सगळ्या प्रकारांचें खरें कारण सर्व लोकांना हळु हळु कळूं लागलें. शंकराच्या भाललोचनांतील क्रोधानळानें त्रस्त आणि तप्त झालेला वायु पहिल्यानें धापा टाकीत टाकीत हिमालयावरून इतस्ततः पळत सुटला. त्या वेळीं लोकांना शंका

आली कीं, हा वायु असा धावऱ्या धावऱ्या कां येत आहे. त्याचप्रमाणें शुद्ध तरंगाची आणि अंतरंगाची गंगा कल्लोलतुषारांचीं टिपें गाळीत आणि मंद आक्रोश करीत हिमालयावरून धडधड धडधड खालीं आली, तेव्हां तर लोकांची शंका जास्तच बळावली. आणि कोठें तरी कांहीं तरी मोठें अत्याहित झालें असावें, असें त्यांना वाटूं लागलें. मानस सरोवरांतील राजहंस पक्षी त्या वन्हिज्वाळांच्या त्रासानें हिमालयापेक्षां त्या वेळेपुरत्या तरी जास्त थंड अशा अन्य सरोवरांमध्यें येऊन पोहूं लागले; तेव्हां कैलास शिखरावर कांहीं तरी दुर्धर प्रसंग झाला असला पाहिजे, असा लोकांनीं तर्क केला. त्याच वेळीं आकाशाचें मुख मेघांनीं काळवंडलेलें असून त्याच्या डोळ्यांतून वर्षाबिंदूचे अश्रु गळत आहेत, असें जेव्हां लोकांनीं पाहिलें, तेव्हां आकाशस्थ देवांचें कांहीं तरी मोठें अहित झालें असावें, असें लोकांनीं अनुमान केलें. परंतु निश्चित असें कोणालाच कांहीं कळेना. परंतु पुढें कांहीं काळानंतर हिमालयांतून जे कित्येक वापसी आले, त्यांच्या तोंडून सर्व लोकांना मन्मथोन्मथनाची सविस्तर हकीकत समजली. तेव्हां पृथ्वीवर काय आकांत झाला, याची कल्पना करणें फार कठिण आहे. कामवासनेसंबंधानें जें एकाएकीं औदासिन्य आलेलें होतें, तें आकस्मिक आणि क्षणिक नसून मदनदहनामुळें आतां तें कायमचें उत्पन्न झालेलें आहे, ह प्रकाश जेव्हां लोकांच्या अंतःकरणांत पडला, तेव्हां सर्व जग त्यांना अंधकारमय भासूं लागलें. जगांत सुख उरलें नाहा, या प्राणयात्रेंतील प्राण निघून गेला, संसार निस्सार झाला, जीवित आणि मरण यांच्यामध्यें तारतम्यभाव राहिला नाहीं, अशा प्रकारच्या भावना सर्वभूतमात्रांच्या ठिकाणीं उद्भूत झाल्या. आणि त्यामुळें हळु हळू मनुष्यांच्या राहणीमध्यें आणि आयुष्यक्रमामध्यें पुष्कळ महत्त्वाचे फरक पडूं लागले. अनेक परमाणूंचा एखादा पिंड एकत्र करण्याकरितां त्यांच्यामध्यें स्नेहाचा धर्म असावा लागतो, आणि तो नसेल तर ते सर्व परमाणु विस्खलित होऊन जातात; त्याप्रमाणें सर्व समाजाचें एकत्र आकलन करून धरणारा स्नेहरूपी धर्म जो मदन तो जळून खाक झाल्यामुळें सर्व समाजाचे घटकावयव विस्खलित होऊं लागले व एकमेकांपासून तुटक राहूं लागले. प्रेमाचे झरे आटून गेले. शृंगार संपला. प्रीतिविषयक संबंधाचे लागेबांधे तुटले. कटाक्षांची भाषा

बंद पडली. मंदस्मितामध्यें आनंददायकत्व उरलें नाहीं. तारुण्याचें महत्त्व मावळलें. सौंदर्याची किंमत कमी झाली. काव्यशास्त्राच्या अभ्यासाला दररोजचाच अनध्याय ठरला. वात्स्यायनादिकांची भाष्यें आणि कामशास्त्रावरील इतर अनादि ग्रंथ यांचीं अध्ययनें लुप्त झालीं. विवाहाची संस्था बुडत चालली. मदनदहनाच्यापूर्वी जेवढे विवाह झाले होते, तेवढेच काय ते विवाह जगामध्यें त्या वेळीं शिल्लक राहिले. नवीन विवाह सर्वथैव अशक्य झाले. आणि विवाहच बंद झाले, ( मग ते उघड विवाह असोत किंवा गुप्त विवाह असोत, ) तर मग अर्थातच पुढील प्रजोत्पत्तिही बंद पडत चालली, तर त्यांत आश्चर्य तें काय ? समाजांतील या फेरफारामुळें समाजाची व्यवस्था लावणारीं जीं धर्मशास्त्रें त्यांच्यामध्येंही साहजिकपणेंच फरक पडूं लागले. धर्मशास्त्रांतून विवाहप्रकरण अजीबात गळून जाऊं लागलें; आणि ज्या समाजांत विवाहधर्माची अवश्यकता उरली नाहीं, तेथें गर्भाधानादिक पुढील संस्कारांची तरी गरज कशाला लागणार आहे ? कारण, प्रजोत्पत्तिच जर नाहीं, तर नामकरण तरी कोणाचें करावयाचें ? किंवा अन्नप्राशन तरी कोणाला करवावयाचें ? श्रौतकर्मांतून किंवा गृह्यकर्मांतून जेथें जेथें सपत्नीकत्वाचे उल्लेख आलेले होते, तेथून तेथून ते गाळून टाकण्यांत येऊं लागले. पण असले फेरफार फक्त धर्मशास्त्रामध्येंच करण्यांत आले असें नसून त्या नवीन बदललेल्या परिस्थितीप्रमाणें व्याकरणशास्त्रामध्येंही आपण काय काय फेरफार केले पाहिजेत याचा विचार करण्याकरितां त्या वेळच्या मोठमोठ्या वैय्याकरणांची एक परिषद भरली होती. कारण, या मदनाच्या दहनामुळें जगामध्यें उत्पन्न झालेल्या स्थितीला अनुलक्षून पाहतां व्याकरणाच्या सूत्रांतून आणि लोकांच्या भाषाप्रचारांतून पुल्लिंग, स्त्रीलिंग, आणि नपुंसकालिंग, असा त्रिविध लिंगभेद इतःपर ठेवण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं, अशा कित्येकांकडून मोठ्या नेटाच्या आणि आग्रहाच्या सूचना वरच्यावर येऊं लागल्या होत्या. व भाषाशास्त्रामध्यें असा हा अपूर्व सुलभतेचा फेरफार करण्याला भाग पाडण्याची संधि ज्याच्या कर्तबगारीमुळें प्राप्त झाली, त्या शिवभालस्थित तृतीय नेत्राचें अभिनंदन करण्याचा एक ठरावही त्यांचेकडून पास करण्यांत आला होता.

शंकराच्या क्रोधांध झालेल्या डोळयानें मदनाच्या पुष्पमय शरीरावर ठिणगी टाकल्यामुळें फक्त शृंगार रसाचाच याप्रमाणें विध्वंस झाला असें नाहीं, तर वीर, रौद्र, भयानक, हास्य, करुण, इत्यादि रसांचाही त्याच्याबरोबर विलय झाला. कारण, प्रेमाचा पाया जर नाहीं, तर मग वीराद्भुत कृत्य कोण कशाला करील ? व आपल्या प्रणयिनीकडून एकांतीं धन्यवाद मिळवून घेण्याची आशा नसल्यावर मग भयानक कृत्यांच्या भयामध्यें उगीच आपल्याला कोण घालून घेईल ? अशा कारणांनीं जगामध्यें कांहीं राम उरला नाहीं. विनवासाच्या एखाद्या फुलाप्रमाणें हें जग होऊन गेलें. त्यांत कांहीं गोडी उरली नाहीं. सरस आणि सप्रेम उपभोक्त्यांच्यावांचून ह्या सृष्टींतील सर्व सुखें वायां जाऊं लागलीं. शुक्लपक्षामध्यें चंद्राचें चांदणें पडे; पण त्या एका जड आणि अरसिक चकोराशिवाय त्या धवल चंद्रिकेचा उपभोग घेण्याची वासना कोणामध्येंही उरलेली नव्हती. मलय पर्वतावरील वारे चंदनाच्या सुगंधाचा भार आपल्या पाठीवर घेऊन आणि वाटेंत जेथें जेथें नदी भेटेल तेथें तेथें तिच्या तरंगांच्या तुषारांनीं त्या सुगंधांचा शीतलपणा जास्त वृद्धिंगत करून, सर्व पूर्वपरिचितस्थलीं फिरत व प्रत्येक गवाक्षांतून आंत डोकावून पहात; परंतु त्यांच्या आगमनानें हर्षित आणि रोमांचित होणारे ते पूर्वीचे बिलासी जन त्यांना कोठेंही आढळतना ! बिचाऱ्या कोकिला ओरडून ओरडून आपला कंठशोष करीत. पण कोणी विरहिणी त्यांना पूर्वीप्रमाणें शाप देईनात, किंवा कोणी सहचारिणी त्यांचें अभिनंदन करीनात. वसंत ऋतु केव्हां येई आणि केव्हां जाई, हें ज्योतिष पाहणारांशिवाय कोणाच्या लक्षांतही येईनासें झालें. वर्षाकालीं मेघ आकाशामध्यें पूर्वीप्रमाणें उत्पन्न होत, पण त्यांना पाहिल्यापासून पथिकांच्या आणि पथिकवनितांच्या मनांमध्यें अन्योन्य समागमासाठीं जी उत्सुकता आणि आतुरता पूर्वी उत्पन्न होत असे, ती मात्र आतां उत्पन्न होईनाशी झाली होती. पान्थस्थांना आतां बाराही महिने सारखेच झाले होते. लताकुंज वाळून चालले होते. जलयंत्रगृहें शेवाळानें निरुपयोगी झालीं होतीं. क्रीडासरोवरांमधून अरण्यांतील पशुपक्षी येऊन डुंबत बसत होते. शय्यागृहें शून्य पडलीं होतीं. सौधशिखरें पारावतांनीं आपल्या ताब्यांत

घेऊन ठेविलीं होतीं. दूती आणि दासी यांचे धंदे बुडाले. विट आणि वयस्य यांचीं प्रयोजनें राहिलीं नाहींत. वेश्यांना व्यवसाय उरला नाहीं. तारुण्यें म्हातारें झालें. संगीत, नृत्य, इत्यादि कला लुप्त झाल्या. शृंगाररसप्रधान काव्यें कवडीमोल झालीं. आणि नवीन शृंगाररस प्रधान काव्यें करण्याला कोणाही कवीची प्रतिभा पहाटेस सुद्धां जागृत होईना. चंद्र रोज आकाशांत उगवे आणि मावळे; पण कोणी नवशिक्या कवि सुद्धां—आपल्या कामिनीच्या सामान्य कपोलपालीशीं—त्या दिव्य चंद्रबिंबाची तुलना करण्याला तयार होईना !

सारांश, जिकडे तिकडे विरस उत्पन्न झाला. मुलाबाळांची पुढें आशा नसल्यामुळें घरादारांची किंवा मालमत्तेचीही कोणी काळजी करीतनासे झाले. त्यामुळें संसाराच्या एकंदर घटनेमध्यें फार शैथिल्य येऊं लागलें. प्रपंचाचा मुख्य सांधाच उखळल्यासारखा झाल्यामुळें बाकीचे बारीकसारीक सांधे खिळखिळे होऊं लागले. पुढें नवीन प्रजा उत्पन्न होण्याचें बंद झाल्यामुळें ह्या अनादि आणि अनंत जगाचा अंत दूरदृष्टीचे लोकांना अगदीं जवळ दिसूं लागला. अशा स्थितींत सांपडलेल्या लोकांच्या मनामध्यें परमार्थ साधनाशिवाय आतां दुसरा काय विचार येणार ? ऐहिक सुख या जगामध्यें आतां आपल्याला शक्य नाहीं, तर पारलौकिक सुख तरी आपण साधावें, अशा विचारांचें वारें लोकांच्या मनांमध्यें वाहूं लागलें. व परमार्थाकडे एकंदर जगाची प्रवृत्ति जास्त वाढूं लागली. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, मदनाच्या या गैरहजेरींत जगांत मोठी राज्यक्रांति झाली, आणि मदनाला जिंकण्याला सर्वच लोक पुढें सरसावले ! श्रमावांचून साध्य होणारें ब्रह्मचर्याचें व्रत आजन्म कडकडीत पाळण्याचे कोणी निश्चय केले. ' ब्रम्हचर्यादेव वा प्रव्रजेत् ' ही इतके दिवस लुप्त असलेली वैकल्पिक श्रुति या वेळीं सांपडली. या श्रुतीच्या अनुरोधानें मध्यंतरीं गृहस्थाश्रमाची भानगड उरली नसल्यामुळें ब्रह्मचर्यांमधून एकदमच संन्यासाश्रमामध्यें उडी टाकण्याचें आतां सोपें झालेलें धाडस करण्याला पुष्कळ लोक उद्युक्त झाले. या वेळीं धर्मजागृतीची एक मोठी लाट सर्व जगभर उसळली. जो उठला तो दुसरें कांहीं चित्तव्यग्रतेचें कारण न उरल्यामुळें साधु होऊं लागला. शृंगारादिक रस बुडाले, आणि

शांत रसाला भरती आली. गायननर्तनादिकांच्या योगानें जनमनोरंजन करणाऱ्या मंडळींच्या हातांतील विणे साधूंच्या हातांत येऊन गुणगुणूं लागले. अशा रीतीनें मदनानें मोकळा करून दिलेला हा मार्ग फारच मळूं लागला. यति, मुनि, संन्यासी, तापसी, कापडी, जती, श्रमणक, भिक्षु, साधु, बुवा, भगवद्भक्त, इत्यादिकांच्या टोळया इतक्या झाल्या कीं, त्यांचीं सोंगें सजविण्याचें सामान पुरवितां पुरवितां विपुल सृष्टि-संपत्तिही अगदीं टेकीस आली. वल्कलांसाठीं झाडांवर साली उरल्या नाहींत. भगवे कपडे रंगवितां रंगवितां डोंगरांच्या खाणींतील काव संपत आली. रुद्राक्षांच्या फळांचा पुरवठा पुरेनासा झाला. भोपळे महाग झाले. व्याघ्रांबरें आणि मृगासनें मिळेनाशीं झालीं. व ज्ञानवल्लीची वाढती लागवडही अपुरी वाटूं लागली. असा एकंदर जगाचा मनु पाल-टून गेला. या पद्धतीनें नवीन प्रजोत्पत्ति नाहीं आणि जुन्या माणसांचा संहार नेहमींप्रमाणें चालला, तर पुढें मागें केव्हां तरी लवकरच जग बंद पडलें पाहिजे, ही गोष्ट अगदीं सिद्ध झाली !

अशी ही जगाची स्थिति झालेली अखेरीस ब्रह्मदेवाच्या कानापर्यंत गेली. तेव्हां त्याला फार विस्मय वाटला व अतिशय खेदही झाला. पण पुढील तजवीज करण्याच्या आधीं यापासून एकंदरींत नफेतोटे काय झाले आहेत, याचें शांतपणें पर्यालोचन करण्याचा त्यानें विचार केला. त्यांत त्याला असें आढळून आलें कीं, शंकराच्या या अविचारी कृत्यापासून कांहीं फायदेही झाले आहेत. कारण, धर्माचरण, इंद्रियदमन, मनोनिग्रह, इत्यादि बाबतींमध्यें लोकांच्या अंगांत विशेष शौर्य आलेलें होतें, याबद्दल तर वादच नव्हता; पण याशिवाय दुसरेही पुष्कळ फायदे जगामध्यें झाले होते. पातकांची आणि गुन्ह्यांची संख्या अगदीं कमी झाली. अल्पायुषी मरण दुर्मिळ झालें. दीर्घायुष्य भस्मांवांचून आणि मात्रांवांचूनही पुष्कळ वाढलें. वैद्यशास्त्रावरचें निम्मेहुन अधिक ओझें हलकें झालें. आणि रोग्यां-च्या अभावीं स्थितिस्थापकत्व कायम ठेवण्याच्या कामांतून रिकामे झालेले वैद्य दुसरीं प्रागतिक कामें करण्याला मोकळे झाले ! क्षयरोग बंद झाला. गर्भपात, बालहत्या, इत्यादि गोष्टींचीं नांवेंहीं ऐकूं येईनाशीं झालीं. वेश्या-गमनाचें व्यसन अजिबात नाहींसें झालें. कनक आणि कांता या कुकर्म-

कारी कारणांच्या जोडीच्या अंगांतील निम्में सामर्थ्य नाहींसें झालें. व मनुष्याला आतां फक्त पांचच शत्रु जिंकावयाचे शिल्लक राहिले. असे कांहीं फायदे झाले, हें अगदीं निर्विवाद होतें, व तें ब्रह्मदेवालाही नाकबूल करतां येईना. तरी पण पुढें जर प्रजोत्पत्तिच झाली नाहीं, आणि मग त्यामुळें जर हें जग चालूच राहिलें नाहीं, तर या फायद्यांचा उपयोग तरी कोण घेणार ! असा विचार मनामध्यें आणून ब्रह्मदेव पूर्वीची स्थिति फिरून कशी उत्पन्न करतां येईल, ह्याच्या विचाराला लागला. पूर्वी अनेक युगेंपर्यंत प्रयत्न करतां करतां आणि प्रयोग करून पाहतां पाहतां अनेक अनुभवांच्या अंतीं ब्रह्मदेवाला ही मद-दनाची युक्ति सुचलेली होती, व या युक्तीच्या योगानें त्याचें हें जगाचें गाडें येथपर्यंत साधारणपनें सुरळीतपणानें चाललें होतें. त्यामध्यें शंकराच्या या अविवेकानें अशा प्रकारचा बिघाड झालेला पाहून ब्रह्मदेवाला फार वाईट वाटलें. "मी किती प्रयासांनीं जगाच्या यंत्राची ही मुख्य कळ शोधून काढली होती आणि शंकरानें एका रागाच्या झटक्याबरोबर ती सर्व बिघडवून टाकिली !" हा विचार मनांत येऊन ब्रह्मदेवाच्या डोळ्यांत अश्रु आले. व त्याच्या तोंडून पुढीलप्रमाणें रागाचे उद्गार निघाले:— "माझ्याकडे जग उत्पन्न करण्याचें काम जर दिलेलें आहे, तर त्यांत मध्येंच कोणी ढवळाढवळ करतां कामा नये. आणि तशी जर कोणी ढवळाढवळ करील, तर मग मी हें जग चालू ठेवावें कसें ? शंकराला जरी संहाराचें काम दिलेलें असलें, तरी तसा मुळावरच कुठार-प्रहार करण्याची त्याला कोणी मुभा दिलेली आहे, असें मुळींच नाहीं. तेव्हां याचा बंदोबस्त करून मग मदनसंजीवनाच्या विचाराला लागलें पाहिजें." असें म्हणून या कामीं विष्णूची मसलत विचारण्याकरितां ब्रह्मदेव वैकुंठलोकाला गेला.

ब्रह्मदेव फिरून मदनाला जिवंत करण्याच्या विचारांत आहे, व त्यासाठीं तो वैकुंठालाही गेला आहे, ही बातमी मृत्युलोकामध्यें हळूहळू फुटली, तेव्हां तेथें फार खळबळ उडून गेली. ब्रह्मदेवानें मदनाला जिवंत केलें, तर फिरून पहिल्यासारखी आनंददायक स्थिति प्राप्त होईल, अशा आशेनें सगळ्यांच्या तोंडाला पाणी सुटूं लागलें. पूर्वपरिचित कामुक-

आणि कामिनी हीं अन्योन्यांकडे फिरून साकांक्ष मुद्रेनें पाहूं लागलीं. " मदनाच्या पुनः संजीवनाची बातमी उठली आहे, व ती खरी होण्याचा कदाचित् संभव आहे. तेव्हां फिरून आपल्या समागमाचा योग येण्याची आशा आहे, म्हणून तोंपर्यंत कसे तरी दिवस कंठावे !" अशा आशयाचीं प्रेमपत्रें कोणी प्रियकरांनीं गुप्त दासीबरोबर आपल्या दूरस्थ प्रियकरणींना पाठविलीं. म्हातारेही असें म्हणूं लागले कीं, आम्ही जिवंत आहों, तोंपर्यंत हा इष्ट फेरफार घडून आला, तर आम्हीसुद्धां लग्नें करूं. गरीब लोकांनीं लग्नाकरितां कर्जें काढून ठेविलीं. जे देशत्याग करून गेले होते, किंवा जे तीर्थाटनें करीत हिंडत होते, ते आपापल्या घरोघर परत येऊं लागले. जे आपल्या मालमत्तेचा दानधर्म करून टाकणार होते, ते आतां फिरून कदाचित् संतति होईल, अशा आशेवर आपलीं दानपत्रें रद्द करूं लागले. सारांश, सर्वांना आनंदी आनंद वाटूं लागला. फक्त ज्यांनीं चतुर्थाश्रमाची दीक्षा घेतली होती, त्यांना मात्र ही बातमी ऐकल्यापासून फार पश्चात्ताप वाटूं लागला होता. तरी पण आपत्कालीं घेतलेला संन्यास हा प्रतिबंधक नाहीं, असा शास्त्रार्थ त्यांनीं वेळ पडल्यास उपयोगांत आणण्याकरितां काढून ठेविला होता. फक्त, एकदां जळालेला मदन फिरून जिवंत होणें शक्य नाहीं, हें अगदीं निश्चित आहे, तर या हल्लीं उठलेल्या मदनसंजीवनाच्या असंभाव्य बातमीवर विश्वास ठेवून आपण चतुर्थाश्रमांतून द्वितीयाश्रमामध्यें यावें, आणि लोकांमध्यें आपलें हसें करून घ्यावें, याच्यापेक्षां एकदां आपण जी साधुवृत्ति पतकरली आहे, तीच बाह्यात्कारी कायम ठेवावी, आणि मदन जिवंत झालाच, तर त्याचाही फायदा गुप्त रीतीनें घ्यावा, असा दुटप्पी आणि दूरवरच्या धोरणाचा पोक्त विचार ज्यांच्या बुद्धीला सुचला, ते मात्र आपल्या साधुवृत्तीमध्येंच अढळपणें कायम राहिले !

इकडे ब्रह्मदेव वैकुंठाला जाऊन पहातात, तों विष्णूसभोंवती इतरही अनेक देव जमलेले होते, व ते तारकासुराच्या त्रासाचे अनर्थ विष्णूला सांगत होते. त्यांतच ब्रह्मदेवानें पृथ्वीवरील प्रजेच्या प्रत्यासन्न उच्छेदाची हकीकत सांगितली. त्यावरून विष्णूच्या हें लक्षांत आलें कीं, मदनाचें पुनरुज्जीवन करून सृष्टींतील प्रजोत्पत्तीचा क्रम सुरू केला नाहीं, तर मर्त्य

लोकांचा ज्याप्रमाणें उच्छेद होईल, त्याचप्रमाणें मदनाच्या पुनरुज्जीवनानें शंकर आणि पार्वती यांच्यापासून आपण जर सेनानीची उत्पत्ति करवून घेतली नाहीं, तर आपल्या या सर्व देवलोकाचाही उच्छेद होईल. तेव्हां या दोन्ही लोकांच्या कल्याणासाठीं मदनाला पुन्हा जिवंत करणें अत्यंत अवश्यक आहे. हा विचार सर्व देवांच्या मतानें निश्चित झाल्यानंतर आतां त्या मदनाला कसा जिवंत करावयाचा, हा प्रश्न विचाराकरितां पुढें आला. त्या वेळीं विष्णु म्हणाला, " हे ब्रह्मादिक देव हो, ही गोष्ट तुम्हां आम्हांला जरी कठिण दिसत असली, तरी महादेवाला ती कठिण नाहीं. ज्याच्या अंगामध्यें मदनरूपी तत्त्व जाळून भस्म करण्याची शक्ति आहे, त्याच्या अंगामध्यें तें तत्त्व फिरून उत्पन्न करण्याचें सामर्थ्य नसेल, असें का तुम्हांला वाटतें ? हें मदनरूपी तत्त्व सृष्टीच्या घटनेंतील आदितत्त्व आहे. तें आदिपुरुष आणि आदिमाया यांच्या समागमावांचून अन्यत्र कोठें उत्पन्न होणार आहे ? तेव्हां, हे देव हो, तुम्ही निश्चिंत असा. कारण, आतांपर्यंत पार्वतीनें आपल्या तपश्चर्येनें शंकराला सुप्रसन्न करून घेतलें आहे. सप्तऋषि हिमालयाकडे मागणी घालण्याकरितां गेले आहेत. आणि लवकरच शंकर व पार्वती यांचा विवाह होईल, असा संभव दिसत आहे. त्या विवाहानंतर हिमालयाच्या लताकुंजामध्यें ज्या वेळीं शंकर आणि पार्वती यांचा एकांतामध्यें संगम होईल, त्या वेळीं ज्याच्या रागानें मदन दग्ध झाला, त्याच्याच अनुरागापासून तो फिरून उत्पन्न होईल; इतकेंच नव्हे, तर त्या समागमापासून आपणा देवांचा भावी सेनापति जो स्कंद तोही निश्चयें करून उत्पन्न होईल, याबद्दल तुम्हांला कांहीं एक काळजी नको ! "

विष्णूकडून असें आश्वासन मिळाल्यानंतर सर्व देव आपापल्या स्थानाप्रत गेले; आणि पुढें यथावकाशानें विष्णूनें सांगितल्याप्रमाणें शंकर आणि पार्वती यांचा विवाहमहोत्सव हिमालय पर्वतावर मोठ्या समारंभानें साजरा झाला; आणि त्याच्यापुढीलही सर्व प्रकार विष्णूनें सांगितल्याप्रमाणें अगदीं बरोबर घडून आले. ज्या हिमालयपर्वतावर मदन दग्ध झाला होता, त्याच हिमालय पर्वतावर तो फिरून जिवंत झाला. आणि तो जिवंत होण्याचा अवकाश, तों नवीन उत्पन्न झालेल्या एखाद्या विजेच्या

प्रवाहाप्रमाणें त्याचा सर्व विश्वामध्यें फिरून संचार सुरू झाला. तसेंच ज्या वेळीं मदन हिमालयावर पुनरुज्जीवित झाला, त्या वेळीं ती बातमी कोणी कोणाला सांगावी लागली नाहीं प्रत्येक स्त्रीपुरुषांना ती बातमी अंतःस्फूर्तीनें समजली. विजेचे दिवे लावावयाला बाहेरून कोणी मनुष्य त्या दिव्याजवळ जावा न लागतां त्या दीपज्योतीच्या आंतूनच तें तेज प्रकाशित होतें, त्याप्रमाणें मदनाच्या पुनर्जन्माच्या वृत्तांताचा आनंद सर्व प्रणयी जनांच्या नेत्रकटाक्षांतून आणि मंदस्मितातून सांडूं लागला. आणि जगांतील सर्व गोष्टी फिरून पूर्ववत् सुरळीतपणें चालूं लागल्या. मध्यंतरीं थांबून राहिलेले विवाह फिरून होऊं लागले. आणि आदिदेवी जी गौरी तिच्या विवाहामुळेंच आपले हे विवाह शक्य होत आहेत, हें लक्षांत येऊन कृतज्ञतापूर्वक बुद्धीनें त्या वेळच्या स्त्रियांनीं मोठ्या भक्तिभावानें गौरीची पूजा केली, आणि तुझ्याप्रमाणेंच आम्हांलाही सेनानी पुत्र प्राप्त होवोत, अशी त्यांनीं सद्गदित कंठानें प्रार्थना केली. तेव्हांपासून लग्नाच्या मंगल प्रसंगीं गौरीहराची पूजा करण्याची जी चाल पडली आहे, ती आजपर्यंत आपल्यामध्यें अव्याहतपणें चालू आहे. मात्र शुद्ध भूमींतील सात्त्विक बीजांपासून आम्हांला सेनानी पुत्र मिळावेत ही जी प्रार्थना, ती करण्याची पद्धति केव्हांपासून अनवश्यक वाटूं लागली आहे, याचा कालनिर्णय अद्यापि कोणी बरोबर केला नाहीं. परंतु एकंदरींत जगाची घडी फिरून पहिल्यासारखी होती तशी बसली, आणि स्वर्गामध्येंही तारकासुराचा वध होऊन उभयत्र जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला.

हे माझ्या प्रिय शिष्या, ही कोणी क्वचित्च ऐकलेली अशी अभिनव रसात्मक कथा मी कर्णपरंपरेनें ऐकलेली आज तुला सांगितली आहे, असें म्हणून गुरूंनीं जेव्हां आपली गोष्ट संपविली, तेव्हां हा कथाभाग ऐकून शिष्याचें अंतःकरण फार संतुष्ट झालें. परंतु "कांहीं साधुपुरुष असाधु आचरणाचे कां असतात?" हा माझा मूळचा जो प्रश्न, त्याचें समाधान काय, हें अद्यापि माझ्या लक्षांत आलें नाहीं, असें शिष्यानें सांगितलें. तेव्हां त्यावर गुरु म्हणाले, "अरे, याचें उत्तर तर मी केव्हांच देऊन टाकलेलें आहे. पण तें तुझ्या लक्षांत आलेलें नाहीं, म्हणून फिरून तुला स्पष्टपणें सांगतों कीं, मदन दग्ध झाला होता, त्या वेळच्या धांदलींत ज्यांनीं

साधुपणाचा आव साधून घेतला होता, आणि मदन फिरून जिवंत झाला. तरीही साधुपणाच्या किफायतीवरील आपला हक्क सोडून न देण्याविषयीं गुप्त मार्गाच्या भरंवशावर ज्यांनीं आपला दुराग्रह कायम ठेविला होता, अशा साधूंची त्या वेळीं जी एक जात निघाली होती, त्या जातीपैकीं हे कांहीं अवशिष्ट राहिलेले साधु कोठें कोठें आढळतात. तेव्हां हे मदनाच्या गैरहजेरींत झालेल्या साधूंपैकीं आहेत, असें समजून त्यांची उपेक्षा करणें आणि त्यांच्याही चित्ताला चांगलें वळण लागावें आणि त्यापासून सर्वांचें कल्याण व्हावें, अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना करणें, हेंच आपलें पवित्र कर्तव्यकर्म आहे !

---

# नवी सृष्टि !

पूर्वीं सूर्यवंशांत त्रिशंकु या नांवाचा एक राजा होऊन गेला. त्याच्या मनामध्यें एकदां अशी इच्छा उत्पन्न झाली कीं, आपण यज्ञयागादिकांच्या सामर्थ्यानें स्वर्ग लोकाला सदेह जावें. ही इच्छा तृप्त करून घेण्यासाठीं आपला गुरु वसिष्ठ याच्याकडे तो गेला, आणि त्याला त्यानें आपलें असें मनोगत सांगितलें कीं, " बाबा, मनुष्यानें सदेह स्वर्गास जाणें ही गोष्ट अशक्य आहे. " बिचाऱ्या वसिष्ठाला काय ठाऊक कीं, आपल्याला ज्या गोष्टी आज इतक्या अशक्य वाटत आहेत, त्या युगांतरानें पुष्कळांना शक्य वाटतील ! त्रिशंकूच्या मनांतील सदेह स्वर्गगमनाची इच्छा फार प्रबळ असल्यामुळें वसिष्ठाच्या सांगण्यानें त्याचें मुळींच समाधान झालें नाहीं. व गुरूकडून आपलें काम होत नाहीं, तर कदाचित गुरुपुत्रांकडून झालें तर

पहावें, अशा हेतूनें तो महत्त्वाकांक्षी राजा वसिष्ठाच्या शंभर पुत्रांकडे गेला, त्यांना त्यानें आपली इच्छा निवेदन केली, आणि ज्याच्या योगानें मी सदेह स्वर्गाला जाईन, असा कोणता तरी एखादा यज्ञ तुम्ही माझ्यासाठीं करा, अशी त्यानें त्यांची प्रार्थना केली. तेव्हां त्यांनीं सुद्धां ही गोष्ट अशक्य आहे, असें सांगितलें. मग निरुपाय होऊन तो विश्वामित्र ऋषीकडे आला. आपल्या गुरूंचा अपमान करून दुसरीकडे गेल्याबद्दल वसिष्ठाच्या शंभर पुत्रांनीं "तूं चांडाल होशील" असा त्याला शाप दिला होता. परंतु तशा अवस्थेमध्येंही विश्वामित्रानें त्याला अभय दिलें, आणि ज्याच्या योगानें तूं सदेह स्वर्गाला जाशील, असा यज्ञ मी तुझ्याकरितां करतों, असें त्यानें त्याला आश्वासन दिलें. लागलीच विश्वामित्रानें यज्ञाची तयारी सुरू केली. सर्व मोठमोठ्या ऋषींना आमंत्रणें गेलीं. ते प्राप्त झाले. यज्ञमंडप उभारला गेला. कसें काय करावयाचें, हें सगळ्यांना समजावून सांगण्यांत आलें. खुद्द विश्वामित्र अध्वर्यु झाला. आणि यज्ञाला सुरवात झाली. यज्ञांतील हविर्भाग प्रत्यक्ष घेण्याकरितां विश्वामित्रानें देवतांचें आवाहन केलें. परंतु राजा चांडाल आणि त्याचा अध्वर्यु क्षत्रिय अशी स्थिति असल्यामुळें हविर्भाग घेण्याकरितां कोणीही देवता येईनात. तेव्हां विश्वामित्राला अतिशय क्रोध आला. त्याचे डोळे त्वेषानें लाल झाले. आणि हातामध्यें यज्ञांतील स्रुवा घेऊन तो त्रिशंकूला म्हणाला, "हे त्रिशंको, हे देव हविर्भाग घेऊन संतुष्ट होऊन तुला स्वर्गलोकाला सदेह नेत नसतील, तर खुशाल न नेवोत. मला त्यांची मुळींच परवा नाहीं. मी आपल्या स्वतःच्या तपोबलानें तुला सदेह स्वर्गाला चढवितों. माझ्या तपश्चर्येचा महिमा कसा आहे, तो तूं पहा!" विश्वामित्र इतकें बोलत आहे, तों त्रिशंकु राजा देहासहवर्तमान हळू हळू आकाशांत वर चढूं लागला. ही बातमी स्वर्ग लोकामध्यें इंद्राला समजली, तेव्हां स्वर्गलोकांत फारच गडबड उडाली. जिवंत माणसें सदेह स्वर्गांत येऊं लागलीं तर मोठा अनर्थ होईल, तेव्हां हा प्रकार बंद पाडलाच पाहिजे, असा विचार करून इंद्रानें स्वर्ग लोकांतून त्रिशंकूला हांक मारून सांगितलें कीं, 'त्रिशंको, तूं वर येऊं नकोस. येथें तुला जागा मिळणार नाहीं." तेव्हां त्रिशंकूची फारच तारांबळ उडून गेली. त्याची उर्ध्व गति बंद झाली, आणि तो खालीं पडूं लागला. तेव्हां त्यानें विश्वामित्राला हाक

मारली. तेव्हां विश्वामित्र क्रोधानें संतप्त होऊन सर्व लोकांसमक्ष म्हणाला, " थांब, त्रिशंको, तूं भिऊं नकोस! हे देव जर तुला आपल्या स्वर्गामध्यें घेत नसतील, तर कांहीं हरकत नाहीं. यांची एवढी प्रतिष्ठा नको. मी तुझ्याकरितां आठ दिवसांचे आंत दुसरीच सृष्टि निर्माण करितों, आणि त्या सृष्टींतील स्वर्गामध्यें दुसरा इंद्र निर्माण करून त्याच्याजवळ तुला नेऊन बसवितों!"

असे निर्वाणीच्या प्रतिज्ञेचे शब्द विश्वामित्राच्या तोंडून ज्या वेळीं बाहेर पडले, ती वेळ मोठी भयंकर होती; आणि त्या वेळची स्थितिही मोठी विलक्षण झालेली होती. आपल्या ऐरावतावर बसून आणि हातामध्यें अशनि धारण करून इंद्र स्वर्गाच्या दाराशीं क्रोधानें त्रिशंकूला प्रतिबंध करण्याकरितां उभा राहिला होता. त्याच्या बाजूला अग्नि, यम, वरुण, कुबेर, वगैरे अनेक देवता इंद्राच्या आज्ञेची वाट पहात उभ्या राहिल्या होत्या. त्यांच्या पाठीमागें स्वर्गातील तटबंदीच्या बुरुजांवरून यक्ष, गंधर्व, किन्नर, यांचीं प्रचंड सैन्यें हातांमध्यें शस्त्रास्त्रें घेऊन त्रिशंकूवर हल्ला करण्याकरितां सज्ज झालेलीं होतीं. इकडे खालीं क्रोधानें लाल झालेला विश्वामित्र आपला हात वर उचलून "थांब, थांब, भिऊं नको!" अशा शब्दांनीं त्रिशंकूला धीर देत होता. यज्ञमंडपांतील सर्व ऋत्विग्जन आणि इतर प्रेक्षक मंडळी विश्वामित्राच्या तपःसामर्थ्याचें कौतुक करीत आकाशांतील त्रिशंकु राजाकडे टक लावून पहात उभे राहिले होते. आणि इंद्राचें भय व विश्वामित्राचें सामर्थ्य या दोन्ही जोरांच्या कमी अधिक प्रमाणाप्रमाणें बिचारा त्रिशंकु राजा मात्र कधीं खालीं जात, तर कधीं वर चढत, अशा डळमळीत स्थितीमध्यें आकाशांत लोंबकळत राहिलेला होता.

या दोन जोरांच्या ताणामुळें मध्यंतरी नक्षत्रमंडळाच्या आसपास लोंबत राहिलेला त्रिशंकु राजा जेव्हां साहजिकपणेंच सर्व ठिकाणच्या लोकांना उंचावर दिसूं लागला, तेव्हां हें काय आश्चर्य आहे, असें म्हणून जे ते लोक पृच्छा करूं लागले. तेव्हां सदेह स्वर्गाला जाण्याची त्रिशंकुराजाची इच्छा, त्याकरितां विश्वामित्रानें केलेला यज्ञ, इंद्रादिक देवतांचा त्रिशंकूच्या स्वर्गारोहणाला प्रतिबंध, त्यामुळें आठ दिवसांच्या आंत दुसरी सृष्टि निर्माण करण्याची विश्वामित्रानें केलेली घनघोर प्रतिज्ञा, इत्यादि सर्व गोष्टींबद्दलची इत्थंभूत हकीकत कर्णपरंपरेनें हां हां म्हणतां सर्वत्र पसरली.

विश्वामित्राच्या तपश्चर्येचें उग्र तेज सर्वांना माहितच होतें. तो जें बोलेल तें केल्याशिवाय कधींही राहणार नाहीं अशी प्रत्येकाला खात्री वाटत होती. तो दुसरी सृष्टि निर्माण करील, इतकेंच नव्हे, तर कदाचित् रागानें पहिली दग्धही करून टाकील, असें सुद्धां कित्येकांना वाटूं लागलें. विश्वामित्राच्या तपःसिद्धीवर लोकांचा इतका विश्वास असल्याकारणानें या दुसऱ्या सृष्टिनिर्माणाची बातमी जेव्हां सर्व जगभर पसरली, तेव्हां सकल लोक-समुदायामध्यें फारच मोठी खळबळ उडून गेली. त्या वेळीं जगांतील असलेल्या एकंदर परिस्थितीसंबंधानें प्रत्येक जण स्वाभाविकपणेंच नाखुष आणि नाराज झालेला होता. जी स्थिति असेल तिच्याबद्दल असंतुष्ट असणें आणि तिच्याहून दुसऱ्या कांहींतरी काल्पनिक स्थितीबद्दल साकांक्ष असणें, हा मनुष्यमात्राचा स्वभावच आहे. त्याच्या अनुरोधानें त्या वेळीं सर्व लोक या सृष्टिसंबंधानें अत्यंत असंतुष्ट झालेले होते, व कांहीं तरी योगानें ही स्थिति बदलेल तर फार बरें होईल, असें प्रत्येकाला वाटत होतें. देवानेंही सृष्टि निर्माण केलेली आहे, तेव्हां त्या सृष्टींतील स्थितीबद्दल आपण असंतोष बाळगितां कामा नये, याची कल्पना सुद्धां कोणाच्या मनाला न शिवतां प्रत्येकाचें मन येथील परिस्थितीच्या तक्रारींनीं साहजिकपणेंच अगदीं आंत बाहेर पूर्णपणें व्यग्र होऊन गेलेलें होतें. अशा स्थितींत जेव्हां विश्वामित्राच्या ह्या आठ दिवसांत होणाऱ्या दुसऱ्या सृष्टीची प्रतिज्ञा या पहिल्या सृष्टींतील लोकांच्या कानावर गेली, तेव्हां सचेतन, अचेतन, वगैरे यच्चयावत् सर्व लोकांमध्यें जी गडबड उडून गेली, तिचें यथास्थित वर्णन करणें अगदीं अशक्य आहे.

पहिल्या सृष्टीच्या विरुद्ध लोकांच्या अनेक तक्रारी होत्या; व त्यांबद्दल लोक जरी अनेक अटोकाट प्रयत्न करीत असत, तरी त्यांची कोणी बिलकुल दाद घेत नसे. जें आहे तें उत्तमच आहे, देवानें जें केलें आहे तें तुमच्या हिताचेंच आहे, त्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवा, तो तुमचें कधीं अकल्याण करणार नाहीं, इत्यादि अनेक निर्मूलक आणि निराधार तत्त्वांच्या भडिमारानें या लोकांचीं तोंडें तात्पुरतीं बंद करण्यांत येत असत. परंतु त्यांच्या अंतःकरणाचें खरें समाधान असल्या गोष्टींनीं यत्किंचितही झालेलें नव्हतें. देवांचे तोंडपुजे वेदान्ती या जगांतील त्रिविध तापांनीं

संतापून गेलेल्या लोकांना वरच्या सारख्या असमाधानकारक तत्त्वांच्या कांहीं तरी थापा मारून जगामध्यें शांतता कायम ठेवण्याचा यथामति प्रयत्न करीत असत. परंतु त्यांच्या प्रयत्नांनाही फारसें यश कधींच येत नसे. यांना गरीब लोक विचारीत कीं, आम्हांला गरीब काय म्हणून केलें ? दुःखी लोक विचारीत कीं, आम्हांला दुःखी काय म्हणून केलें ? कुरूप लोक विचारीत कीं, आम्हांला कुरूप काय म्हणून केलें ? असे प्रत्येक जण आपापल्या परिस्थितीबद्दल तक्रारी करीत जेव्हां एकच हलकल्लोळ करून उठत असत, तेव्हां देवाच्या वतीचे कांहीं वेदांती पुढें येऊन त्यांना सांगत असत कीं, ' बाबांनों, यांत तक्रार कसली करतां ? तुम्ही जशीं कर्में केलीं असतील, तशीं तुम्हांला फळें मिळालेलीं आहेत. तुम्ही आतां चांगलीं कर्में करा, म्हणजे या देवाच्या राज्यांत तुम्हांला पुढें चांगलीं फळें मिळतील. जसें कर्म तसें फळ ! उभय पक्षांमध्यें वादाचा असा प्रश्न निघाला, म्हणजे याच्या पुढील भांडणाचा ओघ फारच खळखळाटाचा होत असे. कारण, यावर लोक साहजिकपणेंच असें विचारीत कीं—

लो०—हें कर्म आम्ही केव्हां केलें ?

वे०—या जन्मीं केलें नसेल, तर तें तुम्ही मागच्या जन्मीं केलें असेल.

लो०—मागच्या जन्मीं तरी आम्ही असें कर्म कां केलें ?

वे०—त्याच्या पूर्वीच्या जन्मीं तुम्ही कांहीं तरी कुकर्म केलें असेल, त्यामुळें तुम्हांला हें कर्म करण्याची वासना झाली असली पाहिजे.

लो०—तें त्या जन्मांतील कुकर्म तरी आमचे हातून कां घडलें ?

वे०—त्याच्याही पूर्वीच्या कुकर्मांमुळें.

लो०—असें किती मागें जावयाचें ? ही विचारसरणी जरी केवळ तर्कदृष्ट्या सयुक्तिक आणि कधींही न हटणारी व न संपणारी असली, तरी हिच्यापासून मनाचें समाधान होत नाहीं. शिवाय असें मागें मागें आपण गेलों, तरी अगदीं पहिलें कर्म तरी कां झालें ?

वे०—(हंसून) पहिलें कर्म कोणतें ? कर्म जर मुळीं अनादि आहे, तर पहिलें कर्म असें कोणत्या कर्माला म्हणतां येईल ? तेव्हां पहिलें कर्म कां झालें, हें कांहीं आम्हांला सांगतां यावयाचें नाहीं !

लो०—तुम्हांला सांगतां यावयाचें नाहीं, आणि देव कांहीं बोलत नाहीं. आणि आम्हांला मात्र मधच्यामधें सर्वतोपरी दैन्यावस्थेमध्यें आणि दुःखामध्यें दिवस काढावे लागतात. आणि शिवाय, या जगांत एक श्रीमंत कां होतो, आणि दुसरा गरीब कां होतो, एकाला सुख कां मिळतें, आणि दुसऱ्याला जन्मभर दुःखच कां भोगावें लागतें; या जगांतील साध्या प्रश्नांचीं देखील जर तुम्हांला समर्पक आणि समाधानकारक उत्तरें सांगतां येत नाहींत, तर तुम्ही या जगांतील सुव्यवस्थितपणाची तरफदारी करून ती लोकांच्या पुढें मांडण्याच्या कामांत विनाकारण कां लुडबुडतां ? आणि आपण तेवढे ज्ञानी आणि बाकी सगळें जग मूर्ख असा निराधार आणि निष्कारण टेंभा तुम्ही कां मिरवितां ? असली ही देवाच्या आणि आमच्या मधील अर्धवट मध्यस्थी करण्याला तुम्हांला कोणी सांगितलें आहे ?

अशा प्रकारच्या अनेक प्रसंगीं होणाऱ्या प्रश्नोत्तरांवरून, कोटिक्रमांवरून आणि वादविवादांवरून लोकांच्या मनांत त्या वेळीं या जगाच्या एकंदर व्यवस्थेसंबंधानें किती असंतोष माजलेला होता, याची कोणालाही कल्पना करतां येण्यासारखी आहे. परंतु बिचारे गरीब लोक काय करणार ? मुकाट्यानें सर्व दुःखें सहन करीत स्वस्थ बसले होते. आपल्याला कोण दुःख देत आहे, हें तर समजावयाचें नाहीं, परंतु दुःख मात्र रात्रंदिवस होत असावयाचें, अशा कोंडमाऱ्याच्या अवस्थेमध्यें ते बिचारे सांपडलेले होते. अशा या लोकांच्या कानावर जेव्हां विश्वामित्राच्या नव्या सृष्टीची बातमी आली, तेव्हां त्यांच्या मनामध्यें नवीन आशा उत्पन्न झाली. त्यांची मुखचर्या पालटली. तोंडावर आशेचें तेज चमकूं लागलें. अंतःकरणें उल्लसित झालीं. नवा सूर्य उगवल्यासारखा दिसूं लागला. दशदिशांनीं वहाणाऱ्या वाऱ्यांमध्यें नवीन चांचल्य भासूं लागलें. आकाशांतील नक्षत्रें जास्त सतेज दिसूं लागलीं. जिकडे पहावें तिकडे आनंद संचरूं लागला. जुन्या जगाचीं त्रासदायक बंधनें तोडून टाकून नव्या जगामध्यें आपल्या सोईला पाहिजे तशी नवीन स्वतंत्रता मिळवून घेण्याला आतां आपल्याला ही फार सुरेख संधि आलेली आहे, असा सर्वांच्या अंतःकरणांमध्यें आत्मविश्वासाचा लखलख उजेड पडला. विश्वामित्र हा खरोखरच सर्व

विश्वाचा अतिशय मोठा मित्र आहे, असें सर्वांना वाटूं लागलें; आणि नवीन सृष्टीच्या रचनेच्या वेळीं आपल्याला कोणकोणत्या सुधारणा पाहिजेत, त्याबद्दलच्या सूचना त्याच्या कानावर घालण्याचा सर्वांनीं निश्चय केला.

नवीन जग निर्माण करण्याच्या प्रतिज्ञेचा शेवटचा शब्द विश्वामित्राच्या तोंडांतून उच्चारण्याचा संपला नाहीं, तोंच विश्वामित्रानें दुसरी सृष्टि उत्पन्न करण्याला प्रारंभ केला. त्रिशंकु राजा स्वर्गामध्यें जाण्याकरितां दक्षिण दिशेकडील आकाश मार्गानें वर चढत होता. परंतु तेथेंच मध्यंतरीं त्याच्या ऊर्ध्व गतीला प्रतिरोध झाल्यामुळें तो त्या दक्षिण दिङ्मंडलाच्या आसमंतात् भागींच खालीं डोकें आणि वर पाय अशा स्थितीमध्यें अंतराळांत लोंबत राहिला होता. तेव्हां त्याला धीर येण्याकरितां आणि आपण खरोखरच आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें नवीन सृष्टि निर्माण करीत आहों, असा त्याच्या मनाला तेथल्या तेथें समक्ष प्रत्यय पटण्याकरितां विश्वामित्रानें प्रथमतः त्याच्या भोंवताली दक्षिण दिशेला नवीन सृष्टि करण्याला सुरवात केली. उत्तर ध्रुवाभोंवतीं प्रदक्षिणा घालणारें सप्तऋषींचें मंडळ ज्याप्रमाणें उत्तर दिशेकडे आहे, तसलेंच एक नवीन सप्तऋषींचें मंडळ त्यानें दक्षिण दिशेकडे निर्माण केलें. व त्यांच्या पाठीमागून त्यानें दुसरींही कित्येक नक्षत्रें निर्माण केलीं. इतका उपक्रम झालेला पाहून त्रिशंकूला पुष्कळ खात्री वाटली. व आपल्या सभोंवतीं नवीन सृष्टि निर्माण होत असून आपण त्या सृष्टीला कारणीभूत आणि केंद्रीभूत होत आहों, असें पाहून त्याच्या मनामध्यें जें अपमानाचें दुःख सांचलें होतें तें जाऊन त्याच्या जागीं उलट अभिमानाचा आनंद उत्पन्न होऊं लागला होता. परंतु अशा रीतीनें त्रिशंकूला जरी आनंद होऊं लागला होता, तरी विश्वामित्राच्या मनांतील क्रोध अद्यापि यत्किंचितही कमी झाला नव्हता. त्याचा मुख्य राग इंद्रावर होता. तेव्हां आपल्या दुसऱ्या सृष्टीमध्यें दुसरा इंद्र निर्माण करावा किंवा इंद्राची जागा मुळीं अजिबातच कमी करून टाकावी, या विचारामध्यें तो पडलेला होता.

या विचारांत तो मग्न झाला असतां त्याच्या मनाचा क्षोभातिशयामुळें कांहींच निश्चय होईना. अशा स्थितींत त्याचें मन जास्तच व्यग्र करण्याला आणखी नवीन कारणें उत्पन्न होऊं लागलीं. नवीन व्हावयाच्या

सृष्टीमध्यें आपल्याला काय सुधारणा पाहिजेत त्या सुचविण्याकरितां सिद्ध होऊन आलेल्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी विश्वामित्राच्या यज्ञमंडपाभोंवतीं आणि आश्रमाभोंवतीं जमूं लागल्या. तेव्हां हा काय प्रकार आहे आणि हा सकल सृष्टपदार्थांचा समुच्चय इकडे कां लोटत आहे, हें विश्वामित्राला कांहीं कळेना. आणि या व्यग्रतेमुळें त्याची समाधि लागेना. तेव्हां विश्वामित्रानें यांच्या येण्याचें प्रयोजन काय आहे तें समजून घेण्याकरितां आपले शिष्य पाठविले, आणि त्यांच्या द्वारें त्यानें सर्व माहिती आणविली. तेव्हां आपल्याला जर नवीनच सृष्टि करावयाची आहे, तर त्या सृष्टीमध्यें जुन्या सृष्टींतील चुका तशाच कायम न ठेवितां त्यांमध्यें दुरुस्ती करणें बाजवी आहे, असें विश्वामित्रालाहि वाटूं लागलें; आणि त्याप्रमाणें कोणाच्या काय तक्रारी आहेत आणि कोणाला काय सुधारणा पाहिजे आहेत, याची नोंद करून घेण्याला त्यानें आपल्या शिष्यवर्गाला आज्ञा केली.

इकडे विश्वामित्राचा उपक्रम पाहून स्वर्गलोकामध्यें इंद्रादि देवतांना मोठी काळजी पडली. विश्वामित्रानें दुसरी सृष्टि निर्माण करण्याला सुरवात केली, कांहीं नक्षत्रेंही उत्पन्न केलीं, आणि नवीन सृष्टींत दुसरा इंद्र निर्माण करावयाचा किंवा इंद्राची जागा मुळींच कमी करून टाकावयाची, या विचारामध्यें विश्वामित्र आहे, ही बातमी जेव्हां इंद्राला कळली, तेव्हां तर इंद्र फारच घाबरून गेला, व आवां पुढें काय करावें, या आपत्तीवर उपाय काय योजावा, विश्वामित्राच्या सामर्थ्याला प्रतिबंध करण्याचें सामर्थ्य आपल्या कोणामध्यें आहे, किंवा त्याच्याशीं कांहीं तडजोडीचा तह करणें श्रेयस्कर आहे, असे अनेक प्रश्न देवांच्या समोर येऊन उभे राहिले.

स्वर्ग लोकांतील देव इतक्या तऱ्हेनें गडबडले आहेत आणि घाबरून गेले आहेत, याबद्दलची कुणकूण पृथ्वीवरील लोकांना ताबडतोब समजल्यामुळें त्या लोकांना तर फारच चेव आला. आजपर्यंत देवांनीं आपल्याला वाटेल तसें वागविलें, आपल्या पूजा करून घेतल्या आणि आम्हांला राबाविलें, आपण नैवेद्य खाल्ले आणि आम्हांला उपाशी मारलें, अशा प्रकारच्या आजपर्यंतच्या त्यांच्या वागणुकीबद्दल त्यांच्यावर सूड उगविण्याची विश्वामित्रानें आतां ही मोठी उत्कृष्ट संधि आणून दिलेली आहे; तेव्हां ह्या जुन्या जगाचा नाश करून नवीन जग चांगल्या पायावर आणि संतोषकारक

तत्त्वांवर कसें रचावें, याच्याबद्दल विश्वामित्राला वेळींच आपण योग्य सूचना करणें हें आपलें अत्यंत अवश्यकतेचें कर्तव्यकर्म आहे, अशा विचारांनीं प्रेरित होऊन सर्व लोक विश्वामित्राच्या आश्रमाकडे निघाले.

विश्वामित्राच्या तपोवनाभोंवतीं या लोकांची हळू हळू इतकी गर्दी होत चालली कीं, विश्वामित्राचे चौसष्ट हजार शिष्य त्यांचें म्हणणें लिहून घेण्याकरितां बसले असतांहा त्यांच्या नवीन जगांतील सुधारणांसंबंधीच्या सूचना कांहीं केल्या संपेनात. कित्येकांच्या सूचना लिहून घेण्याच्या राहून गेल्या, कित्येकांच्या अर्धवटच लिहून घेतल्या गेल्या, आणि कित्येक सूचना लिहून घेण्यांत तर अशी गडबड होऊन गेली कीं, कांहीं लोकांनीं जी मागणी केली होती ती दुसऱ्यांच्या नांवावर पडली, आणि दुसऱ्यांनीं केलेली मागणी जी त्यांना नको होती ती दुर्दैवानें यांच्या नांवावर पडली, आणि त्यामुळें फारच अनर्थ ओढवण्याचा प्रसंग प्राप्त झाला होता. कोणी कोणी काय काय मागितलें होतें, हें त्या वेळीं जर पूर्णपणें लिहून सुद्धां घेतां येणें शक्य नव्हतें, तर आतां तें पूर्णपणें सांगणें अधिकच अशक्य आहे, हें उघड आहे. तरी पण त्या वेळच्या सूचनांपैकीं आणि मागण्यांपैकीं कांहीं कांहींचा अवशिष्ट उल्लेख कोठें कोठें सांपडतो:—

झाडें म्हणालीं, आम्ही या जुन्या जगांत उभीं राहून राहून कंटाळलों आहों, तेव्हां आम्हांला वाटेल तेव्हां खालीं बसतां यावें व वाटेल तेव्हां उभें राहतां यावें, अशी कांहीं तरी सोय झाली पाहिजे!

वेली म्हणाल्या, आम्ही झाडांच्या आश्रयानें आतांपर्यंत दिवस काढले, परंतु यापुढें आम्हांला आमच्या स्वतःच्या पायावर उभें राहतां येण्याची स्वतंत्रता असावी!

पर्वतांनीं आपलें म्हणणें असें लिहून दिलें कीं, पूर्वीं आम्हांला पंख होते, परंतु त्या इंद्रानें ते आमचे पंख कातरून टाकले आहेत; ते या नवीन सृष्टीमध्यें आमचे आम्हांला परत मिळावेत. तसेंच अगस्त्य ऋषीनें आम्हांला फसवून आमची वाढ खुंटविली आहे. मी दक्षिणेकडे जाऊन येत आहें, तोंपर्यंत तुम्ही वाढूं नका, असें सांगून अगस्त्यऋषि जो दक्षिणेकडे जाऊन बसला आहे, तो तेथून मुळींच हलत नाहीं! हा आज परत येईल, उद्यां परत येईल, अशा आशेवर आम्ही आपली वाढ थांबवून

त्याची मार्गप्रतीक्षा करीत बसलों आहों. तर त्याला तरी परत बोलवावें, किंवा आम्हांला तरी वाढण्याची परवानगी द्यावी !

मासे म्हणाले, आम्ही युगेंच्या युगें पाण्यांत राहून अगदीं थंडावलों आहों, तेव्हां आम्हांला या नवीन सृष्टींत जमिनीवर फिरण्याची परवानगी असावी ! ही सूचना ते करीत असतांना जे पुष्कळ मत्स्याहारी लोक त्यांच्याजवळ होते, त्यांनींही या सूचनेंतील शहाणपणाबद्दल माना डोलविल्या, व ही सूचना नवीन जगामध्यें अवश्य अमलांत आलीच पाहिजे, असा त्यांनीं आपला नेटाचा दुजोरा त्या सूचनेला दिला !

सापानें विनंति केली कीं, माझ्या या विषारीपणाचा मला अलीकडे अगदीं तिटकारा येऊं लागला आहे. या दुर्गुणाबद्दल ज्यानें त्यानें मला डवचावें आणि मारावें, ही स्थिति कांहीं चांगली नाहीं. तेव्हां याबद्दल कांहीं तरी तजवीज झाली, तर बरें होईल. यावर विश्वामित्राच्या शिष्यांनीं त्याला असें सांगितलें कीं, हें तुमचें सापांचें विष तुमच्या जिव्हेंतून काढून घेतलें, तर तें ठेवावयाचें कोठें ! तें कोणी घेण्याला तयार होत असतील, तर मग तें तुमच्यापासून काढून घेण्याची तजवीज करण्यांत येईल. हें त्यांचें बोलणें चाललें असतां तेथें कांहीं दुर्जन आणि निंदक चहाडखोर होते. त्यांनीं तें ऐकलें, तेव्हां आपल्या धंद्याला लागणारा हा महत्त्वाचा माल अशा बिनमोलानें चालला आहे असें पाहून त्यांना वाईट वाटलें, व सापांचें जितकें विष असेल तितकें सगळें आपल्या जिव्हाग्रीं धारण करून सापांचें ओझें हलकें करण्याचें त्यांनीं आश्वासन दिलें !

हत्तींनीं पुढें येऊन अशी तक्रार सांगितली कीं, सगळ्या प्राण्यांचे दांत त्यांच्या तोंडांत असतात, परंतु आमचे दांत मात्र एखाद्या दंताळ्या माणसाच्या दांताप्रमाणें बाहेर आलेले असतात. तेव्हां ते आंत गेले तर बरें. यावर असा आक्षेप काढण्यांत आला कीं, ज्याचे दांत त्याचेच घशात घालणें हें चांगलें नाहीं. त्यामुळें ती सूचना विचारांत घेण्यांत आली नाहीं.

बगळ्यांनीं अशी एक जुनी हकीकत सांगितली कीं, आम्ही आणि ढोंगी साधु यांच्या दरम्यान पहिल्या सृष्टीच्या प्रारंभीं असें ठरलें होतें कीं, फक्त कांहीं दिवसपर्यंतच आम्ही डोळे मिटून पाण्यांत बसून आपलें भक्ष्य गांठावें आणि ढोंगी बुवांनीं जमिनीवर डोळे मिटून बसून लोकांना

फसवावें. त्याप्रमाणें आम्ही आजवर पाण्यांत बसून बसून गारठून गेलों आहों. तेव्हां या नवीन सृष्टीमध्यें आतां आम्हांला साधु करावें आणि ज्यांनीं आतांपर्यंत लोकांना भोंदण्याचें काम केलेलें आहे, त्यांना आमच्याप्रमाणें गळबाहतच्या पाण्यांत उभें करावें !

कित्येक पशूंनीं आपल्या वतीनें अशी कैफियत दाखल केली कीं, बुद्धीच्या तुलनेच्या दृष्टीनें पाहिलें असतां मनुष्यांपैकीं कित्येक लोक अगदीं आमच्यासारखे असतात, किंबहुना आमच्याहून देखील क्वचित् स्थळीं त्यांची अक्कल कमी असते. असें असून निर्बुद्धपणाचीं द्योतक अशीं जीं शिंगें तीं फक्त आमच्याच कपाळीं ! तेव्हां या नव्या सृष्टीमध्यें तरी हा पक्षपात अवश्य दूर झालाच पाहिजे. मूर्ख लोकांच्या डोक्यांवर तरी मूर्खपणाची खूण म्हणून आमच्या सारखीं शिंगें लावा, नाहीं तर त्यांच्याप्रमाणें आमच्या तरी डोक्यावरचीं शिंगें काढून टाका !

अशा प्रत्येकांच्या निरनिराळ्या मागण्या किती सांगाव्या ! थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे प्रत्येकजण आपापल्या पहिल्या असलेल्या स्थितीला कंटाळलेला होता, आणि अननुभूत अशा कोणत्या तरी नवीन स्थितीचा अभिलाष त्याच्या मनांत उचंबळत होता. कित्येकांनीं तर विश्वामित्राच्या नवीन सृष्टीच्या अम्मलबजावणीची वाट न पाहतां आपणच होऊन आपलें स्थित्यंतर करून घेण्याला सुरवात केली ! गरिबांनीं श्रीमंत होण्याकरितां आपल्या फाटक्या चिंध्या फाडून टाकल्या ! चतुष्पादांनीं माणसांत मिसळून जाण्याकरितां आपले दोन पाय तोडून घेतले ! गाढवांनीं शहाण्यांत मोडण्याकरितां आपले कान कातरून घेण्याची कल्पना अमलांत आणिली ! असे अनेक विलक्षण प्रकार होऊं लागले. त्यांतच विश्वामित्राच्या शिष्यवर्गांतील लेखकांच्या हातून गर्दीमुळें व गडबडीमुळें होणाऱ्या चुकांच्या कारणानें भलत्यांच्या मागण्या भलत्यांच्याच नांवांवर नोंदल्या जात होत्या. कित्येक लोकांनीं अक्षयी भव्य साधूबुवा होण्याच्या इराद्यानें आपल्याकरितां अक्षयी दाढीमिशांचे झुबके मागितले होते; पण ही मागणी लेखकांच्या चुकीनें तरुण स्त्रियांच्या नांवांपुढेंच मांडून ठेवण्यांत आलेली होती ! कुलस्त्रियांनीं आपण सदोदित अष्टपुत्रवती आणि पौत्रवती असावें अशी मागणी केली होती; परंतु ही मागणी नजरचुकीनें वारस्त्रियांच्या कोष्टकामध्यें नोंदली गेली

होती ! कित्येक मागण्यांतील अभिप्राय लेखकांना बरोबर न समजल्या-मुळेंही सदर रजिस्टरांमध्यें कांहीं चुका झाल्या होत्या. लांबलांबच्याही प्रसिद्ध आणि गुप्त बातम्या आपल्याला सहज समजाव्या म्हणून कित्येकांनीं आपल्याला दूरश्रवणाची देणगी मागितली होती. त्यांच्या नांवांपुढें लेखकानें शेरा लिहून ठेविला होता कीं, यांना लांब कान पाहिजे आहेत !

असे जरी अनेक घोटाळे आणि गोंधळ उडत होते, तरी देखील त्या सगळ्या गोंधळांमधून आणि घोंटाळ्यांमधून एक गोष्ट बिनचूकपणें व्यक्त होत होती. ती ही कीं, सर्वांना आपल्या पूर्वस्थितीमध्यें कांहीं तरी बदल घडून यावयाला पाहिजे होता. श्रीमंतांनाही अधिक श्रीमंत व्हावयाला पाहिजे होतें, आणि राजांनाही पूर्वींच्याहून अधिक राज्यविस्तारावर फुकट मिळेल तर राज्य करावयाला पाहिजे होतें. इतक्या मोठ्या या फेरबदलाच्या वावटळीमध्यें फेरबदल नको असल्याचें उदाहरण विरळाच सांपडावयाचें. फक्त हिंदु धर्मांतील पतिव्रता स्त्रीला मात्र आपल्या पतीच्या बाबतींत कांहींही बदल नको होता. या वर्गानें आपल्या नांवापुढें आपली अशी इच्छा नोंदविली होती कीं, तुमची जरी दुसरी सृष्टि झाली, तरी सुद्धां त्यांत आमचे पति मात्र पहिलेच असले पाहिजेत !

ह्या व्यक्तिविषयक सूचना होत्या. परंतु याच्यापेक्षां तात्त्विक स्वरूपाच्या आणि सार्वत्रिक उपयोगाच्या अशा दुसऱ्याही कित्येक सूचना सादर करण्यांत आलेल्या होत्या. पृथ्वीच्या पोटांत अगर समुद्राच्या वाळवंटांत जे सोन्याचे बारीक बारीक कण निरनिराळे इतस्ततः पडलेले असतात, ते तसे न टाकतां सृष्टिदेवतेनें त्यांचा एक मोठा गठ्ठा एकत्र करून जमिनींत कोठें तरी ठेवावा, व ती जागा तिनें गुप्तपणें येऊन फक्त आमच्या कानामध्यें सांगावी, अशी कित्येक राजे लोकांची सूचना होती ! शास्त्रज्ञ लोकांच्या एका सभेनें पाण्यासंबंधानें आपलें असें मत कळविलें होतें कीं, पाण्याच्या बाबतींत पूर्वींच्या सृष्टि-रचनेंत मोठी चूक झालेली आहे. उष्णतेच्या योगानें वाफेपासून बनलेलें पाणी आयतें मेघमंडळामध्यें पुष्कळ उंचीवर असतें. तेथून तें पावसाच्या रूपानें खालीं पाडून मग तें रहाटानें, दोरीनें किंवा पंपानें वर काढीत बसण्याचा द्राविडी प्राणायाम अगदीं गैर आहे. याच्यापेक्षां मेघमंडळांतील पाणी आयतें उंचीवर आहे,

तें नवीन सृष्टीमध्यें तेथेंच असूं द्यावें, आणि तेथूनच ठिकठिकाणीं पाण्याच्या नळ्या घ्याव्या म्हणजे झालें ! कारण, असें केल्यानें पाण्याला उंचीच्या योगानें जोर पुष्कळ येऊन खर्चही थोडा लागेल. दुसरी एक तेजःशास्त्रोत्तेजक मंडळी होती. तिनेंही ह्या पाण्याच्या नळयांच्या युक्तीचेंच अनुकरण करून सूर्याच्या सरोवरांतून तेजाचे नळ आणण्याची एक कल्पना विश्वामित्राच्या नवीन सृष्टीकरितां काढिली होती. त्यांत विशेष असें कांहींच नव्हतें. फक्त सूर्यमंडळापासून तेजाच्या नळ्या आणून त्या घरोघर द्यावयाच्या म्हणजे ह्याच्या योगानें रात्रीं सुद्धां उजेडाचें काम होईल, आणि अन्न शिजविण्याकरितां विस्तव फुंकीत बसण्याची अवश्यकता उरणार नाहीं ! स्त्रीदुःखपरिहारपरिषद या नांवाची त्या वेळीं एक तुफानी आणि तोफखानी परिषद होती. त्या परिषदेनें विश्वामित्राला असें दरडावून सुचविलें होतें कीं, पूर्वीच्या सृष्टींतील जरायुज आणि अंडज हे जे पहिले दोन भेद आहेत, ते या परिषदेला मुळींच संमत नाहींत. व म्हणून या परिषदेचें असें मत आहे कीं, जरायुज पद्धति ही स्त्रियांच्या आरोग्याला आणि सौंदर्याला अपायकारक असल्यामुळें ती नवीन सृष्टीमध्यें ताबडतोब बंद करण्यांत यावी; व ही स्वतः ओझीं वहात बसण्याची जी रानटी काळची पद्धत आहे, ती बंद झाल्यानंतर याच्या पुढच्या पायरीची जी अंडजपद्धति पक्ष्यादिकांमध्यें प्रचलित आहे, ती मनुष्यादिकांमध्येंही सुरू व्हावी !

पदार्थविज्ञानशास्त्रवेत्ते, रसायनशास्त्रवेत्ते, ज्योतिषशास्त्रवेत्ते, गणितशास्त्रवेत्ते, इत्यादि नानाविधशास्त्रवेत्त्यांची एक सभा त्या वेळीं फार प्रख्यात होती. तिच्यांतील सभासद विश्वामित्राला समक्ष येऊन भेटले आणि असें सांगूं लागले कीं, आकाशांतील तारे अन्योन्य गुरुत्वाकर्षणाच्या योगानें अंतराळांत त्या त्या ठिकाणीं स्थिर राहिले आहेत, हें आम्हांला गुरुत्वाकर्षणाच्या नियमांवरून समजतें. परंतु हे एकेक तारे पहिल्यानें जेव्हां आकाशांत मांडले जात होते, आणि त्यांचे गुरुत्वाकर्षणाचे जोर जेव्हां एकमेकांवर अद्यापि लागू झालेले नव्हते, तेव्हां त्या स्थितींत हे तारे आकाशांत अधांतरीं कसे राहिले होते, हें आम्हांला समजत नाहीं. तेव्हां तें आपण कसें करितां हें या नवीन सृष्टीच्या वेळीं पाहण्याकरितां आम्ही आलेले आहों. सबब तो प्रयोग आम्हांला आपण दाखवाल, अशी आशा आहे !

अशा नानाप्रकारच्या सूचना आणि मागण्या एका पाठीमागून एक जेव्हां विश्वामित्राच्या कानावर येऊं लागल्या, तेव्हां त्याचें मन अगदीं गोंधळून गेलें. या सूचनांची संख्या पुढें पुढें तर इतकी वाढत गेली कीं, त्या नुसत्या लिहून घेणें किंवा लक्षांत ठेवणेंसुद्धां अशक्य होऊं लागलें. मग त्यांची अंमलबजावणी करण्याची गोष्ट तर लांबच राहिली. अशा विवंचनेमुळें विश्वामित्राच्या बुद्धीला अगदीं वेड लागण्याची वेळ आली. तिकडे गुरुत्वाकर्षणाच्या ताणामध्यें जरा कोठें कमी जास्ती झाल्याबरोबर आतां मी पडतों कीं काय, असें वाटून "धांव, धांव, विश्वामित्रा, पडलों रे पडलों!" अशा हांकावर हांका त्रिशंकु मारीत होता; त्याला " थांब, थांब, भिऊं नको!" असें विश्वामित्र एकीकडे आश्वासन देतच होता, आणि दुसरीकडे नव्या सृष्टींतील भावी रहिवाश्यांच्या मागण्या ऐकून घेत होता. शिवाय त्रिशंकु वरून ओरडलीं कीं, खालीं जमलेल्या लोकांमध्येंही एकसारखी पळापळ सुरू होई. हा जर वरून खालीं कोसळला, तर आपल्या डोक्यावर आदळून आपल्याला जुनीही सृष्टि नाहीं आणि नवीही सृष्टि नाहीं, अशी स्थिति होईल, म्हणून साहजिकपणेंच ते सैरावैरा पळत. अशा गडबडींत कोणाचें डोकें ताळ्यावर रहाणार आहे! इतक्या थरावर गोष्ट आली, तेव्हां आपण अंगावर घेतलेलें काम किती मोठें आणि व्यापक आहे, याची कल्पना विश्वामित्राला हळु हळु येऊं लागली; आणि या कधींही न संपणाऱ्या सूचना आणि मागण्या ऐकून घेण्यांतच आपल्या प्रतिज्ञेचे सारे दिवस निघून जातात कीं काय, अशीही त्याला भीति वाटूं लागली. कारण, प्रतिज्ञा केल्यापासूनचा तो सातवा दिवस सुरू झालेला होता. अशा स्थितींत आपण प्रतिज्ञा केली नसती, तरी बरें झालें असतें, असेंही मधून मधून त्याच्या मनाला वाटूं लागलें. एकदां त्याला असेंही वाटे कीं, या सगळ्या लोकांच्या सूचना ऐकण्याच्या भानगडींत आपण पडलों नसतों, तरीही फार बरें झालें असतें. परंतु तो फार उदार अंतःकरणाचा असल्यामुळें या दीन आणि दुबळ्या लोकांच्या गाऱ्हाण्यांकडे दुर्लक्ष करण्याचें निर्दयत्व त्याच्या हातून होईना. अशा पेचांत सांपडल्यामुळें त्याला एकदां असेंही वाटे कीं, इंद्राकडून एखादा देव आपल्याशीं तहाचें बोलणें करण्याकरितां येईल, तरीही या प्रसंगीं बरें होईल. परंतु

इंद्राकडेही जरी तशाचा कांहीं विचार चालला होता, तरी तो अद्यापि निश्चित न झालेला असल्याकारणानें इंद्राकडून तर या वेळीं कोणी आलें नाहींच, पण उलट नव्या सृष्टीसंबंधानें जिज्ञासापूर्ण असलेल्या लोकांपैकींच आणखी कांहीं नवीन लोक विश्वामित्राची समक्ष भेट घेण्याकरितां आले!

या वेळीं आलेले हे लोक कांहीं सामान्य नव्हते. ते फार मोठ्यांपैकीं होते. व ते आतांपर्यंतच्या इतर क्षुद्र लोकांप्रमाणें या जगांतील तुच्छ कामनांनीं आणि वासनांनीं प्रेरित झालेले नसून जगाच्या उत्पत्तिस्थितिप्रलयासंबंधानें, जगांतील सुखदुःखाच्या कार्यकारणपरंपरेसंबंधानें, प्राण्यांच्या जन्ममरणासंबंधानें, मरणोत्तरकालीन पारलौकिक गतीसंबंधानें, जीवात्मा आणि परमात्मा यांच्यामधील ऐक्यानैक्यासंबंधानें, पुरुष आणि प्रकृति यांच्या कर्तृत्वाकर्तृत्वासंबंधानें, व अशाच प्रकारच्या इतरही अनेक आधिभौतिक आणि आध्यात्मिक प्रश्नांसंबंधानें प्रणिधानपूर्वक विचार करणारे जे महात्मे आणि महर्षि असतात, त्यांच्यापैकीं ते होते. कणाद, गौतम, कपिल, जैमिनि, व्यास, याज्ञवल्क्य, इत्यादि दर्शनकार आणि शास्त्रकार, यांच्या योग्यतेचे आणि यांच्या तोडीचे ते होते. इतक्या मोठ्या दर्जाचे लोक आपल्याकडे आलेले पाहून विश्वामित्र ऋषि त्यांना सामोरा गेला, व मोठ्या आदरानें त्यांचें आगतस्वागत करून सामान्य कुशल प्रश्नांनंतर त्यांच्या आगमनाचें विशेष कारण विश्वामित्रानें त्यांना विचारलें. तेव्हां नवीन सृष्टीच्या उत्पत्तीच्या प्रसंगीं आध्यात्मिक आणि आधिभौतिक शास्त्राच्या दृष्टीनें काय काय अशक्यता उत्पन्न होतील, याविषयीं आपल्यापाशीं विवेचन करण्याच्या विचारानें आम्ही आलों आहों, असें त्यांनीं सांगितलें. तें ऐकून विश्वामित्राला थोडासा आनंद आणि थोडासा उद्वेगही उत्पन्न झाला. तरी पण मधून मधून त्रिशंकूच्या हांकांनीं आणि आक्रोशांनीं विश्वामित्राचें मन व्यग्र होत असतांही त्यानें त्या आलेल्या महाजनांपाशीं पुष्कळ वेळ शांतपणानें संवाद केला. तो अन्योन्यांचा संवाद गहन आणि गंभीर होता. त्याचें यथार्थतेनें आकलन होणें अशक्य आहे. तरीपण त्यांतील मथितार्थ लक्षांत ठेवण्याजोगा आहे. विश्वामित्राकडे आलेल्या महात्म्यांचें म्हणणें असें होतें कीः—

हे विश्वामित्रा, तूं ही जी नवीन सृष्टि उत्पन्न करण्याला प्रतिज्ञा-

पूर्वक प्रवृत्त झाला आहेस, ती सृष्टि तूं कशी उत्पन्न करूं शकशील ? या इतर लोकांनीं केलेल्या सामान्य मागण्या पुऱ्या करणें हेंही फार कठिण आहे. परंतु त्यांतून तूं कसाबसा बाहेर पडलास, अशी कल्पना केली, तरी याच्याशिवाय तात्त्विक दृष्टीच्या अशक्यतेच्या फार मोठ-मोठ्या अडचणी तुझ्या मार्गांमध्यें येतील, हें तुझ्या लक्षांत येत नाहीं काय ? तूं नवी सृष्टि कशी करणार ? ही जुनी सृष्टि कशी निर्माण झाली, हें तरी कोणाला आधीं कळलें आहे काय ?—तुला तरी कळलें आहे काय ?—कीं, ज्याच्यायोगानें जुन्या सृष्टीच्या धर्तीवर तुला ही नवीन सृष्टि उत्पन्न करितां येईल ? तूं आपल्या नव्या जड सृष्टीकरितां या पंचमहाभूतांचे इतके असंख्य परमाणु कोठून गोळा करून आणणार ? बरें, यदाकदाचित् तूं कोठून तरी हे परमाणु पैदा केलेस, तरी पुढें तूं त्यांचें काय करणार ? ते बोलून चालून पडले जड ! ते प्रत्येकजण एखाद्या मठ्ठासारखे हात पाय जोडून जागच्या जागीं स्वस्थ बसतील, आणि कांहीं एक हालचाल करणार नाहींत. मग त्या सूक्ष्म परमाणूंचे एकमेकांशीं संयोग होणार कसे ? आणि त्यांच्यापासून तुझी स्थूल सृष्टि दृश्यमान होऊं लागणार कशी ? एक अणु जर दुसऱ्या अणूशीं समवेत झाला नाहीं, तर मग त्या दोन अणूंपासून तुझा द्व्यणुक कसा तयार होणार ? आणि द्व्यणुकालाच जर ठिकाण नाहीं, तर मग त्र्यणुक आणि चतुरणुक हे तरी कोठून येणार ? सारांश, ह्या जड अशा परमाणूंच्या पुढेंच तुला प्रथमतः हात टेकावे लागतील, असें तुला वाटत नाहीं काय ? तूं ह्या जड परमाणूंमध्यें पहिली गति कशी उत्पन्न करणार ? या सृष्टीच्या सृष्टीविषयीं विचार करणारे सर्व तत्ववेत्ते येथें येऊन अडखळलेले आहेत. त्यांतून तूं कसा बाहेर पडणार ?

अथवा सत्त्व, रज आणि तम, ह्या तीन गुणांच्या जोरावर जरी तूं कदाचित् पुढील सृष्टि निर्माण करण्याला इच्छित असलास, तरी हे तीन गुण आधीं तूं कोठून आणणार ? त्याकरितां तुला त्रिगुणात्मक प्रकृति निर्माण केली पाहिजे. ती तूं कशी निर्माण करणार ? आणि यदाकदाचित् जरी त्रिगुणांच्या साम्यावस्थेच्या स्वरूपामध्यें असणारी प्रकृति तूं निर्माण केलीस, अशी कल्पना केली, तरी ती प्रकृति प्रवृत्त केव्हां होईल, आणि निवृत्त केव्हां होईल ? आणि ती प्रवृत्त तरी कां होईल ? आणि

एकदां प्रवृत्त झाली, तर तिनें फिरून निवृत्त तरी कां व्हावें ? तराजूचीं जीं दोन पारडीं मधल्या आडव्या दांड्यापासून खालीं लटकलेलीं असतात, तीं दोन्ही पारडीं व तो तिसरा दांडा हीं तिन्ही स्थिर झालीं, म्हणजे जशी अवस्था उत्पन्न होते, तशी त्रिगुणांच्या स्थिरतेची जी साम्यावस्था तद्रूपी जरी प्रकृति असली, तरी त्या पहिल्या साम्यावस्थेचा जगाच्या प्रवृत्तीसाठीं तूं भंग कसा करणार ? ह्या प्रकृतीच्या अचेतन तराजूचा समतोलपणा तूं पहिल्यानें कसा विध्वंसित करणार ? ज्याप्रमाणें अणूमध्यें, त्याचप्रमाणें या गुणत्रयात्मक प्रकृतीमध्यें तूं पहिली गति कशी उत्पन्न करणार ? तूं म्हणशील कीं, मी पहिल्यानें जरा त्यांना आपल्या हातानें धक्का देईन, तर तेंही जमणार नाहीं. कारण, परमाणु हे मूळचे जड असल्यामुळें तूं किती परमाणूंना हातानें ढकलीत बसशील ? आणि असें करूं लागलास, तर ह्या परमाणूंना एकमेकांवर ढकलतां ढकलतां तुझे हात दमून जातील. आणि तुझा सगळा वेळही त्या अनंत परमाणूंमध्यें गति उत्पन्न करण्याला पुरणार नाहीं ! आणि अशीच प्रकृतीचीही गोष्ट आहे !

किंवा तूं कदाचित् असेंही म्हणशील कीं, मी खरी जड सृष्टि निर्माणच करणार नाहीं, तर केवळ आभासमय सृष्टिच उत्पन्न करीन; म्हणजे मग तुमच्या या परमाणूंची किंवा प्रकृतीची पंचाईतच उरणार नाहीं. पण असें करूनही तुझें जग चालावयाचें नाहीं. कारण, रज्जूवर भासणाऱ्या सर्पाला किंवा शुक्तीवर भासणाऱ्या रजताला जरी कोणत्याही परमाणूंची अवश्यकता लागावयाची नाहीं, तरी सत्य सृष्टीमध्यें लोकांचे जे सगळे व्यवहार चालावयाचे, ते असल्या अज्ञानमूलक आभासावर चालावयाचे नसून सत्य, दृश्यमान व स्पृश्यमान अशा सत्पदार्थांच्या अनुरोधानेंच चालावयाचे असतात, व अशा सत्यतेशिवाय ते चालणें शक्यही नसतात.

ह्या अचेतन सृष्टीच्या मार्गांतील कांहीं अडचणी झाल्या. परंतु सचेतन सृष्टि निर्माण करतांना ज्या अडचणी येतील, त्याही त्यांच्यासारख्याच दुर्घट असणार. तूं परमात्मा आणि जीवात्मा यांच्या भेदाभेदाची काय तजवीज करणार ? तुझ्या सृष्टींतील जीवात्मे तूं परमात्म्याचे अंशभूत म्हणून त्या परमात्म्यापासूनच उत्पन्न करणार, किंवा परमात्म्याचा आणि जीवात्म्यांचा तूं कांहीं संबंधच ठेवणार नाहींस ? आणि याच्याही आधीं तूं

आम्हांला हें सांग कीं, तूं ह्यांपैकीं कोण होणार? जीवात्मा कीं परमात्मा? किंवा या दोहोंहूनही तिसराच कोणी तरी? पण तूं आधींच एक जीवात्मा असल्यामुळें तुला परमात्मा कसें होतां येईल? आणि परमात्मत्वाशिवाय तुझ्याहातून जगदुत्पत्ति शक्य कशी होईल? आणि या दोहोंहून तिसराच कोणी तरी असणें हें तर शक्यच नाहीं. तेव्हां तूं कोणत्या भूमिकेवर आरूढ होऊन ही सृष्टि उत्पन्न करणार? बरें, ही तुझ्या स्वतःसंबंधाची अडचण तूं कशीबशी दूर केलीस, तरी बाकीच्या जीवात्म्यांची तूं काय वाट लावणार? त्यांना जर तूं नवीन उत्पन्न केलेंस, तर जें उत्पन्न होतें तें नष्ट झालें पाहिजे, या न्यायानें तुझे उत्पन्न झालेले जीवात्मे नाश पावूं लागतील, आणि ते तसले तुझे जीवात्मे मनुष्याच्या मृत देहाबरोबर दग्ध होऊं लागले, तर मग तुझी सृष्टि पुढें अखंड कशी चालणार? आणि शिवाय त्यांनीं केलेल्या कर्माबद्दल त्यांना जो बरावाईट फलोपभोग मिळावयाचा, तो एका जन्मांत मिळाला नसला, तर तुझ्या सृष्टींत नाश पावणाऱ्या जीवात्म्यांना तो पुढें केव्हां मिळणार? तसेंच तूं हे नवीन जीवात्मे उत्पन्न करूं लागलास, तर त्यांना पूर्वींचें कांहीं कर्म नसल्यामुळें तूं त्यांना कोणत्या स्थितींत जन्मास घालणार? तूं त्यांना श्रीमंत करणार? किंवा गरीब करणार? सुखी करणार? किंवा दुःखी करणार? आणि यांपैकीं कांहींही केलेंस, तरी तूं तें कां करणार? त्याला तुझ्यापाशीं नियामक असें काय आहे? तूं जर एखाद्या जीवाला उगीच दुःखी किंवा दरिद्री उत्पन्न केलेंस, तर तुझ्यासारखा निर्दय आणि निष्ठुर तूंच होशील! बरें, तो प्रसंग टाळण्यासाठीं तूं कोणावर दयावंत होऊन त्याला सुखी आणि सधन केलेंस, तर असें तरी तूं कारणावांचून कां करावेंस? एकावर दया करावयाची, तर तशीच दुसऱ्यांवरही ती तूं कां करूं नयेस? आणि कारणावांचून जर तूं कोणावर कृपा आणि कोणावर क्रोध करूं लागलास, तर तुझी सृष्टि अत्यंत अव्यवस्थेची आणि बेबंदशाहीची होऊन ती लवकरच नाशाला जाईल. हल्लींच्या या जुन्या सृष्टीमध्यें ईश्वर प्रत्येकाला त्याच्या पूर्वकर्मानुसार बरें वाईट फळ देतो, अशी कल्पना करून तत्त्ववेत्ते यथाशक्ति या अव्यवस्थेचा परिहार करावयास करितात. तें पूर्व कर्म केव्हां व कसें सुरू झालें, हें आम्हांला कोणाला समजत नसल्या कारणानें तें अनादि आहे, अशी कल्पना करून घेऊन आम्ही

कसा तरी मानसिक निर्वाह करून घेत आहों. त्या बाबतींत तुझ्या नवीन सृष्टींत कांहीं नवीन समाधान मिळतें कीं काय, हें पाहण्याच्या जिज्ञासेनें आम्ही तुझ्याकडे आलों आहों. या जुन्या जगाचा प्रारंभ कसा झाला, हें पाहण्याला त्या वेळीं कोणिही तत्त्ववेत्ता तेथें हजर नव्हता. त्यामुळें अनेकांच्या मनांत अनेक शंका आणि संशय राहिलेले आहेत. त्यांचें निराकरण समक्ष करून घेण्याची ही संधि साधण्याकरितां आम्ही आलों आहों. तेव्हां तूं कसें काय करणार आहेस, तें आम्हांला नीट समजावून सांग. तसेंच, तूं जीवात्म्यांना उत्पन्न करते वेळीं कोणत्या पद्धतीनें त्यांना उत्पन्न करणार आहेस? परमात्मा हें आदिकारण घेऊन त्यापासून जीवात्मे हे परिणाम म्हणून तूं उत्पन्न करणार आहेस? किंवा त्या परमात्म्याचीं निरनिराळया ठिकाणीं नुसतीं निरनिराळीं प्रतिबिंबें पाडवून त्यांनाच तूं जीवात्मे म्हणून भासविणार आहेस! आणि या जीवात्म्यांची संख्या तूं नियमित करणार आहेस किंवा ती अनियमित ठेवणार आहेस! आणि या जीवात्म्यांना तूं जर या भवचक्रामध्यें घालणार असशील, तर त्यांना तूं त्यांतून कोणत्या उपायानें सोडविणार! मृत्यूनें किंवा मोक्षानें! आणि पुढें जरी मोक्षाच्या द्राविडी प्राणायामानें त्यांना भवचक्रांतून तुझ्या मनांतून सोडवावयाचें असलें, तरी त्या बिचाऱ्यांना या भवचक्रामध्यें घालावें, असें तरी तुझ्या मनामध्यें आधीं कां यावें! जे जीवात्मे मूळ स्वतंत्र आहेत किंवा नवीन उत्पन्न व्हावयाचे आहेत, त्या बिचाऱ्यांना आधीं या संसारसागरामध्यें बुडवून आणि त्यांतील त्रिविध तापांनीं तापवून मग त्यांना त्यांतून सोडवावयाचें कसें—कर्मानें, भक्तीनें किंवा ज्ञानानें, किंवा आणखी कशानें—ही नसती उठाठेव करीत बसण्यापेक्षां बिचाऱ्या स्वतंत्र आत्म्यांना (ते खरोखर स्वतंत्र असले तर) त्यांच्या स्वतंत्र अवस्थेमध्येंच तूं सुखानें नांदूं दिलेंस किंवा त्यांना अनुत्पन्न स्थितीमध्यें तूं राहूं दिलेंस, तर त्यांत तुझें कांहीं नुकसान होणार आहे काय? दुसऱ्यांना विनाकारण सव्यापसव्य करावयाला लाविल्यानें तुझ्या पदरांत काय पडणार आहे? तुझ्या मनांतून त्रिशंकूला वर चढवावयाचें असेल, तर तूं खुशाल तसें कर. पण तुझ्या एकट्याच्या या लहानशा अभिमानासाठीं तूं असंख्य जीवात्म्यांना ह्या चौऱ्यायशीं लक्ष योनींतून अनेक यातना भोगीत फिर-

ण्याला कां लावतोस ? दुसऱ्यांना दुःखांत घातल्यावांचून तुझें हें हित साधत नाहीं काय ? आणि सृष्टि उत्पन्न करण्याच्या योग्यतेचा जो पुरुष असेल, त्यानें दुसऱ्याच्या दुःखानें आपलें सुख साधावें, हें तरी योग्य आहे काय ? आतां त्रिशंकूला वर न्यावें, एवढा तरी तुझ्या ह्या नवीन सृष्टीचा हेतु आम्हांला दिसत आहे; परंतु या जुन्या सृष्टीच्या मुळाशीं काय हेतु होता, तो तर कोणालाही मुळींच कळत नाहीं. कोणत्याही बाजूनें विचार करून पाहिला, तरी या जुन्या सृष्टीच्या कर्त्याच्या ठिकाणीं कोणताही हेतु संभवूं शकत नाहीं. तेव्हां कोणताही आपला हेतु साधावयाचा नसतां या पहिल्या सृष्टीच्या कर्त्यानें या असंख्य जीवांना या भवचक्राच्या रहाट-गाडग्याभोंवतीं घिरट्या घालण्याला कां लाविलें आहे, हें आम्ही त्याला विचारलें असतें. परंतु तो कोठें सांपडतच नाहीं ! पण तो सांपडत नहीं तर नाहीं, पण तूं तरी निदान आम्हांला सांपडला आहेस; तेव्हां या आमच्या शंकांचें समाधान तूं करावेंस, म्हणून आम्ही तुझ्याकडे आलों आहों.

अशा प्रकारचा त्या महात्म्या ऋषिगणांच्या आणि तत्त्ववेत्त्यांच्या संभाषणांतील सारांश होता. तें त्यांचें संभाषण ऐकून आपण हातीं घेतलेल्या जगदुत्पत्तीच्या कार्याचा बिकटपणा किती आहे, याची विश्वामित्राला चांगली कल्पना आली. व अशा स्थितींत आतां आपण नवीन सृष्टि उत्पन्न करण्याला प्रवृत्त व्हावें किंवा त्यापासून परावृत्त व्हावें, या विचारानें त्याचें मन डळमळूं लागलें. परंतु इतक्यांत " धांव, धांव, विश्वामित्रा, पडलों रे पडलों ! " असे आकाशांतून त्रिशंकूचे शब्द त्याच्या कानावर पडले. त्याबरोबर तो विचाराचा द्वैधीभाव मनांतून पार नाहींसा होऊन त्याचे डोळे क्रोधानें फिरून लाल झाले, फिरून त्याचे ओठ त्वेषानें कंप पावूं लागले, आणि फिरून त्याच्या प्रतिज्ञेचा अभिमान त्याच्या अंगांत नखशिखान्त खेळूं लागून, त्याच्या तपश्चर्येचें प्रखर तेज त्याच्या नेत्रांतून बाहेर वाहूं लागलें, आणि तो त्या जमलेल्या सर्व तत्त्ववेत्त्यांवर चवताळून जाऊन म्हणालाः—

"मी तुमचें सगळें म्हणणें समजलों. पण मी आपल्या प्रतिज्ञेपासून कधींही परावृत्त होणार नाहीं, हें तुम्ही पक्कें लक्षांत ठेवा. माझ्या मार्गामध्यें कितीही अडचणी असल्या, तरी त्यांना भिऊन मी आपलें अंगीकृत कार्य कधींही सोडणार नाहीं. ज्या त्रिशंकु राजाला स्वर्गांत सदेह पाठविण्याबद्दल मी

वचन दिलें, त्याला अंतराळामध्यें खालीं डोकें आणि वर पाय अशा स्थिती-मध्यें लोंबत आणि खालीं कोसळत ठेवून मी एखाद्या कृमिकुर्वत प्राण्या-प्रमाणें स्वस्थ बसूं ? हा विश्वामित्र असें कधींही करणार नाहीं ! कितीही अडचणी असल्या, तरी मी दुसरी सृष्टि निर्माण करणारच ! आणि त्या अडचणींचीं हीं शाब्दिक जाळीं तुम्ही माझ्यापुढें कां पसरीत आहां, हेंही आतां माझ्या लक्षांत आलें. तुम्ही बहुतकरून त्या स्वर्गांतील देवांचे पृथ्वीवरील साथीदारच असलां पाहिजे ! आतां आपलें सर्व महत्त्व जातें, असें पाहून त्या देवांनींच बहुतकरून माझा तेजोभंग करण्याकरितां तुम्हांला माझ्याकडे पाठविलें असलें पाहिजे ! पण जा ! तुम्ही त्या आपल्या देवांना जाऊन सांगा कीं, विश्वामित्र आपल्या प्रतिज्ञेपासून एक लेशभर-देखील परावृत्त होण्याला तयार नाहीं. मी दुसरी सृष्टि निर्माण करण्याला जी सुरवात केलेली आहे, ती मी तशीच पुढें चालविणार ! आणि त्यांतील स्वर्गांत त्रिशंकूला सदेह नेऊन बसविणार ! या कामांत अडचणी आहेत, म्हणून तुम्ही मला सांगतां ! पण कसल्या अडचणी? तुमच्या सारख्या दुबळ्या माणसांना त्या अडचणी वाटल्या, म्हणून मी त्या अडचणींना भिऊं कीं काय? तुम्ही तत्त्ववेत्ते हे व्याकरणांतील कांहीं क्रियापदांप्रमाणें नेहमीं असेच अकर्मक असल्यामुळें तुमच्या अंगांत कर्तृत्व तर नसावयाचेंच, पण ज्या ज्ञानाची तुम्ही एवढी घमेंड मारीत असतां, तेंही तुम्हांला पूर्णपणें कळलेलें नसतें. तुम्हांला ज्या अडचणी वाटतात, त्यांचा मी आपल्या प्रयत्नानें आणि तपश्चर्येनें नाश करून टाकीन. प्रयत्न आणि तपश्चर्या मुख्य पाहि-जेत. प्रयत्नाला आणि उग्र तपाला कांहीं एक अशक्य नाहीं. पूर्वीं जीं जीं महत्कृत्यें झालीं, तीं तीं सर्व तपानेंच झालीं. फार काय, खुद्द पूर्वीची सृष्टिही तपानेंच झालेली आहे. " सोऽकामयत । बहुस्यां प्रजायेयेति । स तपोऽतप्यत । स तपस्तप्त्वा इदं सर्वमसृजत । यदिदं किंच । " ही तैत्तिरीय श्रुति हेंच सांगत आहे. आणि त्याच तपाच्या बलानें मी हेंही जगदुत्पत्तीचें कृत्य करीन ! एका तपानें सिद्धि झाली नाहीं, तर शंभर तपें करीन. पण मी आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें नवीन जग निर्माण करून त्यांतील स्वर्गांत त्रिशंकूला सदेह नेऊन बसविल्याशिवाय कधींही राहणार नाहीं !"

हे विश्वामित्राचे क्रोधाचे आणि निर्वाणीचे शब्द ऐकून त्या मानवी

तत्त्ववेत्त्यांना भय वाटलें असेल, यांत कांहींच सांगण्या गरखें नाहीं. कारण, त्या भाषणाच्या भयानें स्वर्गांतील देवही इतके कंपायमान होऊं लागले कीं, त्यांचे स्वर्गांतील आश्रय तुटून ते इंद्रादिक सर्व भूतलावर येऊन उतरले. ते पडलेले पाहून त्रिशंकूला जरा समाधान वाटलें, व तो विश्वामित्राच्या नांवानें ओरडण्याचा जरा थांबला, आणि हे जर आतां इतके खालीं पतन पावले आहेत, तर मग आपण हल्लीं जितके उंच आहों तितकेच असलों तरी कांहीं हरकत नाहीं, असेंही त्याल वाटूं लागलें. स्वर्गांतून खालीं उतरलेले सर्व देव इंद्राला पुढें करून विश्वामित्रासमोर आले, आणि त्याला नम्र-पणानें वंदन करून ते म्हणाले:—"हे विश्वामित्रा, आम्ही तुला शरण आलों आहों. तुझा महिमा आम्हांला माहीत आहे. तूं जें म्हणशील तें तपो-बलानें केल्याशिवाय कधीं रहाणार नाहींस, ही आम्हांला खात्री असल्या-मुळेंच आम्ही तुजपाशीं विनंति करण्याकरितां आलों आहों कीं, प्रतिसृष्टि निर्माण करण्याचा हा तूं आपला अभिनिवेश सोडून दे. तुला कांहीं कार्य-भाग करून घ्यावयाचा असेल, तर तो जर याच सृष्टीमध्यें सफळ करून घेतां आला, तर मग दुसरी सृष्टि निर्माण करून काय करावयाचें आहे? तुला त्रिशंकूला सदेह वर न्यावयाचें आहे, एवढेंच ना? त्याला आमची हरकत नाहीं. आम्ही तुझें म्हणणें मान्य करतों. त्रिशंकु हल्लीं नक्षत्रमंडळामध्यें वा-स्तव्य करीतच आहे. तेथें त्याला कायम राहूं दे. आम्ही त्याच्या वाटेस जाणार नाहीं. तेथें तो स्वर्गांत असल्यासारखाच आहे. तेथें तो स्वतेजानें सदो-दित चमकत राहील. आणि हीं जीं नक्षत्रें तूं याच्याकरितां निर्माण केलीं आहेस, तींही सदोदित त्याच्या साहचर्यानें वास्तव्य करतील." या देवांच्या म्हणण्याला त्रिशंकूनें आपली संमति दिल्यामुळें विश्वामित्रानें आपला आग्रह सोडला. आणि देवांना अभय देऊन स्वस्थानाप्रत जाण्याकरितां त्यानें त्यांना आज्ञा दिली. त्या वेळीं सर्वांना अतिशय आनंद झाला. स्वर्ग-लोकांत नानाप्रकारचीं वाद्यें वाजूं लागलीं. गंधर्व गायन करूं लागले. अप्सरा नृत्य करूं लागल्या. आणि स्वर्गंगेच्या शीतल तुषारांनीं हर्षपुलकित झालेल्या मंदारवृक्षांची पुष्पवृष्टि विश्वामित्राच्या मस्तकावर पडूं लागली!

———

REFBK-0002703